


# नागाव

## आर्थिक व सामाजिक जीवन

## १७६०-१८४०

शां. वि. आवळसकर

उत्तर कोकणच्या समुद्रकिनाऱ्यावरील बागायत-गावांपैकीं एका गावचा — नागाव — इ. स. १७६० ते १८४० या कालखंडांतील आर्थिक व सामाजिक जीवनाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या पुस्तकांत केला आहे. प्रकाशित ऐतिहासिक साधनांबरोबरच अप्रकाशित साधनांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला आहे. पुस्तकाचें स्वरूप संकलनात्मक व संशोधनात्मक असें उभयविध आहे.

आरंभीं राजकीय इतिहास पार्श्वभूमीदाखल सांगून गावची आर्थिक व सामाजिक परिस्थिति मांडली आहे. गाव ब्राह्मणवस्तीचा असल्यामुळें, त्या समाजाच्या परिस्थितीचा आढावा ठळक असला, तरी इतर जाती-जमातींच्या परिस्थितीचें चित्र रेखाटण्याचाही प्रयत्न केला आहे.

या पाहणींतून निघणारे कांही निष्कर्ष असेः- पेशवे उत्तरकालापासून कोकणच्या बागायत-गावांतून विभक्तकुटुंबपद्धति नांदत होती; सर्व जमिनीची मालकी सरकारची होती; निवळ बागायत किंवा निवळ शेतीवर तेथील शेतकरी जगूं शकत नव्हता; पण दोहोंच्या आधारें निर्वाह करणें त्यास शक्य होतें; कोकणची भातजमीन लोकांच्या निर्वाहास अपुरी असल्यामुळे, खारजमिनी निर्माण करण्याची गरज भासत राहिली; तेथील प्रजा नेहमींच अकिंचन असलेली दिसते; कोकणांतील पूर्वींच्या व आजच्या समस्यांचा तोंडवळा सारखाच दिसतो.

ऐतिहासिक काळांतील आर्थिक व सामाजिक ग्रामीण जीवनाचा एक अभ्यास या दृष्टीने या साधनग्रंथाचें महत्त्व आहे.

रु. १०·००

# ना गा व

आर्थिक व सामाजिक जीवन

(१७६०–१८४०)

शां. वि. आवळसकर

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणें ४
पॉप्युलर बुक डेपो, मुंबई ७

गोखले अर्थशास्त्र संस्था मराठी प्रकाशन आठवें

शांताराम विष्णु आवळसकर, १९०७–

© गोखले अर्थशास्त्र संस्था
पुणें ४

१९६२

ह्या पुस्तकाच्या प्रकाशनखर्चापैकी कांही रक्कम महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाकडून मिळाली आहे.

प्रकाशक : ध. रा. गाडगीळ, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणें ४
मुद्रक : मा. ह. पटवर्धन, संगम प्रेस (प्रा.) लिमिटेड, ३८३ नारायण पेठ, पुणें २

# पुरस्कार

या पुस्तकाचे लेखक श्री. शां. वि. आवळसकर आमच्या संस्थेंत आर्थिक इतिहास विभागांत इ. स. १९५९ पासून काम करीत आहेत. संस्थेंत येण्यापूर्वी अष्टागर व आंगरेकाल यांच्या इतिहासाचा अभ्यास ते अनेक वर्षें करीत होते. या अभ्यासाच्या आधारें त्यांनी नागावचा इतिहास लिहिण्याचें मनांत आणलें व तें काम बऱ्याच अंशीं पूर्ण केलें. आमच्या संस्थेंत रुजू झाल्यावर पेशवेदप्तरांत वारंवार जावें लागे; तेव्हा नागावच्या इतिहासास साहाय्यक असे कागद तेथे त्यांस शोधतां व तपासतां आले. यायोगे नवीन पूरक माहिती मिळून मराठेशाहीपुरता तरी वृत्तांत बराच अखंड जुळवितां आला.

पुस्तकाचा मोठा भाग श्री. आवळसकर यांनी संस्थेंत असतांना लिहिला. महाराष्ट्रांतील कोणत्याहि ग्रामाबद्दल संगतवार सामाजिक व अर्थव्यवहाराविषयीं भरपूर ऐतिहासिक माहिती देणारीं पुस्तकें फारशीं प्रकाशित नसल्यामुळे, हें प्रकाशन संस्थेमार्फत करण्याचें ठरविलें.

नागावबद्दल प्रकाशित व अप्रकाशित साहित्यांत जेवढी ऐतिहासिक माहिती उपलब्ध झाली, तेवढी संगतवार मांडण्याचा प्रयत्न पुस्तकांत केला आहे. या साहित्याची जुळणी लेखकाच्या विशिष्ट दृष्टिकोनांतून झाली असली, तरी ती शक्यतोंवर साधार व निर्दोष करण्याचा प्रयत्न केला आहे. यास पूर्णार्थानें सामाजिक अगर आर्थिक इतिहास म्हणतां येत नाही; कारण, असा इतिहास एका गावाबद्दल लिहावयाचा झाला, तरी समग्र प्रदेश आणि त्यांतील समाज यांचें स्वरूप व त्यांतील स्थित्यंतरें हीं नीट आकलन झाल्याखेरीज लिहितां यावयाचा नाही. तेव्हा, हें पुस्तक मूलतः महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक इतिहासलेखनाचें एक साधन म्हणून मानलें पाहिजे व याच अर्थानें हें प्रकाशित करीत आहोंत.

अशा प्रकारचें पुष्कळ साधनसाहित्य, विविधांगी व बहुरूपी, प्रसिद्ध झालें, म्हणजे सामाजिक व आर्थिक इतिहासप्रवाहांचें यथार्थ स्वरूप लक्षांत येऊं लागेल. या क्षेत्रांत कांही कामगिरी करण्याचें गोखले अर्थशास्त्रसंस्थेने योजलें आहे. याहि दृष्टीने श्री. आवळसकर यांच्या ग्रंथाचा समावेश आमच्या प्रकाशनांत करणें आम्ही योग्य मानतों.

—

गोखले अर्थशास्त्र संस्था,
पुणें ४
३० एप्रिल १९६२

ध. रा. गाडगीळ

# निवेदन

प्रस्तुत पुस्तकांत ' नागाव ' या एका खेडेगावाची राजकीय, सामाजिक व आर्थिक माहिती एकत्र दिली आहे. ज्या गावाला राजकीय महत्त्व नव्हतें, धार्मिक अगर तीर्थस्थानाचें मोठेपण नव्हतें, युद्धभूमि म्हणून ऐतिहासिक धारातीर्थाची योग्यता नव्हती, नाक्याचें अगर सरहद्दीवरचें स्थान म्हणून थोरवी नव्हती, जें केवळ एक खेडें होतें व जेथील लोकांचा बागायत व शेती करणें एवढाच प्रमुख व्यवसाय होता, अशा एका गावाची ही ऐतिहासिक कालांतील पाहणी आहे व त्याच दृष्टीनें या पुस्तकाकडे वाचकांनी पाहावयाचें आहे. नागाव हें कोंकणच्या समुद्रकिनाऱ्यावर असलेल्या नारळ-सुपारीच्या बागायती गावांचें एक प्रतिनिधि गाव म्हणून निवडून त्याची पाहणी केली आहे; त्याचें स्वरूप सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

या पुस्तकासाठी जीं साधनें वापरलीं आहेत त्यांचें स्वरूप सांगणें जरूर आहे. प्रस्तुत लेखकानें ज्या ' अष्टागरां ' त नागाव आहे, त्या भागांत इतिहास-संशोधनार्थ बराच काल घालविला व अलीबाग तालुक्यांत गावोगावीं उपलब्ध झालेले कागद पाहिले. चौल येथें अधिकारी या आड-नांवाचें एक पांचकळशी माळी जमातीचें घराणें नांदत आहे. इ. स. १५०० पासून या घराण्यास प्रतिष्ठा प्राप्त झाली. अष्टागरांत होत असलेल्या सर्वविध घडामोडींची नोंद करणें, सामाजिक स्वरूपाच्या कागदांच्या नकला करून ठेवणें, राजसत्तेला न्यायनिवाड्यांबाबत आपल्या दप्तरांतून कागदी पुरावा दाखल करणें, इत्यादि कामें त्याला सतत, सरकारआज्ञेनेच करावीं लागलीं. सदर घराण्याचें ' अधिकारी दप्तर ' दृष्टिक्षेपांत आल्यावर प्रस्तुत लेखकानें तीं साधनें पाहिलीं, जरूर वाटलीं तीं नकललीं व संस्कारपूर्वक, अनेक ग्रंथांच्या रूपानें प्रकाशित केलीं. त्यांपैकी (१,२) शिवचरित्रसाहित्य, खंड ९ व १०, (३) आंगरेकालीन पत्रव्यवहार व (४) आंगरेकालीन अष्टागर या चार पुस्तकांचा, हें पुस्तक तयार करतांना, फार उपयोग झाला. विशेषत: ' आंगरेकालीन अष्टागर ' या पुस्तकांत अधिकाऱ्यांच्या ऐतिहासिक रोजनिशींतील ठळक नोंदी क्रमवार घेतल्या असल्यामुळे, त्या पुस्तकाचा विशेष उपयोग झाला.

यांशिवाय, अष्टागरांत हिंडून जे इतर कागद नकलले, त्यांचा येथें उपयोग केला आहे. हें झालें स्थानिक संशोधन व स्थानिक प्रसिद्ध झालेल्या साधनांबाबत.

पुण्यास पेशवेदप्तरांत ऐतिहासिक साधनांचे जे रुमाल ठेविलेले आहेत, त्यांत ब्रिटिश सर-कारनें जेवढें आंगरेदप्तर हातीं लागलें, तेवढें सगळें ठेवलें आहे. त्या दप्तरापैकी अनेक रुमालांतून माहिती नकलून घेऊन तिचा येथें उपयोग केला आहे. पेशवे दप्तरांतून माहिती नकलून घेण्यास सरकारची परवानगी घ्यावी लागते; ती संशोधकास मिळते. या दप्तरांत महाल नागावबद्दल तीन स्वतंत्र रुमाल आहेत ते तर पाहिलेच; शिवाय, कांहीं विशिष्ट वर्षांचे कागद पाहावयाचे असें ठरवून अनेक रुमाल पाहिले व कागदांच्या नकला केल्या.

अशा तऱ्हेनें ' आंगरेसरकारचें दप्तर ' पाहून झाल्यावर, ' कोंकणजमाव ' म्हणून पेशवे-दप्तराचा जो भाग आहे, तोहि नजरेखाली घातला व जरूर वाटले ते कागद नकलले. ' जमाव ' दप्तर आंगऱ्यांचें नव्हे; त्यांतील कागद ब्रिटिशांनी लोकांकडून जमवलेले असून ते पेशवेदप्तरांत ठेवलेले आहेत.

' आंगरेदप्तर ' व ' कोंकणजमाव ' या दोहोंबद्दल एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. हीं

दोन्ही दप्तरें संपूर्ण नाहीत. आगीच्या अनर्थांतून जे वांचले व त्यांतले ब्रिटिश अधिकाऱ्यांना जेवढे कागद मिळाले, तेवढे कागद येथे आहेत. आंग्र्यांचें दप्तर कुलाबा किल्ल्यांत व वरसोली येथे लालबाग राजवाड्यांत असे. या दोन्ही ठिकाणीं अनेकदा आग भडकून दप्तर नष्ट झाल्याच्या नोंदी ' आंगरेकालीन अष्टागर ' मध्ये प्रस्तुत लेखकाने दिल्या आहेत. त्या आगींत हजारो कागद नष्ट झाले. अधिकाऱ्यांच्या दप्तरासहि अग्नीचा उपसर्ग लागला होताच. नागाव येथेहि, कांही वेळां, असें ' अग्नये स्वाहा ' झालें आहे. सारांश, उरलेल्या साधनांचा येथे उपयोग केला आहे. त्यामुळे मजकुराचें अनुसंधान, क्वचित् तुटलें आहे.

दप्तरें विस्कळीत होण्यास आणखीहि कांही कारणें घडलीं आहेत. अधिकारी दप्तराचेंच उदाहरण देतां येईल. हें दप्तर इ. स. १९२० नंतर तीन संशोधकांच्या पाहाण्यांत आलें. (१) धुळयाचे कै. शं. श्री. देव यांनी त्यांतून कांही पोतीं कागद नेले व ते आता धुळयास पडून आहेत. कै. देवांना छत्रपति शिवाजी व रामदासस्वामी यांबद्दल संशोधन करावें असें आटत होतें व त्या विषयापुरते कागद जमविणें हें त्यांचें उद्दिष्ट होतें. त्यामुळे त्यांनी बाकीचे कागद फारसे पाहिले नाहीत. (२) कै. य. रा. गुप्ते हे अलीबाग तालुक्यांत सब्-रजिस्ट्रार असतांना त्यांनी या दप्तरांतून बरेच कागद नेले व स्वतःच्या संग्रहांत त्यांची भर टाकली. त्यांचे दृष्टीसमोर प्रभुमंडळी, बडी साहेबीण, धाकटा शिवाजी या व्यक्ती प्रामुख्याने होत्या. त्यामुळे त्यांनी आपल्या विषयास अनुलक्षून साधनें निवडलीं. (३) प्रस्तुत लेखकास सदर दप्तर इ. स. १९४० मध्ये प्रथम किलकिलें व नंतर उघडें झालें. कोंकणचा सर्वविध इतिहास अभ्यासणें हें उद्दिष्ट असल्याने, प्रस्तुत लेखकाने उरलेल्या दप्तरांतून सर्व प्रकारचीं साधनें निवडलीं व त्यांतील मजकुराच्या आधारें चारपांच खंड प्रसिद्ध केले; पण अजून बरेच कागद अप्रसिद्ध स्वरूपांत उरले आहेत.

तीन संशोधकांच्या हातीं लागलें, तेंहि पुरें दप्तर नव्हेच ! सदर दप्तर ब्रिटिश राजवटीच्या आरंभीं कसें उध्वस्त झालें, याची नोंद ' आंगरेकालीन अष्टागर ' यांत आली आहे. तीन संशोधकांना जेमतेम एक-पंचमांश दप्तर पाहावयास मिळालें व त्याचे प्रत्येकीं तीन हिस्से झाले. ज्याला जेवढें प्रसिद्धीस योग्य वाटलें, तेवढें प्रत्येकाने उचललें. उरलेलें दप्तर तेथेच होतें; तें दोन वर्षांपूर्वीं वाळवीच्या भक्ष्यस्थानीं पडून कायमचें नष्ट झालें असलें, तरी या दप्तरांतील कोंकणविषयक महत्त्वाचे बहुतेक सर्व कागद वांचले ही महाराष्ट्रेतिहासावर ईश्वरी कृपा होय.

आजवर संशोधकांतील कांहींनी कागद जमविण्याचेंच काम प्रमुखत्वें केलें. कांहींनी ते कागद संस्कारपूर्वक प्रसिद्ध केले व कांहींनी त्या कागदांच्या आधाराने इतिहासाचें सूत्र सांगितलें. साधनें जमवणें, संस्कारपूर्वक प्रसिद्ध करणें व इतिहासाचें सूत्र सांगणें हें काम नागावबाबत प्रस्तुत लेखकाकडून बव्हंशीं एकहातीं झालें आहे. त्यामुळे, इतरांच्या परिश्रमांची जोड या पुस्तकास फार थोडचा प्रमाणांत लाभली आहे; आरंभापासून अखेरपर्यंत जवळ जवळ सर्व काम एकहातीं झालें आहे.

' शिवकालीन पत्रसारसंग्रह ' या शीर्षकाखालीं पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाने शिवकालीन ऐतिहासिक साधनांचें तीन खंडांत संकलन केलें आहे. त्यांचा उपयोग नागावचा शिवकालीन राजकीय इतिहास देण्यास बराच झाला. कुलाबा गॅझेटियरचा उपयोग पुष्कळ झाला आहे. अन्य साधनग्रंथांचा उपयोग केला, तोहि जागजागीं नमूद केला आहे.

अष्टागरांतील कमवंतांची हकीकत श्री. ग. दा. टिल्लू यांच्या पुस्तकाच्या आधारें दिली असली, तरी सदर पुस्तकांत प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांचें मूळ अलीबाग येथे प्रस्तुत लेखकाने काळजीपूर्वक पाहिलें आहे. श्री. टिल्लू यांच्या पुस्तकांत कांही किरकोळ चुका आढळल्या; पण त्यांचा दिलेल्या हकीकतीशीं संबंध नाही.

जुन्या जमान्यांत कागदांचे अनेक प्रकार मानलेले असत. पेशवेदप्तरांतून नकललेल्या सुमारें शंभर कागदांचा उपयोग या पुस्तकांत केला आहे. त्यांचे प्रकार :

(१) हिशेब जमा वसूल बाकी, (२) हिशेब जमाखर्च, (३) हिशेब एकंदर सज्या, (४) हिशेब ऐनजिन्नस, (५) तेरीज आकार नेमणूक, (६) तेरीज एकंदर जमा वसूल बाकी, (७) तेरीज ऐनजिन्नस भात, (८) ताळेबंद, (९) ताळेबंद झडती, (१०) ताळेबंद बागायत आकार, (११) बद्दल देणें खेरीज मुशाहिरा, (१२) दफाते पत्रें, (१३) कौलनामा, कौल, अभयपत्र, (१४) कमावीस जमाखर्च, (१५) कमावीस पाटदाम, (१६) अजमास जकाती, (१७) अजमास नक्त, (१८) यादी, (१९) यादी ठराव जकात, (२०) यादी लग्नटक्का, (२१) यादी पाटदाम, (२२) पट, (२३) टिपण जकाती, (२४) जाबता इनामखर्च, (२५) जाबता देवस्थानें, (२६) जाबता धर्मादाय, (२७) सिलकबंद महाल पोतां, (२८) नजर, (२९) जमा जकात, (३०) जमा महालानिहाय परभारें, (३१) जमा दरीबा भंडारी खूम, (३२) मिठागर मांडवें, (३३) चिठी, मसाला, (३४) विडी, (३५) आज्ञापत्र, (३६) नेमणूक महाल नागाव, (३७) ठरावपट्टी (३८) मसुदा, (३९) आकार बागायत, (४०) सनद, (४१) धर्मादाय श्रावण मासाभिषेक, इत्यादि. या प्रकारांत आर्थिक स्वरूपाचे विविध कागद आले असून कांही धार्मिक व सामाजिक स्वरूपाचे आहेत व ते नागावच्या इतिहासाचें दिग्दर्शन करतात, परंपरा सांगतात.

या पुस्तकांतील भाषेबद्दल थोडें लिहिलें पाहिजे. जुन्या काळांत देशांतील आर्थिक, सामाजिक इत्यादि सर्वविध व्यवहार प्रांतिक भाषांतून चालत होते. जेव्हा जरूर भासली, तेव्हा नवे अर्थवाही शब्द प्रचारांत आले, शब्दांवांचून अडलें नाही. प्रत्येक शब्द कांही कल्पना अगर विचार मनावर बिंबविण्याच्या सामर्थ्यासह जन्मास येत असतो. त्याचा योग्य वापर केला म्हणजे थोडक्यांत बराच अर्थ वाचकास प्रतीत करून देतां येत असे. इंग्रजी झाल्यावर राज-दरबारी व्यवहारांतून प्रांतिक भाषा मागे पडल्या व अर्थवाही शब्दहि मागे पडून कालांतराने ते अनोळखी झाले. त्यामुळें बरेच शब्द आज दुर्बोध होऊन बसले आहेत. असे जुने कांही शब्द या पुस्तकांत वापरले आहेत. जुन्या काळांतला सामाजिक, आर्थिक इतिहास सांगतांना जुने सुटसुटीत शब्द कटाक्षपूर्वक टाळून त्यांऐवजी स्पष्टीकरणाची लांबलचक शब्दावलि वापरणें प्रस्तुत लेखकाच्या प्रकृतीस मानवेना म्हणून अनेक जुने शब्द लेखनांत येणें अपरिहार्य झालें. असे शब्द वाचकांस समजावेत म्हणून जागजागीं त्यांचा स्पष्टार्थ दिला आहे. शेवटीं शब्दकोश दिला आहे; त्यायोगें असे शब्द व त्यांचे अर्थ एकत्र पाहावयाची शक्य तेवढी सोय केली आहे.

शब्दांचे अर्थ देतांना शब्दकोशांचा वापर केला आहे. मराठींत जास्तींत जास्त शब्दांचे अर्थ देणारा शब्दकोश श्री. दाते व कै. कर्वे यांचा आहे; पण तोहि अपुरा पडतो. सदर कोशकारांच्या आटोक्याबाहेरचे अनेक शब्द प्रस्तुत लेखकाने उपयोगांत आणलेल्या साधनांतून आढळले. त्यांचे अर्थ देण्याचा येथे प्रयत्न केला आहे. अर्थ देतांना प्रा. ग. ह. खरे, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणें, यांचा उपयोग झाला. प्राध्यापक खरे अनेक भाषा चांगल्या जाणतात व त्यांतील ऐतिहासिक साधनांचा सुस्पष्ट अर्थ लावूं शकतात; एवढें सांगितलें म्हणजे त्यांच्या मदतीचें मोल कळून येईल.

प्रस्तुत पुस्तकांत एका गावाची, ऐंशीं वर्षांची सामाजिक व आर्थिक पाहणी आहे. पाहणींतून कांही निष्कर्ष निघतात; तसे येथेही कांही निष्कर्ष निघाले आहेत. अर्थात्, ते कोंकणपुरतेच मर्यादित आहेत. त्यांतील कांही निष्कर्ष असे.

(१) कोंकणांतील बागायती खेड्यांत पेशवे–उत्तरकालापासून विभक्त कुटुंबपद्धति दृष्टीस पडते. तेथे एकत्र कुटुंबपद्धति हा अपवाद होय. बाप व मुलगे आपल्या हयातींतच वेगळे राहतांना

दिसतात; भावांचीं घरें वेगळीं असा प्रकार दिसतो. (२) कोंकणांत दूधदुभतें पुरेसें नसे. म्हशी, बल घाटावरून आणावे लागत अगर कोंकणांत हेडी उतरत, त्यांतून खरेदी होई. आज तोच क्रम चालू आहे; याचें कारण कोंकणचें हवामान व निकस गवत हें होय. (३) सरकार जमिनीचे मालक होतें व कसणारा कूळ होता. (४) खाऱ्या भातजमिनी लागवडीस आणणें म्हणजे 'खारी बांधणें' हा कोंकणच्या रहिवाश्यांचा व सरकारचा नित्याचा क्रम होता. त्यायोगें मर्यादित जमिनी वाढवून वाढतें पीक काढणें हें सत्ताधारी व प्रजा यांचें उद्दिष्ट होतें. (५) कोंकण निसर्गदृष्टचा श्रीमंत असला, तरी कोंकणांतल्या माणसास अगर सत्तेस आर्थिक दृष्टया सधनता प्राप्त झाली नाही. (६) खारजमिनींप्रमाणे मिठागरें बांधणें, मीठ पिकविणें हा कोंकणांत वाढीस लागूं शकेल असा एक व्यवसाय होता.


सर्वच निष्कर्ष येथे दिले नाहीत; कांही केवळ दिग्दर्शित केले आहेत. हे व इतर निष्कर्ष सत्य कीं भ्रामक हें ठरविणें जाणकार वाचकांचें व विचारवंतांचें काम आहे; लेखकास त्यांबद्दल अभिनिवेश नाही.

ज्या संशोधकांच्या संशोधनाचा या पुस्तकांत उपयोग केला आहे, त्यांचे आभार मानणें कर्तव्य आहे. पेशवेदप्तर ज्यांच्या ताब्यांत आहे, त्या अधिकारी वर्गाच्या सौजन्यामुळे प्रस्तुत लेखकास अनेकविध असंशोधित इतिहास-सामग्री मिळूं शकली; त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच होतील. प्रा. ग. ह. खरे यांचें ऋण प्रकट करणें व आभार मानणें प्रस्तुत लेखकाचें कामच आहे. या पुस्तकांत नागावचा नकाशा दिला आहे. पूर्वपरिचय व ऋणानुबंध जाणून श्री. व्ही. एस्. म्हापणकर, अलीबाग, यांनीं तो करून दिला. त्यांचा मी आभारी आहें.


**शां. वि. आवळसकर**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | पुरस्कार | (३) |
| | निवेदन | (५) |
| १ | राजकीय घडामोडी | १ |
| २ | मुलकी कारभार | १४ |
| ३ | व्यावसायिक आणि त्यांवरील कर | ४० |
| ४ | बागायत | ४३ |
| ५ | पावसाळी व हिवाळी पिकें | ६७ |
| ६ | वतनदार | ८० |
| ७ | न्यायनिवाडे | ८३ |
| ८ | ब्राह्मणसमाज | ९५ |
| ९ | मंदिरें व पुष्करिणी | १२७ |
| १० | नागावें—विविध | १४० |
| | परिशिष्ट | १४३ |
| | व्यक्तिस्थलसूची | १४७ |
| | संदर्भग्रंथसूची | १५१ |




नागावचा परिसर


नागाव

# राजकीय घडामोडी

**स्थान**—उत्तर कोंकणांत, समुद्रकिनाऱ्यावर , अलीबाग हें तालुक्याचें ठिकाण १८°–३९" अक्षांश आणि ७२°–५७" रेखांशांवर वसलें आहे. मुंबईच्या दक्षिणेकडे किनाऱ्यानें जाऊं लागलें म्हणजे आपण अलीबागजवळ येतों. आंग्र्यांचें राहण्याचें ठिकाण झाल्यापासून तें महत्त्वाचें गाव झालें.

अलीबागच्या दक्षिणेस सुमारे तीन मैलांवर, आपला वर्ण्यविषय असलेलें नागाव समुद्रकिनाऱ्यावर वसलें आहे. त्याचे उत्तरेस व पूर्वेस साखरची खाडी आहे. दक्षिणेसही समुद्राचें पाणी भरतीच्या वेळीं पसरून नागावास पूर्वी बेटाचें स्वरूप प्राप्त होई; पण आता त्याच्या दक्षिण व पूर्व बाजूंस एवढे बदल झाले आहेत, की पूर्वी नागाव पूर्णपणें बेट होतें, ही गोष्ट आता चटकन् ध्यानांत येत नाही. नागावचे दक्षिणेस सुमारे सहा मैलांवर इतिहासप्रसिद्ध चौल हें बंदर वसलें आहे. पूर्वेस सुमारे चार मैलांवर बामणगांव, बेली, गोठी, बेलकडे इत्यादि लहान खेडीं असून त्यांचे पूर्वेस सागरगडचा डोंगर व किल्ला आहे. सागरगडचें पूर्वीचें नांव खेडेदुर्ग असून शिवाजी राजांनीं तो आपल्या ताब्यांत आणल्यावर त्यास हें नवें नांव दिलें, असें मानतात.

हीं खेडीं व नागाव यांचे दरम्यान खाऱ्या जमिनी पसरलेल्या आहेत. भरतीच्या वेळीं साखरच्या खाडींत खारें पाणी प्रवेश करतें व एरवी कोरडया असलेल्या नागावच्या पूर्वेकडील भागांत तें थोडा वेळ थोडया प्रमाणांत पसरतें. आता खाऱ्या पाण्याचें हें आक्रमण अत्यंत मर्यादित झालें असून भातशेतीच्या प्रदेशाचा विस्तार झाल्याचें आढळून येतें.

**अष्टागर**—अलीबाग तालुक्याच्या किनारपट्टीवरील गावांना अष्टागर अशी पूर्वापार संज्ञा आहे. कांहींच्या मतें अष्टागर हा शब्द व्युत्पत्तीचे दृष्टीनें 'अग्रहार' या शब्दाचे अपभ्रष्ट रूप आहे. मध्ययुगीन इतिहासांत ब्राह्मणांना गाव अग्रहार दिल्याचे उल्लेख ताम्रपटांतून येतात. पण आठ गावांचा हा प्रदेश कोणा ब्राह्मणांस अग्रहार दिल्याचा पुरावा अजून पुढे आलेला नाही. त्यामुळे ही व्युत्पत्ति मान्य करवत नाही. कांहींच्या मतें, समुद्रकिनाऱ्यावरील आठ आगरगावांचा समुदाय सूचित करण्यासाठी या शब्दाची योजना झाली आहे. ही व्युत्पत्ति पटण्याजोगी आहे. १ रेवदंडा, २ चौल, ३ नागाव, ४ अक्षी, ५ वरसोली, ६ थळ, ७ किहीम आणि ८ आवास हीं तीं आठ गावें होत.

ही आठ गावांची यादी इ. स. १८६७ मध्ये लिहिलेल्या 'माझ्या प्रवासाची हकीकत' या पुस्तकाचे आधारें सांगितली; पण ती बरोबर नसावी. कारण, चौल व रेवदंडा अशीं दोन वेगळीं गावें पूर्वी नव्हतीं. चौल या मोठया शहराच्या तीन पाखाडया वेगळया पडून त्यांचें रेवदंडा हें गाव प्रामख्यानें पोर्तुगीझांमुळे वसलें, असा त्या गावच्या स्थापनेचा इतिहास आहे.[1] अष्टागर हा शब्द रेवदंडा हें स्वतंत्र गाव बनण्यापूर्वीचा आहे. तेव्हां, चौल-रेवदंडा एक गाव समजून सासवनें या गांवाचा उल्लेख सदर यादींत नागावकर मंडळी करतात, तें युक्त वाटतें. 'अठागर' शब्द सन १३६७ च्या नागाव येथील शिलालेखांत स्पष्ट आहे व तो 'अष्टागर' चा अपभ्रंश आहे हें उघड आहे. नागाव अष्टागरांत मोडतें याबद्दल एकवाक्यता आहे.

**प्राचीन इतिहासाचा अभाव**—उत्तर कोंकणांतील अनेक स्थलांना पुरातन कालापासून

---

१ शिवसाखं. ९ ले. ३, पृ. ३.

इतिहास आहे. उदाहरणार्थ, अष्टागराच्या एका टोंकास असलेल्या चौलचा प्राचीन इतिहास बऱ्याच अंशीं उपलब्ध आहे. तेथें बौद्धांनी अपूर्णावस्थेंत टाकलेल्या लेण्यांचे अवशेष आढळतात. उपलब्ध साधनांवरून सुमारें सव्वादोन हजार वर्षांचा चौलचा इतिहास संकलित करतां येईल. उत्खननाचे योगानें प्राचीन इतिहासाची अधिकहि उपलब्धि होऊं शकेल. नागावच्या पूर्वेस सागरगडच्या डोंगरांतही बौद्ध लेणीं आढळून आलीं आहेत. तेव्हा अष्टागराच्या कांही भूप्रदेशांत प्राचीन कोंकणचा इतिहास घडला आहे व त्याचें स्वरूप ज्ञात आणि अज्ञात असें उभयविध आहे. पण नागावला मात्र तितका प्राचीन इतिहास नाही; कारण, नागावच्या भूमीची रचना बरीच अलीकडील असावी. कोंकणच्या किनाऱ्यावर तीन प्रकारचा प्रदेश आढळतो ; (१) सह्याद्रीच्या रांगांवरून सागराचें दर्शन घेत असलेला डोंगरउताराचा प्रदेश. हा प्रदेश सह्याद्रीबरोबर जन्मास आला; अर्थात् तो पुरातन आहे. या भागांत प्राचीन कालीं इतिहास घडल्याचें बौद्ध लेण्यांमुळे ध्यानांत येतें. सह्याद्रीचे कांही फाटे समुद्रांत बुडाले असून त्यांचीं शिखरें तेवढीं वर राहिलीं आहेत; असा प्रदेशहि यांतच अंतर्भूत होतो. उदाहरणार्थ, राजपुरीचा किल्ला आणि खांदेरी व उंदेरी हे जंजिरे होत. पण हीं शिखरें बंदिस्त झाल्यानंतर, तटबंदीच्या आंत तेथील इतिहासाची घडण होऊं लागली; म्हणून हीं बेटें जुनीं, पण इतिहास नवा आहे. (२) समुद्रांतील वाळूचे थर व सह्याद्रीवरील गाळानें घडविलेलीं बेटें. कोंकण किनाऱ्यावरील नारळसुपारीच्या बागा असलेला सगळा प्रदेश या प्रकारांत मोडतो. रेवदंडा, दिवेआगर, बालवटी, हरिहरेश्वर, बागमांडलें, आडें, पाडलें, आंजलें इत्यादि कितीतरी ग्रामप्रदेश असा आहे की त्यावर घडलेला इतिहास अतिप्राचीन असूं शकणार नाही; कारण हा प्रदेश तयार होण्याची प्रक्रिया अलीकडे सुमारे दीड हजार वर्षांत सुरू झाली. हा प्रदेश प्रथम किनाऱ्याजवळ बेटांचे स्वरूपांत निर्माण झाला व आस्ते आस्ते मुख्य भूमीशीं संलग्न झाला. या प्रदेशाचें वैशिष्ट्य असें की त्यांत टेकड्या नसतात; सर्व जमीन सपाट असते. तिची समुद्रसपाटीपासून उंची १५–२० फुटांहून अधिक नसते व तींत समुद्रांतील वाळूचा व चुन्याचा अंश फार मोठ्या प्रमाणांत असतो. नागाव या प्रकारांत मोडणारें गाव आहे. (३) सह्याद्रीचा पायथा व समुद्राच्या खाड्या यांच्या आसऱ्यानें तयार झालेलीं खाजणें व त्यांत मानवी प्रयत्नांनी बनवलेल्या खाऱ्या भातजमिनी, हा तिसरा प्रकार होय.

**नागाव 'बेटा'चा उल्लेख** — इ. स. १५३०–३१ मध्ये पोर्तुगीझांनी चौल 'मारलें' आणि पश्चिम किनाऱ्यावर राजनैतिक व धार्मिक आक्रमणास प्रारंभ केला.[1] चौलचे शेजारीच नागाव असल्यानें, तें पोर्तुगीझांच्या दृष्टिक्षेपांत यावेळीं प्रथम आलें. इ. स. १५३८ मध्ये डी. कॅस्टो या पोर्तुगीझ प्रवाशानें लिहिलें आहे कीं नागाव हें बेट असून चौलपासून एक लीग म्हणजे तीन मैलांवर आहे. कोंकणच्या मुख्य भूमीपासून तें पाव फर्लांग ( a gunshot ) अंतरावर असून दरम्यान जी खाडी आहे, तींतून लहान होड्या वल्ह्यांवर चालतात.[2] यांतील सत्याचा पडताळा आजहि येतो. नागावच्या पश्चिमेस समुद्र, उत्तर व पूर्वेकडील कांही भागांत खाडी, असें स्वरूप आज कायम आहे. पूर्वेकडील उरलेल्या भागांत खाऱ्या भातजमिनी आहेत. नागाव हें लांबच लांब आणि अरुंद असें बेट होतें व गेल्या चारशें वर्षांत त्याचें स्वरूप बदललें असून आता तें बेट नाही. नागावांत हिंडत असतां आढळून येतें की नागावची भूमि मूलतः एक बेट नसून अनेक बेटें सांधून सलग झाली असावी. भर पावसाळ्यांत पाणी साचूं लागलें, म्हणजे नागावला आजहि अनेक बेटांचें तात्पुरतें स्वरूप प्राप्त होतें.

**मूळ नांव** — नागावचें मूळ नांव नागग्राम असावें. भारतांत नागपूर, नागोठणें इत्यादि

१ आं. अ. १     २ कुर्ग. पृ. ३५१

अनेक नावें ' नाग ' शब्दाने प्रारंभ झालेलीं आहेत. उत्तर कोंकणांतील अनेक गावांचें नांव ' नागाव ' आहे. तेव्हा, प्रस्तुत नागाव ध्यानीं येण्यासाठी अक्षी-नागाव असा दोन गावांचा जोड उल्लेख नेहमीं येतो. नागावांतील एका वाडींत नागांच्या आकृति खोदलेले अनेक दगडहि आहेत. त्यांचा व ग्रामनामाचा निश्चित संबंध काय, हें सांगतां येत नाही.

**मुसलमानपूर्व इतिहास**— नागावांतील श्रीभीमेश्वर मंदिराजवळ पूर्वी एक शिलालेख उभा होता. पेशवेकालांत जेव्हा त्या मंदिराची दुरुस्ती करण्यांत आली, त्या वेळीं सदर शिलालेख मंदिराच्या पायरींत बसविण्यांत आला. शिलेची लांबीरुंदी अनुक्रमें दोन फूट चार इंच व एक फूट सहा इंच आहे. कै. राजवाडे यांच्या मतें सदर लेख शके १२८९ म्हणजे इ. स. १३६७ मधील आहे. तो यादवकालीन मराठींत असून मजकूर २८ ओळी आहे. कै. राजवाडे यांनी त्याचा ठसा ग्रंथमाला, वर्ष ५ वें मध्ये प्रसिद्ध केला आहे. संपूर्ण लेखाचें वाचन जसें कै. राजवाड्यांनी केलें, तसें तें डॉ. मो. गं. दीक्षित व डॉ. शं. गो. तुळपुळे यांनीहि केलें आहे. पण या तीन संशोधकांचें वाचनाबाबत एकमत नाही. (डॉ. दीक्षित व डॉ. तुळपुळे यांचे लेख प्रसिद्ध व्हावयाचे आहेत). सदर शिलालेख प्रथम ' Bulletin of the School of Oriental Studies, London, Vol. V मध्यें प्रसिद्ध झाला; असो.

त्यांचे मतभेद बाजूस ठेवून आपणांस एवढें निश्चित म्हणतां येतें की इ.स. १३६७ च्या सुमारास ठाणें येथें श्रीमत् प्रौढप्रताप चक्रवर्ति महाराजाधिराज श्रीहंबीरराव हा राजा राज्य करीत होता; नागाव त्याचे राज्यांत मोडत होतें. अठागर हा शब्द तेव्हां रूढ होता. हंबीरराव हा आपणांस कोंकणचा राजा म्हणवितो. नागाव येथें आगरें म्हणजे नारळ-सुपारीच्या बागा होत्या. त्या वेळीं द्राम हें नाणें अष्टागरांत चालत होतें. शिलालेखांत कवळचा, दातार, म्हातारे (महातारे, म्हात्रे) पाटील हीं आडनांवें व कोतलवाडी, चोरलेवाडी, पठिआरवाडी हीं वाड्यांचीं नांवें आलीं आहेत. या शिलालेखास राजनैतिक इतिहासाचे दृष्टीनें महत्त्व आहे, पण त्याचा श्रीभीमेश्वराशीं कांही संबंध नाही.

उपरिनिर्दिष्ट शिलालेखापासून एक मैल अंतरावर पूर्वेस, एका वाडींत दुसरा शिलालेख होता. तो लेखहि देवनागरींत आहे; पण अत्यंत जीर्ण झाला असल्याने त्याचें वाचन करणें अशक्य झालें आहे.[१] पहिल्या शिलालेखाच्या आधारानें म्हणतां येईल की नागावची वास्तु इ. स. १३५० च्या सुमारास लोकवस्तीनें भरभराटलेली असली पाहिजे. तेथे नारळसुपारीच्या बागा असल्या पाहिजेत.

## मुसलमानी सत्ता

अष्टागरावर विजयनगरच्या राजांचा अंमल होता कीं नाही व असल्यास किती काळ होता, याबद्दल स्पष्ट विधान करतां येणार नाही. पण आदिलशाही व निजामशाही सत्ता अष्टागरांत आलटून पालटून झाल्या होत्या. इ. स. १६०४ ते १६३० या कालांत, चौल सोडून बाकीचें अष्टागर मलिकंबराने निजामशाहीस जोडलें. पण इ. स. १६३७ मध्ये मोगलांनी निजामशाही नष्ट केल्यावर तें दिल्लीच्या शहाजहांन बादशहाच्या ताब्यांत गेलें. हा बादशाही अंमल नाममात्र होता. तत्पूर्वी कांही काल शहाजी या प्रदेशांत निजामशहाच्या नांवाने अधिसत्ता गाजवी. आपल्या राज्यास हा प्रदेश जवळ; तेव्हा तो आपल्या ताब्यांत असावा, अशा बुद्धीने, खंडणी देण्याच्या अटीवर आदिलशहाने शहाजहानकडून आपणाकडे मागून घेतला.[२]

---

१ कुर्ग. पृ. ३५१, ३५२ २ कुर्ग. पृ. १४३

## मुसलमानी सत्तेचें स्वरूप

चौलच्या सुभ्यांत नागाव मोडत असे. तेथील मुसलमानी सत्तेच्या स्वरूपाची कल्पना 'आंग्रेकालीन पत्रव्यवहार' लेख पहिला वरून येते. तेथ प्रस्तुत लेखकाने म्हटलें आहे की चौलचा सुभेदार सामान्यपणें तीन वर्षांनी बदले. त्याचा सर्व कारभार जमीनदारांच्या व वतनदारांच्या सल्लामसलतीने चाले. सारावसुली जमीनदारांच्या रुजुवातीने होई. दरवर्षी पीक पाहणी करावयाची व मग साऱ्याचा ठराव म्हणजे संचणी करावयाची, अशी पद्धति तेथे नव्हती; म्हणजे, शेतसाऱ्यांत दरवर्षी बदल होत नव्हता. जहाजफर्मावीस म्हणजे गलबतांवरील कर, वेठ, बेगार इत्यादि जाचक कर नव्हते. सुभ्याचे महाल पाडलेले होते; त्यांत नागांवचा महाल अंतर्भूत झाला होता. सर्व महालांचा जमीनधारा सुभ्याचे ठिकाणीं जमा करण्याची रीत असल्यानें, नागावचा महसूल रोख रकमेच्या रूपाने चौल येथे जमा होई. इ. स. १५७७ मधील एका लेखांत म्हटलें आहे की चौलच्या मुसलमान सुभेदाराने पायपोसपट्टी, नाजीरपट्टी, राखनुकसानपट्टी, सादिलवारपट्टी, देशमुखपट्टी इत्यादि अनेक कर प्रजेवर लादण्याचा विचार केला.

या करांचें स्पष्टीकरण येथेच पाहूं या. राजाचे अगर अधिसत्तेचे म्हणून कांही कर लादण्याची पूर्वापार पद्धति होती. राजाने चांभारांवर पायपोसपट्टी आकारण्याची रीत होती. पायपोस म्हणजे जोडा. पण राज्यांतल्या सर्व चांभारांकडून पायपोस जमा होऊं लागले, तर अनवस्था प्रसंग व्हावयाचा; म्हणून नक्त म्हणजे रोख पैशांत ही पट्टी वसूल करण्याची रूढि पडली. नाजीरपट्टी म्हणजे पाहणी किंवा रक्षण करण्याबद्दल घेतलेला कर. प्रत्येक गावांत कांही उत्सव होत असत; त्यांचा व धर्मादाय वगैरे आगंतुक खर्च भागविण्यासाठी सादिलवारपट्टी बसविण्याची रीत असे. हा कर ज्या त्या ठिकाणचा खर्च भागविण्यासाठीं बसवीत असत. प्रत्येक महालांत नक्त जमाबंदीवर शेंकडा सात व धान्यावर शेंकडा तीन इतका एक कर बसवीत; त्यास देशमुखपट्टी असें नांव होतें. पूर्वी हे कर अन्यत्र आकारले जात असले, तरी चौल सुभ्यावर म्हणजे नागावादि महालांवर आकारण्याची पद्धति नव्हती व मुसलमान सुभेदाराने, प्रथमच ते आकारण्याचें जेव्हा निश्चित केलें, तेव्हां अष्टागरांतील सर्व महालांचे लोक एकत्र जमले. त्यांनी ठरविलें की या करांस रूढीचा आधार नाही; तेव्हा ते आपण द्यावयाचे नाहीत. आपली एकजूट व्हावी व टिकावी, म्हणून त्यांनी एक समापत्र म्हणजे 'संमतिपत्र' तयार केलें; नागावचे लोकहि या एकजुटींत सामील झाले.[१] यावरून दिसतें की नागांवच्या प्रजेस मुसलमानी अंमल अमान्य नव्हता; पण जुलूम सहन करण्याचा दुबळेपणाहि तिचेमध्ये नव्हता. शिवाय, राजधानीपासून म्हणजे मुख्य सत्ताकेंद्रापासून दूर असलेल्या प्रदेशांत थोडें सैलपणाने वागणें अधिकाऱ्यांसहि भाग असल्याने, अशा विरोधाच्या वेळीं माघार घेऊन अधिकारी स्वस्थ बसत.

गाव म्हटलें म्हणजे त्यांत वतनदार, मानकरी असावयाचेच. इ. स. १६१२ मधील अस्सल कागदांत नागावचा हरि वर्तक हा वतनदार उल्लेखित झाला आहे.[२] बागायती गावांत 'वर्तक' असावयाचाच. सध्याच्या बेलिफाचें जें काम असतें, तशा स्वरूपाचें काम वर्तक करी. ग्रामपंचायतीचे ठराव अमलांत आणणें वर्तकाचें काम असे. गावच्या वतनदारांची यादी समजली, म्हणजे गावाचें स्थान, आकारमान, भरभराट इत्यदि कितीतरी गोष्टींचा अजमास लागतो, आणि वतनदारांचा अभाव म्हणजे गावाचें बाल्य असेंही समजून येतें. इ. स. १६६३ पर्यंत नागावांत वतनदार कुलकर्णी असल्याचें अगर कुळकर्ण्याच्या वतीने एकादा यादी नेमल्याचें आढळून येत

१ शिचसाखं ९, ले. ९ २ शिचसाखं. ९, ले. २५

नाही.[१] म्हणजे, हा कालपर्यंत नागावला स्वतंत्र दप्तर ठेवण्याची गरज उत्पन्न झाली नव्हती, कारण तें विस्तारलेलें आणि भरभराटलेलें गाव झालें नव्हतें.

**शिवकालीन नागाव** — इ. स. १६६२ मध्ये अष्टागराचा बराचसा भाग शिवाजीनें आदिलशहापासून घेतला; त्यांत नागाववर त्याची सत्ता प्रस्थापित झाली.[२] आण्णाजी दत्तो सुभेदार झाला व त्यानें तेथें जमीनधाऱ्याची बिघावणीची पद्धति सुरू केली. भारतांत राजा तोडरमल्ल, मलिकंबर आणि आण्णाजी दत्तो हीं तीन माणसें जमीनमहसुलाची पद्धति निर्माण करणारीं म्हणून प्रसिद्ध आहेत. पैकी राजा तोडरमल्लानें अकबराच्या काळांत घालून दिलेली पद्धति उत्तरभारतांत रूढ झाली. तेथें महसूलपद्धति घालून देणें जमिनीच्या सपाटीमुळे व सारखेपणामुळे बरेंच सोपें होतें.

पण कोंकण आणि घाटावरच्या प्रदेशांत ज्यांची सत्ता पसरली, त्यांना आपल्या प्रदेशांत महसुलाची पद्धति घालून देणें भौगोलिक परिस्थितीमुळे बरेंच अवघड होतें. शिवाजीच्या कोंकणच्या व घाटावरच्या प्रदेशांत ही अवघड कामगिरी आण्णाजी दत्तोने पार पाडली. कोंकणच्या जमिनींत अव्वल, दूम, सीम हे सपाट प्रदेशांत जिरायतीपरत्वें पाडावयाचे जमिनीच्या मगदुराचे प्रकार आहेतच; पण डोंगरउताराची, खारी, खस्ती, मुरमाड, धुळपट, दरवट इत्यादि आणखी प्रकार आहेत. ते सर्व आण्णाजी दत्तोने ध्यानांत घेतले व जमिनीची प्रतवारी केली. चौल सुभ्यांतील सर्व जिराईत जमिनी मोजल्या व त्यांचें उत्पन्न ठरविलें. नागावबद्दल असें म्हणतां येईल की त्यानें सरकारी महसुलाचा नक्त व ऐनजिनसी धारा ठरविला. सर्व जमीन बिघ्यांत मोजली. तदनुसार महाल नागावचें नक्त महसुलाचें उत्पन्न ७४३।≈ लारी ठरलें. एकूण जिराइतो जमीन १७१ बिघे १४।। पांड भरली, व तिचें ऐनजिनसी कराचें उत्पन्न ८० खंडी, ९।।। मण व १।। पायली इतकें ठरलें. जमिनीची मोजणी काठीस काठी लावून होत होती.[३] गांवचें एकंदर क्षेत्र मोजलें जात असतांना प्रत्येक कुळाकडे असलेल्या जमिनीची बिघावार मोजणी झाली. गावचे वतनदार—खोत, पाटील इत्यादींनी कुळांच्या सरकारदेण्याबाबत गुंता उत्पन्न करूं नये, अशीही व्यवस्था करण्यांत आली. महालोमहालीचे जमीनदार व महालकरी यांच्या अनुमतीने लिहिण्याचें काम देशपांडे यांनी कुळकर्णी ठेवून करावें असें ठरलें.

कुळकर्णी नेमला म्हणजे त्याच्या वेतनाचा प्रश्न आला. तेव्हा, सरकारमहसुलाच्या जमेवर कुळकर्णी याचें वेतन आकारून वसुली व्हावी, असें मराठी सत्तेनें ठरविलें. गावकुळकर्ण्याचें वेतन ९६ लारी असें शिवाजी राजांनी ठरविलें. हेंच नागावच्या कुळकर्ण्याचें शिवकालीन वेतन होय. कुळकर्ण्यानें गावचें लिहिणें करावयाचें व दप्तर सांभाळावयाचें असें ठरलें. कुळकर्ण्याची जागा शक्यतों वंशपरंपरा करण्याचें राजांनी मान्य केलें.[४]

इ. स. १६६४ मध्य शिवाजीचा सरसुभेदार आबाजी महादेव याने अष्टागरांतील प्रत्येक तप्यास म्हणजे महालास वतनदार कुळकर्णी नेमले. नागावचा कुळकर्णी तत्पूर्वी नेमला होता. त्यास वेतनादाखल नक्त ऐवज मिळे; पण ऐनजिनसी वेतनाची जोड नसल्यामुळे कुळकर्ण्याचें भागत नव्हतें. एकूण, नागावच्या व महालाच्याही कुळकर्ण्यांची स्थिरता बराच काल झालेली दिसत नाही. इ. स. १६९३ मध्ये रघुजी कुळकर्णी नागावचा कुळकर्णी म्हणून काम पहात असलेला दिसतो.[५] आंगऱ्यांची कारकीर्द अष्टागरांत सुरू झाल्यावर कुळकर्ण्यास महालांतून नक्त वेतनाबरोबर ऐनजिनसी उत्पन्न मिळण्याची सोय झाली व नागाव महालाचा वतनदार कुळकर्णी कायम झाला.[६]

---

१ शिचसाखं. ९, ले. ५०
२ कुर्गे पृ. १४४, १४५
३ उकोंर नं. १७४, पृ. २००
४ उकोंर नं. ५०६, पृ. १९२, १९३
५ शिचसाखं ९ ले. ८१
६ आंप ले. ३०

जोंपर्यंत चौलचें बंदर आणि बागायत शिवाजी राजांच्या ताब्यांत आलें नव्हतें, तोंवर इतर प्रदेश ताब्यांत येऊन तादृश लाभ नव्हता. इ. स. १६६८ नोव्हें. १६ या दिवशीं शिवाजीनें चौल घेतलें.[१] म्हणजे, इ. स. १६६९ च्या आरंभीं शिवाजी उत्तरकोंकणच्या समुद्रकिनाऱ्याचा मालक झाला. पांचसात वर्षें तशींच गेलीं. इ. स. १६७६ च्या डिसेंबरमध्ये, शिवाजीचा वकील म्हणून प्रसिद्ध असलेला नारायण शेणवी आणि मोरोपंत पिंगळे हे दोघे चौल येथे हिशेब तपासून व्यवस्था लावण्यास आले.[२] इ. स. १६७७ मध्ये शिवाजीने आपले कायदेकानू व आपली कारभाराची पद्धति नागावांत सुरू केली.[३]

शिवछत्रपतींच्या कालांत नागावांत वस्ती बरी असली पाहिजे. इ. स. १६७४-७५ मधील स्थायिक लोकांत पुढील नांवें आढळतात—१ विसोबा महाजन, २ कृष्णाची लोंढा, ३ राम वर्तक, ४ हरबा पाईक, ५ अंतोबा बहिरव ठोसर, व ६ नारो बाबाजी कुंटे. यांपैकी ठोसर हे कऱ्हाडे ब्राह्मण आहेत. महाजन, लोंढे, कुंटे हे कोंकणस्थ ब्राह्मण असून वर्तक हे क्षत्रिय माळी आहेत. वर्तक व महाजन वतनदार आहेत. ठोसर बागायतीचा व्यवसाय करीत. कुंटे बागायतदार असून सावकारी करीत. सामाजिक व्यवहारांत खरेदी, विक्री, गहाणखतें, त्यांवर साक्षीदारांच्या सह्या हा सर्व प्रकार शिवकालांत चालूच होता.[४] नागाव येथे कांही पोर्तुगीझ पूर्वी स्थायिक झाले होते. त्यांनी वाड्यांची खरेदीविक्री केल्याचे कांही कागद उपलब्ध झाले आहेत. मराठी राज्यांत नागाव समाविष्ट झाल्यावर पोर्तुगीझ तेथून निघून गेले.[५]

मुसलमानी सत्ता जाऊन अष्टागरांत मराठी सत्ता निर्माण झाल्यावर शिवाजीने आपले नामजाद म्हणजे नेमणुकीचे लोक ठेविले; सुभे, तपे कायम केले. वसूल ऐनजिनसी आणि रोख अशा स्वरूपांत घेण्यास सुरुवात केली. शिवाजीच्या या पद्धतीचें मर्म असें की जीं माणसें किल्ले-महालांतून नोकरीवर असत, त्यांचेसाठी हा ऐनजिनसी वसूल शिवाजीस उपयोगी पडे. गडकोटांवर असलेल्या दास्तानांत वसुलीच्या वेळीं गल्ला साठवीत. नेमलेल्या लोकांस वेतनाचे पोटीं दरमहा अडिसेरी देत. त्यायोगें, अस्वस्थतेच्या कालांत सरकारी नोकर क्वचित् लुटला गेला, तरी त्याच्या योगक्षेमाची चिंता उरत नसे. कारण, नक्त रकम लुटली जाते; गल्ला सहसा लुटला जात नाही. ज्या वेळीं शिवाजीने या गोष्टी रूढ केल्या, त्याच वेळीं काथलचुडी,‡ जहाजफर्मास, वेठबेगार या गोष्टी त्याने अष्टागरांतील आपल्या प्रजेवर लादल्या[६] आणि प्रजेने त्या मुकाट मान्य केल्या; कारण शिवाजीची सत्ता रायगडवरून म्हणजे जवळून चालत होती.

**खांदेरीचें प्रकरण** — नागाव आणि साखरची खाडी अंमलाखाली आणल्यावर शिवाजीनें कुलाबा, खांदेरी आणि पद्मदुर्ग असे तीन पाणकिल्ले बांधण्यास प्रारंभ केला. त्यायोगाने पोर्तुगीझ, इंग्रज व जंजिऱ्याचा शिद्दी या पाणसत्तांस काबूत आणण्याचें व उत्तरकोंकणांत आपली सागरी सत्ता निर्माण करण्याचें त्याचें धोरण उघड झालें. खांदेरी किल्ल्याची घटना नागावचे इतिहासाचे दृष्टीने महत्त्वाची आहे. खांदेरीमुळें नागावला जास्त सुरक्षितता आली आणि नागावामुळे खांदेरी व कुलाबा यांची उभारणी झाली; म्हणून खांदेरी प्रकरणाचा थोडक्यांत परामर्श घेतला पाहिजे.

नागावपासून सुमारें सात मैलांवर आणि मुंबईपासून सुमारें अकरा मैलांवर खांदेरी आणि

---

१ शिपसासं १-१२३० | २ शिपसासं २-१८८५
३ शिचसाखं ९, ले. ५६ | ४ आंदरु नं. ६३७, पृ. ११५,११६
५ अप्र. कागद | ६ आंपले १

‡ हा कर कोणता हें स्पष्ट होत नाहीं. तर्क करावयाचा, तर काथ्या व भाताचा पेंढा असा मूलतः अर्थ असावा. या दोन्ही वस्तूंची सरकारांत जरुरी असे व त्या ऐनजिनसी कराचे रूपानें घेत.

उंदेरी हीं दोन बेटें मुंबई बंदराच्या प्रवेशद्वारासारखीं दिसतात. मुंबईहून मलबार किनाऱ्यावर वाहतुक करणाऱ्या गलबतास खांदेरीजवळून जावें लागत असल्यामुळे, मुंबईकर इंग्रजकंपनीस असें वाटे की तें आपल्या ताब्यांत असावें. खांदेरीपासून केवळ अर्ध्या मैलावर पूर्वेस उंदेरी बेट आहे, खांदेरी उंच व आकाराने मोठें असल्यामुळे, तटबंदी करून मजबूत केल्यास तें आपल्या सोयीचें होईल, अशी कल्पना सर्वच सत्तांस होती; पण त्याचा ताबा घ्यावा, तटबंदी करावी व वर शिबंदी ठेवावी, अशी निकड इ. स. १६७९ पर्यंत कोणासच वाटली नाही.

इ. स. १६७० मध्ये शिवाजीचें लक्ष या बेटांकडे गेलें. त्याचा मुख्य पाणशत्रु जंजिऱ्याचा शिद्दी असून त्यांचे हर्षामर्षाचे प्रसंग अनेकदा उद्‌भवत होते. आपल्या दोघांच्या संघर्षांत इंग्रज पडणार नाहीत असें जोपर्यंत शिवाजीस वाटत होतें, तोपर्यंत शिवाजीनेहि या बेटांस तटबंदी करून शिबंदी ठेवण्याचा विचार मनांत आणला नाही. पण इंग्रजांचा स्वभाव उचापत्या आहे व ते शिद्दीस कधी पावसाळी वादळांच्या निमित्ताने, कधीं त्याची आर्थिक परिस्थिति तंग झाली म्हणून, आपणाशीं बाह्यतः सख्य असूनही आश्रय देतात, असें स्पष्ट दिसून आल्यावर शिवाजीने जास्त लक्ष पुरविण्याचें ठरविलें. शिद्दीचा बंदोबस्त जंजिऱ्यांतच करण्याच्या उद्देशाने त्याने जंजिऱ्याजवळ पद्मदुर्ग उर्फ कांसा किल्ला बांधला. शिवाजीने अभिमानाने म्हटलें आहे की जंजिरे राजपुरीच्या उरावर पद्मदुर्ग ही दुसरी राजपुरीच उत्पन्न केली आहे! पण एवढ्या एका उपायाने भागणार नव्हतें.

इ. स. १६७० च्या अखेरीस, वेढा घालण्याच्या, हल्ला करण्याच्या सर्व साहित्यानिशी व खणण्या-उकरण्याचीं साधनें व चाळीस दिवस पुरेल इतक्या रसदेनिशी शिवाजीचे तीन हजार लोक आरमारासह नागावच्या खाडींत आले; नोव्हेंबर २८ रोजीं हें आरमार खांदेरीकडे वळलें व पाहणी करून तीन दिवसांनी परतलें.[१] इ. स. १६७१ सप्टेंबर ९ या दिवशीं इंग्रजांनी पत्रद्वारें प्रथम जाहीर केलें की आपल्या मुलखाजवळ एक किल्ला बांधण्याचा शिवाजीचा विचार आहे! इ. १६७२ एप्रिल २२ रोजीं इंग्रज लिहितात की शिवाजी हेन्रीकेन्रींवर म्हणजे खांदेरीउंदेरीवर तटबंदी करणार![२] पण पुढील सहा वर्षांत कांहीच घडलें नाही.

शके १६०१,* भाद्रपद गौरीच्या मुहूर्तावर म्हणजे इ.स. १६७८ ऑगस्ट १४ या दिवशीं शिवाजीने खांदेरीस पाया घातला.[३] व नागाव–खांदेरी प्रकरणास प्रारंभ झाला. शिवाजीच्या उपक्रमास विरोध करणें जरूर आहे, अशी भाषा मुंबईकरांच्या २७ ऑगस्ट १६७९ च्या पत्रांत आहे. शिवाजीने किल्ले बांधण्याचें साहित्य व माणसें चौल येथें जमविलीं. हे किल्ले बांधल्यावर शिवाजी आपणांस सागराच्या पृष्ठभागावर भारी होईल असें वाटून मुंबईकरांनी एक छोटें आरमार तयार ठेवलें.[४] शिवाजीच्या आज्ञेनुसार खांदेरीचें काम सिद्ध करण्याकरिता माया नाईक १५० लोक व ४ तोफा घेऊन खांदेरीजवळ आला असतां, इंग्रजांच्या टेहळणी करीत असलेल्या गलबतांवरून निरोप आला की त्याने बेट सोडून तावडतोब निघून जावें! माया नाइकाने तें साफ नाकारलें.

खांदेरीपासून थळ गाव जवळच आहे. तेथून माया नाइकास मदत मिळूं नये, म्हणून त्याचा किनाऱ्याशीं असलेला संबंध तोडण्यासाठी मुंबईकरांचीं तीन गलबतें थळच्या किनाऱ्याशीं नांगरून

१ शिपसासं २–१३५५, १३६२ २ शिपसासं २–१४०९, १४६६
३ आंब ३, आंश ३, कुर्गे पृ. ३२५, BS ३० ४ शिपसासं २–२११८

* मूळ कागदांत शके १६०० दिला आहे, पण येथें शके १६०१ पाहिजे; म्हणजे पुढील तारखा व काल यांशीं मेळ बसतो. नाहीतर, एक वर्षभर काय चाललें होतें, याचा उलगडा होत नाही. BS ने शके १६०१ च दिला आहे.

पडलीं.[१] पण अनेक ठिकाणांवरून येणारें मराठ्यांचें साहित्य आडवणें इंग्रजांस अशक्य होऊन बसलें. तेव्हा, 'हें बेट आपल्या म्हणजे इंग्लंडच्या राजाचें आहे व त्यावर आक्रमण करण्याचा शिवाजीला हक्क नाही,' असें सांगण्याचें इंग्रजांनी ठरविलें आणि हंटर नांवाची आपली लढाऊ बोट खांदेरीभोवती सतत ठेवून दिली.[२]

शिवाजीचीं चारशें माणसें खांदेरीची तटबंदी रचीत होतीं. ६ सप्टेंबर १६७९ पर्यंत तीन फूट उंचीचा तट त्यांनी उभारला आणि वर चढून येण्याच्या सर्व वाटा पूर्णपणें रोखल्या. नंतर नाक्याच्या जागीं ४।६ तोफा उभ्या करून बेटावरच तोफांचे नवे गाडे तयार करण्यास त्यांनी प्रारंभ केला.[३]

**पहिली चकमक**— इतके दिवस माया नाईक एकटाच, संरक्षण व देखरेखीचें काम करीत होता. ११ सप्टेंबर रोजीं दर्यासारंग दौलतखान आरमाराच्या लहानशा काफल्यासह खांदेरीच्या रोखानें येत असल्याचें इंग्रजांस समजलें. तेव्हा, आरमारी मुकाबला करून हें काम बंद पाडलेंच पाहिजे असें इंग्रजांनी ठरविलें. १५ सप्टेंबर रोजीं इंग्रजांचें आरमार युद्धासाठी तयार होऊं लागलें; त्यांत रिव्हेंज, हंटर व कांही नामवंत गलबतें होतीं. इंग्रजांनी शिवाजीशीं उघड विरोध जाहीर केला व ता. १९ रोजीं खांदेरीजवळ युद्धास प्रारंभ केला; पण त्यांत त्यांचा पराभव झाला.[४] पुन्हा ६ ऑक्टोबर रोजीं, खांदेरीस वेढण्यासाठी इंग्रजांचें दुसरें आरमार मुंबईहून रवाना झालें. त्यांत सहा मोठीं लढाऊ व अनेक लहान गलबतें होतीं. कॅप्टन केग्विन यास मुख्याधिकार देण्यांत आला. २०० गोरीं माणसें लढाईंत कष्ट मेहनत करणार होतीं. या आरमाराची तमा न बाळगतां, दौलतखान वीस गलबतांसह खांदेरीकडे पुन्हा वळला; त्याने किल्ल्यावर भरपूर रसद पोहोंचविली व तो नागावकडे परतला. इंग्रजी आरमार मात्र खांदेरीजवळ रेंगाळत राहिलें.[५]

**दुसरें झुंज**— ता. १८ रोजीं मराठ्यांचीं ४०।५० गलबतें नागावच्या खाडींतून बाहेर पडलीं व त्यांनी इंग्रज आरमाराची गाठ घेतली. प्रथम मराठी आरमार थळच्या किनाऱ्यापर्यंत वल्ह्यांवर आलें व त्याने 'रिव्हेंज'वर हल्ला चढविला. इंग्रजांचीं ५।७ गलबतें पाडाव झालीं. कॅप्टन केग्विनचा पराक्रम आणि 'रिव्हेंज'ने दिलेली झुंज यांमुळेंच केवळ, इंग्रजांचा सपशेल पराभव झाला नाही. मराठी आरमार आपल्या लुटीसह नागावच्या खाडींत परतलें. त्याशीं पुन्हा मुकाबला करतां यावा, म्हणून इंग्रजी आरमार खाडीच्या तोंडाशीं टेहेळणी करीत राहिलें.[६]

ऑक्टोबर १९ ते २३ या दिवसांत इंग्रज-मराठ्यांच्या रोज चकमकी झडत होत्या. मराठी आरमार पहाटच्या मतलय वाऱ्यावर नागावच्या खाडींतून बाहेर पडे; खांदेरीवर तोफा, दारू-गोळा, रसद इत्यादि साहित्य पावतें करी व परत येऊं लागे. वाटेंत इंग्रजांनी गाठलें, म्हणजे एखादी टक्कर देऊन तें आपल्या मुक्कामास परत येई. पण एकदा सणसणीत सामना दिल्याशिवाय इंग्रजांची रवरव बंद होणार नाहीं, हें मराठ्यांनी जाणलें होतें. आगामी चकमकीसाठी मराठ्यांनी फार सुंदर डाव टाकला. ता. २० ऑक्टोबर रोजीं मराठी आरमारांतील तेरा गलबतें खांदेरीच्या आसऱ्यास जाऊन राहिली, त्यांवर इंग्रज केव्हातरी हल्ला करणार, हें निश्चित होतें. त्यावेळीं इंग्रजी आर-मारास गाठण्यासाठी मराठ्यांच्या आरमाराचा दुसरा काफला नागावच्या खाडींत तयार होऊन राहिला. दोन्ही ठिकाणीं मिळून पन्नास लढाऊ गलबतें इंग्रजांची वाट पहात राहिलीं.

इंग्रज अधिकाऱ्यांस या परिस्थितीची कल्पना आली. त्यांनी मुंबईस स्पष्ट कळविलें की

१ शिपसासं २–२१२१
२ शिपसासं २–२११९, २१२०
३ शिपसासं २–२१२२, २१२३
४ शिपसासं २–२१२६, २१२८, २१३१
५ शिपसासं २–२१३६, २१३७, २१४१
६ शिपसासं २–२१४३, २१४४

शिवाजीच्या लोकांशीं सागरी युद्धांत टक्कर देणें आमच्या सामर्थ्यापलीकडील आहे. त्यांनीं मनांत आणलें, तर ते मुंबई बंदरावरही हल्ला करून अनवस्था प्रसंग निर्माण करूं शकतील ! तेव्हां, पोर्तुगीझ व शिद्दी यांची मदत तरी मिळवा, अगर हें प्रकरण मिटवा[१] !

**तिसरा लढा.** नोव्हेंबर १७ रोजीं मराठी आरमाराने इंग्रज आरमारावर हल्ला केला. मराठी आरमाराची रचना चंद्रकोरीसारखी असून नंतर दोन्ही टोकांनी वर्तुलाकृति वळून इंग्रज आरमारास कडयांत कोंडावयाचें, असा व्यूह होता. या कड्यांत इंग्लिशांचें 'डोव्ह' हें लढाऊ गलबत सापडलें. वीस युरोपियन व अनेक देशी माणसें दौलतखानाने पकडलीं व विजय संपादित केला. ही बातमी मुंबईस कळतांच तेथे चिंतेचें वातावरण निर्माण झालें. डिसेंबर २४ रोजीं मुंबईकर इंग्रजांचें स्पष्ट मत झालें की खांदेरीवरील शिवाजीची सत्ता मजबूत झाली असून तें ठिकाण घेणें आपल्या सामर्थ्यापलीकडील आहे.[२] त्यांनी या प्रकरणांतून यशस्वी माघार घेण्याचा निर्णय घेतला. चौलचा सुभेदार आण्णाजी (दत्तो ?) याच्या मध्यस्थीने १६ जानेवारी १६८० रोजीं पक्का तह होऊन युद्ध थांबलें व खांदेरीवर मराठ्यांची सत्ता कायम झाली; तीस इंग्रजांनी बिनतक्रार मान्यता दिली.[३]

हा इतिहास थोडक्यांत अशाकरिता दिला की नागाव प्रत्यक्ष रणक्षेत्र नसलें, तरी त्याचा आरमारी तळ म्हणून मराठ्यांनी उपयोग केला, त्याचें महत्त्व समजावें. नागावची सुरक्षित खाडी शेजारीं नसती, तर खांदेरी आणि कुलाबा हे किल्ले मराठ्यांच्या हातीं राहाते ना; आणि हे किल्ले नजीक नसते, तर नागाव आणि एकूण अष्टागराचें संरक्षण होतें ना. आरमारी युद्धाचीं हीं दोन ठाणीं आणि नागाव यांचा, शिवकालांत असा अन्योन्याश्रय संबंध होता.

**शिवोत्तर काल** :—शिवाजी राजांच्या मृत्यूमुळे पोर्तुगीझ, शिद्दी व मोगल बादशाहा यांना अपूर्व संधि मिळून महाराष्ट्रांत शत्रु जोरावले व इ. स. १६८३ पासून अष्टागराच्या नशिबीं युद्धविषयक आपत्ति आल्या. संभाजीने पोर्तुगीझ व शिद्दी यांच्या निमित्ताने चौलवर जो हल्ला केला, तो निष्फळ ठरून मराठ्यांची सत्ता अष्टागरांतून उठल्यासारखी झाली. त्यामुळे इ. स. १६८६ पर्यंत तेथे गोंधळ उडवून देणें शिद्दीस शक्य झालें. या वर्षी शिद्दीने चौल लुटलें. इ. स. १६८७ पासून संभाजी तेथे पुन्हा स्थिरस्थावर करतो न करतो तोंच, १६९० च्या आरंभीं चौलच्या सुम्यांत औरंगजेबाची फौज शिरून सात महिनेपर्यंत तळ देऊन बसली.[४] सारांश, इ. स. १६८० ते १६९० चा नागावचा इतिहास विविध आपत्ति आणि परचक्र यांमुळे निर्माण झालेल्या संकटांचा कथाभाग होय. इ. स. १६८९ मध्ये शिद्दी याकूतखानाने कुलाब्यास वेढा घातला. याच कालांत चौलचा राजकोट, नागावच्या पूर्वेस असलेला सागरगड यांवरही स्वाऱ्या होतच होत्या व राजकीय स्थित्यंतरें घडत होतीं.[५]

**आंगऱ्यांच्या सत्तेचा उदय** — या आपत्तींतून कान्होजी आंगऱ्यांचा उदय झाला. इ. स. १६९७ मध्ये कान्होजीने तळकोंकणांतले मोगल व शिद्दी यांचे पुंडावे मोडले; पोर्तुगीझांस काबूत आणलें व 'महाराष्ट्रधर्मा'ची पुन्हा स्थापना करून आपणांभोंवतीं कर्तबगार मंडळींची प्रभावळ निर्माण केली.[६] इ. स. १६९९ त त्याने शिद्दी, पोर्तुगीझ व चौलचा मोगल सुभेदार यांचा पराभव करून

---

१ शिपसासं २–२१४७, २१४९, २१५१, २१५४

२ शिपसासं २–२१७५, २१७८, २१८५, २१८७, २२०२

३ शिपसासं २–२२०८ २२१०, २२११, २२१५, २२१९, २२२९

४ शिचसाखं ९ ले. ६९, ७०, ७७; रामराम भाग ४२ ले. ६३, ६६; आंज ८.

५ आंज ११; आंश पृ. ४

६ आंज १२; इति. मं. १८३५ पृ. १६५

नागावच्या पूर्वेस असलेला सागरगड जिंकला व नागांवचा महाल आपल्या सत्तेखाली आणला.[१] आणखी दहाबारा वर्षांत त्याची सत्ता अष्टागरांत स्थिरावली. इ. स. १७०६ मध्ये त्याने अलीबाग-जवळ वरसोली येथे शिद्दीवर आणि १७०८ मध्ये सागरगडाजवळ पोर्तुगीझांवर विजय मिळविले. पुन्हा इ. स. १७१० मध्यें नागावपासून केवळ तीन मैलांवर बामणगांव येथे पोर्तुगीझांचा जंगी पराभव करून तो सर्व अष्टागराचा धनी झाला व नागावचा प्रदेश पुन्हा मराठी सत्तेखाली नांदूं लागला.[२]

वरील विधानास पोषक असा एक कागद उपलब्ध आहे. इ. स. १७१४ मध्ये कान्होजी आंगरे सरखेल अष्टागरावर सत्ता चालवीत होते; पण त्यांनी शाहूची अधिसत्ता मान्य केली नव्हती. तेव्हा कोल्हापूरकर छत्रपतींनीं त्यांस एक पत्र पाठवून कळविलें की वैजनाथ बिन रंगभट ज्योतिषी हे सत्पात्र ब्राह्मण आहेत; त्यांनी कसबे नागाव येथील जुवेकरांचें बागायत खरेदी केलें आहे. तें बागायत सदर ज्योतिषांस कुलबाब कुलकानु इनाम करून दिलें आहे. तें, पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें त्याजकडे चालवावें.[३] कोल्हापूरकरांची अधिसत्ता नष्ट होऊन शाहूचें स्वामित्व आंगऱ्यांनी मान्य केलें, तत्पूर्वीचा हा कागद आहे. मध्यवर्ती मराठी सत्ता अतिशय क्षीण झाली असतांना मोगली मगरमिठी सोडविण्याचे प्रयत्न अनेकांनी चालविले; त्यांत आंगऱ्यांना कोकणांत प्रथम स्थान होतें. आंगरे व इतर मराठे सरदार यांत एक ठळक भेद निर्माण झाला. आंगऱ्यांना अनेक सागरी सत्तांविरुद्ध उभा दावा करावा लागला; इतरांस फक्त मोगली सत्तेशीं जमिनीवर टक्कर द्यावयाची होती. आंगऱ्यांना समुद्रांत व समुद्राशेजारीं जमिनीवर, दोन ठिकाणीं लढत द्यावी लागत होती. त्यामुळे त्यांस अनेक वर्षे उसंत मिळाली नाही. कान्होजीने शून्यांतून मराठी सागरीसत्ता नागावच्या परिसरांत, तीन पाणशत्रूंना साक्ष ठेवून निर्माण केली !

**आंगरे व पोर्तुगीझ** — आंगऱ्यांचें उत्तर कोंकणांतील सत्तास्थान नागावजवळ कुलाबा येथे निर्माण झालें. कुलाब्याच्या आरमारी ठाण्यावर जेव्हा पोर्तुगीझ, इंग्रज व शिद्दी या तीन सत्तांची वक्रदृष्टि झाली, व युद्धजन्य परिस्थिति निर्माण झाली, तेव्हा नागावच्या शांत वातावरणांत अस्वस्थता उत्पन्न होण्याचा धोका प्राप्त झाला. इ. स. १७२१–२२ मध्ये सियोर विजरेल व आंतोन कडदिन हे पोर्तुगीझ अधिकारी गोव्याहून आरमार घेऊन कुलाब्यावर स्वारी करून आले. त्यांनी आपल्या आरमाराचा तळ अलीबागजवळ वरसोली येथे दिला. आंगऱ्यांच्या मदतीस बाजीराव पेशवा व सरदार पिलाजी जाधव सैन्यासह आले. त्यांनी व आंगऱ्यांनी पोर्तुगीझांचा पराभव केला. झालेलें युद्ध नागावपासून पांच मैलांवर उत्तरेस झाल्यामुळे, तें युद्धक्षेत्रापासून थोडें दूर राहिलें.[४]

**आंगऱ्यांतील पहिली यादवी** — २८ मार्च १७४० रोजीं संभाजी आंगरे दक्षिण कोकणांतून आरमार घेऊन मानाजी आंगऱ्यांवर कुलाबा येथें चाल करून आले. त्यांच्या आरमाराचा तळ नागावपासून २–२॥ मैलांवर साखर येथे होता. संभाजी आंगऱ्यांस कुलाबा, अलीबागचा हिराकोट, चौलचा राजकोट हीं ठिकाणें घ्यावयाचीं होतीं. त्यांनी राजकोट व हिराकोट घेतले व ते कुलाबा घेण्याच्या प्रयत्नांस लागले असतां चिमाजीआप्पा व नानासाहेब पेशवा मानाजी आंगऱ्याच्या मदतीस तातडीने आले. संभाजीस ही मोहीम सोडून देणें भाग पडलें. यामुळे नागाव व त्याच्या परिसरांत निर्माण झालेला युद्धपरिस्थितीचा धोका अल्पकाळ राहिला.[५]

---

१ कुर्गे पृ. १४५, १४६

२ आंअ १५,१८,२२; राखं ३ पृ. ५१३

३ आंदरूनं ६३८ पृ. १६१

४ आंअ ४१; पेद ३० ले. ६३

५ आंअ १०२, १०३; राखं३ पृ. २८४; ब्रच ५६व ३६५; कासंपया ले. ३५; राखं ४ पृ. ४४; राखं २ पृ. ८५

**आंगरे-पेशवे-संघर्ष** — १७४७, मे २८ पासून १७४९ च्या आरंभापर्यंत मानाजी आंगरे व पेशवे यांमध्ये माणिकगड किल्ल्याच्या निमित्ताने वितुष्ट आलें. मानाजीने पेशव्यांच्या प्रदेशांत चौल, रेवदंडा व पेणच्या बाजूस हालचाली केल्या; त्याच्या सैन्याच्या हालचाली नागावजवळून झाल्या.[1] इ. स. १७५२, ऑक्टोबर २५ पासून मानाजी आंगरे व पेशव्यांचा रेवदंडा येथील सुभेदार यांमध्ये युद्ध सुरू झालें; त्यांत तळें, घोसाळें येथील पेशव्यांच्या सुभेदारांनी भाग घेतला व नागावच्या भूमीवरून अनेकदा सैनिकी हालचाली झाल्या. नोव्हेंबरमध्ये नागावचे पूर्वेस असलेला सागरगडचा किल्ला काबीज करण्यास सुमारे दीड हजार सैनिक चालून आले. पण मानाजी आंगऱ्यांनी पेशव्यांच्या सैन्याचा मोड केला.हें युद्ध नागावचे पूर्वेस चार मैलांवर जमिनीवर झालें.[2] या प्रकाराची पुनरावृत्ति इ. स. १७५४ च्या जानेवारींत झाली.[3]

**आंगरे व शिद्दी** — १७५८ ऑक्टोबर ते १७५९ मार्च ६ या कालांत आंगरे व पेशवे यांचें सैन्य उंदेरी येथे शिद्दीविरुद्ध लढत होतें. त्यामुळे रामाजी महादेव बिवलकर, राघोजी आंगरे, तुकाजी आंगरे यांच्या हालचाली चौलपासून थळपर्यंत संपूर्ण अष्टागरांत अनेकदा झाल्या; त्यावेळीं नागावासही झाल्या.[4] त्यावेळीं नागावला उपद्रव पोहोंचला असण्याची शक्यता आहे.

शिद्दीच्या चोरट्या हल्ल्यांचा उपद्रव नागावकरांना अनेकदा होई. १७ जुलै १७६२ रोजीं धोंडो गणेश सहस्रबुद्धे यांजकडे रात्रीच्या वेळीं शिद्दीच्या माणसांनी येऊन त्यांचें घर लुटलें व घरांतील तीन स्त्रिया व एक चाकर यांस धरून जंजिऱ्यास नेलें. अंताजीपंत मंडलिक यांचें घर जाळून एक माणूस ठार केला. पण तिसऱ्या दिवशीं सर्व चीजवस्त व माणसें शिद्दीने परत पाठवून दिलीं. हे धोंडो गणेश अनेक वर्षेपर्यंत चौल, नागोठणें इत्यादि महालांवर अधिकारी म्हणून काम करीत होते.[5] इ. १७६३ ऑगस्ट, ३ या दिवशीं शिद्दीने नागावचे चार पुरुष व चार बायका यांस पकडून जंजिऱ्यास नेलें; त्यांत नागावचे केशव महाजन हे एक होते; (त्यांचा वशिला मातुःश्री अहिल्याबाई होळकरणीपर्यंत होता).[6] इ. स. १७६६ एप्रिल ६ या दिवशीं चोरांनी हरबाजी जोशी यांजवर हल्ला केला.[7] शिद्दीने असे प्रकार नागावात अनेकदा केले.

**आंगरे–दुसरी यादवी** — इ. १७९३ मार्च २७ या दिवशीं राघोजी आंगरे सरखेल दिवंगत झाला व त्याचा पुत्र दुसरा मानोजी ८ एप्रिल रोजीं सरखेल झाला. संपूर्ण अष्टागर त्याचे सत्तेखाली होतें. पण मानाजी व जयसिगराव आंगरे यांत वितुष्ट येऊन आंगरे घराण्यांत दुसरी यादवी उत्पन्न झाली. सागरगड, हिराकोट, साखर, वरसोली येथे वर्षभर चकमकी झडत राहिल्या; त्यांची झळ नागावच्या ग्रामीण जीवनास लागणें अपरिहार्य होतें.[8] इ. १७९४ मध्ये हरिपंत फडके यांचा पुत्र माधवराव सैन्यासह अष्टागरांत अंतःकलह मिटविण्याकरितां पेशव्यांच्या सूचनेवरून आला. त्याची व जयसिगराव आंगऱ्यांची नागावजवळ भेट झाली. नंतर अक्षी येथील महादेवाच्या मंदिरांत जयसिगराव व मानाजी यांच्या भेटी होऊन सौरस्य झालें.[9] यावेळीं यादवींतील सर्व प्रमुख माणसें व त्यांचें सैन्य नागावांतून अनेकदा आलें गेलें. इ. १७९६ सप्टेंबर २४ रोजीं जयसिगराव

---

१ आंअ १२२ ते १२८; पेद २४।२४, १३५, २६५; बाबापेरो खं. १ कलम २९१
२ आंअ १५०, १५१, १५२; कासंपया ले. ११३
३ आंअ १६७ ते १७१
४ आंअ २१२ ते २१८
५ आंअ, २४९; B. S. पृ. २६०
६ आंअ २६१
७ आंअ २९२
८ आंअ ५६१ ते ५९१
९ आंअ ५९२

व नागोजी आंगरे आपल्या २ हजार सैन्यासह चौल येथील श्रीएकवीरा भवानीच्या मंदिरांतून अलीबाग व कुलाबा हीं ठाणीं काबीज करण्यास निघाले. त्यांनी पहिला मुक्काम नागावच्या दक्षिणेस बागमळा येथे केला. दुसऱ्या दिवशीं आपल्या सैन्याच्या तीन टोळ्या करून ते अलीबागेस निघाले. एक टोळी नागावच्या समुद्रकिनाऱ्यावरून पुढे गेली; दुसरी टोळी नागावांत 'ह्राटाळें' येथे आली व तिसरी टोळी नागावच्या दक्षिण टोकाशीं असलेल्या कस नदीवरून, नागावच्या पूर्वेकडून कुरुळ येथे जाऊन पोहोंचली. म्हणजे हें सैन्य नागावांतून व गावच्या हद्दीवरून युद्धाकरितां अलीबागेकडे वळलें.[1] इ. स. १७९७ फेब्रुवारी १३ या दिवशीं जयसिंगराव व बाबूराव आंगरे यांची अक्षी व साखर यांचे दरम्यान एक लढाई झाली. युद्धक्षेत्र नागावपासून अडीच मैलांवर होतें.[2] आंगऱ्यांच्या प्रदेशांत सैनिकी हालचाली होत असतां प्रजेची नागवण झाली नसली, तरी कांही प्रजा परागंदा झाली.

इ. १७९४ पासून जीं यादवी युद्धें अष्टागरांत झालीं, त्यांमुळे आंगऱ्यांचें उत्पन्न केवळ तीन लाखांवर आलें. प्रत्यक्ष लुटालुटीचे व अनर्थाचे प्रकार झाले नसले, तरी नित्य व्यवहार आणि जीवन यांस प्रत्यवाय येऊन अशांतता उत्पन्न झाली.[3] इ. १७९७–९८ मध्ये नागावांत यादवी युद्धाचें वातावरण उत्पन्न झालें व पळापळ झाली. कांही प्रजा परमुलखांत व मुंबईस गेली. शांतता प्रस्थापित झाल्यावर, आंगऱ्यांची परवानगी घेऊन आपापल्या ठिकाणीं परतली. अशा तऱ्हेने परत येणाऱ्यांस सरकार सवलती देई. उदाहरणार्थ, या वर्षी नागावचा रामशेट शिंपी दंग्यामुळें परागंदा होऊन मुंबईस गेला. परत येऊन नागावांत राहण्याची त्याला इच्छा होती. आंगऱ्यांनी परवानगी दिली व एक वर्षाची घरपट्टी व मोहतर्फा हे कर माफ करून कौल म्हणजे अभय दिलें. पुढील एक वर्ष निम्मे घरपट्टी व निम्मे मोहतर्फा आकारण्यांत येईल असें त्यास आंगऱ्यांनी कळविलें.[4] अस्वस्थतेचें वातावरण उत्पन्न झालें, म्हणजे लोक आपल्या स्थावरजंगम मालमत्तेचें संरक्षण व्हावें, अशी साहजिक अपेक्षा करीत. शेतें व बागायत यांचें संरक्षण करण्याचा कोणताच मार्ग उपलब्ध होत नसे. मात्र, आपलीं गुरेंढोरें सांभाळण्याची जबाबदारी प्रजा सरकारवर टाकीत असे इ. स. १७९७–९८ मध्ये दंग्याची परिस्थिति उत्पन्न होतांच नागावचे वेदमूर्ति बाळकृष्णभट्ट लेले यांनी आपले दोन बैल सरकारथटींत जमा केले. इ. १७९८–९९ मध्ये याच कारणामुळे भिकाजी हरि सोनी यांनी आपली गाय सरकारथटींत दाखल केली. बाळकृष्णभट्ट लेले यांनीहि आपल्या दोन गाई सरकारथटींत सांभाळण्यास दिल्या. सरकारनें अशा तऱ्हेने अनेकांचीं गुरें सांभाळण्याचा पत्कर घेतला. दंगा शमल्यानंतर, थटीवरील अधिकाऱ्यांस पत्रें लिहून, सरकार तीं गुरेंढोरें परत देववीत असे. म्हणजे बिकट परिस्थितींतहि प्रजेच्या संपत्तीचें संरक्षण करण्याची जबाबदारी आपण पार पाडली पाहिजे, याची जाणीव सरकारला होती.[5]

दंगा उत्पन्न होतो, तेव्हा तो बाहेरून येणाऱ्या शत्रूमुळे, हें खरेंच आहे; पण आपल्या प्रजेंतील कांहीजण बाहेरून येणाऱ्यांस सामील होणार, याची जाणीव सरकारला असे व सरकार त्या दृष्टीने चौकशी करी. इ. स. १७९८–९९ मधील दंग्याचे वेळीं नागावचे आप्पाशास्त्री फडके यांनी फंदफितुरींत भाग घेतल्याचें सरकारला कळलें. आप्पाशास्त्र्यांस बोलावून घेतल्यावर त्यांनी विनंति केली की माझी बेअब्रू करूं नये; यापुढे मी चांगला वागेन, अशी खात्री पटविण्यासाठी योग्य जामीन देतों. सरकारने त्यांजकडून ६७५ रुपये दंड वसूल केला. आणखी कांहीं ब्राह्मणमंडळी या दंगलीच्या

---

१ आंग्र ६२८
२ आंग्र ६४०
३ कुर्गे पृ. १५६
४ आंदरु. नं. १३४ पृ. ६६
५ आंदरु. नं. १३४ पृ. ६४

प्रकरणांत मानाजी आंगऱ्यांस सामील झाल्याचें प्रस्थापित सरकारास कळलें. सामील झालेल्यांकडून ४५ रु. दंड सरकारनें वसूल केला.[१] यादवीचे वेळीं दोन प्रतिस्पर्धी उत्पन्न होतात व सत्तेसाठी अहमहमिका उत्पन्न होते. अशावेळीं न्याय्य पक्ष कोणता, याबद्दलच्या गोंधळामुळे फितुरीचा आरोप आल्याचें इतिहासांत निष्पन्न झालेलें दिसतें. वर दिला तो प्रकार अशा स्वरूपांतील होय.

यांशिवाय, तोतयाच्या हालचाली इ. स. १७७६ च्या सुमारास अष्टागरांत झाल्या.

---

१ आंदरुनं १३४ पृ. ६३ ले. ८

# मुलकी कारभार

**जुनीं नाणीं** :—आदिलशाही व निजामशाही सत्ता नांदत होती, तेव्हा **सजगनी** हें हलक्या किमतीचें नाणें अष्टागरांत प्रचारांत होतें. या तांब्याच्या नाण्यास आंगरेकालांत **ढबू** म्हणूं लागले. एका ढबूच्या दोन शिवराई मिळत. शिवराई हें शिवकालांतील सर्वांत लहान नाणें होय. बारा शिवराई अगर सहा ढबूंची एक लारी होई. शिवपूर्वकालांत चौलच्या सुम्यांत एक नाणें पाडीत, त्याला **चौली लारी** म्हणत. **दाभोळी लारी** व **बसरी लारीहि** अष्टागरांत चालत. लारी हें चांदीचें नाणें असून साडीस लावावयाच्या 'पिन्' सारखें लांबट होतें. एक रुपया म्हणजे पांच लारी असें आंगरेपूर्वकालांत प्रमाण होतें. शिवकालांतहि बसरी अगर (चौली) लारी नागावांत सर्रास रूढ होती. शिवाय, **अशर्फी** (अश्रफा) हें अर्ध्या रुपयाच्या किमतीचें नाणें प्रचलित होतें.

**बुजरुकी** हें नाणें मुसलमानी अमलांत अष्टागरांत प्रचलित होतें. शिवराई व बुजरुकी हीं एकाच किमतीचीं नाणीं होत; म्हणून शिवकालांत शिवराईस बुजरुकी–शिवराई असें जोडनांवाने संबोधीत बुजरुकीहून लहान नाणें '**रुका**' या नांवाचें होतें. चार रुक्यांबरोबर एक बुजरुकी असें प्रमाण होतें.[१]

पेशवेकालांत **पुणेंवालीचा** रुपया नागावांत चालत असे. इंग्रजी सत्ता दृढ होऊं लागली तेव्हा **सुर्ती शिक्का** म्हणजे इंग्रजी रुपया चालू झाला. आंगऱ्यांनी आपल्या प्रांतांत रुपयाचें नाणें पाडलें, त्यास **अलीबागी रुपया** म्हणत.[२] इ. स. १८१९–२० मध्ये नागावांत **ढबु**, **सापिका** व **दमडी** हीं चिल्लर नाणीं प्रचारांत होतीं.[३] इ. स. १८३३–३४ त पुणेंचाल, सुर्ती व अलीबागी असे तीन प्रकारचे रुपये नागावांत चालत. पेशवाई गेली; पण पेशव्यांचें नाणें बराच काल प्रचारांत होतें. इ. स. १८४०–४१ मध्ये वरील तीन प्रकारच्या रुपयांत पुणेंचाल मोठ्या प्रमाणांत, सुर्ती मध्यम प्रमाणांत व अलीबागी कमी प्रमाणांत प्रचारांत होता. अलीबागी रुपया प्रचारांतून जाण्याची जणु पूर्वसूचना म्हणून, या वर्षी रयतेस सुचविण्यांत आलें की तिने भरणा करावयाचा, तो शक्य तों पुणेंचाल अगर सुर्ती रुपयांत करावा. प्रजेने ६५३३।=।।। रुपये पुणेंचाल व सुर्ती भरले; ४३७।।≡।।। रु. अलीबागी रुपयांचा भरणा केला.[४] बाबूराव आंगरे सरखेल गादीवर आल्यावर त्यांनी एक वेगळें रुपयाचें नाणें पाडलें; त्यास ८– एक आणा वटाव देऊन तें सर्वत्र चालू केलें होतें.

**अलीबागी रुपया** —हें आंगऱ्यांच्या प्रदेशांतील चांदीचें नाणें होय. प्रथम त्यावर छत्रपतींचा शिक्का(?) असे. त्याचें स्वरूप बदलून 'श्री' या अक्षराचा रुपया अष्टागरांत आंगऱ्यांनी प्रचलित केला. त्यामुळे 'जुना रुपया' व 'नवा रुपया' असे शब्द प्रचारांत आले. 'श्री.' इ. स. १८३६ त प्रचारांत आला; तो फक्त आंगऱ्यांच्या प्रदेशांतच चाले; म्हणून असंतोष पसरला.[५] 'श्री' रुपयास एक लहानसें छिद्र होतें. आंगऱ्यांचे ८८ रुपये म्हणजे मुंबईकरांचे १०० रुपये असा इ. स. १८४२ मधील दर होता. अलीबागी रुपयाचें वजन १७१.६४ ग्रेन होतें व त्यांत १४५.४६४ ग्रेन इतकी शुद्ध चांदी होती.[६] नाण्यांबद्दल अधिक माहिती परिशिष्टांत पहावी.

**नागावांत टांकसाळ**— इ. स. १८२४–२५ त नागावांत टांकसाळ असल्याचा उल्लेख

---

१ आंज ७४१; आंदरुनं. ६३७, पृ. ११५

२ म. ना. अप्रपेदरु नं. ६३८

३ आंदरुनं ४७, पृ. ११२

४ कोंजरु नं. १३७, पृ. ३, ३२, ३७

५ आंज १५८

६ कुर्गे पृ. १०१

आढळतो.[१] नाणें पाडण्याचें वतन दिलें जाई. या वतनदारांस पोतदार म्हणत. नाणीं पाडण्याचे करारमदार सरकार व पोतदार यांत झालेले असत. खोट्या रुपयास करडा रुपया म्हणत. नाणें पारखण्याच्या कांही पद्धति रूढ होत्या. पोतदारास आणखी एक काम प्रसंगवशात् करावें लागे; तें मुलकी कारभाराशीं संबद्ध आहे. इ. स. १७९७–९८ मध्ये नागावच्या पोतदारास आंग्र्यांनी सनद धाडली की महाल रामराज तर्फ उमटें येथे धाडण्यासाठी 'मोर्तब' तयार करून द्यावें.[२] म्हणजे, प्रसंगीं शिक्का व मोर्तब तयार करून देण्याचें जबाबदारीचें काम त्याजवर सोपविलें जाई.

**अलीबागची पेढी** — इ. स. १८५४ पर्यंत अलीबागेस एक पेढी होती; तिचा व्यवहार मुंबई, पुणें व बनारस येथे चाले. कमिशनचा दर मुंबईस उन्हाळ्यांत शेंकडा पाव टक्का व पावसाळ्यांत अर्धा टक्का असे. पुण्यास पैसे पाठवावयाचे झाल्यास, कमिशन शेकडा एक टक्का पडे; बनारस. येथे धाडणें झाल्यास शे. २ ते ३ टक्के पडे. अलीबागची पेढी लहान असल्यामुळे पांच हजार रुपये-पर्यंतच्या हुंडीचा स्वीकार होई[३] ही पेढी केव्हा स्थापन झाली, याचा निर्देश आढळत नाही.

**नवीं नाणीं** — इ. स. १८५६ मध्ये वर उल्लेखिलेलीं सर्व नाणीं बंद झालीं. आंग्र्यांची टांकसाळ बंद झाली; पोतदारी नष्ट झाली. पोतदारांचें नाणें पाडण्याचें व पारखण्याचें कौशल्य संपलें ! इंग्रजांचा '**डोक्याचा रुपया**' प्रचारांत आला. त्याचें वजन बारा मासे असून त्यांत दहा आणे किमतीची चांदी होती. चौसष्ट दिडक्यांच्या खुर्दाचा एक रुपया होत असे. पैशाचें वजन सहा मासे होतें. खुर्दा मोडला, तर दहा आणे वसूल होत.'**चामड्याच्या नोटा**' दहा रुपयांपासून एक हजारापर्यंतच्या प्रचारांत आल्या. टांकसाळींत रुपये यंत्राने तयार होऊं लागले.[४] चामड्याच्या नोटांच्या उल्लेखाला प्रत्यंतर पुरावा मिळत नाही.

**नागाव महाल** — आंग्रेकालांत महाल नागावांत फक्त तीन स्थळें मोडत. १ नागाव, २ नवेदर बागमळा व ३ खार दिवाणखार. खार दिवाणखारींत इ. स. १८१६ पर्यंत वस्ती नव्हती. बागमळा येथील वस्ती जुजबी होती. त्यामुळें नागाव येथें बहुतेक वस्ती एकवटली होती. महाल आकारानें फार लहान असत. अक्षीचा महाल वेगळा; बामणगावचा निराळा; आणि हीं ठिकाणें नागावच्या अगदी शेजारीं, ३-४ मैलांवर आहेत. महालावरील अधिकाऱ्यास महालकरी म्हणत.

**महालाची इमारत** — महालाची इमारत स्वतंत्र असे; नागावांत तशी सरकारी चौसोपी इमारत होती. इ. स. १८२८–२९ मधील महालांत असलेल्या नित्याच्या वस्तूंची यादी अशी : (१) रुप्याचें मोर्तब. महालांतून सरकारी पत्रव्यवहार होई, त्यावर ठसा उठविण्यासाठी तें वापरीत. अर्थात्,कागद, शाई, लाख इत्यादि साहित्य असणार; (२) तांब्याचे पांच दागिने–दोन तपेलीं, एक पातेलें, एक घागर, एक हंडा; (३) एक कर्णा; (४) एक जाजम; (५) एक लोड; (६) एक लोखंडी तवा.[५]

महालांत कामकाजाचें दप्तर असे व तें सांभाळणारा दप्तरदार असे. इ. स. १८२३–२४ त महादाजी अनंत मोवे नागाव महालांत दप्तरदार म्हणून काम करीत होते.[६]

## महालांतील सरकारी नोकरवर्ग :

इ. स. १७९७–९८ मध्ये बालाजी सदाशिव नागाव महालावरचा आंग्र्यांचा महालकरी होता.[७] इ. स. १८०६–०७ मध्ये अंताजी गणेश होता.[८]

१ म. ना. अप्रपेदरु. नं. ६३७
२ आंदरु नं. १३४, पृ. ६४
३ कुर्गं पृ. १०१
४ आंस ८१३
५ म. ना. अप्रपेद रु. नं. ६३७
६ म. ना. अप्रपेद रु. नं. ६३७
७ आंदरु नं. १३४, पृ. ६६
८ आंदरु नं. ६३७ पृ. १३४

इ. स. १८०९–१० या वर्षीचा नागाव महालांतील एकूण नोकरवर्ग पुढीलप्रमाणे :—

| नांव | बेतन नक्त बारमाही रुपये | बेतन ऐनजिनसी |
|---|---|---|
| गोंदजी नाईक मोरे सरदार | ६६ | १।। खंडी भात ३।। शेरी मापानें |
| गुणाजी पवार | — | — |
| नारो त्रिंबक | ४८ | १० मण २।।। पायली १।। शेर |
| कृष्णाजी महाडीक | ४८ | ,, ,, ,, |
| त्रिंबकजी गुळवे | ४८ | ,, ,, ,, |
| गोपालजी कर्णेकरी | ३० | ,, ,, ,, |

[ आंद रु. नं. १६४, पृ. १८७. ]

महालांतील नोकरांची ही संख्या अनेक वर्षे कायम होती. पण प्रसंगविशेषीं त्यांत वाढ होई. इ. स. १७९९–१८०० या वर्षी महाल नागाव व तपे ब्राह्मणगाव येथे अनुक्रमें २९ व १२ मिळून ४१ इसमांची जास्त नेमणूक केली होती व त्यांचे वेतनाप्रीत्यर्थ दहा महिन्यांचे २२१।। रु. खर्च झाले. दंग्याचे वातावरणामुळे ही नेमणूक असावी.[१]

इ. स. १८१३–१४ मध्ये मैराळ पांडुरंग याने नागावचा महालकरी म्हणून काम केलें.[२]

इ. स. १८१६–१७ मध्ये गोविंद रामचंद्र फडणीस यांस वेतन रु. ९०, महालांतील तीन असामींस रु. १५ प्रमाणें ४५, कर्णेकरी यास १५ रु. दप्तरखर्च म्हणून ७ रु., रोषणाई म्हणून ५।।=रु. असें हिशेबांत दाखविलें आहे.[३]

इ. स. १८१९–२० मधील नागाव महालांतील सरकारी नोकर व त्यांचें वेतन :

१ गोविंद रामचंद्र (फडणीस) यांस वेतन ९० रु.; ६।।= खेरीज कबज. यांत कांहीं भोजनखर्च व ३ मण मोठ आहे. एकूण वेतन ९६।।= रु.

२ काशीनाथ बाबाजी आठवले–१५ रु. ऐन नक्त. १५ रु. किंमत १५ मण भाताची=३० रु.

३ येसजी नाईक बागवे — १३।।। रु. ऐन नक्त
१२।।।– किंमत (भाताची). एकूण २६।।– रु.

४ गुणाजी पवार — ५ रु. किंमत ५ मण भाताची

५ नार सावंत — ऐन नक्त ४ रु.

६ चितो विश्वनाथ — ५५।।।– ऐन नक्त; ३२८≡। भाताची किंमत (साडेतीन शेरी माप; २० रु. खंडी) एकूण ८८८।. रु.

७ धार्कालिंग कर्णेकरी — १७ रु. ऐन नक्त.
१४।।≡।। रु. किंमत (भाताची) मिळून ३१।।≡।।। रु.

एकूण वेतन ऐन आकार २८१।।।≡ रु.
ऐन कबज (पावती) २७५।≡; खेरीज कबज ६।।. रु.
नक्त रुपये १९८।।–; किंमत नक्त ८३।=
गला कैली (मापी) ४१.।।.१।। खंडी
रु. ८३।= भात सवातिशेरी २८१।।। रुपये ४१।।।

---

१ आंदरु. नं. १३५, पृ. ४६  २ आंदरु. नं. ६३७, पृ. १४२

३ आंदरु. नं. ६३६, पृ. ११४, ११५

मीठ ३ मण किंमत .।।. रु.

[ आंदरु नं. २५२, पृ. ४५; आंदरु नं. २४४, पृ. ९९ ].

येथें दिलेलें नोकरांचें वेतन अल्प मुदतीचें आहे, असें मूळ कागदांत स्पष्ट सांगितलें आहे. वरील यादींतील चिंतो विश्वनाथ महालकरी आहे. आंगरे सरकार महालकऱ्यांशीं पत्रव्यवहार करणार हें उघड आहे. या वर्षी आंगऱ्यांनी चिंतो विश्वनाथकडे सनद धाडून कळविलें की कोळी लोकांस होळीसाठी एक निकामी पोफळ द्यावी. दुसरें पत्र धाडून कळविलें की कोणा एका लक्ष्मीबाईंस विजयादशमीनिमित्त खेरीज मुशाहिरा म्हणून वेतनांत एक बकरें द्यावें व महालाच्या हिशेबांत खर्च मांडावा.[1] गोविंद रामचंद्र महालाचे फडणीस आहेत. बाकीचे पांचजण सरकारी नोकर आहेत; पैकी तीन केवळ शिपाई आहेत. या वर्षीचा हिशेबाचा कागद महालच्या लोकांच्या वेतनाची स्पष्ट कल्पना देतो; तो थोडक्यांत असा :

महाल नागाव नि।। चिंतो विश्वनाथ.

महालाचा नख्त खर्च रु. १३४।।= बद्दल मुशाहिरा.

२३८≡ भोजनखर्च चिंतो विश्वनाथ यास आसामी २; दरमहा रु. ३ प्रमाणें मोहरम ते साबान २२

२३८≡ शिवा आबा दिवलकर नि।। चिंतो विश्वनाथ; मुदत व दर वरीलप्रमाणें.

८५८≡ महाल मजकूर खर्च.

४५ गोपाल रामचंद्र फडणीस मोईन ९० रु. पैकीं

४०८≡ शिपाई ३ महालचे.

३८− गोपाल आंगरे याकडे.

१३४।।= ही रक्कम अल्प मुदतीची आहे; संपूर्ण वर्षाची नव्हे.

[ आंदरु नं. ४७ पृ, ७२ ]

चिंतो विश्वनाथ महालकरी याचेमार्फत महालाचा जमाखर्च व कारभार चालत होता.[2]

इ. स. १८३९ ते ४१ मध्ये सदाशिव विश्वनाथ नागावचा महालकरी होता.[3] त्याचे हाताखाली पुढील लोक होते — ० तलाठी; १ नारायण हैबत कारकून, १ रामचंद्र अमृत कुलकर्णी. कागदांत त्याचे हाताखालील पहारेकरी, शिपाई यांचा उल्लेख नाही; पण ते असणार. या वर्षाचा खर्च :

३३७।.।। रु. महाल मजकूर खर्च परभारा.

२४९।।।= बद्दल मुशाहिरा एकंदर नेमणुकीप्रमाणें आकार नख्त.

२२१८−।।। महालकरी व १२ जणांचें वेतन (अल्प मुदत).

२८।।।.। बाहा (किंमत) नख्त.

३८=।।। भिक्षेकरी यास दरमहा भात १ मणप्रमाणें मुदत ४।।। महिने दीड दिवस; दर १३ रु. खंडीप्रमाणें.

५।.।. दप्तरखर्च — महालीं लिहिण्यास कागद [ या वर्षी जुन्नरी कागदाचा भाव १० आणे दस्ता असा होता ].

३।।.। रोषणाई — दिवाबत्तीस तेल.

.।।≡।।। लागवड खर्च — महालीं डागडुजी.

---

१ आंदरु नं. ४७, पृ. ७५
आंदरु नं. ४५, पृ. ६८

२ आंदरु नं. २४४, २४९, पृ. ९९ व ११०

३ आंदरु नं. ६३८, पृ. १७४

२॥ मजुरी दिवाणखारीचे बांधास खांड गेली त्यास.
३९=। बाग सदाशिव हिचा खर्च.
२०॥= पागा, पोटखर्च, चंदी वगैरे.
११।≡ खरेदी जिन्नस रवाना अलीबाग.
१ खुर्दा [ वोवाळणी ]

एकूण खर्च ३३७।.॥. रु.

[ कोंजरु नं. १३७, पृ. २, १८, ३८, ३९, ४२ ].

खर्चाच्या उताऱ्यावरून महालच्या कामकाजाची कल्पना होते. महालांतून नोकरांचें वेतन देण्यांत येई. महालांत भिक्षेकऱ्यांस भिक्षा घालण्याचा रिवाज दिसतो. पण एक मण भात खर्च होतें (दरमहा), तेव्हा, भिकार कमी असावें. इ. स. १८३२ मधील नोंद माहिती देते की दर भिक्षेकऱ्यास दरमहा ८― एक आणाप्रमाणे, सरकारांतून बारमाही नेमणूक असे.[1] नागावांत आंगऱ्यांची पागा होती; आंगऱ्यांच्या वाड्या होत्या. त्यांसाठी महालांतून खर्च होई. आंगऱ्यांस अलीबागेस लागणाऱ्या, नागावांत मिळणाऱ्या वस्तू खरेदी करून धाडण्याचें काम महालकऱ्यास करावें लागे. नागावची दिवाणखार, महालाची इमारत यांची डागडुजी महालांतून होई. महालांत हिशेबाचे काम चाले. पावसाळ्यापूर्वी महालाची इमारत, सदाशिव बागेंतील रहाट रहाटवड, बंदरावरील चौकी, साततडावर असलेलें मेट यांची शाकारणी महालांतून होई. शिपायांचीं घरें शाकारणें, आंगऱ्यांच्या बागांतील माळ्यांचीं घरें शाकारणें, महालांत दिवाबत्ती ठेवणें हेंही अधिकाऱ्याचें काम होतें. दिवांबत्तीस रोज पावशेर तेल लागे.[2]

**रखवाली** — महालांत बंदुकीची दारू असे. कोंकणचें हवामान दमट असल्यामुळे दारू सर्द होऊन फुकट जाण्याचा धोका असे; म्हणून दारूच्या थैल्या भाताच्या कोठारांत ठेवण्याची रीत असे. भाताच्या उष्णतेमुळे ती ठीक राही. इ. स. १८२८–२९ मध्ये कोठारांत फक्त पावमण दारू शिल्लक असल्याचा उल्लेख आहे. पेशवाई नष्ट झालेली; शिद्दी आणि पोर्तुगीझ यांशीं वैर संपलेलें; इंग्रजांशीं पूर्वीप्रमाणे युद्ध करण्याचें सामर्थ्य उरलेलें नाही, अशा स्थितींत जास्त दारूची गरजही नव्हती. बंदुकीच्या दारूचा दर दहा रुपये मण आहे. दारूबरोबर शिशाच्या गोळ्या वापरावयाच्या असत. यावर्षी महालांत फक्त १०० गोळ्यांचें शिसें शिल्लक आहे. बंदुकी ठासणीच्या असत. त्यांचा उपयोग करण्याची फारशी पाळी येत नसे. महालांत सरकारी शिपाई असत;[3] त्यांचा जागता पहारा रात्रभर असावयाचा. चोर-गुन्हेगारांचा उपद्रव होऊं नये. म्हणून ते फिरते असत.

इ. स. १८४०–४१ चा महाल नागावचा शाकारणीचा जमाखर्च असा :—

६०।=। रु. शाकारणी खर्च महाल नागाव.
१५८=॥. सरकारी महाल (इमारत). शाकारणीस २७८ झाप लागले. सुंभ ७ शेर, बांबू काठ्या १५, पेंढे २ हजार; एकूण १३ माणसांनी एक दिवसांत शाकारणी केली.
८॥≡॥. शिपायांची राहण्याची अलंगा (पागा, सोपा, चाळ).
५ बागेंतील माळ्यांचीं छपरें.
५।.।. शिवार ठेवण्याचीं छपरें.
२ रहाट चार; बागेंतील शाकारणें.

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३८ २ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६
३ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७

२४८≅॥। चौकी बंदर साततांड येथील शाकारणी.
६०।≈ ।. रु.

हें काम सरकारी खर्चानें महालकरी करवून घेत.[1]

## सरकारी उत्पन्नाचे विषय

महालांत सरकारी उत्पन्न जमा होई व तेथून तें खर्चीं पडे. तें पूर्वीं सांगितल्याप्रमाणें दोन प्रकारचें होतें. शिवाय, पुढील कर वसूल करीत. (१) घरटक्का, (२) वनटक्का, (३) मोहतर्फा (व्यवसाय कर), (४) दरीबा, (५) दहींबकरें, (६) गादीतंबाखु, (७) तूप-उडीद मोईन व (८) ताडी. या करांची वसुली रोख रकमांत होई.[2]

यांशिवाय लग्नटक्का व पाटदाम हा कर वसूल करीत. बागायत व शेतजमिनींतील उत्पन्नावर महसूल होता; तो ऐनजिनसी वसूल करण्याची पद्धति होती. हीं महालाच्या उत्पन्नाचीं एकूण खातीं झालीं.

बागायतावर महसूल आकारला जाई, त्याचीं सदरें पुढीलप्रमाणे —

माड, सुपारी, उंडी, फणस, पानवेल, बागायतांतील वरकस जमीन, झाप; भातजमिनींतून उत्पन्न होणारें खारें—गोडें भात, वाल, उडीद, चुडी यांचा महसूल जमा करीत.[3]

कर महालांत भरला पाहिजे असा कटाक्ष नव्हता पण शिरस्ता होता. उत्पन्न एकंदर चार ठिकाणीं मिळून जमा होई. (१) महाल पोतां, (२) परभारें, (३) कोठी जंजिरे कुलाबा, (४) सुभे मजकूर येथे. महालाच्या अनेक रकमा परस्पर अलीबागेस जमा होत व खर्ची पडत. त्यांचा कागदी मेळ दोन्हीकडे सापडतो.[4]

## महालांतील खर्चाचे विषय

महालखर्चांत पुढील सदरें येतात. (१) बद्दल मुशाहिरा म्हणजे वेतनादाखल खर्च, (२) खेरीज मुशाहिरा म्हणजे वेतनाव्यतिरिक्त झालेला खर्च, (३) बक्षीस खर्च, (४) माफी खर्च, (५) मेहमान खर्च म्हणजे प्रतिष्ठित पाहुण्यांसाठी झालेला खर्च, (६) देहेनगी खर्च, (७) धर्मादाय, (८) महाल मजकूर खर्च, (९) वेतनात खर्च, (१०) मजुरी खर्च, (११) भोजन खर्च, (१२) जत्रा खर्च, (१३) तहवेल खर्च, (१४) खरेदी खर्च.[5] (१५) देवस्थानांचा खर्च, (१६) ब्राह्मणांचीं इनामें; (१७) कुळकर्णी वगैरे हक्कदारांचें इनाम.[6]

**घरटक्का** — म्हणजे घरांवर आकारलेला कर महालांत जमा करण्याची पद्धति होती. त्यांतून पुढील घरें माफ होतीं : (१) सरकारी इमारती, मेटें, पागा. (२) मंदिरें, (३) मठ, (४) गुलामांचीं घरें, (५) सनदी नोकरांचीं घरें, (६) ब्राह्मणांचीं घरें, (७) प्रभूंचीं घरें; (८) भिकाऱ्यांच्या झोपड्या, (९) व्याधिग्रस्तांचीं घरें, (१०) कुणबिणींचीं घरें. यांशिवाय, कारणपरत्वें घरटक्याची माफी मिळे. यांमुळें बहुधा निम्मीं घरें घरटक्क्याच्या वसुलींतून माफ म्हणून

१ कोंजरु नं. १३७, पृ. ४१, ४२

२ आंदरु नं. ६३६, ६३७, ६३८; ले. ३८,४९, ७१

३ आंदरु नं. १३४, पृ. ५७; आंदरु नं. १६६, पृ. १८६; म. ना. अप्रपेदरु नं. ६३६

४ आंदरु नं. १६६, पृ. १८६; आंदरु नं. २४६, पृ. १००, १०१

५ आंदरु नं. २४९, पृ. ११०

६ आंदरु नं. ६३६, पृ. ११४, ११५

सुटत. कोणास विशेष प्रकारचा संसर्गजन्य रोग झाला असला, तर त्यास वेगळी झोपडीं बांधून देत. त्या घरांत व्याधिग्रस्त बिचारा एकटा राही. त्याला सर्व कर माफ असत.[1]

दरवर्षी घरांची मोजणी होई; तिला 'घर टीपेस लागणें' अशी संज्ञा होती. टीप झाल्यावर घरटक्का कोणास माफ, कोणाजवळून किती वसूल करावयाचा, हें ठरे.[2] शेती व बागायत करणाऱ्या नागावकरांना आपल्या व्यवसायार्थ नोकरांची गरज असे. क्वचित्, एकादा माळी ठेवून त्याजकडून आपल्या बागायतास पाणी देणें, लागवड करणें, नारळ-सुपारी पाडणें, झाप विणणें इत्यादि बागायतीसंबंधींचीं कामें करून घेत. माळी अगर परमुलखांतून 'मुशारखोर' नोकर आणून ठेवण्याचा शिरस्ता पूर्वापार होता. आपणांजवळच्या साधनांतून त्याचे दाखले इ. स. १७७२–७३ पासून सापडतात. माळयाला सामान्यपणें पहिलीं तीन वर्षें घरटक्क्याची माफी मिळे. त्या काळांत त्यास वेठ माफ असे. नंतर त्याचेवर घरटक्का आकारीत व त्यास दरमहा दोन वेठी द्याव्या लागत. चाकर ठेवल्यास त्यालाही आरंभींचीं कांही वर्षें घरटक्का माफ असे.[3] इ. स. १८०१–०२ मध्ये नागावच्या अंताजी गणेश सहस्रबुद्धयांनी कान राऊत नांवाचा एक मनुष्य परमुलखांतून शेतकामासाठी नोकर म्हणून आणला व सरकारांत तसें कळविलें. आंगऱ्यांनी त्यास घरटक्का माफ केला.[4] आंगऱ्यांना पटलें होतें की नोकर ठेवल्याशिवाय बागायत व शेती नीट होणें दुरापास्त आहे. इ. स. १८०८–०९ मध्ये त्रिंबकभट आठवले यांस, राघो महादेव करंदीकरांस, इ. १८१३–१४ मध्ये शिवाजी विठ्ठल लोंढे यांस, इ. स. १८१६–१७ मध्ये वासुदेव बल्लाळ महाजनांस, गंगाधर रामचंद्र पुराणिकांस परमुलखांतून कुळें आणून शेती व बागायताची उस्तवारी करण्यास आंगऱ्यांनी कौल म्हणजे अभयपत्र दिलें. आणलेल्या नोकर व माळयास आरंभीं कांही काल घरटक्का न आकारला जाण्याचें अभिवचन स्पष्ट आहे.[5]

वाडकर आणि शेतीवाले कुळें आणीत, त्याप्रमाणें कांहीजण स्वत: होऊन नोकऱ्यांसाठी नागावांत येत व आंगऱ्यांस आपल्या येण्याचा उद्देश कळवून नोकरी पत्करीत. इ. स. १८१०–११ मध्ये बाबाजी पेडणेकर भंडारी मुलांमाणसांसह हेट प्रांतांतून येऊन नागावांत राहिला. त्याला आंगऱ्यांनी दोन वर्षें घरटक्का माफ केला व पुढील तीन वर्षें अर्धा माफ केला. तदनंतर दरसाल ३।= रु. घरटक्का द्यावा असे ठरलें. त्यास पांच वर्षेंपर्यंत वेठबेगार माफ केली. इ. स. १८१९–२० मध्ये बाजी मल्हार नारपाटील हेटकरी नोकरीनिमित्त आला. त्यास घरटक्क्याच्या माफीच्या सनदा देण्यांत आल्या.[6]

इ. स. १८१२–१३ मध्ये आंगरे सरकार व नागावकर यांमध्ये एक महत्त्वाची कलमबंदी झाली. विषय, बागायतीची महामुरी म्हणजे भरभराट करणें हा होता. लोकांनी आपलें म्हणणें मांडलें की वाडीच्या उस्तवारीकरिता चाकर अगर माळी ठेविला, तर त्यास पाळणूक म्हणजे घरटक्क्याची माफी मिळावी. स्वमुलखी चाकर अगर माळी असल्यास त्यास घरटक्का, वेठबेगार कोंबडें–बकरें इत्यादि कर माफ असावेत. परमुलखी नोकर असल्यास घरदेणें सहा वर्षें माफ असावें; नंतर निम्में घरदेणें आकारावें. परमुलखी माळी असल्यास त्यास घरदेणें तीन वर्षें माफ असावें; नंतर निम्में घर देणें आकारावें; त्याजकडून वेठ,बेगार, फडफर्मास इत्यादि कर घेऊं नयेत.

---

१ आंदरु नं. ६३७, पृ. १५२
२ आंदरु नं. ६३७, पृ. १२०
३ आंदरु नं. ६३७, पृ. १२७,१२८
४ आंदरु नं. ६३७, पृ. १३२
५ आंदरु नं. ६३७, पृ. १२०,१४३, १४५; आंदरु नं. ६३६, पृ. १४६, १४७
६ आंदरु नं. ६३७, पृ. १५०; आंदरु नं. २४९, पृ. ११०

लोकांनी आपल्या म्हणण्यांतच परमुलखी व स्वमुलखी असा भेद केला असून माळी व मुशारखोर नोकर असा दुसरा फरक व्यक्त केला आहे. सरकारने परमुलखी माळ्यांबद्दलचें लोकांचें म्हणणें पूर्ण मान्य न करतां, त्यांस तीन वर्षें घरटक्का व इतर कर माफ केले; नंतर निम्मी घरपट्टी आकारण्यांत येईल असें सांगितलें. नोकरांस सहा वर्षें घरटक्का माफ ठरविला. स्वमुलखी माळ्यास घरपट्टी द्यावी लागेल, पण अन्य कर त्याजपासून घेतले जाणार नाहीत असें सरकारने कबूल केलें. जेव्हा अनियंत्रित राजा व प्रजा यांत करार होतात, तेव्हा प्रजा राजाच्या म्हणण्यास मान तुकवते; येथेही लोकांनी आंगऱ्यांचें म्हणणें मान्य केलें आहे.[1] हें झालें बागायत व शेती या व्यवसायांनिमित्त येणाऱ्यांबद्दल.

उदीम करण्यासाठी नागावकडे लोक आकृष्ट होऊं लागले होते. इ. स. १८०७–०८ मध्ये शिऊ कुंभार, राहणार गिरी व भगीरथगिरी गोसावी हे पंचकेण्याचीं दुकानें घालण्यास नागावांत आले. सरकारने त्यांस घरदेण्याबाबत सवलती दिल्या.[2]

अविभक्त घराचा एकदाच घरटक्का घेण्याची रीत दिसते. पण माणसें विभक्त झालीं व एकाच घरांत वेगळीं राहूं लागलीं, तरी एकाचीं दोन घरें झालीं असें समजून दोघांकडून घरटक्का घेतला जाई.[3]

घरांची प्रतवारी केलेली असे; त्यामुळे सर्व घरांवर सारखा घरटक्का नसे. इ. स. १८४०–४१ मध्ये कॅप्टन डेव्हिस याने आंगरे संस्थान खालसा केल्यानंतर अनेक कर तहकूब केले; त्यांत त्याने, सालमजकुरापासून घरटक्का तहकूब केल्याचें जाहीर केलें. जाहीर होण्यापूर्वी सदर वर्षांचा ४१६८= रु.घरटक्का वसूल झाला होता; तो परत करण्यांत आला नाही; पुढील वसुली थांबली.[4]

घरटक्क्याच्या आकारावरून सरकारचें उत्पन्न कळतें; पण घरांतील माणसांची संख्या कळत नाहीं. इ. स. १८४०–४१ मध्ये नागावांत ५८५ घरें होतीं. सर्व घरें कुड्टारू म्हणजे केंबळीं होतीं. या वर्षीची नागावची लोकसंख्या अशी — पुरुष ९०७; मुलगे १५९; बायका ९६४; मुली ९३; एकूण २१२३ माणसें. म्हणजे दर घरास जेमतेम चार माणसें हें प्रमाण दिसतें![5] म्हणजे पूर्वी अविभक्त कुटुंबपद्धति होती असें म्हटलें जातें, तो पोकळ भ्रम कीं काय!

| इ. स. | नागाव घरें | वस्ती | आधार |
|---|---|---|---|
| १८४०–४१ | ५८५ | २१२३ | कोंजरु नं. १३७, पृ. ३ |
| १८५०–५१ | ६३३ | ३१४१ | कुर्ग |
| १८८१–८२ | ७२५ | ३९०० | " |

हें कोष्टक कुटुंबपद्धतीच्या दृष्टीने ध्यानीं घेण्यासारखें आहे. यावरून म्हणतां येईल की इ. स. १८४०–४१ मध्ये जेव्हा इंग्रजांनी आंगऱ्यांची सत्ता आपल्या ताब्यांत घेतली, त्यावेळीं व तदनंतर नागावमध्ये विभक्त कुटुंबपद्धति असली पाहिजे. इंग्रजी सत्ता व विभक्त कुटुंबपद्धति यांनी एकाच दिवशीं नागावांत प्रवेश केला, असें म्हणणें हास्यास्पद ठरेल. तेव्हा आंगरेसत्तेच्या अखेरच्या कालांत विभक्तकुटुंबपद्धतीचें दृश्य नागावांत निश्चित होतें, असा एक स्पष्ट प्रकार संभवतो. आंगरेकालांत झाडें, म्हशींची खानेसुमारी होत होती; पण माणसांची होत नव्हती. कुटुंब-पद्धतीचा विचार करतांना आणखी एक मुद्दा ध्यानांत घेऊन मगच निर्णयाप्रत यावें लागेल. नागावचे वर दिले ते आकडे ब्रिटिश राजवटीच्या प्रारंभापासूनचे आहेत; अर्थात्, इ. स. १८४०–४१ चे आंकडे हे आंगरे राजवटीच्या अखेरचे आहेत. त्या वर्षीची माणसांची संख्या २१२३ आहे.

१ आंदरु नं. ६३७, पृ. १२५, १२६
२ आंदरु नं. ६३७, पृ. १५१
३ आंदरु नं. २४६, पृ. १०१
४ कोंजरु नं. १३७, पृ. ३२
५ कोंजरु नं. १३७, पृ. ३

उत्तरोत्तर ती वाढत गेली असें दिसतें. पूर्वी ती २१२३ हून जास्त असेलसें वाटत नाही आणि मानवतही नाही. कुटुंबपद्धतीचा विचार करतांना आपण हा आकडा सामान्यपणें स्थिर मानून आंगरे- कालाचा विचार करूं. दुसरा आंकडा घरांचा. यांतील कांही घरांतून वस्ती एकेरी असणार; कारण, परप्रांतांतून येणारे माळी व चाकरीच्या व्यवसायासाठी येणारें सगळे मुशारखोर आपणांबरोबर कुटुंब आणि परिवार थोडेच घेऊन येणार होते! त्यांना घरटक्का देण्याचा व घर टीपेस लागण्याचा प्रसंग आला, तरी घरांत माणसांची संख्या काय असणार! तेव्हा त्यांची, व्याधिष्टांची, गुलामांची, मठ यांची संख्या वजा करून, भरलेल्या घरांची संख्या साधारणत: कायम करूनच कुटुंबपद्धतीसंबंधींचा अंदाज बांधला पाहिजे असें वाटतें. त्या दृष्टीने पानें २३ व २४ वरील तक्ता १ व तक्ता २ पाहावे. या तक्त्यांवरून मात्र असें अनुमान निघतें की १८ व्या शतकाच्या अखेरीच्या कालांत नागावांत विभक्त कुटुंबपद्धति रूढ झाली होती.

**वनटक्का** — वनटक्का म्हणजे गुरांढोरांवरील कर होय. शेतीवर महसूल असल्यामुळे, शेतीचें साधन जे बैल व रेडे, त्यांवर वनटक्का आकारीत नसत; तो प्रामुख्याने म्हशींवर आकारला जाई. दर म्हशीवर हा कर पूर्वापार १५॥ आणे होता. पण तो सर्वच म्हशींवर आकारीत नसत. एखादी म्हैस वांझ निघाली किंवा वीत नाहीशी झाली, तर तसें कळवल्यास वसूल केलेला वनटक्काही परत दिला जाई आणि तो परत घेण्याइतकीं नागाव महालाचीं माणसें व्यवहारदक्ष होतीं.[1] वनटक्का माफ केलेल्या म्हशींची संख्या नागाव महालांत मोठी आहे. मुख्य म्हणजे, नागावांतील सर्व ब्राह्मणमंडळीस वनटक्का माफ होता.[2] आंगऱ्यांनी पूर्वापार तसा नियमच करून टाकला होता. इ. स १८०१–०२ मध्ये नागावच्या अंताजी गणेश सहस्त्रबुद्धे यांनी बाबूराव आंगरे सवाई सरखेल यांस विनंतीपूर्वक कळविलें की सर्वच ब्राह्मण मंडळीस म्हशींवर वनटक्का माफ असतां मला ही सवलत नाही! ती मिळावी. आंगऱ्यांनी त्यांना चार म्हशींवर वनटक्का माफ केला![3] पारड्या या अनुत्पादक, म्हणून त्यांवर वनटक्का सर्रास माफ असे.[4] इ.स. १८१६–१७ मध्ये गंगाधर रामचंद्र पुराणिक यांनी दुभत्याकरिता एक म्हैस खरेदी केली; तिचा वनटक्का आंगऱ्यांनी माफ केला.[5] इ. स. १८०८–०९ मध्ये आंगऱ्यांनी राघो महादेव करंदीकर यांस कळविलें कीं तुम्ही एक म्हैस आणल्यास वनटक्का माफ करूं.[6] (तक्ता पान २६ वर पहा.)

कोकणांतील गुरें अत्यल्प दूध देणारीं असतात; पूर्वीही तोच प्रकार होता. त्यामुळें एखाद्याजवळ बऱ्याच गाई-म्हशी असल्या तरी त्याचेकडे भरपूर दूधदुभतें असे, असें म्हणणें चुकीचें होईल. पूर्वीप्रमाणे आजही कोंकणचा शेतकरी आणि सुखवस्तु मनुष्य घाटावरूनच बैल आणि म्हशी खरेदी करून नेतो; अगर कोकणांत घाटावरून ज्या हेडी जातात, त्यांतून खरेदी करतो. इ. स १८१९–२० मधील पुढील नोंदी पहा :—

(१) भिकाजी गोविंद यांनी आंगऱ्यांकडून म्हशीच्या खरेदीबद्दल सनद घेतली; त्यांस चार आणे नजर द्यावी लागली.

(२) बाबूराव लोंढे यांनी वरघाटाहून नवी म्हैस घेतली. तिच्या पाळणुकीची सनद मिळावी म्हणून त्यांना दोन रुपये नजर करावे लागले.

(३) भिकाजी विठ्ठल जोगळेकर यांनी म्हशीच्या पाळणुकीची सनद घेतली; त्याबद्दल त्यांना दोन रुपये नजर द्यावी लागली.

---

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६ २ आंदरु नं. ६३७, पृ. १३२

३ आंदरु नं. ६३७, पृ. १३२ ४ आंदरु नं. १३४, पृ५७

५ आंदरु नं. ६३७, पृ. १२० ६ आंदरु नं. ६३६, पृ. १४७

### तक्ता १ : नागाव घरें

| इ. स. | एकूण घरें | देवालयें | ब्राह्मण घरें | प्रभु | सनदीपाल | भिकारी | कुणबिणी | परमुलकी कोळी | घरटक्का देणारीं |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७९८–९९ | ४९४ | ११ | १९८ | १० | १९ | ४ | १ | ४ | २४७ |
| १८०७–०८ | ५५३ | १७ | २२३ | १९ | ४ | २ | ० | ४ | — |
| १८१९–२० | ६२३ | १७ | — | — | — | — | — | — | २९६ |
| १८२३–२४ | — | १७ | — | — | — | — | — | — | ३४१ |
| १८२९–३० | ६३२ | १७ | २११ | १९ | ४४ | ९ | १ | २२ | ३०९ |
| १८३९–४० | ६१४ | १८ | २३२ | २० | — | १५ | — | ३२ | २७८ |
| १८४०–४१ | ६१० | १८ | २३२ | २० | — | १५ | — | ८ | २७८ |

[ आंदह नं. १३४, पृ. ५०, ५१, ५६; आंदह नं. ६३८, पृ. १६३, १६४, १७४; कोंजह नं. १३७, पृ. ३३. आंदह नं. ६३७, पृ. १३३ ].

तक्ता २ : नागाव घरटक्का

| इ. स. | एकूण घरें | घरटक्का देणारीं | प्रत घरें | प्रत घरें | प्रत घरें | प्रत घरें | प्रत घरें | आकार रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २८= रु. | १।। रु. | १४- रु. | २४- रु. | १४।। | |
| १७९८–९९ | ४९४ | २४७ | १६५ | २६ | ४१ | १० | ५ | ४५८।।।≡।. |
| १८०६–०७ | ५५३ | — | — | — | — | — | — | ४७२८-।।. |
| १८०७–०८ | ५५३ | — | — | — | — | — | — | ४७२८-।।. |
| १८१६–१७ | — | — | — | — | — | — | — | ५०१।≡. |
| १८१९–२० | ६२३ | २९६ | १६६ | ३६ | ७९ | ९ | ६ | ५१५।≡ |
| १८२३–२४ | — | ३४१ | — | — | — | — | — | ६५० |
| १८२९–३० | ६३२ | ३०९ | १४४ | २८ | ११७ | ७ | ७ | ४९७।।-।. |
| १८३८–३९ | ६२२ | — | — | — | — | — | — | |
| १८३९–४० | ६१४ | २७८ | — | — | — | — | — | २५७८≡ |
| १८४०–४१ | ६१० | २७८ | — | १०९ | १२० | ५ | ७ | ४१६८≡ |

[ आंदरु नं. १३४, पृ. ५०, ५६; आंदरु नं. ६३७, पृ. १३३; आंदरु नं. ६३८, पृ. १६४, १७४; कोंजरु नं. १३७, पृ. ३३
म. ना. अप्रपेदरु नं. ६३६; ६३७ ].

(४) बाळाजी गोविंद काणे यांनी म्हैस खरेदी घेतली; तीबद्दल त्यांनीं दोन रुपये नजराणा भरला; पण त्यांस एक रुपया बक्षीस म्हणून परत करण्यांत येऊन एक रुपया स्वीकारण्यांत आला.[1] म्हणजे, आणल्या जाणाऱ्या गुरांवर जकात व नजराणा घेण्याचा हक्क आंगरेसत्तेनें आपणांकडे राखून ठेवला होता; पण तो किती प्रमाणांत घ्यावयाचा, हें ठरलेलें नसावें.

इ. स. १८३९–४० मध्यें बाळाजी महादेव लेले यांनी आंगऱ्यांना अर्ज केला की दुभत्याकरितां दोन म्हशी पारडयांसह परमुलखांतून खरेदी करून आणल्या आहेत. त्यांबद्दल देणें ठरवावें व पाळणुकेची सनद द्यावी. आंगऱ्यांनी कळविलें की दरम्हशीस पावणेआठ आणेप्रमाणे दरसाल (वनटक्का) देत जावा; तशी सनद दिली. म्हणजे, दर म्हशीमागें १५।। आणे वनटक्का आकारावयाचा, हा शिरस्ता आंगरे संपूर्णतः पाळीत होतेच असें नव्हे; किंवा ब्राह्मणाजवळूनही अपवाद म्हणून वनटक्का घेत होते.[2]

इ. स. १८१२–१३ मध्यें नागावचें बागायत अगदी मोडकळीस आलें. त्याची पुन्हा निगा राखली जावी म्हणून नागावची प्रजा व आंगरेसत्ता यांमध्ये एक कलमबंदी झाली. लोकांनी आपलें म्हणणें एका कलमान्वयें मांडलें की नागांवच्या म्हशी, बैल, टोणगे प्रांतांत ठिकठिकाणीं चारणीस जातील. चरणावर कर घेण्याची वहिवाट या महालांत पूर्वापार नाही; तेव्हा आम्हांस चारणावळीचा उपसर्ग होऊं नये. आंगऱ्यांनी एवढेंच मान्य केलें की बैल व टोणगे यांवर चरणावळ आकारली जाणार नाही. याच कलमबंदीनुसार सरकारनें मान्य केलें कीं वाडकर रहाटांसाठी बैल व टोणगे खरेदी करून आणतील; त्यांवर जकात घेण्याचा शिरस्ता पूर्वीपासून नाही; यापुढेही सरकार जकात आकारणार नाही.[3]

इ. स. १७९८–९९ मधील व पुढील कागदांवरून आणखी एक गोष्ट प्रत्ययास येते की नागांवच्या दिवाणखारीच्या भागांत वस्ती जुजबी होऊं लागली होती; पण तेथील रहिवासी म्हशी पाळूं लागले नव्हते व आंगरेसत्तेच्या अखेरीपर्यंत परिस्थिति तशीच राहिली. इ. स. १७९८–९९ मध्यें नवेदर बागमळा येथें दहा म्हशी होत्या व त्यांवर वनटक्का आकारला गेला होता.[4]

वनटक्का आकारण्यापूर्वी सर्व म्हशींची टीप घेत. नोंदीनंतरही संख्या वाढलेली आढळली, तर वाढीव संख्येवर वनटक्का आकारीत. दरवर्षी किती म्हशी मेल्या व नव्या किती खरेदी झाल्या याचा हिशेब सरकारजवळ असे. उदा० इ. स. १८३८–३९ मध्यें चार म्हशी मेल्या व इ. स १८३९–४० त बारा म्हशी नव्या खरेदी केल्याचें टिपण आढळतें.[5]

इ. स. १८४०–४१ मध्यें आंगरे संस्थान खालसा झालें व कॅप्टन डेव्हिसने इंग्रजी राजवट सुरू केली. त्यावेळीं लोकांस प्रसन्न ठेवण्याच्या उद्देशानें वनटक्का तहकूब करण्यांत आला.[6]

घरांची संख्या व म्हशींची संख्या ध्यानांत घेतां आंगरे उत्तरकालांत नागावांत दूधदुभतें भरपूर होतें असें म्हणतां येणार नाहीं. जुन्या काळांत, खेडयांतून दूधदुभत्याची चंगळ असे, असें सर्रास मानलें जातें; हा भ्रम होय असें स्पष्ट वाटतें. (तक्ता ३ पान २६ वर पहा)

**मोहतर्फा** — मोहतर्फा म्हणजे गांवचे कारागीर, दुकानदार यांवरील कर. नागाव महालांत या कराची आकारणी ज्यांवर होई, ते व्यावसायिक व करांचें प्रमाण पुढीलप्रमाणे :—
गवंडी ३।~. भंडारी .।।।≡. शिपी १।।. कुंभार १।. बुरुड १।।. हजाम १ए~. दुकानदार १ए।।.

---

१ आंदरु नं. २४९, पृ. १०३
२ आंदरु नं. ६३८, पृ. १६२
३ आंदरु नं. ६३७, पृ. १२४, १२५
४ आंदरु नं. १३४, पृ. ५१
५ आंदरु नं. ६३८, पृ. १६४, १७४, १७५
६ कोंजरु नं. १३७, पृ. ३३

## तक्ता ३ : नागाव वनटक्का

| इ. स. | एकूण म्हशी | ऐन | उमेदवार | वांझ | वजा अजीपाल | ऐन पाल | गरा पाल | बाकी वण | आकार रुपये. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७९८–९९ | ३३५ | २९८ | १९ | १८ | २३१. | १९४ | ३७ | १०४ | १००।।।. |
| १८०६–०७ | — | — | — | — | — | — | — | ७० | ६९।।।. |
| १८१६–१७ | — | — | — | — | — | — | — | ७१ | ७०।।≡।।. |
| १८१९–२० | २९७ | — | — | — | — | — | — | ८६ | ८३।– |
| १८२९–३० | ३०७ | २९२ | ७ | ८ | २२३ | २०८ | १५ | ८४ | ८१।= |
| १८३८–३९ | २७१ | — | — | — | — | २३३ | — | ४२ | ४०।।≡ |
| १८४०–४१ | २८३ | २८२ | १ | — | — | २३३ | — | ५० | ४७।।।≡।. |

[ आंदरु नं. १३४, पृ. ५१ व ५७; आंदरु नं. ६३८, पृ. १६४; १७४, १७५; आंदरु नं. १३७, पृ. ३७; म. ना. अप्रपेदरु नं. ६३७ ].

तेली २।. सोनार १८॥. लोहार १।=. चांभार ३, परीट १।।।. साळी .।।. सुतार १।।. ज्यांस हा कर द्यावा लागे, अशांची इ. स. १८०८–०९ मधील संख्या उपलब्ध आहे; ती अशी :—

बुरुड ४, कुंभार ३, कापडकरी १, तेली ७, लोहार २, गवंडी ६, भंडारी ४५, शिंपी १, परीट १, न्हावी, सोनार, दुकानदार व चांभार यांचे आकडे उपलब्ध नाहीत; पण त्यांची संख्या एकूण २० असावी; कारण या वर्षीची मोहतर्फा देणारांची एकूण संख्या ९० आहे.[1] कोळी लोकांजवळूनही हा कर घेतला जाई; पण शेजारीं असलेला रायवाडी गाव केवळ कोळी जमातीचा व दाट वस्तीचा असल्यामुळे नागावांत कोळी लोकांचीं घरें जास्त नसणें स्वाभाविकच होतें.[2]

इ. स. १७९७–९८ मध्ये नागावचा रामशेट शिंपी दंग्यामळे परागंदा होऊन (इ. १७९५–९६ च्या) मुंबईस निघून गेला. त्याने नागावास परत येण्याची परवानगी मागितली. सरकारने त्यास एक वर्ष घरपट्टी व मोहतर्फा माफ करून परवानगी दिली. पुढील एक वर्ष निम्मी घरपट्टी व निम्मा मोहतर्फा आकारला गेला; तिसऱ्या वर्षी पूर्ण घरपट्टी व पूर्ण मोहतर्फा आकारण्यांत आला.[3] शिंपी गृहस्थास स्वस्थपणें व्यवसाय करतां आला नाही, म्हणून सरकारने ही सवलत दिली. इ. स. १८०५–०६ त रंगा बापु म्हात्रा हा गवंडीकाम करणारा मनुष्य नागाव येथे येऊन राहिला. त्याने आंगऱ्यांस विनंति केली की मजवर जीवनमाफक मोहतर्फा आकारावा. सरकारने त्याचेवर २।। रु. मोहतर्फा आकारला व व्यवसाय करण्यास परवानगी दिली.[4] सरकार नवागतास गावीं स्थिरता यावी म्हणून सवलती देई. अनेकदा घरपट्टी, गादीतंबाखु कर यांतही सवलती दिल्या जात असत.[5] इ. स. १८०७–०८ मध्ये परप्रांतांतून नागावांत आलेल्या भगीरथगिरी गोसावी याने विनंति केली की मी पंचकेण्याचें दुकान घालण्याचें ठरवितों; तरी आंगऱ्यांनी परवानगी द्यावी. त्याचें म्हणणें की घरटक्का, गादीतंबाखु, मोहतर्फा व दुकानविक्री हे चार कर मला भरावे लागणार; ते पांच वर्षेपर्यंत माफ करावेत. आंगऱ्यांनी तशी माफी दिली. त्या मुदतीनंतर १।।। रु. मोहतर्फा व .।= दुकानविक्री एवढा कर द्यावा अशी त्यास सवलत दिली.

याच वर्षी शिऊ बिन लिंबाजी कुंभार हा गिरी येथून नागावास आला. त्याने महालांत कळविलें की मी वर-घाटावरून सडा आलों असून उदरनिर्वाहार्थ पंचकेण्याचें दुकान घालणार आहें. त्याच्या ऊर्जिताकडे नजर देऊन आंगऱ्यांनी त्याचेजवळून व्यवसाय-कर केवळ एक रुपया घेतला व घरपट्टी माफ केली[6] इ. स. १८१३–१४ मध्ये नागावच्या गोवराजी तेल्याने सरकारांत कळविलें की माझा चुलता रामाजी तेली दरसाल ५ रु. व्यवसाय-कर भरीत होता, तो मृत्यु पावला. माझें सामर्थ्य कमी; तेव्हा मला मोहतर्फा कमी करावा. सरकारने त्याचा 'घानवडी' चा व्यवसाय नीट चालावा म्हणून कर ३ रु. करून दरसाल २ रु. ची सूट दिली.[7] जरूर वाटल्यास व्यवसायकर कमी करावयाचे, ही सरकारची प्रवृत्ति दिसते.

**मोहतर्फा वसुली —**

| इ. स. | कर एकूण रु. |
|---|---|
| १७९८–९९ | १४४।।= पैकी नवेदर बागमळा २ रु. व दिवाणखार ८ रु. नागाव १३४.।।= |

---

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६ २ कुर्गे पृ. १९६

३ आंदरु नं. १३४, पृ. ६६ ४ आंदरु नं. ६३७ पृ. १३६

५ आंदरु नं. ६३७, पृ. १५१ ६ आंदरु नं. ६३७, पृ. १५१

७ आंदरु नं. ६३७, पृ. १४१

| | | |
|---|---|---|
| १८०६–०७ | १३७.।।।= | |
| १८१६–१७ | १३१०≡ | |
| १८२९–३० | १३७.।।।=।।. | १०४ जणांकडून |
| १८३९–४० | १७८.।।।=।।।. | ११९ जणांकडून |
| १८४०–४१ | १६३०.।।. | ११२ जणांकडून |

नागावची ही मोहतर्फावसुली सामान्यपणें फारसा चढउतार नसल्याचें दर्शविते. या रकमेंत दोन भाग पडतात; एक ऐन दस्त व दुसरा बाबती. पैकी ऐन दस्त हा सरकारचा हिस्सा असून बाबतीमध्ये वतनदारांचा वांटा असे.[१]

**दुकानविक्री** :— किराणा, भुसार इत्यादि विविध वस्तू विकणाऱ्या दुकानदारांवरील हा कर आहे; पण दुकानदार संख्येने फार थोडे असत. वाटेल त्याने दुकान थाटावें असा तो काल नव्हता. इ. स. १८०४-०५ मध्ये नागावांत पांच दुकानदार आहेत. त्यांचीं नावें—१ पितांबर खुशाल, २ प्रेमजी मेहता, ३ तान फत्तरे, ४ सिलेमान मुसाजी, व ५ दाने इब्रम. परप्रांतांतून आणलेला विविध माल व किराणा यांची विक्री हे दुकानदार करीत.[२] इ. स. १८१९–२० मध्ये दुकानदारांची संख्या ११ झाली. इ. स. १८२०–२१ मध्ये नागावांत तांबटांचीं दुकानें असल्याचा उल्लेख आढळतो. १८२२–२३ मध्ये दुकानदार ११ च आहेत. या वर्षीचे कांही दुकानदार १ सदु कुंभार, २ गणेश गंगाधर भिडे, ३ महादेव बापुजी महाजन हे होत. ब्राह्मण दुकानदारांचा उल्लेख नागावच्या इतिहासांत या वर्षी प्रथमच येतो.[३] इ. स. १७९८–९९ मध्ये नागावांत 'दुकानविक्री' ५।।।≡ रु. जमा झाली. बागमळा व दिवाणखारींत एकही दुकान नव्हतें.[४]

**गादीतंबाखु** — पान तंबाखू देणें ही जुन्या जमान्यांतील प्रतिष्ठित समजली जाणारी चाल होती. महालांत येणाऱ्या मनुष्यास, न्यायनिवाड्याचे प्रसंगीं किंवा दरबारांत पान, विडा व तंबाखु देणें शिष्टमान्य होतें. सदर खर्च भागविण्यासाठी हा कर बसविला असावा, असें चर्चेचे प्रसंगीं संशोधकांनी आपलें मत मांडलें व अन्य कारणपरंपरेच्या अभावीं सध्या मान्य करावें असें वाटतें. ज्याप्रमाणें ब्राह्मण, प्रभु, मंदिरें, सनदी नोकरांवर घरटक्का नव्हता, त्याप्रमाणे गादी-तंबाखु हा करही त्यांस माफ होता.[५] इ. स. १७९८–९९ मध्ये नागाव येथे ४९४ घरें होतीं. पैकीं २५१ घरांवर हा कर आकारला आहे. दुकानांत विकल्या जाणाऱ्या तंबाखू या वस्तूशीं त्याचा संबंध नाही; तो घरांच्या संख्येवर आकारला आहे हें स्पष्ट होईल. तो दर घरास १। रु. आकारण्याचा शिरस्ता होता. पण ३९ घरांतून तो निम्मा वसूल केला आहे.

| | |
|---|---|
| २१२ घरें — १.।. रु. प्रमाणे | २५५ रु. |
| ३९ घरें — ०।।= रु. प्रमाणें | २४.।= रु. |
| २५१ घरें | २८९।।. रु. |

१ आंदरु नं. १३४ पृ. ५० ते ५७; आंदरु नं. ६३७, पृ. १३३; आंदरु नं. ६३६पृ. ११३, ११४; आंदरु नं. ६३८, पृ. १६३, १६५, १७४, १७५.; कोंजरु नं. १३७, पृ. २९, ३०

२ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६

३ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७

४ आंदरु नं. १३४, पृ. ५४

५ आंदरु नं. १३४, पृ. ६०

अशी ही रकम झाली. आणखी सहा घरांवर दुकानविक्रीबरोबरच .।।. रु. प्रमाणें ४।। व एका दुकानावर १। रु. मिळून ५।।।० रु. 'गादीतंबाखु' या सदराखालीं जमा केले आहेत. तेव्हां, इ. १७९८–९९ मधील गादीतंबाखूची एकूण वसुली २९५।० रु. झाली. गादीतंबाखू व दुकानविक्री हे दोन कर वेगळे आहेत.[1] खार नागांवमध्यें या वर्षी ९ घरें होतीं; त्यांवर १०।।= रु. व नवेदर बागमळामधील २२ घरांपैकीं २१ घरांवर २५ रु. हा कर आकारला आहे.

| इ. स. | गादीतंबाखु कर रुपये. |
|---|---|
| १७९८–९९ | २९५। रु. (२५८ घरांवर) |
| १८०६–०७ | २९६।। रु. |
| १८१६–१७ | ३१२।।।= रु. |
| १८२८–२९ | ३०४।= रु. |
| १८२९–३० | ३०७।। रु. |
| १८३९–४० | २५७०= रु. (२७७ घरांवर) |
| १८४०–४१ | २५७०= रु. |

[ आंदरु नं. ६३७, पृ. १३३; आंदरु नं. ६३६, पृ. ११३, १४४; आंदरु नं. ६३८, पृ. १७४; १६३, कोंजरु नं. १३७ पृ. ३३, ३७; आंदरु नं. १३४, पृ. ६० ].

इ. स. १८१९–२० मध्यें नागावचे मोरशेट बिन पांडशेट सोनार यांनी आंगऱ्यांस विनंति केली की मी यंदा भावापासून वेगळा होऊन त्याच घरांत दुकान घालून राहात आहें. तेव्हा मजवरील घरटक्का इत्यादि देणें ठरवून द्यावें. आंगऱ्यांनी पुढील ठराव केला.

१०।। घर देणें + .।।= पट्टी तंबाखु + .।।-।। मोहतर्फा देखील बाबती, मिळून २।. रु. दरसाल मोरशेटने द्यावेत.[2]

**भंडाऱ्यांच्या व्यवसायावरील कर** — भंडारी तीन व्यवसाय करीत. कांही जण ताडांपासून ताडी काढीत; ते ताडे-भंडारी होत. माडांपासून माडी काढणारे भंडारी होते, त्यांचा व्यवसाय महत्त्वाचा होता. तिसरा व्यवसाय 'सराभट्टी'चा म्हणजे दारू गाळण्याचा. इ. स. १७९८–९९मध्ये नागावांत — दिवाणखार धरून — एकूण भंडाऱ्यांचीं ३९ घरें होतीं. पैकी एका घरास भंडारपणाचा कर माफ होता. बाकी ३८ पैकी ३६ घरांस प्रत्येकीं २।। रु. प्रमाणे ९० रु. कर द्यावा लागे. दोन घरांवर प्रत्येकीं १।. रु. प्रमाणे आकार होत होता. एकूण ९२।। रु. कर वसूल झाला. बागमळ्यांत दोनच भंडारी हा व्यवसाय करीत होते. एकच मनुष्य सराभट्टी लावणारा दिसतो; त्याचेवर २ रु. आकार केला आहे.[3] या दोन रुपये करांत १।।. रु. ऐनदस्त व .।. रु. बाबती म्हणून वांटणी झाली आहे.

गावांत कोणता व्यवसाय करणारीं किती माणसें असावींत, याचा विचार राज्यकर्त्यांनी करावयाचा असतो. एखाद्या गावांत फार मोठ्या प्रमाणावर माडी काढण्याचा धंदा चालवून भागणारें नव्हतें. सत्तेला व्यावसायिकांच्या प्रमाणाची जाणीव असे. इ. स. १८१२–१३ मध्येसरकार व नागावचे वाडकर यांमध्यें कलमबंदी झाली; त्यावेळीं लोकांनी सरकारला विनंति केली की, 'आगरांतील माड भंडाऱ्यांस द्यावयाचे ते आमच्या सोयीने देऊं; मक्त्याखेरीज तोशीस देऊं नये.' त्यावर सरकारने सांगितलें की 'बागायतांतील शें. १० माडांपर्यंत मक्त्याखेरीज तोशीस लागणार नाही. भंडाऱ्यास जास्त माड दिल्याचें आढळल्यास जादा आकार आकारला

१ आंदरु नं. १३४, पृ. ५४, ६०, ६२, ६३

२ आंदरु नं. २४६, पृ. १०१

३ आंदरु नं. १३४, पृ. ५१. ५४, ६०

जाईल.'[१] याचा अर्थ, आपल्या गावांतील शें. १० मांडांची माडी काढली गेली, तरी तें प्रमाणांत होय, अशी सरकारची कल्पना दिसते. इ.स. १८२२–२३ मध्ये नागावांत पन्नास भंडारी माडी काढण्याचा व्यवसाय करीत होते.[२] इ. स. १८२९–३० मध्ये नागावांत ८ ताडे भंडारी होते व त्यांचेकडून प्रत्येकीं १ रु. कर घेतला आहे. भंडारी ३८ आहेत; त्यांचेकडून एकूण १०७ रु. दरीबा वसूल केला आहे.[३]

इ. स. १८३९–४० रु. भंडारपण करणारे एकूण ३५ जण आहेत; पैकी ६ ताडेभंडारी होते. ताडेभंडारी १।. प्रमाणें कर भरीत होते. बाकी २९ पैकी २६ जणांनी प्रत्येकीं २॥ रु. प्रमाणे ६५ रु. कर भरला. एकूण कर ७२॥. रु. वसूल झाला. तिघांना कराची माफी होती.[४] इ. स. १८४०–४१ मध्ये ताडेभंडारी ५ व माडांचे भंडारी २६ मिळून ३१ जण व्यवसाय करीत होते.

सरकारला कारणपरत्वें दारू लागत असे. वरीलपैकी १४ जणांकडून सरकारने या वर्षी ६।. मण दारू घेतली. दारूचा दर १ रु. मण होता. या वर्षी कर म्हणून ६७।. रु. सरकारभरणा झाला.[५] दारूचा उपयोग ठिकठिकाणच्या यात्रांकरिता व तोफा धुण्याकरिता करीत.

## दारू गाळण्याचा मक्ता

इ. स. १८२९–३० पर्यंत परप्रांतीं राहणाऱ्या कोणत्याही माणसाने आंगऱ्यांच्या प्रदेशांत दारू गाळण्याचा मक्ता मागितल्याचें आढळून येत नाही. स्थानिक भंडारी माडी काढीत व क्वचित् मोहाची दारू गाळीत. त्यांना मोहतर्फा द्यावा लागे व ते आपल्या घरीं अगर बाजारांत माडी–दारू विकीत.

या वर्षी मुंबईचा पारशी व्यापारी धनजी रुस्तुमजी याने आंगऱ्यांच्या प्रदेशांतील सात महालांत कोठेही दारूची भट्टी घालण्याची, गाळण्याची व विक्री करण्याची परवानगी मागितली. त्याचें म्हणणें असें होतें की सातही महालांत बाजाराचा मक्ता कोणासही नाही; तेव्हा दारूचाही मक्ता कोणास नाही. आंगऱ्यांनी त्यास परवानगी दिली. त्यानें मोहाच्या फुलांची दारू गाळण्याचें ठरविलें व विनंति केली की पहिल्या दोन वर्षांचा प्राथमिक खर्च भरून येण्यासाठी मक्ता किमान दहा वर्षांचा दिला, तरच आपला निभाव लागेल. ठरलें की चालू सालीं धनजी रुस्तुमजीने २५ रु द्यावेत व पुढे दरसाल ५० रु. दोन हप्त्यांनी—श्रावण व माघांत द्यावेत. करार झाला तो असा —

(१) ज्याला जशी उंची, मध्यम दारू पाहिजे असेल, तशा प्रकारची दारू धनजीने शिरस्त्याप्रमाणे पुरवावी. (२) पूर्वीचे भंडारी माडी-दारू विकतील; त्यांच्या धंद्यावर धनजीने आक्रमण करूं नये. (३) ज्या सात महालांत दारू विकण्याचा मक्ता आंगऱ्यांनी दिलेला नाही त्याच महालांत फक्त, धनजीने दारू विकावी; मक्त्याचे महालांत विकूं नये. (४) सोयीस येईल तेथे धनजीने भट्टी घालावी. (५) सदर सात महालांत अन्य कोणास भट्टी घालण्यास आंगरे परवानगी देणार नाहीत. (६) धनजी शेटने मान्य केलें की मोहाचीं फुलें ठिकठिकाणांहून आणीन; त्यांवर २० मणांचे खंडीस १ रु. प्रमाणे जकात देईन; शिवाय खुटवा देईन. (७) आंगऱ्यांच्या राज्यांतून गाळलेली दारू मुंबईस न्यावयाची झाल्यास धनजीस जकात पडणार नाही. (८) मक्त्यांतील ठिकाणीं दारू रस्त्याने अगर बंदरांतून विक्रीस न्यावी लागेल. त्यावेळीं वाटेंत जकात

१ आंदरु नं. ६३७, पृ. १२४
२ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६, ६३७
३ आंदरु नं. ३८४, पृ. १९७
आंदरु नं. ६३८, पृ. १६५
४ आंदरु नं. ६३८, पृ. १७५
५ कोंजरु नं. १३७, पृ. ३०, ३५

पडणार नाही. (९) दहा वर्षांच्या मुदतींत ग्रालमेल करून भट्टी घालण्यास दुसऱ्या कोणास परवानगी देण्यांत येणार नाही.[1] आंगरे प्रदेशांत भट्टीच्या दारूचा प्रारंभ अशा तऱ्हेने झाला.

**दहीबकरें मक्ता** — हा कर बकरीं पाळणारे व गौळी यांच्या व्यवसायावरील आहे. म्हशी पाळणारांवर दहीटक्का आकारीत; ब्राह्मणांस तो माफ होता. नागावचे ब्राह्मणेतर बकरीं पाळीत त्यांवर 'बकऱ्यांचा' आकार केला आहे. इ. स. १७९८–९९ मध्ये दहीटक्का १० रु. व बकऱ्यांवरील कर २५ रु. मिळून ३५ रु. वसूल झाले. बागमळा व दिवाणखार यांतून एक पैही वसूल झालेली नाही.[2] इ. स. १८०६–०७ व १८१६–१७ मध्ये ही रक्कम ३५ रु. च जमा झाली आहे.[3] इ. स. १८४०–४१ मध्ये हा कर फक्त ४॥।– रु. जमा झाला.

हा कर आकारण्यामागील विचार आपणांस इ. स. १८४०–४१ च्या कागदावरून कळतो. ४८ घरांकडून तो वसूल केला; त्याचें प्रमाण असें—४६ घरांकडून २ शेरप्रमाणे दहीं वार्षिक घ्यावयाचें व दोहोंकडून १ शेरप्रमाणे, मिळून ९४ शेर दही बकऱ्यांबाबत झालें.

शिवाय, या वर्षीं ५० म्हशींचा वनटक्का वसूल केला आहे. त्यापैकी ३० म्हशींवर दह्याचा आकार नाही. २० म्हशींवर, दर म्हशीस ३ शेरप्रमाणे ६० शेर दही आकारलें आहे.

तेव्हा, एकूण दही ९४ + ६० = १५४ शेर = ३॥।४ मण झालें. त्याची या वर्षाची किंमत ४॥।– रु. झाली. (दर १।. रु. मण). वापरलेलें माप वजनी आहे.[4]

**पहीण कोंबडेपट्टी** — नागावचे अब्राह्मण कोंबडीं पाळीत; त्यांवर कर आकारण्याचा शिरस्ता केव्हा निर्माण झाला हें कळत नाही. इ. स. १८४०–४१ मध्ये तो आकारलेला दिसतो. या वर्षीं नागावांत ६३२ घरें होतीं. त्यांपैकी ३५४ घरांवर ही पट्टी नव्हतीच. (यांत मंदिरें, ब्राह्मणघरें, सरकारी इमारती इ. आलीं.) उरलीं घरें २७८. त्यांतूनही अनेक घरें वगळून शेवटीं ती फक्त २४ घरांवर आकारलेली आहे. त्यांचा हिशेब —

| कोंबडीं | प्रतघरें | दरघरास |
|---|---|---|
| ६० | २० | ३ |
| ८ | ४ | २ |
| ६८ | | |

दर कोंबड्याची किंमत ⅛= प्रमाणें ८.।।. रु. वसुली.[5] इ. स. १८००–०१ मध्ये १२९ कोंबडीं जमा झाल्याचें दिसतें.[6]

**तूप उडीद मोईन** — मोईन म्हणजे वार्षिक नेमणूक अगर ठराव होय. तूप आणि उडीद यांवर हा कर घेत.

| इ. स. | तूप + उडीद मोईन | | आकार | आधार |
|---|---|---|---|---|
| १७९८–०७ | १०० + ४⅛= | = | १०४⅛= | आंदरु नं. १३४, पृ. ५५ |
| १८०६–०७ | | = | १०० | आंदरु नं. ६३७, पृ. १३३ |
| १८१६–१७ | | = | १०४⅛= | आंदरु नं. ६३६, पृ. ११३, ११४ |
| १८२९–३० | | = | ७४॥. | आंदरु नं. ६३८, पृ. १६३ |
| १८३२–३३ | | = | ७४॥. | आंदरु नं. ६३८, |
| १८३९–४० | ५०।– + २४⅛≡ | = | ७४॥. | आंदरु नं. ६३८, पृ. १७४ |
| १८४०–४१ | | = | ७४॥ | कोंजरु नं. १३७, पृ. ३७ |

१ आंदरु नं. ८३, पृ. १८१, १८२
२ आंदरु नं. १३४, पृ. ५४, ६२, ६३
३ आंदरु नं. ६३७, पृ. १३३ व आंदरु नं. ६३६, पृ. ११३, ११४
४ कोंजरु नं. १३७, पृ. ३५
५ कोंजरु नं. १३७, पृ. ३४
६ आंदरु नं. ६०१ पृ. ७७

इ. स १८३९–४० पर्यंत तुपावर मणामागे १० रु. हा कर होता; तो या वर्षी ७ रु. करण्यांत आला; उडदावर मणामागे .।।।. रु. कमी करण्यांत आला.[१]

या करांहून वेगळ्या प्रकारचे कांही कर आंगरेकालांत होते; ते 'नजर' या स्वरूपाचे आहेत.

**दत्तक** — (१) इ. स. १७९८–९९ मध्ये पांडुरंग हरि आठवले यांनी दत्तक घेण्यास परवानगी मागितली. ५० रु. नजर घेण्याचा ठराव करून आंगऱ्यांनी त्यांस परवानगी दिली.[२] (२) इ. स. १८१८ ऑगस्ट २३ या दिवशीं गोविंदभट वैशंपायन यांनी दत्तक घेतला. त्याप्रीत्यर्थ ५ रु. नजराणा आंगऱ्यांनी आकारला. नंतर धर्माधिकारी, जमीदार व कमाविसदार यांचे नावें दत्तकास परवानगी दिल्याच्या सनदा सुटल्या.[३] (३) इ. स. १८१९–२० मध्ये वेदमूर्ति भगवंत बापु करवंत यांनी भास्कर करवंत, महाल थळ यांचा पुत्र दत्तक घेण्याचें ठरविलें. सरकारनें ठराव केला की, करवंत यांनी १५ रु. सरकारांत नजर द्यावेत. आंगऱ्यांनी सनद देऊन दत्तकाची परवानगी दिली. सनदेची एक प्रत धर्माधिकारी व समस्त ब्राह्मण यांचे नावें, कमाविसदार यांचे नावें दुसरी, अशा दोन प्रती धाडण्यांत आल्या.[४] (४) इ. स. १८३९–४० मध्ये आंगऱ्यांनी नागावच्या धर्माधिकाऱ्यांस पत्र लिहिलें की वाराणशीबाई घाणेकरीण आपल्या पुतण्यास दत्तक घेणार आहे. सुरती चार रुपये नजर घेऊन परवानगी दिली आहे; चौकशीपूर्वक दत्तविधान व्हावें.[५]

नजर किती घ्यावयाची, हा सरकारच्या इच्छेचा व देणाऱ्याच्या ऐपतीचा विषय असल्यामुळे येथे नियम नाही; म्हणून आकडे वेगळे आहेत.

लग्नटक्का व पाटदाम अशा दोन बाबतींचें उत्पन्न आंगऱ्यांस मिळत असे. ही रकम अलीबागेस भरावयाची असे; पण ११ मार्च १८२७, छ १२ साबान रोजीं आंगऱ्यांनी जाहीर केलें की नागाव महालाचे प्रजेस हा मान देण्यास अलीबागेस येणें गैरसोयीचें व हिसक्याचें होतें; तरी सदर मानाच्या वस्तु नागाव महालांत भराव्यात व त्यांबद्दल कवज म्हणजे पावती घ्यावी. लग्नाबद्दल दोन रुपये, एक आणा नारळ-विड्याबद्दल, असे २८" रु. महालांत भरावयाचे. कारकुनांस आठ आणे द्यावयाचे. या आठ आण्यांत दिवाणजी, पोतनीस, फडणीस व शिक्केबारदार यांचा समान हिस्सा होता. एकूण, प्रजेस लग्नटक्का म्हणून २।।" रु. भरावे लागत.[६]

**लग्नटक्का** — लग्नटक्क्याबद्दल कांही नोंदी अशा — इ. स. १७९७–९८ (१) लक्ष्मण भंडारी पाटील, वास्तव्य हाटाळें, महाल नागांव, याज्जा भाऊ नवरा. संबंधी राघु करदेकर, वास्तव्य आवास याची लेकी नवरी असें लग्न आवास येथे झालें. पाटील हा सुभेकरी (?), सबब लग्नटक्क्याच्या माफीची चिठ्ठी देण्यांत आली.[७]

इ. स. १८१९–२० (१) लक्ष्मण शिंदा गुलाम निसबत बचंभट जोशी, वास्तव्य नागाव हा नवरा व धर्माजी आप्पाची याचे कुणबिणीची मुलगी असें लग्न नागावांत लावण्याबद्दल आंगरे यांनी जोशी यांस पत्रानें कळविलें. लग्न गुलाम व कुणबिणीची मुलगी यांचें असल्यामुळे लग्नटक्का माफ केल्याची सनद देण्यांत आली.[८]

---

१ आंदरु नं. ६३८, पृ. १७५

२ आंदरु नं. १३४, पृ. ६३

३ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६

४ आंदरु नं. ४७, पृ. ७५; आंदरु नं. २४९, पृ. १०३

५ आंदरु नं. ६३८, पृ. १६२

६ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७

७ आंदरु नं. १३४, पृ. ६४

८ आंदरु नं. ४७, पृ. ७०

नागावचे ब्राह्मण व प्रभु यांस लग्नटक्का माफ होता. अन्य जातीयांचे प्रथम विवाहांची इ. स. १८१९–२० ची नोंद आंगरेदप्तर रुमाल नं. २४९, पृ. १०५ ते १०७ वर दिलेली आहे. या वर्षी नागावांत प्रथम विवाह तेवीस झाले. त्या यादीचें अवलोकन करितां, लग्नटक्का आकारण्यांत कांही शिरस्ता होता, हें निर्विवाद दिसतें; तो शिरस्ता असा —(अ) गुलाम आणि कुणबिणींच्या मुलांचे विवाहांस सरकारी परवानगीची चिठी मिळे; मग लग्न लावलें जाई. त्यांचेजवळून लग्नटक्का घेत नसत. (ब) दोन्ही पक्षांकडून प्रत्येकी एक रुपया, एकूण दोन रुपये लग्नटक्का घेत. (क) देवस्थानांकडे नेमलेल्या गुरवांस लग्नटक्क्यांत अर्धी माफी दिली जात असे. (ड) गावच्या पाटलाच्या मुलाचें, मुलीचें, पुतण्या अगर पुतणीचें लग्न असल्यास त्याचे पक्षास लग्नटक्का माफ केला जाई. (ई) वर्तकादि वतनदारांस लग्नटक्का अर्धा माफ असे. (फ) लग्नें बहुधा मुलीच्या घरीं होत.

आंगरेदप्तर रुमाल नं. २४९, पृ. १०७, १०८ वर नागावांत १८१९–२० मध्ये लागलेल्या सर्व म्हणजे सात पाटांची नोंद आली आहे. या संबंधांत मुलास पाटकर व रंडक आणि मुलीस पाटकरीण, रंडकी व पाटनवरी असे शब्द आले आहेत. विधवा स्त्रीस रांड असा शब्द सर्रास वापरला आहे. काल बदलला म्हणजे शब्दार्थ किती बदलतात ! पाटदाम अडीच रुपये असे; शिवाय, आंगऱ्यांस मानाचा शेला अगर दहा रुपये द्यावे लागत; मिळून साडेबारा रुपये एका पाटाचे सरकारास मिळत. वतनदाराकडील पाट असला, तर पाटदाम व शेला यांची माफी सरकारांतून मिळे. पाट लावण्यापूर्वी सरकारची परवानगी घ्यावी लागे. रोख पैसे भरतां न आल्यास सरकार पाटदाम नांवें टाकून नंतर वसूल करी. इ. स. १८४०–४१ मध्ये ३७ रु. लग्नटक्का वसूल झाला असून पाटदाम ४७ रु. जमा झाले.[१]

ठरावपट्टी :—आंगऱ्यांच्या प्रदेशांत कारणपरत्वें कांही नवीन कर वसूल केल्याचें दिसतें. इ. स. १८०७–०८ मध्ये नागावांत एकंदर ५५३ घरें होतीं. पैकी १७ देवालयें, १ मठ, १ सरकारचौकी, ३ अलगा सरकारचीं घरें, २ व्याधिष्टांचीं घरें, २ भिकाऱ्यांचीं घरें, १ परागंदा न्हाव्याचें घर मिळून २७ घरें वगळलीं, म्हणजे संख्या ५२६ होते. शिवाय, नवेदर बागमळा येथे ३२ घरें होतीं. एकूण घरें ५५८ झालीं. दिवाणखारींत एकही घर नव्हतें. ५५८ घरांकडून सरकारने १०८४ रुपये ठरावपट्टी वसूल केली; ती पुढीलप्रमाणे :—

| घरें | आकार रु. | |
|---|---|---|
| २२० ब्राह्मण पुरुष घरें | ४४० रु. | |
| ३ „ स्त्री घरें | ३ रु. | |
| १९ प्रभु घरें | ३८ | |
| २७ अब्राह्मण स्त्री घरें | २७ | |
| २५७ अब्राह्मण पुरुष घरें | ५१४ | |
| ५२६ नागावचीं घरें | १०२२ रु. | नागाववर पट्टी. |
| ३० बागमळा पुरुष घरें | ६० | बागमळावर पट्टी. |
| २ „ स्त्री घरें | २ | „ „ |
| ५५८ घरें. | १०८४ रु. | |

[आंदरु नं. ६३६, पृ. १५२]

ठरावपट्टी वसूल करण्याचीं कारणें कळत नाहींत; पण ती एका वर्षापुरतीच, म्हणजे नैमित्तिक आहे.

---

१ कोंजरु नं. १३७, पृ. ३३, ३७

**संतोषपट्टी**–; इ. स. १८१५–१६ सीत आशर मयातैन व आलफ या वर्षी आंगऱ्यांनी नागावकरांकडून एकूण ५८९ रुपये संतोषपट्टी म्हणून जमा केले आहेत. बागमळयावर २९ रु. आकारले गेले. सामान्यपणें घरटीप १ रु. आकारला आहे. दिवाणखारीवर घरच नसल्यामुळें वसुली नाही. जे परगावीं गेले होते, ते पट्टींतून सुटले.[१] ही संतोषपट्टी कशाकरिता वसूल केली हें कळत नाही. या वर्षी दुसरे कान्होजी आंगरे सरखेल व दिवाणजी बिवलकर यांचें बिनसलें असल्याने दिवाणजींस दूर करण्याचा आंगऱ्यांचा प्रयत्न चालला होता; तो याच वेळीं फसला असून आंगऱ्यांवर दिवाणजींचा वरचष्मा झाला. तेव्हा, संतोषपट्टी बहुधा बिवलकरांनी बसविली असावी. रावबाजी पेशवे झाले; त्यामुळे प्रजेस संतोष झाला ! तत्प्रीत्यर्थ त्यांनीही 'संतोषपट्टी' याच नांवाची पट्टी पुणेंकरांकडून उकळली होती; तिची ही नक्कल असावी.

**दायेतपट्टी** — इ. स. १८२३–२४ या वर्षीं नागावकरांवर आकारलेली ही पट्टी बिवलकर दिवाणजींनी रद्द करविली. दायाद म्हणजे नातलग. दायेतपट्टी म्हणजे भाऊबंधांचे निमित्ताने आकारलेला कर होय.[२]

**जकात** —नागावच्या जकातीचे दोन विभाग पडतात. (१) गावांत उत्पन्न झालेली वस्तू किरकोळीने गांवच्या बाजारांत विकली जात असतां आकारलेली जकात, हा एक विभाग. भाजीपाला, फळें इत्यादींचा खप परप्रांतांत व्हावा, म्हणून फार मोठ्या प्रमाणावर निर्माण करणें व मोठ्या शहरीं पाठविणें, हा प्रकार आंगरेकालांत नव्हता. भाजीपाला गावच्या गरजेपुरता उत्पन्न करावयाचा व गावांत विकावयाचा, हा शिरस्ता होता.

इ. स. १८१२–१३ मध्ये सरकार व नागावकर यांत जी कलमबंदी झाली, तींतील एक-कलम असें — नागांवचे वाडकर नारळ, सुपारी व इतर आगरी जिन्नस प्रांतांत विकावयास नेतील; त्यास पूर्वीपासून जकात नाही. पुढेही, सरकारनें जकात आकारूं नये. सरकारनें मान्यता दिली की खुद्द वाडकराने वाडींतील जिन्नस विकावयास आणिल्यास त्यास जकात पडणार नाही.[३] पण जकात न पडली, तरी 'वानगी' घेण्याचा पूर्वापार शिरस्ता होता; त्याबद्दल तक्रारी उत्पन्न होत. वानगीवारी विक्रीचा जिन्नस संपून जाणेंही शक्य असे. इ. स. १८२९–३० मध्ये आंगऱ्यांनी जाहीर करून टाकले की वस्तूची एकदा वानगी घेतल्यावर पुन्हा घेतली जाऊं नये; पण एवढया जाहीर करण्याने भागलें नाही ! इ. स. १८३८–३९ मध्ये बाळाजी विष्णु लोंढे, जकातमामलेदार, यास आंगऱ्यांनी अट घातली की ज्या गावांतून जिन्नस विक्रीस निघेल, त्या गावीं एकदा वानगी घेतल्यास दुसऱ्यांदा घेऊं नये.[४]

इ स. १८२९–३० मध्ये, पुढील किरकोळ वस्तूंवर जकात न घेण्याचें जाहीर झालें. (१) नारळ सुमारें पांच. (२) विड्याचीं पानें पांचशें. (३) पोफळें पंचवीस. (४) तांदूळ मापी दीड पायली. (५) केरसुण्या पांच. (६) वासे–एक. (७) मांसळी चार पैशांची. (८) काकवी वजनी अडीच शेर. (९) तंबाखु एक शेर. (१०) भाज्या व फळें,—भोपळा, फणस, अननस, महाळुंग, कलिंगड किंवा या प्रकारचे (प्रत्येकीं) एक फळ. पडवळ, शिराळीं वगैरे लांबट जिन्नस तीन तीन सुमारें; कारलीं, भेंडे, वांगीं—एक एक जिन्नस पंचवीसपर्यंत. आंबे दहा, लिंबें पांच. केळीं दहा. सुंभाच्या कोपऱ्या तीन.[४] या यादीमुळे नागावच्या बाजारांत येणाऱ्या, नागावांत उत्पन्न होणाऱ्या वस्तूंची यादी कळते.

---

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६    २ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७
३ आंदरु नं. ६३७, पृ. १२४    ४ आंदरु नं. ७६१, पृ. ७९,८२

किरकोळीच्या बाजाराप्रमाणे महालचा घाऊक व्यापार होता. या व्यापाराचे दोन मार्ग होते; एक उभा मार्ग व दुसरा जलमार्ग. मार्गावरील जकात आंगरे मक्त्याने देत. तर्फ उमटें, तर्फ ब्राह्मणगांव, महाल नागावें, महाल अक्षी व तर्फ खंडाळें या पांच विभागांस पंचमहाल अशी जकात–कागदांत संज्ञा आहे.[१] इ. स. १८०६ ते १८१० पर्यंत पंचमहालांची जकातकमावीस नागावचे बापुजी त्रिंबक आठवले यांनी दरसाल चारशे रुपये मक्त्याने केली व त्याप्रमाणे उगवणी झाली. जकातीच्या कराराची कलमें अशीं — (१) कार्तिक शु।। १ ते पौष व।। ३० या कालांत १८३ रुपये, पुढे तीन महिन्यांत १३३ रुपये व अखेर सालीं ८४ रुपये मिळून चारशे रुपयांचा भरणा करावा. (२) आफ्तफितरत झाल्यास प्रांत मजकूरच्या शिरस्त्याप्रमाणे बाकी मजुरा दिली जाईल. (३) हप्तेबंदीशिवाय आगाऊ ऐवज सरकारांत घेतल्यास व्याज दरमहा दर शेकडा १ रु. प्रमाणें मजुरा देऊं. (४) ठरलेल्या मक्त्याच्या रकमेवर २५ रु. हून जास्त चढ कोणी कबूल केल्यास मक्त्याची घालमेल केली जाईल.[२] करारावरून अजमास होतो की श्रावण, भाद्रपद व आश्विन या तीन महिन्यांत कोंकणच्या जोरदार पावसामुळे व्यापार बंद असावा; उभा मार्ग थोडा चालू राहात असेल.

इ. स. १८११ ते १३ या दोन वर्षांचा मक्ता बापुजी त्रिंबक आठवले यांनींच दरसाल ५ शें. रुपयांनी म्हणजे शंभर रुपये चढ देऊन केला. इ. स. १८१३ ते १५ या दोन वर्षी दरसाल ५५० रु. मक्ता त्यांनी दिला. कराराचीं कलमें पूर्वींचींच होतीं; फक्त, मक्त्याची रक्कम दरमहा ६८।।।.रु. प्रमाणें आठ हप्त्यांनी भरण्याचें बदलतें कलम आलें होतें.[३] इ. स. १८१९–२० मध्यें सदर आठवले नागावकर हेच जकातमक्तेदार असून त्यांनी ७२६ रु. सरकारकडे भरणा केलेला आढळतो; म्हणजे, जकातमक्त्यांत दरसाल चढ होत गेलेला व मक्ता पुरा झालेला आढळतो[४]. हें व्यापारवाढीचें चिन्ह आहे.

इ. स. १८१९–२० मध्ये महाल नागावचें १११।।३ खंडी भात (३।। शेरी मापी पायली.) मुंबईस विक्रीस रवाना झालें. पुढील तपशील पहा.

| खंडी | गलबताचें नांव | तांडेल |
|---|---|---|
| २९ | बहिरी | कान तांडेल |
| २४।।।४ | दर्यादौलत | बाल तांडेल |
| २० | वेताळप्रसाद | भान तांडेल |
| १४।।।१ | पवन | बेंड तांडेल |
| २२।।३ | बहिरी | कान तांडेल |
| १११।।३ | | |

[आंदरु नं. २४९, पृ. १११]

पेशवाई गेल्यानंतरची ही नोंद महत्त्वाची आहे; कारण, तोंवर आंगरे पेशव्यांचे अंकित असल्याने मुंबईशीं त्यांचा व्यापार किती असावा, यावर पेशव्यांचें नियंत्रण असण्याची शक्यता आहे. आपल्या प्रजेस पुरून उरेल तेंच परप्रांतांत रवाना होणार; तेव्हा नागावच्या शिलकी उत्पन्नाचा अजमास देणारा, म्हणून हा आकडा उद्बोधक वाटतो. गलबतांचा माल वाहून नेण्याचा मगदूर ध्यानीं घेण्यासारखा आहे.

१ आंदरु नं. ७६१, पृ. ७९
२ आंदरु नं. ७६१, पृ. ७७, ७८, ८६
३ आंदरु नं. ७६१, पृ. ८४, ८५
४ आंदरु नं. २४९, पृ. १०४, १११

महाल नागावांतील भात परप्रांतीं विक्रीसाठी रवाना होई. व्यापारांत गुंतलेल्या आणखी कांही गलबतांचीं नांवें — (१) भास्कर, (२) पालखी, (३) दर्यासागर, (४) यशवंती, (५) भवानी, (६) जगजीवन हीं होत. हीं गलबतें इंग्रजी प्रदेशांत भात घेऊन जात. भातावर जकात वसूल होई. नारळ परप्रांतीं रवाना होत; त्यांवर शेकडा ८= जकात असे.[1]

इ. स. १८२९–३० चें महाल नागावचें जकातीचें उत्पन्न ११६६ रु. आहे.[2]

इ. स. १८३८–३९ मध्ये बाळाजी विष्णु लोंढे या दुसऱ्या नागावकराने जकातीचा मक्ता केला. त्याला आंगऱ्यांनी जकातीसंबंधाने अटी घातल्या, त्या अशा — (१) सरकारचे दोन शिपाई जकातीकडे आहेत; त्यांस नेमणूक अलीबागी ६० रुपये आहे. ती रकम जकातींतून द्यावी; तेवढी रक्कम तुम्हांस मजुरा देऊं. (२) जकात पेठ श्रीबाग, बंदर मांडवी, तर रहदारी बंदर मुंबई यांचाही मक्ता तुम्हांसच ४३५० रु. स दिला. ही रक्कम पांच हप्त्यांनी, दरवेळीं ८७० रु. प्रमाणे भरावी. (३) जकात पुणेंचाल नाण्यांत भरावी. (४) सावकारांनी जकातीबाबत लबाडी केल्यास सरकारांतून उपराळा होणार नाही. जकातीची चालीप्रमाणे वहिवाट व्हावी. (५) सरकारांत लागणारा जिन्नस बंदरांतून, वरवाटावरून व प्रांतांतून येईल; त्याची जकात घेऊं नये. पूर्वापार, सरकारी जिनसांवर जकात आकारण्याचा शिरस्ता नाही. (६) गांजा, बकरीं व तंबाखु या किराणा वस्तू परजिल्ह्यांतून आणल्यास तूर्त मनाई केली आहे. त्यामुळे व आफ्तीमुळे असें दुहेरी नुकसान होण्याचा संभव आहे; पण तें मजुरा दिलें जाणार नाही[3] ! पूर्वीच्या कलमांपेक्षा यांतील निराळेपणा असा की आंगऱ्यांनी पुणेंचाल तेवढेंच नाणें करारांत मान्य केलें आहे. स्वतःच्या प्रदेशांत पाडलेलीं रुपया वगैरे नाणीं आंगऱ्यांनींच बंद केल्याचा देखावा लक्षणीय आहे. सावकारांनी केलेल्या लबाडीमुळे जकातदाराच्या होणाऱ्या नुकसानीविरुद्ध त्यास जें संरक्षण सत्तेने द्यावयाचें, तेंही, या कराराने काढून घेतलें आहे. दुहेरी नुकसान होण्याचा संभव दिसत असतांनाही, आम्ही ठरलेली रकम घेऊं; तुम्ही बुडालांत तरी चिंता नाही, असें सत्तेने करारांत सांगणें चिंतनीय आहे. सारांश, या कराराला सर्वस्वी एकतर्फी व जुगाराचें स्वरूप आलें आहे.

इ. स. १८३९–४० मध्ये पंचमहालांचा मक्ता जयराम जिवाजी यांनी १००७।. रु. स केला. तर पेठ श्रीबाग, बंदर मांडवी व तर रहदारी बंदर मुंबई यांचा मक्ता बाळाजी विष्णु लोंढे यांनी केला. त्यांनी ४५५० रु. म्हणजे दोनशे रुपये चढ मान्य केला व ९१० रु. प्रमाणे पांच हप्त्यांत रक्कम फेडण्याचें ठरलें.[4] इ. स. १८४०–४१ मध्ये पंचमहालांचा मक्ता बाळाजी विष्णु लोंढे यांनी केला व हप्त्यांपोटीं कांही रक्कम भरली. पण १ डिसेंबर १८४० रोजीं डेव्हिसने पत्रक प्रसिद्ध केलें की खुष्कीच्या प्रदेशांत जकात घेण्याची वहिवाट होती; ती सरकार मेहरबानीमुळे आता बंद करण्यांत आली आहे.[5] वर्ष पुरें होण्यापूर्वीच, लोंढे यांजबरोबरचा करार सरकारने मागे घेतला व जकातीची मक्तेदारी थांबली.

**जुने कर माफ** — १० डिसेंबर १८४० रोजीं कॅप्टन डेव्हिसने आंगऱ्यांचें राज्य खालसा केल्याचें जाहीर केलें.[6] पण त्याने पूर्वीचींच माणसें कामावर कायम ठेवून कारभार चालविला. इंग्रजी प्रदेशाचे कायदे लागू करून त्याने रयतेस फडफर्मास म्हणजे राजा किंवा मोठे अधिकारी यांस प्रजेने द्यावयाचा नजराणा माफ केला. २७ नोव्हेंबर १८४१ रोजीं लग्नटक्का, पाटदाम व वेठ हे कर डेव्हिसने काढून टाकले. १३ डिसेंबर १८४१ रोजीं त्याने जाहीर केलें की करांपैकी कोंबडें, घर-

---

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७
२ आंदरु नं. ३८४, पृ. १९७
३ आंदरु नं. ७६१, पृ. ८० ते ८३
४ आंदरु नं. ७६१, पृ. ८०, ८८
५ कोंजरु नं. १३७, पृ. ३२, ३४
६ कोंजरु नं. १३७, पृ. ३९, ४०

टक्का व वनटक्का हीं कलमें तहकूब करण्यांत आलीं आहेत. जाहीरनाम्याचे अन्वयें कारसाई तहकूब करण्यांत आली; पण तत्पूर्वी ५२।।.।।।. रु. वसुली झाली होती.[१] कर कमी केले म्हणजे लोक संतुष्ट होतात व ते वाढवले किंवा लादले म्हणजे प्रजा असंतुष्ट होते, हें कॅप्टन डेव्हिसला माहीत होतें. त्याने कर काढून टाकल्यामुळे प्रजेस संतोष झाला.

येथवर नागावच्या नक्त उत्पन्नाच्या बाबींचा आपण विचार केला. ऐनजिनसी उत्पन्नाच्या बाबतींचा विचार आपण स्वतंत्र प्रकरणांतून करणार आहोंत. येथे कारभाराच्या किरकोळ बाबींचा विचार करूं.

## (१) महालाचें दास्तान

सरकारी भाताची वसुली झाली, म्हणजे तें दास्तानांत ठेवीत व त्यांतून त्याचा विनियोग होई. इ. स. १७९८–९९ मध्यें नागावच्या दास्तानांत नागावचें ४९ खंडी १० मण ७।। पा. गोडें भात व ९ खंडी १८ मण ११।।। पा. खारें भात साठविलें होतें[२] येथे जमा करावयाचें व येथून त्याची विल्हेवाट लावावयाची अशी रीत होती. इ. स. १८००–०१ मध्ये नागावच्या कोठींतून, मागणीप्रमाणे कुलाब्याच्या कोठीकडे पुढील वस्तू रवाना झाल्या :— भात चोखें ५० खंडी १ मण २।। पायली; वरणे म्हणजे वाल, तीळ, तांदुळाची करड, चुना, काथा बारीक, चिंच, कोनफळ, खोऱ्या, कोंवडीं, फणस, नारळ, ऊस, पोफळें, विडचाचीं पानें, झाप, बांबूच्या काठ्या.[३] प्रसंगीं महालकरी खरेदी करूनही वस्तू पाठवीत. रोख रकमांचा भरणा सुभ्याकडे व ऐनजिनसी वस्तू महालांत जमा करण्याची सामान्यत: रीत होती.[४] कुलाब्याहून सरकारचें पत्र आलें म्हणजे तदनुसार रकमा अगर वस्तू खर्ची टाकण्याची शिरस्ता असे.

## (२) महालाचे कांहीं कायम खर्च

(१) १९ नोव्हेंबर १८०९—छ १० सवाल, आशर मयातैन व आलफ श्रीवाघजाई पर्वतवासी (नागावचे आग्नेयीस) येथील जत्रेकरिता नागाव महालांतून ३८≈।। रु. खर्च झाले. हे दरवर्षी खर्ची पडत.[५]

(२) इ. १८११–१२ जंजिरे खांदेरी येथील श्रीवेताळजीच्या यात्रेस महाल नागावांतून २।।। रु. खर्च दरसालप्रमाणे.[६]

(३) इ. स. १८१५–१६ नागाव महालांतून चिंचवडच्या देवांस दरसाल नक्त नेमणूक ६।≈।।. होती.[७] इ. स. १८४०–४१ मध्ये ८।≈। रु. नेमणुकीची पोहोंच झाली आहे.[८] पूर्वी चिंचवडचे देव नागावला दक्षणेप्रीत्यर्थ येत असत. उदाहरणार्थ, इ. स. १७६६ डिसेंबर ६ ते १६ हे दहा दिवस धरणीधर गोसावी अष्टागरांत दक्षिणेप्रीत्यर्थ पर्यटन करीत होते. ते प्रथम कुलाब्यास आले व नंतर नागाव येथून चौलकडे रवाना झाले. त्यांचेबरोबर सवाशें माणसें, एक हत्ती, पंचवीस घोडे, दोन उंट एवढा लवाजमा होता.[९] असे यात्राखर्च व देणगीखर्च दरसाल होत.

(४) इ. स. १८१५–१६–सुासीत अशर मयातैन व आलफ — सागरगडावरील धार्मिक

---

१ कोंजरु नं. १३७, पृ. ३२ ते ३४
२ आंदरु नं. १३४, पृ. ५५
३ आंदरु नं. ६०१, पृ. ७६, ७७
४ आंदरु नं. १६६, पृ. १८६, १८७
५ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६
६ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६
७ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६
८ कोंजरु नं. १३७, पृ. ४१
९ आंअ १००

उत्सवांचा खर्च नागाव महालांतून होई. उदाहरणार्थ, घटस्थापनेस नारळ सुमारे ७५ खर्च होत. इ. स. १८१६ जानेवारी २८ रोजीं सागरगडावर मुंजोबाची समाराधना झाली. तेव्हा नारळांचा खर्च नागाव महालांतून झाला.[1]

(५) इ. स. १८२६–२७–आंगऱ्यांस दिवाण बिवलकर यांचें बरेंच कर्ज होतें. दरवर्षी नागाव महालांतून अनेक रकमा रद्दकर्जांत दिवाणजींकडे जमा होत.[2]

(६) वर्षप्रतिपदेच्या दिवशीं ग्रामस्थ जोशी प्रथम वतनदारांकडे पंचांग सांगण्यास जात; त्यानंतर महालांत येऊन पंचांग सांगत.[3] या प्रीत्यर्थ दरसाल .।. रु. खर्ची पडत असे.[4]

(७) इ. स. १८२२–२३–सरकार खार दिवाणखार येथें चैत्रीची यात्रा भरे; तिला सरा एकूण वजन अर्धा मण आणि कोंबडीं पीस १२ लागे. हा दरवर्षींचा खर्च नागाव महालांतून होई.[5]

(८) **नागांवचे वतनदार** — वर्तक, महाजन, कुळकर्णी, चोघले, माने यांस वतनदार म्हणून मिळावयाचें नक्त व ऐनजिनसी उत्पन्न महालांतून मिळे.[6]

## (३) नागाव महाल नैमित्तिक खर्च

(१) इ. स. १८०४–०५ नाराणस्वरूप संन्यासी उपोषण करितात; सबब, वुधाकरिता दरमहा दीड रुपयाप्रमाणे तेरा महिन्यांचे १९।। रुपये महालांतून खर्च झाले.[7]

महालांतून सरकारतर्फे मेहमानखर्च म्हणून एक खर्च दरसाल होई; तो नैमित्तिक आहे. त्याचीं उदाहरणें पुढीलप्रमाणे —

(२) इ. स. १८११–१२ छ २३ रा।वल सु।। इसन्ने आशर मयातैन व आलफ. बाजीराव पंडित प्रधान यांजकडे गणेशचतुर्थीचे उत्सवास नारळ १२५; पैकीं साधे शंभर व मोहाच्या सुकडी पंचवीस, दर अनुक्रमें शे. ६ व शे. १० रु. प्रमाणे ८।। रु. खर्च महालांतून झाला. (नारळाचा दर नारळ पोहोचविण्याचे खर्चासुद्धा दिसतो.)

(३) राव पंडित प्रधान यांजकडे गुहागरास मोहाचे नारळ धाडले; त्यांची किंमत महालांतून ३ रुपये दिली.

(४) खासा स्वारी (बाबूराव आंगरे सरखेल) कडे उज्जनीस रवानगी सुकडी ४५०; मोहाचे नारळ ५०, एकूण ५०० धाडले. महालांतून खर्च १३।। + ३ = १६।। रु. झाला.

(५) दौलतराव शिंदे अलिजाबहाद्दर यांजकडे नारळ रवाना होत; खर्च नागाव महालांतून होई.

(६) इ. स. १८१२–१३–परशराम श्रीधर बिवलकर दिवाणजी यांजकडे मुलीचें लग्न झालें. नागावांतून तत्प्रीत्यर्थ ५०० नारळ खर्ची पडले.[8]

(७) इ. स. १८२४–२५ — सोभागदास नरोत्तमशेट यांच्या भावाचें अलीबाग येथें लग्न झालें. महाल नागावांतून ५०० नारळ मेहमानखर्च म्हणून दिले. त्यांची किंमत १०८= रु.; दर २८– प्रमाणे महालांत खर्ची पडली.[9]

(८) एक सरखेल जाऊन त्यांचे जागीं दुसरे आले म्हणजे महालांतून कांहीं खर्च होई.

---

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६
२ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७
३ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७
४ कोंजरु नं. १३७, पृ. ४०
५ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७
६ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६, ६३७
७ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६
८ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६
९ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७

इ. स. १७९८–९९ मध्यें पुण्याहून पेशव्यांनी बाबूराव आंगऱ्यांस सरखेली देऊन शिक्का व वस्त्रें धाडलीं; तेव्हा नागाव महालांतून ५० रु. खर्च झाला.[१]

(९) महालांतून वसुलीसाठी शिपाई ठेवून क्वचित् जादा खर्च करावा लागे; त्यास तलबाना खर्च म्हणत. इ. स. १८४०–४१ मध्ये असा खर्च ४८=।।।रु. झाला.[२]

(४) **खातें बदलणें** :—घरचा कर्ता पुरुष दिवंगत झाला म्हणजे महालीं कळवावें लागे. महालांतून वारसांची चौकशी होऊन खातें बदललें जाई.[३]

महालाच्या मुलकी कारभाराचें स्वरूप सध्याच्या मामलेदार कचेरीसारखें होतें. महालांत सर्व प्रकारचा कारभार चाले व सर्वविध जमा व खर्च तेथे होई. त्यामुळे महाल हा कारभाराचा पूर्ण विभाग अगर घटक होता. लोकांचा संबंध महालाशीं येई व विशेष प्रसंगींच त्यांस अलीबागेस आंगऱ्यांकडे जावें लागे.

---

१ आंदरु नं. १३४, पृ. ६३
२ कोंजरु नं. १३७, पृ. ४४
३ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७, ६३८

# व्यावसायिक आणि त्यांवरील कर

नागावांत निरनिराळया काळांत घरांची संख्या वेगळी होती. ब्राह्मणसमाज बहुसंख्य असल्यामुळे त्याबद्दल एका स्वतंत्र प्रकरणांत विचार केला आहे. अन्य समाज अल्पसंख्य असल्याने त्याचा जातवार अगर व्यवसायवार विचार करणें अशक्य आहे. व्यवसाय-करांचा बोजा या समाजावरच पडत असे; म्हणून त्यांचा आपण संकलित स्वरूपांत विचार करणार आहोंत.

पुढील तक्त्यांत घरांची एकूण संख्या, करमाफी असणारांची संख्या देऊन नंतर कर देणारांचा आकडा दिला आहे; नंतर कर माफ असलेल्यांचें स्पष्टीकरण तक्त्याचे रूपानें दिलें आहे.

**नागाव – एकूण घरें व माफ घरें**

| | इ. स. १७९८–९९ | १८०७-०८ | १८२९-३० | १८३९-४० | १८४०-४१ |
|---|---|---|---|---|---|
| एकूण घरें | ४९४ | ५५३ | ६३२ | ६३२ | ६३२ |
| अजीपाल (पूर्ण माफ) | २४७ | २६९ | ३२३ | ३५४ | ३५४ |
| कर देणारीं | २४७ | २८४ | ३०९ | २७८ | २७८ |
| देवळें | ११ | १७ | १७ | १८ | १८ |
| ब्राह्मण | १९८ | २२३ | २११ | २३२ | २३२ |
| गोलक | — | — | ५ | ४ | ४ |
| पोतदार | — | — | — | १ | १ |
| तंबाखुवसुली | — | — | — | ५ | ५ |
| भंडारी | — | — | — | ६ | ६ |
| परप्रांतीय | — | — | ८ | २ | २ |
| शिंपी | — | — | — | २ | २ |
| कोळी | — | — | ५ | ३२ | ३२ |
| सरकारचाकर | १ | ३ | — | १ | — |
| भिकारी | ४ | २ | ९ | १५ | १५ |
| महालकरी | — | — | १ | १ | १ |
| प्रभु | १० | ११ | १९ | २० | २० |
| मठ | — | १ | १ | १ | १ |
| गुलाम | — | — | — | ३ | ३ |
| एकत्र | — | — | — | १ | १ |
| न्हावी | — | १ | — | ३ | ७ |
| मोहतर्फी | — | — | — | १ | १ |
| परमुलकी नवे | ४ | — | २ | ३ | २ |
| सनदी पाल | १८ | — | ४१ | — | — |
| कुणबिणी | १ | — | १ | — | — |
| चौकीसरकार | — | १ | — | — | — |
| व्याधिष्ट | — | २ | १ | — | — |

| | इ. स. १७९८–९९ | १८०७–०८ | १८२९-३० | १८३९-४० | १८४०-४१ |
|---|---|---|---|---|---|
| गुजराथी | — | — | २ | — | — |
| इतर | — | — | — | ३ | १ |
| | २४७ | २६९ | ३२३ | ३५४ | ३५४ |

वर दिलेल्या यादीवरून ब्राह्मण,प्रभु, गोलक यांच्या घरांची संख्या आपणांस निश्चित कळते, मंदिरांची संख्या समजते; कारण त्यांवर कोणतेच कर नाहीत; कर न देणाऱ्या घरांची संख्या कागदांतून नक्की दिली आहे. नागावांत अन्यजातीय लोकांचीं घरें एकूण किती हें वजाबाकीनें कळलें, तरी त्यांचा जातवार निश्चित आकडा देणें अवघड आहे. जेवढे उपलब्ध होऊं शकले, तेवढे आकडे पुढील कोष्टकांत दिले आहेत. पुढील आकडे त्या त्या जातीच्या लोकांचीं कमींत कमी घरें समजावींत.

| | इ. स. १७९८–९९ | इ. स. १८२९–३० | इ. स. १८३९–४० | इ. स १८४०–४१ |
|---|---|---|---|---|
| कर देणारीं घरें | २४७ | ३०९ | २७८ | २७८ |
| दुकानदार व वाणी | ९ | १० | ७ | ८ |
| सोनार | १३ | ९ | ११ | १० |
| तेली | ८ | १० | ९ | ११ |
| परीट | १ | १ | १ | १ |
| न्हावी | ३ | ३ | ७ | ७ |
| कुंभार | २ | १ | १ | १ |
| लोहार | २ | २ | २ | २ |
| कोष्टी (कापडकरी) | २ | — | — | १ |
| सराभट्टी व भंडारी | १२ | ४६ | ४१ | ४० |
| बुरुड | ४ | ६ | ४ | ५ |
| गवंडी | १२ | ४ | ४ | ५ |
| चांभार | ४ | ६ | ५ | ६ |
| शिंपी | — | ३ | ५ | ५ |
| गुरव | — | ७ | ७ | ८ |
| माळी | — | ३ | — | १ |
| सुतार | — | १ | २ | २ |
| कासार | — | — | — | २ |
| | ७२ | ११२ | १०६ | ११५ |

[ कोंजरु नं. १३७; आंदरु नं. १३४; आंदरु नं.६३८. ]

यांशिवाय परमुलुखांतून आणलेले मुशारखोर, पाडेकरी, गुजराथी, इत्यादि कितीतरी लोक असणार. त्यांच्या याद्या कागदोपत्रीं नाहीत. या लोकांना भराव्या लागणाऱ्या करास मोहतर्फा म्हणत. नागावचा हा समाज आपल्या व्यवसायास जोडून शेती करीत असे.

**पाडेकरी** — कांही व्यवसाय स्थलपरत्वें असतात; तशा स्वरूपाचा हा व्यवसाय आहे. नागावांत नारळाचें उत्पन्न मुख्य असल्यामुळे झाडांवरून नारळ काढणें म्हणजे पाडा करणें जरूर

असे. हें मेहनतीचें, ताकदीचें व थोडें धोक्याचें काम असल्यामुळे, कांही जण हाच व्यवसाय करीत. ब्राह्मण व प्रभु हे पांढरपेशे म्हणजे पांढरींत राहून व्यवसाय करणारे असल्यामुळे सख्त मेहनतीच्या बाबतींत ते कमी पडतात; पूर्वीही तसेंच असावें; म्हणून नागावांत पाडेकरी होते असें दिसतें.

इ. स. १८२९–३० मधील कागदांत तीन पाडेकरी घरटक्का भरीत असल्याचा उल्लेख आहे; म्हणजे, त्या वर्षी सुमारें पांच जणांचा तरी पाडेकऱ्याचा व्यवसाय असावा. इ.स. १८४०–४१ मध्ये कोंबडेपट्टी माफ असलेल्यांच्या यादींत चार पाडेकऱ्यांचा उल्लेख आहे.[१] म्हणजे ५।७ जण तरी हा व्यवसाय करीत असतील. साडेतीनशे बागांच्या गावांत माळी व मुशारखोर होते. पाडा करणें हें त्यांच्या नित्य व्यवसायांतील होतेंच; म्हणून पाडेकऱ्यांची संख्या अंदाज केला त्याहून जास्त नसावी. पाडेकरी वठलेले वृक्ष तोडण्याचेंही काम करीत. बागायती गाव म्हणजे मानवनिर्मित अरण्य होय. त्यांतील वठलेलें झाड तेवढेंच तोडतांना जवळपासच्या झाडांस इजा न पोहोचतां काढावें लागतें. हें काम कौशल्याचें असे. पाडेकरी आणखी एक काम करीत. तें म्हणजे चाफ्याचीं व इतर झाडांचीं फुलं तोडून सरकारांत देवपूजेस आणून देण्याचें. याबाबत त्यांचा व सरकारचा करार होत असे. याबद्दल माहिती, प्रसंगोपात्त, अन्यत्र दिली आहे.

**मुशारखोर** :— बागायत लहान असलें, अगर शेती थोडी असली, तर ती स्वत: मालक अंगमेहनतीने करूं शकतो. पण बागायताची उस्तवारी करावयाची असली, शेतजमीन नव्यानेच लागवडीस आणावयाची असली, तर पांढरपेशा मालकास मुशारखोर आणल्याशिवाय आज भागत नाही. आंगरेकालांत ब्राह्मण शेतकऱ्यास मुशारखोरांची गरज लागत होती, याचीं उदाहरणें बरींच आहेत. इ. स. १८०१–०२ मध्ये अंताजी गणेश सहस्रबुद्धे यांनी,[२] इ. स. १८०८–०९ मध्ये करंदीकर व त्रिंबकभट आठवले यांनी,[३] इ. स. १८१३–१४ त शिवाजी विठ्ठल लोंढे यांनी,[४] इ. स. १८१६–१७ मध्ये पुराणिक व महाजनांनीं,[५] इ. स. १८१९–२० मध्ये अर्जुनशेट सोनाराने[६] असे अनेकांनी आंगऱ्यांच्या परवानगीने मुशारखोर आणल्याचीं उदाहरणें आहेत. आंगऱ्यांस माहीत होतें की शेतीबागायताचें उत्पन्न वाढवावयाचें, तर नोकर आणून खर्च केल्याशिवाय भागणार नाही.[७] तेव्हा, नागावमधील कांही जणांचा व्यवसाय शेतीवर राबणें हा झाला होता. दिवाणखारीसाठी नऊ जण आणल्याचा उल्लेख एके ठिकाणीं आला आहे. कांहीजण हा व्यवसाय शोधीत नागावास येत, तर कांही आणवले जात.[८] इ. स. १८२९–३० मध्ये नागावची मुशार-खोरांची संख्या चौतीस होती; इ. स. १८४०–४१ मध्ये ती तीस असल्याचें दिसतें.

यांशिवाय परमुलकी माळी आणून त्यांजकडून शेती-बागायत होत होती. इ. स. १८४०–४१ मध्ये माळ्यांची संख्या किमान वीस होती.[९] याचा उघड अर्थ की नागावात शेतीमुळें मजूर व माळी यांची वस्ती झाली होती; पण त्यांची संख्या लहान होती.

'मोहतर्फा'ची माहिती देतांना भंडाऱ्यांची हकीकत आली आहे. लग्नटक्का व पाटदाम या करांबद्दल लिहितांना ब्राह्मणेतर समाजाची हकीकत दिली असल्याने, तिचा येथे विस्तार करण्याचें कारण नाही.

---

१ आंदरु नं. ६३८, पृ. १६४ व कोंजरु नं. १३७, पृ. ३४
२ आंदरु नं. ६३७, पृ. १३२
३ आंदरु नं. ६३६ व ६३७, पृ. १४५ ते १४७
४ आंदरु नं. ६३७, पृ. १४३
५ आंदरु नं. ६३७, पृ. १२०
६ आंदरु नं. ४५, पृ. ६८
७ आंदरु नं. ६३७, पृ. १२५, १२६
८ आंदरु नं. २४९, पृ. ११०
९ आंदरु नं. ६३८, पृ. १६४; कोंजरु नं. १३७, पृ. ३४

# बागायत

**जमीनमोजणी** — नागावची जमीन प्रथम केव्हा मोजली असेल, हें सांगतां येत नाही. शिवाजीने नागाव आपल्या ताब्यांत आणल्यावर आण्णाची दत्तोने तिची मोजणी केली. मोजणीच्या कागदांच्या नकला उपलब्ध आहेत, पण त्यांत सुहूर सनाचा उल्लेख करून फसली सन अक्षरांत दिलेला दिसतो; त्यामुळे सनाच्या दृष्टीने किरकोळ चूक झाली आहे. महालाची जिरायत जमीन मोजलेली असून तिचें क्षेत्रफळ १७१ बिघे, १४।। पांड आहे. मोजणीचें माप चावर, बिघा, पांड यामध्ये होतें. तत्कालीन कोष्टक असें— १२० बिघे — १ चावर; २० पांड — १ बिघा; ७८ तसूंची एक काठी; ६×५ काठया = ३।।। पांड जमीन.

**बिघावणीची पद्धति** — आण्णाजी दत्तोनें या जमिनीवर ८० खंडी, ९ मण १०।। पायली ऐनजिनसी सारा व ७४३।।≈ लारी एवढा रोख महसूल आकारला.[1] ही नागावच्या जमीनमोजणीची पहिली, स्पष्ट नोंद इ. स. १६६२ मधील आहे. आदिलशाही-निजामशाही कालांत 'मीरजुमले पद्धती'नें जमीनमोजणी होत होती; नागावची तशी मोजणी झाली होती. आण्णाजी दत्तोच्या बिघावणीपद्धतीबरोबर मीरजुमलेपद्धतीचा उल्लेख कागदोपत्रीं करीत. पण तिचें स्पष्टीकरण करणारे कागद आढळले नाहीत.[2] इ. स. १८०४–०५ मध्ये महाल नागावची जमीन-मोजणी काठीस काठी लावून झाली.[3] बिघावणीची पद्धति पेशवाई संपेपर्यंत कायम होती; आंगरेप्रदेशांत ती पुढेही चालू राहिली. इ. स. १८२०–२१ मध्ये नागावास काठ्या टाकून जमीन मोजण्यांत आली. बिघा, पांड हींच क्षेत्र सांगण्याचीं परिमाणें होतीं. शेत अगर जमीन पेटाऱ्या लावून समपातळींत आणीत.[4] इ. स. १८२९–३० मध्ये नागावच्या पटवर्धनांनीं खरेदी केलेल्या वाडीच्या मोजणीचा प्रश्न उत्पन्न झाला, तेव्हांही ७८ तसूंच्या काठीच्या मापाने जमीन मोजली; इ. स. १६६२ मधील कोष्टकच या वेळींही कायम होतें.[5] इ. स. १८३८–३९ मध्ये नागावांत वादळ झाल्यामुळे बागायताची खराबी झाली, म्हणून १८४०–४१ त सरकारला पुन्हा पाहणी करणें भाग पडलें. पाहणी करणाऱ्या अमीनाचें वेतन दरमहा १५ रु. होतें. पाहणीचें काम सव्वा महिना चाललें. कारकुनाचें वेतन १२ रु. होतें. काटकर म्हणजे काठीस काठी लावून मोजणी करणारा; त्यास दरमहा ३ रुपये वेतन होतें. तिघांचें एकूण वेतन ३७.।।≈ रु. झालें. पूर्वी जेव्हा जेव्हा पाहणी झाली, तेव्हा तेव्हा पाहणीखर्च रयतेवर आकारला होता; तसा शिरस्ता होता. पण यावेळीं जबरदस्ती वाटेल, म्हणून हा खर्च सरकारांतून करण्यांत आला.[6] ही मोजणीही आण्णाजी दत्तोंच्या बिघावणीपद्धतीनेंच झाली आहे.

**शंकुसाखळीची मोजणी** — इ. स. १८५३ मध्ये कंपनी सरकारने आंगरे-प्रदेशाची मोजणी केली. बागायत, जिरायत, माळ, डोंगर, खाडीकांठच्या जमिनी — सर्व प्रकारच्या जमिनींची

---

१ उकोंरु नं. १७४, पृ. २००; आंदरु नं. ८३, पृ. १७९; आंदरु नं. ६३७, पृ. १५८

२ आंदरु नं. ८३, पृ. १२२, १७९

३ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६

४ आंदरु नं. ६३७, पृ. १५८

५ आंदरु नं. ८३, पृ. १७९

६ कोंजरु नं. १३७, पृ. १८, १९, २८, ३२

मोठया कसोशीने पाहणी झाली. पूर्वीची पद्धति रद्द करून शंकुसाखळीची मोजणीची पद्धति नव्या सरकारने अवलंबिली व जमिनींचे नकाशे काढले.[1] या पाहणीस 'केवळ जमीनपाहणी' असें नांव दिलें आहे. इ. स. १८५३ ते ५६ या तीन वर्षांच्या कालांत तीन प्रकारची पाहणी झाली. (१) जमीनपहाणी अगर शंकुसाखळीची पाहणी. (२) जमिनीच्या स्वरूपाची पाहणी म्हणजे प्रतवारी. (३) दगडपाहणी. या तीनही पाहणींचा खर्च रयतेवर आकारण्यांत आला. साडेदहा मण दराच्या जमिनीवर मात्र तो माफ करण्यांत आला.[2] म्हणजे, अण्णाजी दत्तोंची बिघावणीची पद्धति इ. स. १८५६ पर्यंत चालू होती, असें ठाम म्हणतां येतें.

२२ जानेवारी १८५३ च्या सुमारास कंपनीसरकारने, आंगरेकालांत दरवर्षी आकारला जाणारा वाडयांच्या व पिकांच्या पाहणीचा खर्च सरसि माफ केला व ज्यावेळीं पाहणी करूं, त्यावेळीं तो आकारण्यांत येईल, असें रयतेस कळविलें. जमाबंदीच्या सरकारी तक्त्यांतूनही तें सदर काढून टाकण्यांत आलें.[3] एकदां पाहणी होऊन जो आकार ठरला, तो तीस वर्षें कायम राहा-वयाचा. पूर्वी आपत्तफितरत झाल्यास म्हणजे मानवी, राजकीय व भौतिक संकटें आल्यास पाहणी होई व सूट मिळे; आता सूट वगैरे कांही नाही ! शेत किंवा बागायत न पिकल्यास पदर-मोड करून देणें भरावयाचें. जमाबंदीचे आकारावर दर रुपयास एक आणा जादा आकारण्यांत येऊं लागला. हा कर शाळा व नवे रस्ते केले अगर करावयाचे, त्यांसाठी आकारण्यांत आला.[4]

**जमिनींचे प्रकार** — शिवकालापासून जिरायती जमिनीचे अनेक प्रकार मानले जात होते. पेशवेकालीन प्रकारांत १ अव्वल म्हणजे वरच्या प्रतीची, २ दूम म्हणजे दुय्यम प्रतीची, ३ सीम म्हणजे कनिष्ठ प्रतीची, अशी प्रतवारी ढोबळ मानाने करीत. कोकणांत यांसमवेत आणखी प्रकार आणि फरक होते, ते असे—१ परेणु, २ मुरमाड, ३ धुळपट, ४ दरवट, ५ खाडी(री) ६ खस्ती.[5] शिवाय, जेथे रहू करून भाताची पेरणी होई, त्या जमिनीस पेणु आणि जींत आवण म्हणजे भाताचीं रोपें करून नंतर लावावयाचीं, तिला अवणु म्हणत.[6]

बिघा म्हणजे किती क्षेत्रफळाची जमीन हें निश्चित कळत नाही. पुण्या-मुंबईकडे ३९०० चौरस यार्ड, गुजराथेंत २९५० चौ. यार्ड, बंगाल्यांत १६०० चौ. यार्ड = १ बिघा समजतात. ['महाराष्ट्र शब्दकोश' दाते–कर्वे] कोकणांत ३९२७ चौ. यार्ड=१ बिघा.[7] मानीत होते. कोकणांतील क्षेत्रमापन व मुंबईकडील क्षेत्रमापन सामान्यपणें सारखें आहे.

## आंगरेकालांतील मोजणी

सामान्यपणें बारा वर्षांनंतर जमीनमोजणी करण्याचा आंगरेकालांत शिरस्ता होता. आपणांस नागावची जमीन मोजल्याचा दुसरा दाखला इ. स. १७८४–८५ चा मिळतो. यावर्षी एकूण जमीन ५४२ बिघे १८॥ पांड भरली; तिचें वांटप पुढीलप्रमाणे होतें —

| बिघे | पांड | |
|---|---|---|
| ३९ — | २ | घरें व वाडे-बेडीं यांखालील जमीन |
| २४ — | १४। | विहिरी व आडखळें यांखालील जमीन |
| १५ — | १॥ | पाण्याखालीं असलेली जागा. हें तळयांचें व पुष्करिणींचें क्षेत्र असावें |

१ आंग्र. ८०३
२ आंग्र. ८१२
३ आंग्र. ८०२
४ आंग्र. ८२४ ते ८२६
५ म. ना. अप्रपेदप्त नं. ६३६
६ कुर्ग. पृ. १९१.
७ कुर्ग. पृ. १७१,१७२

| | |
|---|---|
| १ — २॥। | देवालयांखालील क्षेत्र |
| — ४॥। | रस्ते |
| ८ — १४॥। | खेरीज भक्त्याकडील जमिनी |
| ८९ — ० | |

इतकी जमीन लागवडीखाली नव्हती. बाकी जमीन ४५३ बिघे १८॥ पांड लागवडीखाली होती.[१] ही बागायत व भातशेती मिळून उत्पन्नाची नागावची जमीन होय.

इ. स. १७९८–९९ मध्ये पुन्हा पाहणी व मोजणी झाली. तदनुसार, नागावची भातशेतीखालील म्हणजे जिरायत जमीन १८२ बिघे १२ पांड इतकी भरली. एकूण जमिनीपैकी सवाई जमीन सूट म्हणून बाद करण्याचा शिरस्ता होता; सबब, ३४ बिघे ५। पांड जमीन बाद धरण्यांत आली. म्हणजे, १४८ बिघे ६॥। पांड इतकी जमीन उरली. तींतून ऐन खराबा म्हणून ५३ बिघे १२ पांड जमीन वजा झाली व नागावची भातशेत जमीन ९४ बिघे १४॥। पांड उरली. या जमिनींत गोडें भात पिकत असे. तिची उत्पन्नाच्या दृष्टीने प्रतवारी पुढीलप्रमाणे.

| भात खंडी | जमीन बिघे | प्रत | उत्पन्न दरबिघा |
|---|---|---|---|
| २०॥३। | ३४।३॥। | अव्वल | १२ मण. |
| २२॥।२॥।.१ | ४५॥।.॥।. | दूम | १० मण. |
| ४॥१ | ११।२।. | सीम | ८ मण. |
| .॥।३॥.॥।. | २॥।२॥। | कौली | |
| तपशील | | | |
| ०४॥।.॥।. | ०॥२ | ,, | ८ मण. |
| ०।.१॥. | ००१ | ,, | ६ मण. |
| .॥२।.१॥. | ०२।४॥ | ,, | ५ मण देखील बाबती. |
| ४८॥।.४॥२।. | ९४॥.४॥।. | | |

[आंदरु नं. ६३७, पृ. १३१; आंदरु नं. १३४, पृ. ५७, ५८.]

या वर्षीच्या दुसऱ्या एका कागदाने आणखी कांही तपशील मिळतो, तो असा—

| गाव नागावः | | खार नागाव (दिवाणखार), |
|---|---|---|
| भात जमीन बिघे | १८२॥२ | ३३॥१ |
| पैकी वजा जमीन | ८७॥।२। | — |
| सवाई सूट जमीन | ३४।.।. | — |
| मामूर जमीन | २१॥४ | — |
| खराबा जमीन | १२॥१॥ | — |
| ऐन खराबा जमीन | ५३॥२ | — |
| बाकी जमीन | ९४॥४॥। | ३३॥१ |
| सरकार शिलोत्र | ० | ३३॥१ |
| रयत शिलोत्र | ९४॥४॥।. | ० |

[आंदरु नं. १३४, पृ. ५२.]

१ आंदरु नं. ६३८, पृ. १६५, १६६, १७६

या दोन कागदांचें स्वरूप एक असून त्यांत मेळ आहे; मांडणींत वेगळेपणा आहे एवढेंच. त्यायोगें एक गोष्ट समजली की नागावच्या दिवाणखारीची पहिली बंदिस्ती इ. स. १७९८–९९ पूर्वी झाली असून तींतील ३३।।१ बिघे जमीन मामुरीस आली होती. येथे शिलोत्र याचा अर्थ भातशेतजमीन एवढाच दिसतो.

इ. स. १८०७–०८ मध्ये नागावची पुन्हा पाहणी झाली; तिचा तपशील आढळत नाही. यावेळीं सरकारच्या ध्यानांत आलें होतें की सर्व जमीन सारख्या मगदुराची नाही व कांही जमिनींत कितीही प्रयत्न केले तरी कांही पिकत नाही; केलेला खर्च भरून येत नाही.[1] इ. स. १८०९–१० मध्ये नागावांत ३२९।.।।।. बिघे गोडी जमीन असून उरलेल्या ८५।।१ बिघे जमिनींतील थोडी खारी जमीन होती.[2] यांत दिवाणखारीची जमीन धरून क्षेत्रफळ सांगितलेलें दिसतें. इ. स. १८१८–१९ मध्ये नागावची पाहणी व जमीनमोजणी झाली. या वर्षीं विहिरी आडखळें, देवळांचें क्षेत्र, जलस्थळें, रस्ते मोजून एकूण जमिनींतून वजा केलें व एकंदर उत्पन्न देणारें क्षेत्र निश्चित केलें. नवी लागवड केली असतां पहिलीं दहा वर्षे माफी, नंतर पांच वर्षे इस्तावा; इस्ताव्याच्या कालांत महसूल अर्धा घ्यावयाचा व १५ वर्षे होतांच नव्या लागवडीची पुन्हा पाहणी करून ऐन आकार ठरवावयाचा, असें ठरलें.[3]

इ. स. १८२२–२३ मध्ये नागावची पुन्हा पाहणी व मोजणी झाली. त्यावेळीं भात पिकणाऱ्या जमिनीचें क्षेत्रफळ १४६।३। बिघे होतें; तपशील असा —

२७।।२।। सवाई सूट जमीन.
८८१। ऐन खराबा नाकीर्द जमीन
१।४। माफीकडील जमीन
.।३।। नगदी शिरस्त्याकडे
२९।।१।। बिघे जमीन वजा.

बाकी आकारी जमीन बिघे १९५।।। २।।। मामूरपैकी
८।।।४ खराबापैकी
११६।।।१।।। बिघे

[आंदरु नं. ६३८, पृ. १७०].

इ. स. १८२६–२७ मध्ये सरकारने नागावच्या दिवाणखारीची जमीन मोजली; तिचें क्षेत्रफळ ३६८।। ३।।। बिघे भरलें. अवघ्या २८ वर्षांत दिवाणखारीचें क्षेत्र ३३५ बिघ्यांनी वाढलें ! या जमिनीपैकी १६४।.१।।। बिघे जमीन मामूर न झालेली म्हणजे भातशेतीखाली न आलेली होती; दिवाणखारीचें २०४।२ बिघे क्षेत्र भातशेतीखाली आलें होतें; पण त्यांतील १२७८२।।। बिघे इतकें क्षेत्र भातशेतीबाबत कायम झालें होतें. बाकी ७७८४। बिघे जमीन खराबा म्हणून समजण्यांत आली. ही सर्व जमीन सात वर्षांच्या मक्त्याने कुळांकडे द्यावी, असा विचार सरकारने केला. बहुतेक जमिनींत गोडें भात पिकूं लागलें होतें; अगदी थोडया जमिनींत रातें पेरावें लागे.[4]

## बागायताचें क्षेत्र

यावेळीं नागावची बागायत जमीन ४५३।।।.३।। बिघे भरली, तींत नारळ, सुपारी, उंडी, फणस, ताड इत्यादि झाडें होतीं. बागायत म्हणून मानल्या जाणाऱ्या सर्वच क्षेत्रांत बागायत होत

१ आंदरु नं. ६३७, पृ. १४४, १४५ २ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६
३ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६ ४ आंदरु नं. ६३८, पृ. १७१

नाही; म्हणून जेथे जिरायत पीक काढावें लागतें, असें क्षेत्र ६३८।. बिघे होतें. त्यांतही महामूर जमीन, खराबा जमीन असा बारकावा आणि फरक होता. कांही जमिनींतील उत्पन्नाबद्दल रोख रकम घेत असत, तिला रकमी म्हणत. कांही जमीन लागवडीसाठी कौलानें दिली असल्याने, ती कौली म्हणून दाखल केलेली होती. म्हणून नागावांतील जमिनीचा तपशील असा —

| | |
|---|---|
| बागायत जमीन बिघे | ३९०।।।३।. |
| बागायतांतील भातजमीन बिघे | ६३८।. |
| | ४५३।।।३।।. |
| पैकीं वजा जमीन बिघे | ३७।।।२।।। |
| बाकी आकारी जमीन | १८।।।.।।. मामूरपैंकी |
| | ६।२ खराबापैंकी |
| | ६३८।. |

[आंदरु. नं ६३८, पृ. १६६, १७१].

इ. स. १८३८–३९ मध्ये पाहणी झाली, तेव्हा नागावची बागायत जमीन ४५७ बिघे १०।। पांड एवढी होती. पैंकी रकमी वाडयांचें क्षेत्र ४४९ बिघे ११।।। पांड होतें. फूट कौली वाडयाजमीन ७ बिघे १८।।। पांड. मिळून, ४५७ बिघे १०।। पांड ही बागायतजमिनीची वांटणी होय. रकमी वाडयांपासून उत्पन्न २८६०८=।। रु. व कौली वाडयांपासून ६३८⁻। रु. मिळून २९२३ ।.।।।. रु. झालें.[1] म्हणजे इ. स. १७८४–८५ ते १८३८–३९ या ५४ वर्षांत ३ बिघे २ पांड इतकी बागायत-जमिनींत वाढ झालेली आढळून येते. शिवाय, बागायतजमिनींतील ९० बिघे ११ पांड जमीन बागायत नसलेली होती; तिचें वांटप असें —

| बिघे — पांड | |
|---|---|
| ३८ — १९।। | घरें व बेडीं यांखालीं |
| २४ — ६।।। | विहिरींखालील. (३०४ विहिरी) |
| १४ — १७।। | पाणस्थलांखालील |
| १ — ५। | देवालयें |
| ८ — १४।।। | खेरीज मक्ता |
| १ — ११ | फूट मक्ता |
| — १६। | रस्ता व इतर |
| ९० — ११. | |

या वर्षी नागावची भाताच्या उत्पन्नाची जमीन, पाहणीबरहुकूम १४७ बिघे —२ पांड होती. तिची विभागणी अशी—

| एकूण जमीन | पैकीं वजा जमीन सवाई सूट |
|---|---|
| बिघे पांड | बिघे — पांड |
| १४७ — २ | २८ — २।। |
| २९ — ३। | १ — .।।।. खराबा नाकीर्द |
| ११७ — १८।।। | २९ — ३।. |

१ आंदरु नं. ६३८, पृ. १७६

प्रत्यक्ष वांटणी अशी —

| जमीन बिघे पांड | प्रत | ह्राशील दर | एकूण पीक खंडी |
|---|---|---|---|
| ३२ — १३।।। | अव्वल जमीन | .।।= मण | १९।।=। |
| ६५ — १४।।। | दूम जमीन | .।।. मण | ३२।।।२।१।। |
| ५ — ६। | सीम जमीन | .।≡ मण | २०२।।. |
| १०३ — १४।।। | | | ५४।।२०१।।. |
| १३ — १८।।। | कौली जमीन | | ४।।। ४०१।।।. |
| ११७ — १३।। | | | ५९।। १।।.।. |
| — ५। | खराबा जमीन | | ०२।।१।।. |
| ११७ — १८।।। | एकूण जमीन | | ५९।।३।।।१।।।. |

यावरून नागाव या गावांतलें भाताचें उत्पन्न व भातजमीन आपणांस समजते.[1]

इ. स. १८३३–३४ त संचणी झाल्यानंतर इ. स. १८३४–३५ त पाहणी झाली; त्यावेळीं मोजणींतील चुकांची दुरुस्ती झाली. मागील कागदांच्या आधारेंही कांही दुरुस्त्या झाल्या. ही संचणी १५ वर्षें म्हणजे इ. स. १८४७–४८ पर्यंतच्या मुदतीची होती. संचणीचे वेळीं बागायताची जमीन ५४२।।।३।। बिघे भरली. पण कांहीं वाडयांतून मोजण्यांत चूक झाली; अगर लिहितांना गफलत झाली. बागायताची नक्की जमीन ठरली ती ५४७।।१।। बिघे होती. पैकीं, ९०।।१ बिघे जमीन घरें, बेडीं, विहिरी, पाणस्थळ, देवालयें, रस्ते, हौद इत्यादीखाली होती. बागायताचें निश्चित क्षेत्र ४५७०।।. बिघे ठरलें. या क्षेत्रावर ४३०५ ०≡।।।. रु. आकार ठरला व तो इ. स. १८४७–४८ पर्यंत कायम राहणार होता.

नागावच्या बागायतापैकीं बिगरबागायत जमीन — बिघे.

| | |
|---|---|
| ३८।।।४।।। | घरें व बेडीं यांखालील |
| २४।१।।। | विहिरी |
| १४।।।२।। | पाणस्थळ |
| १।.।. | देवालयांखालीं |
| ०४।।। | रस्ता |
| ०।३ | भातशेती |
| ०३।। | हौद. |
| ८०।.।. | |

भातजमिनीचें एकूण क्षेत्र १४१।१।।। बिघे भरलें. त्याची प्रतवार विल्हेवारी–

| भात खंडी | प्रत जमीन बिघे | दर बिघ्यास उत्पन्न मण |
|---|---|---|
| ५४।।२०१।। | १०३।।४।।। | .।।.।।. |
| ११.।।. | ०२।।१ | .।।. |

[1] आंदरु नं. ६३८, पृ. १७६, १७७

| भाग खंडी | प्रत जमीन विघे | दर बिघ्यास उत्पन्न मण |
|---|---|---|
| १॥४८॥. | ८३॥.॥. | .।४ |
| १॥४॥।१॥ | ८४।१॥. | .।३ |
| ।.।१ | ८॥.।. | .।२ |
| १८४॥.।. | ८४८१॥ | .।१ |
| ३॥.॥२। | १५८३॥ | .।. |
| ।२॥१॥ | ८१॥२॥ | ८४ |
| ८१॥.॥. | ८॥.।. | ८३ |
| ।॥.४॥२॥ | ८४॥.।. | एकूण हिशेबीं. |
| ६६८१। २॥ | १४१। १॥. | |

बागायत व भातजमीन सोडून बाकी, खरीप जमीन बिघे

| | |
|---|---|
| बिघे ४२।।३ | सवाई सूट |
| ८३॥१॥ | रवीकडे |
| ८८॥. | सावट |
| ८८॥.॥. | माफीकडे |
| ८४ ८२॥ | बांधबंदिस्तीकडे |
| ३०॥ २॥ | ऐन सा खराबा |
| ८९॥।⁻॥. | |

खार दिवाणखार बरहुकूम पाहणी जमीन बिघे २७९
पैकीं वजा जमीन—८॥.२॥. बागायताकडे

| | |
|---|---|
| ८।१॥ | जल |
| ४१॥. | ऐन खराबा |
| ४२॥४। | बिघे |

बाकी जमीन २३६।.॥. बिघे भातजमीन (दिवाणखारीची). तिचें उत्पन्न इ. स. १८४०–४१ मधील ५८।८॥. खंडी होतें.

**रस्ते, रहाट, विहिरी, नांगर इत्यादि** — मोजणीप्रमाणें, इ. स. १८४०–४१ त, नागावांत ३०४ विहिरींपैकी १३३ चिरेबंदी व १७१ गैरबंदिस्तीच्या होत्या. १८९ विहिरींचें पाणी अखेर-पर्यंत पुरत असे; ११५ विहिरी उन्हाळ्यांत कोरड्या पडत.

नागावांत सहा तलाव अगर पुष्करिणी होत्या; पैकी तीन चिरेबंदी व तीन गैरबंदिस्त होत्या.

गुरांचीं वेडीं २१३ होतीं. रहाट १५१ होते. बैलगाड्या १९९ होत्या व नांगर २७९ होते. गावांत तीन रस्ते होते. एक बाजार भरत असे. मुलांच्या शाळा दोन होत्या.[1] इ. स. १८१९–२० मध्ये नागावांत रस्ते असल्याची व ते दुरुस्त राखीत असल्याची नोंद आहे. या वर्षी अलीबागपासून खंडाळा टप्प्यांतून नागावपर्यंत असलेला रस्ता ७५ रु. खर्चून दुरुस्त केला व रथ व गाड्या जाऊं शकतील, इतका तो योग्य बनविला.[2] रस्ते नीट करतांना आड येणारीं झाडें तोडीत व रस्ता चांगला

१ कोंजरु नं. १३७, पृ. २ २ आंदरु नं. ४८, पृ. ११३

ते ५, २६, २८
ना....४

मोकळा ठेवीत. इ. स. १८४०-४१ मध्ये रस्तेदुरुस्ती झाली, तेव्हा कांही आंबे, उंडी, माड तोडावे लागले; त्या झाडांच्या उत्पन्नाचा आकार सरकारने बाद दिला.[१]

आकडेवारीवरून नागावच्या जमिनीबाबत एक विधान करतां येतें की दिवाणखारीचें वाढीव, एकसंधी क्षेत्र निर्माण झालें; तें बाजूस ठेवलें, तर मुख्य गावास जोडून क्षेत्राची वाढ, घट इत्यादि प्रकार फारसे झालेले नाहीत.

क्षेत्राची वाढ अगर घट होणें हें बहुताशीं भूकंपादि अनर्थांवर, नद्या, समुद्रकिनाऱ्याचे तोंडाशीं असलेल्या खाड्या, प्रवाह यांवर अवलंबून असतें. १६ जून १८१९ या दिवशीं अष्टागरांत भूकंप झाला. घरें हललीं; कांही मुलूख समुद्राचे पाण्यांत बुडाला.[२] पण तो नागावचा नव्हे; नागावचें क्षेत्र व आकार कायम राहिला.

वादळें— बागायताचा फार मोठा शत्रु वादळें होय. नागाव समुद्रकिनाऱ्यावर उघडें आहे. एकाद्या बाजूने पर्वतराजींनी झाकलेलें, विशेषत: नैर्ऋत्य बाजूकडे एखादी डोंगराची रांग व त्याच्या आडोशास गाव, अशी नैसर्गिक परिस्थिति असती, तर वादळांनी होणारा अनर्थ कमी झाला असता व बागायताचें वारंवार नुकसान झालें नसतें. नागावच्या वादळांची नोंद अशी :—

(१) ८ मे १७५२ — रात्रीं महाल नागाव येथे वादळ होऊन बागायताचें फार नुकसान झालें[३]

(२) २० एप्रिल १७८२ — दीड दिवस प्रचंड वादळ झालें. झाडें मोडलीं; घरें पडलीं व समुद्रांत लहानमोठीं गलबतें बुडालीं.[४]

(३) १६ जानेवारी ते १३ फेब्रुवारी १७९० या कालांत तीन दिवस सतत वादळ झालें. पालव व थेरवंडें येथे समुद्रकिनाऱ्यावर प्रचंड लाटा उठल्या व खाडीचा मार्ग बदलला.[५] वादळ नागावचे दक्षिणेस सुमारे चार मैलांवर झालें.

(४) ४ नोव्हेंबर १७९९— वादळ झालें; झाडें मोडलीं.[६]

(५) इ. स. १८२४-२५ — खमस अशरीन मयातैन आलफ-अवर्षणामुळे आगराचा नाश झाला. विजयादशमीच्या रात्रीं चित्रा नक्षत्राचा पर्जन्य फार कोसळला; वादळ भयंकर झालें. झाड-झाडोरा, माड, सुपारीचीं झाडें मुळांसकट उपटून पडलीं व मोडलीं; फार नाश झाला. यामुळे पाहणी होऊन आफ्तमजुरा देण्याचें सरकारने ठरविलें. वादळापूर्वीचे गैरबारदार माड मात्र सुरक्षित राहिले. चार हजार माड गैरबारदार झाले व ४३६ माड वादळाने मेले.[७]

(६) ३० सप्टेंबर १८२७— आश्विन शु।। १० रोजीं उत्तरेकडून दक्षिणेकडे वादळ झालें; माड व झाडें मोडलीं.[८]

(७) २८ ऑक्टोबर १८२८ — मध्यरात्रीं वादळ झालें; झाडें मोडलीं; घरें कोसळलीं.[९]

(८) २४ जून १८३७ — सकाळपासून प्रचंड वादळ झालें; वाड्यांचा नाश विलक्षण झाला. पोयेकर व बारदार माड यांचेवर देणें आकारून चौथाई सूट देण्यांत आली.[१०]

(९) इ. स. १८४०-४१ — जुन्या वादळाचे परिणाम नाहीसे झाले नव्हते. अनेक माड

---

१ कोंजरु नं. १३७, पृ. १८
२ आंअ. ७२०
३ आंअ. १४८
४ आंअ. ४४९
५ आंअ. ५१६, ५१९
६ आंअ. ६६०; ऐलेसं. ११–५१९० व ५२११
७ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७
८ आंअ. ७३६
९ आंअ. ७४०
१० आंअ. ७५९

मोडले होते; म्हणून महाल नागावच्या बागायताच्या आकारांत सरकारने १२२ रु. १४ आ. ६ पैं सूट दिली. त्याचबरोबर, वादळापूर्वी रोपे असलेले माड बारदार होऊं लागल्यामुळे सरकार-वसुलींत ' चढ ' डोकावूं लागला. यावर्षी तो अत्यल्प,५॥।~। रु.आहे; कारण २ माड, १७ सुपारीचीं झाडें, १ फणस व १० उंडिणी बाजास आल्याचें पाहाणींत दिसून आलें. इ. स. १८३७–३८ च्या वादळानें नवेदर बागमळाचें फार नुकसान झालें. त्याच्या तीन अंगांस खाडी असल्यामुळे, समुद्राचें पाणी शिरून सगळें बागायत खारें झालें. आपला निभाव लागणें शक्य नाही, असें पाहून वाडकरांनी सरकारकडे अर्ज केला. सरकारने कळविलें की दरसाल पाहणी करून चौली शिरस्त्या-प्रमाणे वसूल घेऊं. पाहणीनंतर इ. स. १८४०–४१ मध्येही सरकारला २७७॥।~ रु. इतका आकार कमी करणें भाग झालें.[१]

(१०) इ. स. १८५४—योग्य वेळीं योग्य प्रमाणांत पाऊस पडल्याने पिकें फारच चांगलीं आलीं; पण १ नोव्हेंबर रोजीं भयंकर वादळ झालें व सर्वविध नुकसान झालें. बागायताचा नाश कल्पनातीत झाला. झाडें कोसळून मोडून पडलीं व जीं उभीं होतीं, तीं पुन्हा फळास येणार नाहींत, अशा अवस्थेस येऊन पोहोंचलीं. वादळाचा तडाखा रेवदंडा ते उंदेरी या भागास विशेष जबर होता. अनेक खाड्यांचे प्रवाह पार बदलले.[२] १० जानेवारी १८५५ रोजीं, वरील वादळाची सरकार-तर्फे पाहणी झाली. जेवढी मोडतोड झाली होती, तेवढीच विचारांत घेऊन सरकारने आकारांत सूट दिली.[३]

शेवटची एकच नोंद ब्रिटिश अमदानींतील नमूद केली आहे. सुमारे शंभर वर्षांतील अष्टा-गरांतील वादळें व त्यांचे परिणाम एकत्र केले आहेत. या टिपणांवरून, १७५२ ते १८५४ या कालांत नागावचें बागायताचें वारंवार किती नुकसान होई, याची कल्पना येईल. नैसर्गिक आपत्तींशीं टकरा खेळत खेळतच बागायत लावण्याचा उद्योग नागावकरांना करावा लागला. बागायतांत नारळ अगर सुपारीचें झाड लावल्यानंतर, तें पिकास येण्यास ७ ते १० वर्षांचा काल जातो. एक वादळ सतत अनेक वर्षें नुकसान करीत राहतें, असा वाडकरास अनुभव येतो.

### नागाव–झाडांची मोजदाद–माड

| | इ. स. १७९८–९९ | इ. स. १८०८–०९ | इ. स. १८१२–१३ | इ. स. १८१६–१७ | इ. स. १८२९–३० | इ. स. १८४०–४१ |
|---|---|---|---|---|---|---|
| माड एकूण | १६७४५ | — | १२७५६ | — | १३३२९ | ११९६८ |
| पैकीं वजा सुमार | ५६५६ | — | २७४८ | — | २९९६ | २४५७ |
| बारदार सुमार | ३५७ | ९३२५ | — | १०७६३ | — | — |
| गैरबारदार | ४४ | — | १७४ | — | १६५ | ३०९ |
| भंडारमाड | २ | ३०१ | १५३ | — | ७६ | — |
| पोईकर | ६६ | — | २५० | — | १५५ | १०३ |
| उमेदवार | २९ | — | २३१ | — | २३५ | २१४ |
| रोपे | ४६० | — | ५२९ | — | ४६२ | १५३ |
| धुाते | २७९५ | — | ९११ | — | ९१४ | ६०५ |

१ कोंजरु नं. १३७, पृ. १८, ते २०
२ कुर्गॉ पृ. १००
३ आंअ. ८०९

| | इ. स. १७९८–९९ | इ. स. १८०८–०९ | इ. स. १८१२–१३ | इ. स. १८१६–१७ | इ. स. १८२९–३० | इ. स. १८४०–४१ |
|---|---|---|---|---|---|---|
| झिटे | ३११ | — | ५४२ | — | ६०८ | ४२३ |
| रुजवणे | १३७८ | — | — | — | — | २२८ |
| राईपैकी | १३ | — | — | — | — | — |
| निखर | — | — | १११ | — | १८ | ५७ |
| गैरबारदार | | | | | | |
| वादळानें मयत | — | — | — | — | ३९ | — |
| मूट माड | — | — | — | — | — | २०१ |
| बाकी पेढ सुमार आकाराचे | ११०८९ | — | १०००८ | — | १०७३३ | ९५११ |

[आंदरु नं. १३४, पृ. ५२, ५३, ५९; आंदरु नं. ६३७, पृ. १३७, १३९; आंदरु नं. ६३८, पृ. १६५ ते १६९, १७५; कोंजरु नं. १३७, पृ. ५, ९, ३६]

येथे बागायतांतील नारळाचीं एकूण झाडें समजतात व कोणत्या प्रकारच्या झाडावर सरकार आकार करीत असे हें समजतें. १७९८–९९ नंतर बागायताची स्थिति खालावत असल्याचें स्पष्ट होतें.

## नागाव—झाडांची मोजदाद—सुपारी

| | इ. स. १८०८–०९ | इ. स. १८१२–१३ | इ. स. १८२९–३० | इ. स. १८४०–४१ |
|---|---|---|---|---|
| पोफळी एकूण | २१०७ | १०६७ | ७०० | १५९२ |
| बारदार | | ३६१ | ५७२ | २९० |
| गैरबारदार | | १४५ | — | १६५ |
| उमेदवार | | ८९ | — | ३०६ |
| रोपे | | १९५ | — | ३४९ |
| झिटे | | ७६ | — | ६५ |
| पाते | | २०१ (पाते व रुजवण) | — | १८८ |
| रुजवण | | | — | २२९ |

[आंदरु नं. ६३७, पृ. १३७, १३९; आंदरु नं. ६३८, पृ. १६५, ते १६९, १७५, कोंजरु नं. १३७, पृ. ५, ९, ३६]

## नागाव—झाडांची मोजदाद—उंडिणी

| | इ. स. १७९८–९९ | इ. स. १८०८–०९ | इ. स. १८१२–१३ | इ. स. १८२९–३० | इ. स. १८४०–४१ |
|---|---|---|---|---|---|
| उंडिणी एकूण | — | १४४० | १२२५ | १२३५ | १४०१ |
| बारदार | ३० | — | ४८० | ३६१ | २७४ |

मागील पानावरील कोष्टकावरून चालू

| | इ. स. १७९८–९९ | इ. स. १८०८–०९ | इ. स. १८१२–१३ | इ. स. १८२९–३० | इ. स. १८४०–४० |
|---|---|---|---|---|---|
| गैरबारदार | — | — | १३१ | ८७४ | १९३ |
| उमेदवार | — | — | १७६ | | २९५ |
| रोपे | — | — | ३५७ | | ५५६ |
| ढाके | — | — | ८१ | | ८३ |

[ आंदरु नं. ६३७, पृ. १३७; आंदरु नं. ६३८, प. १६७; कोंजरु नं. १३७, पृ. ५ ]

## नागाव–झाडांची मोजदाद–ताड

| | इ. स. १७९८–९९ | इ. स. १८२९–३० | इ. स. १८४०–४१ |
|---|---|---|---|
| ताड एकूण | २९५ | १८२ | १५२ |
| बारद र | ६३ | २२ | १७ |
| खराब | २३२ | १६० | १३५. |

## नागाव—झाडांची मोजदाद—फणस

| | इ. स. १८०८–०९ | इ. स. १८१२–१३ | इ. स. १८२०–२१ | इ. स. १८२९–३० | इ. स. १८४०–४१ |
|---|---|---|---|---|---|
| फणस एकण | ६३८ | ४९९ | ५०३ | ४६३ | ३४७ |
| बारदार | | २१९ | | १८१ | १२३ |
| गैरबारदार | | २८ | | २०२ | ३३ |
| उमेदवार | | ५८ | | | ५५ |
| रोपे | | ९४ | | | ५९ |
| ढाके | | १०० | | | ७७ |

[ आंदरु नं. १३४, पृ. ५२, ५७; आंदरु नं. ६३७, प. १३७, १३८; आंदरु नं. ६३८, पृ. १६५, १६७, १७५; कोंजरु नं. १३७, पृ. ५, ३६ ]

**वाड्यांची संख्या व व्यवस्था**– आपण नारळींचा विचार करणार आहोंत. नागावचें बागायताचें क्षेत्र सुमारें ४५४ बिघे आहे. बागायतांत मध्यभागीं विहीर असे; अजून असते. विहिरीवर रहाट असून बैलांच्या योगें पाणी काढून बागायताचें शिपणें होतें. नागावांतील तळीं मंदिरांच्या जवळ असून त्यांभोवती बागायत नाही; पूर्वींहि ती नसावी. नागेश्वराचें व वंकनाथाचें तळें अशा जागीं आहेत की त्यांच्या पाण्याचा शेतीबागायतासाठी उपयोग करून घेणें शक्य नाही. तेव्हा, बागायताला विहिरींच्या पाण्याचा उपयोग करणें एवढाच मार्ग उपलब्ध होता. कांही विहिरींचें पाणी उन्हाळ्यांत आटत असे; कांहींचें कडवट होई. अशा कडू पाण्यानें बागायत निकामी होते असा समज होता; आजहि आहे. इ. स. १८४०–४१ मध्यें नागावांत ३०४ विहिरी होत्या;

त्याचा अर्थ, तेवढ्याच वाड्या असाव्यात. म्हणजे प्रत्येक बागायत सरासरी दीड बिघा आकाराचें झालें. म्हणजे, वाड्या आटपशीर होत्या.[1] इ. स. १८१२–१३ मध्यें नागावांत एकंदर ३०४ वाड्या होत्या. हीच संख्या इ. स.१८४०–४१ मध्यें कायम असावी.

नारळाच्या झाडास आरंभीं रोज पाणी घालावें लागतें; पण मूळ धरून तें मोठें झालें म्हणजे रोज पाणी घातलेंच पाहिजे असें नाही. दोन दिवसांनी वाडीचें क्षेत्र एकदा भिजलें म्हणजे पुरे. मृग नक्षत्र लागून पावसाळ्यास सुरुवात झाली, म्हणजे रहाट भिजूं नयेत म्हणून काढून ठेवावयाचे व हस्त नक्षत्राचा मोसम संपला, म्हणजे दिवाळीपूर्वी पुन्हा रहाट रहाटवडीची, शिपण्याची व्यवस्था करावयाची, असा शिरस्ता असे. श्रावणअखेर भातशेतीचीं कामें पुरीं झालीं, म्हणजे भाद्रपदांत नवीन झाडें लावण्याचा उपक्रम करावयाचा, हा परंपरागत प्रकार कोकणच्या बागायतांत आजहि चालतो. पूर्वी याहून वेगळा प्रकार असण्याचें कारण नाही. ज्याच्याजवळ बागायत असतें, त्याच्याजवळ भातशेती असणारच, असें ठाम सांगतां येईल. म्हणून, नागावमध्ये जितके वाडकर होते, तितके सगळेजण भातशेती करणारे होते, असा नियम सांगतां येईल.

कोकणांत बागायत आणि शेती एकमेकांना पूरक आहेत. पाऊस पडूं लागला म्हणजे वाडकरास उसंत मिळते व तो शेतजमिनींतील लावणीच्या कामास मोकळा होतो. शेतीचें काम महिना दीड महिन्यांत हातांवेगळें केलें की पुन्हा बागायताच्या उस्तवारीस लागणें त्यास सहज शक्य होतें. तेव्हा, बागायतांत जें सतत काम असतें, त्यांतून सवड काढून वर्षभराच्या अन्नाची पैदास्त पावसाळ्याच्या प्रारंभींच्या व अखेरच्या दिवसांत करावयाची, असा कोकणच्या रयतेचा दरसालचा शेकडो वर्षांचा रिवाज आहे.

इ. स. १८४०–४१ मध्ये नागावांत १५१ रहाट होते; ही संख्या जरुरीपेक्षा कमी आहे. नांगरांवरून अगर बैलगाड्यांवरून नागाव येथील बैलांच्या संख्येचा अंदाज करूं लागलें, तर ती किमान ४।५ शें असावयास पाहिजे. तेवढी असल्याशिवाय ४५० बिघ्यांचें बागायत तरी कसें सांभाळतां येणार? दर बिघ्यास नारळाचीं पन्नास झाडें लावावयाचीं, असा शिरस्ता होता; त्या दृष्टीने नागावांत २२॥ हजार माड पाहिजेत. पण इ. स. १७९८ ते १८४१ या काळांत ती संख्या १६॥ हजारांवरून १२ हजारांवर घसरत चालली आहे, हें बागायताच्या निकृष्टावस्थेचें ठळक चिन्ह होय. बागायताबद्दल नागावशिरस्ता व चौलशिरस्ता असे दोन वेगळे शिरस्ते होते,[2] पण हा वेगळेपणा उलगडत नाही.

सुपारीची लागवड अत्यल्प प्रमाणांत होती. त्या मानाने उंडीच्या झाडांच्या लागवडीचें प्रमाण बरें दिसतें. उंडीच्या तेलाचा उपयोग समयांसाठी करीत व ती एक नित्यावश्यक बाब असल्यामुळे हीं झाडें मुद्दाम लावीत, राखीत. फणसाच्या व ताडाच्या झाडांचा प्रकार उत्पन्नाच्या दृष्टीने फार महत्त्वाचा नसल्याने त्यांचा विचार सोडून देऊं.

बागायतावर महसूल कसा आकारीत असत, हें समजणें जरूर आहे.

नागावांत वाड्यांचे तीन प्रकार होते, (१) मक्त्यांच्या वाड्या (२) खेरीज मक्त्याच्या वाड्या व (३) फूट कौली वाड्या. प्रत्येक प्रकारच्या वाडीतील झाडांचें मोजमाप होई. उदाहरणार्थ, इ. स. १७९८–९९ मधील आकडे तक्त्यांत दिले ते पाहावेत. या वर्षी नागावच्या बागायतांत नारळाचीं एकूण १६७४५ झाडें होतीं. यांचें वेगळ्या तऱ्हेने वर्गीकरण आढळतें, तें असें –

| | | |
|---|---|---|
| १५५०५ | बरहुकूम मक्ता झाडें | ( वाडी प्रकार १ ) |
| १२२४ | खेरीज मक्ता झाडें | ( वाडी प्रकार २) |

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६ २ आंदरु नं. १३४, प. ६५

| | | |
|---|---|---|
| १६ | फूट कौली झाडें | ( वाडी प्रकार ३ ) |
| १६७४५ | झाडें. | |

पैकी वजा पेढ गैरा सुमार –

| | |
|---|---|
| ५१७९ | मक्तापैकी |
| ४७७ | खेरीज मक्तापैकी |
| ५६५६ | |

म्हणजे ११०८९ माड उरले; त्यांवर उत्पन्न आकारावयाचें.

'शिरस्ता'— जुन्या जमान्यांत केव्हातरी एक 'शिरस्ता' निर्माण केलेला असे व त्याप्रमाणे सर्व गोष्टी व्हावयाच्या. उत्पन्न आकारण्याचा पूर्वशिरस्ता इ. स. १८१२–१३ च्या कागदांवरून कळतो. गैरापेढ, झिटे, पाते, रुजवणे माड एकूण संख्येंतून प्रथम वजा द्यावयाचे. गैरापेढ म्हणजे गैरबारदार अगर फळें न देणारीं झाडें. झिटे म्हणजे म्हातारे झालेले व फळें अगदी तुरळक देणारे माड; पाते म्हणजे ज्यांची रोपाची अवस्था संपून डौलदारपणा येऊं लागला आहे असे; रुजवणे म्हणजे कोंभ येऊन बाल्यस्वरूपांत असलेले. हीं सर्व झाडें बागायतांत असलीं, तरी तीं तात्पुरतीं अनुत्पादक असल्यामुळें एकूण संख्येंतून बाद द्यावयाचीं; त्यांव्यतिरिक्त उरले ते बारदार, भंडारमाड, पोईकर व उमेदवार होत. पैकी, पोईकर व उमेदवार माड या वर्षी नाही, पण पुढील वर्षी कांही पीक देऊं लागणार असें जाणून ते 'चढाकडील' म्हणून यंदा बाद्र होत; पण पुढील वर्षी वसुलाकडे जमा धरीत व त्यांवर आकार ठरवीत. या वर्षी आकार घ्यावयाचा, तो फक्त बारदार व भंडारमाडांवर होय. हा झाला 'शिरस्ता.'[1]

चढाची कल्पना देणारा इ. स. १८४०–४१ मधील आणखी एक कागद पाहण्यासारखा आहे. त्यावरून स्पष्ट होतें की, आंगरेकालांत उत्पन्नास आलेल्या झाडांवरच आकार घेत. कौल देऊन लावणी करविलेल्या बागायतावर विशिष्ट मुदतींत आकार घेत नसत. उदाहरणार्थ, १८४०–४१ मध्ये १५३०८ झाडें होतीं; त्यांतून २१२० झाडें आकारांतून वगळलीं असून १३१८८ झाडांच्या उत्पन्नावर सरकारने आकार केला आहे.[2] उत्पन्न मोजण्याची पद्धति, राजभाग, प्रजाभाग, सरदेशमुखी इत्यादि सर्व प्रकार या कागदांत आलाच असून त्यांत व १८१२–१३ मधल्या कागदांत एकसारखेपणा असल्याने आंगरेकालांत अखेरपर्यंत आकार करण्याची पद्धति एकच असल्याची खात्री होते.

नारळाच्या झाडास लावणीपासून पोईकर होण्यास सुमारें आठ वर्षे लागतात. तदनंतर दोन वर्षांनी तो बारदार होतो, असें कागदांधारें व अनुभवानें लिहितां येईल. पाते माड पांच वर्षांनी पोईकर होतात; रोपे माड सात वर्षांनी पोईकर होतात. तेव्हा, आजचे पाते पांच वर्षांनी चढ धरण्यास व अजमासांत घेण्यास योग्य, असें मानण्यांत येत होते. बागायताच्या उत्पन्नांत 'चढ' दाखविण्याच्या दृष्टीने हें निरीक्षण झालें. सुपारी अगर माड यांत 'पेढ' म्हणून एक प्रकार केलेला कागदांत आढळतो. रकमी पेढ म्हणजे फळें देऊं लागलेलें झाड. माडपेढामध्ये बारदार, भंडारमाड व सूटमाड असा प्रकार केलेला दिसतो. कांही झाडें दर वर्षी भरपूर फळें देत नाहीत; तीं मध्येच एकादें वर्ष गैरबारदार होतात; पण तीं पूर्ण रिकामीं राहात नाहीत; म्हणून त्यांवर कांही वेळां अर्धा आकार धरल्याचें दिसतें.

**चढ देण्याची पद्धति**—माड किंवा सुपारीच्या झाडांची सरकारी प्रतवारी अशी—

१ आंदरु नं. ६३७, पृ. १२२ २ कोंजरु नं. १३७, पृ. ५ ते ८

(१) बारदार, (२) भंडारमाड, (३) सूटमाड, (४) गैरबारदार, (५) पोईकर, (६) रोपे, (७) पाते, (८) झिटे, (९) उमेदवार, (१०) रुजवणे, (११) मयत. प्रथम बारदार माडाचें उत्पन्न ठरवीत. त्यांत पोयेकर माडांच्या उत्पन्नाचा अजमास मिळवीत; म्हणजे यंदाच्या उत्पन्नाचा अजमास झाला. पुढील वर्षी यंदाचे पोयेकर बारदार होणार; ते मिळून बारदारांची संख्या वाढे. त्यांत नव्या पोयेकरांचें उत्पन्न मिळविलें, म्हणजे त्यापुढील वर्षीचा अजमास झाला. सारांश, मागील वर्षाचा वसूल हा पाया धरून त्यावर पुढील वर्षांचा अजमास ठरवितांना चढ आकारण्याची रीत होती. इ. स. १८४०–४१ मध्ये बागायतावर १३८१॥।≈ रु. चढ धरला आहे. म्हणून मागील वसुली + चढ = यंदाच्या उत्पन्नाचा अजमास, असें समीकरण झालें. या चढांतून मृत झाडें वगैरेंच्या उत्पन्नाचा मागील आकडा बाद होऊन पक्का आकडा तयार होई.[1] नागावच्या व चौलच्या शिरस्त्यांत कांही वेगळेपणा असून चौलचा शिरस्ता जास्त सवलतीचा असावा.[2]

इ. स. १८१२–१३ मध्ये आगराची पाहणी व पूर्वीच्या शिरस्त्याप्रमाणें आकार झाला; त्याचा तपशील असा :–

माडपेढ– बारदार नारळ कलित दर माडास सुमारें ३५ नारळप्रमाणें; पण त्यांतले निमे वजा देण्याची पद्धति होती.[3] पाहणीनुसार दर भंडारमाडास ६५ प्रमाणें नारळ. तपशील–

या वर्षीचीं नारळाचीं झाडें–१०००८
कलित नारळ सुमारें

| | | |
|---|---|---|
| ९८६९ | बारदार माडांचे नारळ | १४१४१५ |
| ४९ | भंडारमाडांचे दर ६५ प्रमाणें | ३१८५ |
| ९० | सूट माड दर ३५ प्रमाणें | ३१५० |
| | | १४७७५० नारळ. |

हें झालें नारळांचें या वर्षांत्रें एकूण उत्पन्न !
यांतील ⅓ प्रजाभाग = ४९१३९ नारळ
⅔ राजभाग = ९८६११ नारळ

पैकी राजभाग हें सरकारी उत्पन्न व प्रजाभाग हें वाडकरांचें उत्पन्न होय. हें मोजण्याच्या विशिष्ट पद्धतीमुळें प्रजाभागाच्या दुपटीहून राजभाग थोडा जास्त भरे. उदा० असें समजू की एका वाडींत एक भंडारमाड आहे; त्याचें उत्पन्न ६५ नारळ, एकूण, झालें. त्यांतील प्रजाभाग २१ नारळ व राजभाग ४४ नारळ होत. राजभागाकडे माप झुकतें ठेवायचें, असा 'शिरस्ता' होता. ऐनजिनसी मोजणी झाल्यावर त्याचें नक्त म्हणजे रोख पैशांत रूपांतर करण्याची रीत अशी–

राजभागाच्या नारळांचा भाव शेकडा १॥।≈ रु. होय.
प्रजाभाग नारळांवर नफा शेकडा ।≡ रु. आकारावयाचा व तो सरकारला मिळवायचा.
राजभाग व प्रजाभाग – सर्व उत्पन्नावर जकात शेकडा ८– रु. आकारावयाची व ती सरकारला मिळावयाची.
सरदेशमुखी शेकडा १० रु. सरकारची.
पोतदारी दर शेकडा रुपयांवर १।– आकारावयाची.
इ. स. १८१२–१३ सालचें उदाहरण प्रत्यक्षांत असें —
उत्पन्न जमा रुपये

१ कोंजरु नं. १३७, पृ. ५ ते १० २ कोंजरु नं. १३७, पृ. १९, २०
३ आंदरु नं. ६३८, पृ. १६६

१८५०८।।। ऐन नारळ ९८६११ राजभाग

२२०८= नफा नारळ ४९१३९ प्रजाभाग शेकडा ११= प्रमाणें.

९२।।= जकात नारळ १४७७५० दरसदे ८—

२१६२।।।—।।।

२१८।= सरदेशमुखी शेकडा १० रु. प्रमाणें २१६२।।।—।।। रु. वर

२३८१८=।।।

३९।।=।। पोतदारी २३८१८=।।। रु. वर, दर शेकडा १।।— रु. प्रमाणें

२४२०।।।=।। रु. एकूण सरकारी उत्पन्न नारळांचें

[आंदरु नं. ६३७, पृ. १३७]

हें विवेचन मक्ता, खेरीज मक्ता व फूट कौली बागायतांतील नारळांचें झालें. आणखी दोन प्रकारचें बागायत नागावांत होतें. त्यांतील एक प्रकार दारमाडांचा होय. या वर्षी नागावांत १६२ दारमाड होते. पैकी गैरबारदार, पोईकर, रोपे, झिपे, झिटे, पाते इत्यादींची संख्या ४४ होती. ती वजा जातां ११८ माडांवर आकार झाला. पैकी ४ भंडारमाड होते. तेव्हा, आकाराचा तपशील असा—

रु. ५४।. बारदार ११४ माडांचा आकार

५१।। प्रत १०३ दर ।।. प्रमाणे

२।।। प्रत माड ११ दर ।. प्रमाणे

४ भंडारमाड ४ दर १ रु. प्रमाणे

५८। रु. [आंदरु नं. ६३७, पृ. १३९].

उरला प्रकार कौली वाड्यांचा. कौली वाड्यांत १७५८ माड होते. पैकी गैरबारदार, पोईकर उमेदवार, रोपे, झिटे, पाते मिळून ६४२ वजा करिता १११६ माड उरले. पैकी ४९ सूट माड होते. उरले १०६७ माड; पैकी ९१४ बारदार व १५३ भंडारमाड होते. त्यांचा आकार-तपशील.—

२२९ रु. बारदार माड ९१४ पैकी

२२८ रु. ९१२ माडांचे दर ।. रु. प्रमाणे.

१ रु. २ माडांचे दर ।।. रु.

२२९ रु.

७६।।. भंडारमाड १५३ दर ।।. रु. प्रमाणे

१२।. सूट माड ४९ दर ।. रु. प्रमाणे

३१७।।।. रु. [आंदरु नं. ६३७, पृ. १३९].

माडांच्या उत्पन्नाची कल्पना देण्याइतपत हें विवेचन केलें. वरील विवेचनांत कौली आणि फूट कौली असे दोन शब्द आले आहेत; त्यांतील फरक समजला पाहिजे. एखादी वाडी कौल देऊन मामूर करण्यास दिलेली असे. अशा वाडीबद्दल कौलांत माफीचीं वर्षे, इस्त्याव्याचीं वर्षे व विशिष्ट वर्षानंतर भर आकार, अशा स्वरूपांत करार सांगितलेला असे. कौलीवाडींतील कांही भागांत कौलापूर्वीची लागवड असे. तीवर घेतलेला मक्ता हा 'फूटमक्ता' म्हणून जमाखर्चांत सामील होई. कौल संपूर्ण क्षेत्राबद्दल असे; पण त्यांतील कांहींत अगोदरपासून उत्पन्न येऊं लागलेलें

असे. अशा वेळीं सदर बागायताचेच, हिशेबासाठी, कौली व फूटकौली असे दोन विभाग होत.[१]

नागावच्या वाड्यांतून सुपारीचीं झाडें होतीं; त्यांच्या आकाराचा शिरस्ता पुढीलप्रमाणे :—

बारदार झाडाच्या दर शिपटास (सुपारीचा घड) सुपारी वजन दीड शेरप्रमाणे मानावयाची. एकूण सुपारीचा तिसरा हिस्सा प्रजाभाग व दोन हिस्से राजभाग अशी वांटणी होई. ऐन किंमत दरमणीं रुपये तीन धरून नख्त किंमत ठरविली जाई. प्रजाभागावर नफा दरमणीं .॥≂। रु. समजला जाई. जकात प्रजाभाग व राजभाग मिळून दरमणीं ८≥॥ रु. असे. सरदेशमुखी दर १०० रुपयांवर १० रुपये आकारीत. पोतदारी दर रुपयास ८।. एक पैसाप्रमाणे समजत.[२] इ. स. १८१२–१३ मधील सुपारीच्या आकाराचाच येथे तपशील पाहूं या.

गैरबारदार, उमेदवार, रोपे, झिटे, वगैरे झाडें वजा करिता एकूण बारदार पेढ ३६१ होते. त्यांवर एकूण सुपारी अजमासे ७॥ मण १॥ शेर ठरली. पैकी राजभाग ५ मण १ शेर व प्रजाभाग २॥ मण .॥. शेर झाला.[३]

याचा आकार—

१५।≥।. रु. ऐन किंमत ५ मण १ शेराची दरमणीं ३ रु. प्रमाणे

१॥।≂ रु. नफा तिजाई प्रजाभागावर दर मणीं १०। आणे प्रमाणे

१॥≂। रु. जकात सुपारी ७॥ मण १॥ शेरावर दरमणीं ८≂॥ प्रमाणे

———

१८॥।≥॥. रु.

२।≥ रु. सरदेशमुखीचा आकार सो १८॥।≥॥ वर दरसदे १० रु. प्रमाणे.

———

२१।~॥। रु.

.॥।≥॥ रु. पोतदारी २१।~॥।. रु. वर दरशेकडा १॥~ रु. प्रमाणे

———

२२।~।. रु. एकूण आकार सुपारीचा. [ आंदरु नं. ६३७, पृ. १३७ ].

उंडी, फणस यांबाबत शिरस्ता असा की बारदार झाडास .।. रु. सरदेशमुखी दरशेकडा १० रु. व पोतदारी दरशेकडा १॥~ रु. घ्यावयाची. इ. स. १८१२–१३ मध्ये फणसाचीं एकूण झाडें ४९९ होतीं. पैकी गैरबारदार, उमेदवार, रोपे, ढाके २८० वजा करिता २१९ झाडें बारदार म्हणून उरलीं. त्यांवर, वरील शिरस्त्याप्रमाणे ६५८।. रु. जमा झाले.[४] उंडिणीचीं झाडें १२२५ पैकी वजा ७४५=४८० वर एकूण १४२॥ रु. वसूल झाले.[५] कौली वाड्यांतील उंडिणीचे ५८॥।. रु. जमा झाले. असो. म्हणून, इ. स. १८१२–१३ चें सर्वविध बागायताचें व झाडांचें सरकारी उत्पन्न असें—

| | अज रुपये | रकमी | कौली |
|---|---|---|---|
| माडपेढ | २४७३॥≥।. | २४२०॥≥।. | ५२॥।. |
| सुपारी | २२।~।. | २२।~।. | ० |
| उंडिणी | १४७॥.॥।. | १४२॥. | ५८॥।. |

१ कोंजरु नं. १३७, पृ. १२

२ आंदरु नं. ६३७, पृ. १२१, १२२

३ आंदरु नं. ६३७, पृ. १३७

४ आंदरु नं. ६३७, पृ. १२२, १३७, १३८

५ आंदरु नं. ६३७, पृ. १३७

| | अज रुपये | रकमी | कौली |
|---|---|---|---|
| फणस | ६५ʃ। | ६५ʃ। | ० |
| उत्पन्न | ३९॥।= | ३९॥।= | ० |
| वरकस | ९२॥=। | ९२॥=। | ० |
| | २८४१ʃ–॥।। | २७८३।– | ५७॥।॥।। |
| खेरीज मक्ता | ३९२।॥।। | | |
| फूट मक्ता | २१०॥।–॥।। | | |
| | ३४४४।।। | एकूण जमा | |

[ आंदरु नं. ६३७, पृ. १३६ ते १४१ ]

या वर्षी पानवेल, ताड यांचें उत्पन्न झालें नाही; सबब तें वर दाखविलें नाही (उत्पन्न व वरकस यांचें विवेचन अन्यत्र आलें आहे.)

सरकारी उत्पन्न आकारण्याची पद्धति इ. स. १७९८ ते १८४१ पर्यंत एकच आहे; म्हणून येथे नागावच्या बागायताचें सरकारी उत्पन्न सादर करितों. ( झापाच्या उत्पन्नाचा विचार वेगळा करूं. )

| | इ. स. १७९८–९९ | इ. स. १८२८–२९ | इ. स. १८२९–३० | इ. स. १८३९–४० | इ. स. १८४०–४१ |
|---|---|---|---|---|---|
| माडपेढ | | ३१९२॥–।॰ | ३६१३।= | | २६८४ʃ= |
| सुपारी | ५६२३॥=॥।॰ | १४॥।ʃ॥॰ | ६२ʃ– | ३७८२॥।≡॥।॰ | ४॥ʃ॥॰ |
| उंडिणी | | १०७ʃ=॥॰ | २८४॥≡।॰ | | ८०॥।॰ |
| फणस | | ५३॥≡॥।॰ | ८४ʃ– | | ३५॥= |
| उत्पन्न | | कुळकर्णी मुशाहिरा ५६ʃ≥ | कुळकर्णी मुशाहिरा ५६ʃ≡।॰ | | |
| खेरीज मक्ता | २५४॥≡।॰ | — | १९७।ʃ।॰ | ५९५ʃ=॥॰ | |
| फूट मक्ता | ३।≡॥। | — | १००॥।– | ५।= | ६३ʃ–।॰ |
| ताड | २३॥– | ८।॰ | — | ६।= | ८॥= |
| | | ३४२४।=॥॰ | ४३९८।≡ | ४३८३॥ʃ। | |

[ आंदरु नं. १३४, पृ. ५०, ५२, ५७; आंदरु नं. ६३८, पृ. १६५ ते १६८, १७५, १७६, कोंजरु नं. १३७, पृ. ४, ८, ९. ]

| इ. स. | नारळ | सरकारी किंमत | दर शेंकडा |
|---|---|---|---|
| १८०८-०९ | १७३७७६ | ३२५६॥≡॥।। | १॥।= |
| १८१२-१३ | १४७७५० | २४२०॥।≡।। | १॥।= |
| १८१८-१९ | १३०१८१ | २४४२॥– | १॥।= |

[ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६, ६३७ ]

एकूण उत्पन्न बागायताचें

| | | | |
|---|---|---|---|
| १८०८-९ | बागायत मक्ता | ५३५९१॥=। | रु. |
| | खेरीज मक्ता | २५८८≡। | रु. |
| | फूट मक्ता | ६९१॥=॥ | रु. |
| | | ५६८७॥। | रु. |
| १८११-१२ | | ८७३४॥= | |
| १८१८-१९ | | ५५१२८~। | |
| १८१९-२० | | ७५६२॥ | रु. |

[ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६, ६३७ ]

इ. स. १७९९–१८०० नंतर बागायताची परिस्थिति खालावत चालली व उत्पन्न तुटत चाललें. ही परिस्थिति आंगरेसत्तेच्या अखेरीपर्यंत कायम राहिलेली दिसते.

बागायतांतील आणखी एक उत्पन्नाची बाब झाप होय.

| इ. स. | झाप सरकारचे | आधार |
|---|---|---|
| १७९८-९९ | ४५९४८ | आंदरु नं. १३४, पृ. ५२, ५६ |
| १८०९-१० | १३५५४५ | आंदरु नं. १६६, पृ. १८६, १८७. |
| १८११-१२ | १३३२७० | म. ना. अप्रपेदरु नं. |
| १८१४-१५ | ६२२०६ | ६३६, ६३७. |
| १८१९-२० | १३६८५० | |
| १८२९-३० | ५८९३३ | आंदरु नं. ६३८, पृ. १६९, |
| १८४०-४१ | ४८८७२ | कोंजरु नं. १६७, पृ. १७ |

झापांच्या उत्पन्नाच्या दृष्टीने माडांची प्रतवारी केलेली आढळते. तदनुसार प्रत्येक झाडाचे ४, ३, किंवा २ झाप हें सरकारी उत्पन्न होतें.[1] कांही सागरगडावरील इमारतींच्या शाकारणीस नेत असत. बहुतेक झाप अलीबाग येथे कुलाबा किल्ल्याच्या शाकारणीसाठी अगर सरकारी गलबतं शाकारण्यास नेत असत. इ. स. १८०८–०९ मध्ये कुलाब्यास ६१ हजार झाप नेले.[2] इ. स. १८१९–२० मध्ये ६० हजार झाप नेण्यांत आले.[3]

झाप म्हणजे नारळीचीं पानें अगर पानांच्या हातांनी बनविलेल्या चटया होत. बागायत-टक्क्याबरोबर ऐनजिनसी कर म्हणून झाप सरकारांत जमा करीत. त्यांचा विनियोग असा —

इ. स. १८५४ पर्यंत नागावांत एकहि कौलारु इमारत नव्हती [ Selections from the Records of the Bombay Government, No. 7, New Series, Page 43 ]. त्यामुळे इमारतींची शाकारणी दरवर्षी करावी लागे. सरकारी इमारतींच्या शाकारणीसाठी झापांचा उपयोग होत असल्यामुळे, ते ऐनजिनसी घेण्यांत सरकारचा फायदा होता. १ नागावच्या आगरांतून श्रीबागपेठेंतील सरकारी वाड्याच्या शाकारणीस दरवर्षी झाप रवाना होत. २. दिवाण बिवलकर यांचा अलीबागेस वाडा होता; त्याच्या शाकारणीस नागाव महालांतील झाप धाडले जात. ३. पावसाळ्यांत, कुलाबा किल्ल्याच्या पश्चिमेस, आंगऱ्यांचीं आरमारी व अन्य गलबतं खडकांवर आणि बंदरामध्यें नांगरलेलीं असत; त्यांच्या शाकारणीस झाप रवाना होत. या ठिकाणीं धाडावयाच्या झापांचा आकडा ठरलेला असे. ४. महालाच्या चौसोपी इमारतीच्या शाकारणी-

१ आंदरु नं. १३४, पृ. ५९ २ आंदरु नं. १८, पृ. १७८

३ आंदरु नं. ४७, पृ. ७५

साठी ४७५० झाप लागत. ५. नागावांत रामताड नांवाचें एक ठिकाण आहे; तेथें परवान्याचें भेट होतें; तें शाकारण्यास ५५० झाप लागत. ६. रात्रीं सरकारी माणसें बाहेर पडावयाचीं; म्हणजे झापांच्या चुडी पेटवून त्या प्रकाशांतून जावयाचीं. उदाहरणार्थ, १५ जून १८१४ या दिवशीं श्रीमंत बाबाजी दिवाणजी (विवलकर) यांची स्वारी श्रीनारायणमंदिर, महाल नागाव येथे कीर्तनास आली. अंधारांतून परत जात असतांना, अलीबागपर्यंत १०० झापांच्या चुडी लागल्या. ७. नागावांत सातताड येथें आंगऱ्यांची एक पागा असे. तिच्या शाकारणीस ७३९ झाप लागत. ८. नागावच्या मंदिरांच्या शाकारास २३०० झाप महालांतून द्यावे लागत. ९. चिंचवडच्या श्रीदेवांस शाकाराप्रीत्यर्थ नागाव महालांतून १०८ झाप दर वर्षी रवाना होत.[१] इ. स. १८५२ च्या सप्टेंबरमध्ये कलेक्टर कार यानें झापांचा कर माफ केला. इतकीं वर्षे नुसत्या नागावांतूनच सुमारें दीड लक्ष झाप कर म्हणून जमा होत.[२]

**जमिनीची व बागायताची पाहणी** — इ. स. १७८९–९० मध्ये नागाव महालाच्या बागायताची गिर्दवारी होऊन पाहणी झाली. इ. स. १७९० –९१ मध्ये मक्ता ठरला व तो २१ वर्षे चालू राहावयाचा होता.[३] पण इ. स. १७९३ पासून अष्टागरात आफ्तफितरती येत गेल्या. राघोजी आंगरे वारले व प्रदेशांतील शांतता बराच काल लुप्त झाली. ती लवकरच पुन्हा प्रस्थापित झाली असतीही; पण सवाई माधवरावांच्या मृत्यूनें दुसऱ्या रावबाजीची जी वादळी कारकीर्द सुरू झाली, तिचेमुळे राजकीय इतिहास बदलण्याचा समय येऊन ठेपला व प्रजेच्या जीवनांत अस्थिरता उत्पन्न झाली. आंगऱ्यांच्या आपसांतील यादवीचा परिणाम व अन्य कारणांनी नागावच्या बागायताची खराबी झाली. पाणी लावण्याचें काम नीट झालें नाही. रहाट-रहाटवड मोडकळीस आली. माडाचीं झाडें उतार झालीं. सुपारीचीं बहुतेक झाडें मेलीं.[४] इ. स. १७९७–९८ मध्ये पुन्हा पाहणीचें काम चालू झालें, पण अंतर्गत यादवीमुळे ती सोडून द्यावी लागली. यावर्षी जमाबंदीचें उत्पन्न कमी आल्यामुळे 'खराबापट्टी' प्रजेवर आकारून वसूल करण्यांत आली.[५] इ. स. १८११–१२ मध्ये बागायताचा मक्ता अतिशय कमी आला. सरकारने ८ आणे, ६ आणे व कांही बागांतून केवळ ४ आणे या प्रमाणांत उगवणी केली. इ. स. १८१२–१३ मध्ये उत्पन्न आणखी घटलें. तेव्हा, वाडकरांनी सरकारांत ६०० रु. नजराणा भरला व बागायताची शोचनीय स्थिति कळविली. सरकारने सदर नजर वसुलांत जमा धरली व मागील व या वर्षाची थकबाकी ४३०० रु. पैकी १८०० रु. पुढील वर्षी भरण्यास सांगून १९०० रु. सूट जाहीर केली. सरकारचें उत्पन्न ज्या प्रमाणांत घटलें, त्याच प्रमाणांत लोकांचेंही उत्पन्न कमी झालें व परिस्थिति सर्वांचेच दृष्टीने गंभीर झाली.[६] पण सरकारने आपला महसूल कमी केला नाही.[७] या वर्षाच्या आरंभीं, मागे ठरलेल्या मक्त्यास २१ वर्षे पूर्ण झालीं, म्हणून आगराची गिर्दवारी राखून पाहणी झाली. यावेळीं माडपेढ किती, सुपारीपेढ किती, कलिताचा आकार काय, दस्ती झाडें किती, नक्तचा आकार किती, हें मागील शिरस्ता पाहून ठरविण्यांत आलें व तदनुसार इ. स. १८१२–१३ पासून उगवणी करण्याचें ठरलें. यावेळीं ठरलें की आगर कांही वर्षे 'पाहणीवर' ठेवावें व दरवर्षी पाहणींत दिसून येईल तदनुसार आकार वसूल करावा. जाणत्यांचें मत पडलें की यायोगें रयतेस उमेद येणार नाही.[८]

---

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७ — २ आंअ. ७९८
३ आंदरु नं. ६३७, पृ. १२१ — ४ आंदरु नं. ६३७, पृ. १२१
५ आंदरु नं. १३४, पृ. ६२ — ६ आंदरु नं. ६३७, पृ. १४२
७ आंदरु नं. ६३७, पृ. १२१ — ८ आंदरु नं. ६३७, पृ. १२१

**कलमबंदी** — यामुळे सत्ताधारी व प्रजा यांनी एकत्र येऊन बागायताबद्दल कांही विचार व करार करण्याची जरुरी उत्पन्न झाली. या करारांत नागावच्या बागायताबद्दल पुष्कळच माहिती आली असल्याने त्या कागदाचा येथे अनुवाद देतों.

आरंभींच अशी विनंति करण्यांत आली की यापुढे पंधरा वर्षांचा म्हणजे इ. स. १८२७–२८ पर्यंतचा बागायताचा मक्ता सरकारने ठरवून द्यावा. मैराळ पांडुरंग महालकरी होता; त्यास आंगऱ्यांनी कळविलें होतें की लोकांकडून येणें असलेली दोन वर्षांची बाकी वसूल करावी व इ. स. १८१४–१५ मध्ये आषाढांत बागायताचा पाडा करून गावची रखवाली करावी. नंतर कलित-पाहणी करून इ. स. १८१४–१५ चा मक्ता ठरवावा. तदनुसार आषाढपाडा होऊन बागायताची कलितपाहणी झाली व संचणीचा १५ वर्षांचा आकार ठरला[१]. आषाढपाड्याची कल्पना येथे स्पष्ट केली पाहिजे. बागायताच्या उत्पन्नाचें वर्ष मृग लागलें म्हणजे सुरू होतें. त्या सुमारास मुख्य उत्पन्न जें नारळ, तें पाडवून घ्यावयाचें व झाडावर जुनें पीक राहूं द्यावयाचें नाही. नंतर सरकारने झाडांची राखण करून पाडा होऊं द्यावयाचा नाही. भाद्रपदांत, शिरस्त्याप्रमाणे कलितपाहणी करावयाची. त्या पाहणींत जें उत्पन्न ठरेल, तदनुसार पुढील वर्षीची उगवणी करून घ्यावी. हा ठराव सरकार व वाडकर यांस मान्य झाला. आषाढपाड्यानंतर कुलारगवार पाहणी करणें जरूर असतें. तदनुसार इ. स. १८१५–१६ त उत्पन्नाच्या दृष्टीने कुलारगवार पाहणी झाली.[२] व महालचा १५ वर्षांचा मक्ता ठरला.[३] असो.

सरकार व वाडकर यांत कलमबंदी झाली, तिचें स्वरूप असें ;–

(१) नागावकरांचें म्हणणें की बागायतांत दर बिघ्यास नारळाचीं पन्नास झाडें व दस्ती झाडें असावींत असा नागावचा शिरस्ता आहे. यंदाच्या पाहणींत हाजीर पेढ व दस्ती झाडें यांची संख्या लिहिली आहे. पन्नास झाडांस एक बिघा, याप्रमाणें एकूण किती बिघे जमीन लागवडीखालीं आहे व किती जमीन ओसाड आहे याचा हिशेब होऊं शकेल. हल्लीं अष्टागरांत बागायत नसलेल्या जमिनीची अव्वल, दूम, सीम अशी प्रतवारी होऊन दर बिघा १॥ रु., १ रु. व ॥. रु. असा आकार ठरला आहे, तोच आगरांतील ओसाड जागेस ठरवावा. तितक्या जागेंत ताग, ऊस, पानवेली, हळद, आलें इत्यादि जित्रब उन्हाळीं पावसाळीं केल्यास, त्यावर वेगळें देणें पडूं नये. वरकस म्हणून जो मक्ता आकारला जातो, तोही बाद द्यावा.

यावर सरकारतर्फे उत्तर मिळालें की, नागावच्या बागायत जमिनींतील घरटे, विहिरी, पाटस्थल, देवालयें, झाडझाडोरा यांखालीं असलेली जमीन आम्ही एकूण जमिनींतून बाद करूं. बाकी जी जमीन उरली, तींतून दर बिघ्यास ५० माडांचीं झाडें या प्रमाणांत जी जमीन ठरेल, ती वजा करूं. उरलेल्या जमिनीची अव्वल, दूम, सीम अशी प्रतवारी करूं. तीवर अनुक्रमें १॥ रु., १ रु. व आठ आणे याप्रमाणे चढ देऊ. पूर्वीच्या मक्त्यांत ज्या जागेस वरकस म्हणून मानलें आहे, व आकारही वरकस म्हणून ठरविला आहे, तो माफ करूं. या जमिनींत वाडकरांनी ताग, ऊस इत्यादि जित्रब केल्यास वेगळा आकार पडणार नाही.[४] म्हणजे या कलमबंदींत सरकार जमिनीचा 'वरकस' हा अतिशय कमी महसुलाचा प्रकार काढून तिचा जिरायतीचा आकार घेण्याचें बोलत होतें !

इ. स. १८१२–१३ मध्ये पाहणी झाली. माडपेढ, उंडी, फणस, सुपारी यांचें बारदार पेढ असेल, त्यावर आकार धरण्यांत आला. ठरलें की वरकस म्हणून जी जागा मोकळी होती व वाहींत

---

१ आंदरु नं. ६३७, पृ. १४२ २ आंदरु नं. ६३८, पृ. १६५
३ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६ ४ आंदरु नं. ६३७, पृ. १२१, १२२

ज्या जागेंत जिन्नब केलें जात होतें, तीवरील (वरकसाचा) आकार बाद देण्यांत येईल. पाहणी-नंतर पूर्वशिरस्त्याप्रमाणे बागायतावर आकार करण्यांत आला.

इतके दिवस वरकस म्हणून १०१ रु. आकार जमा होत असे; तो यापुढे बाद द्यावयाचा असें ठरलें.

**दोन शिरस्ते** — सारांश, यावेळीं सरकारने नागावबाबत दोन शिरस्ते केले.

(१) नगदी जमीनशिरस्ता. जी जमीन बागायताखाली नसेल, तिच्यामध्यें निघणाऱ्या उत्पन्नाबाबत हा शिरस्ता होय. अशा जमिनीची अव्वल, दूम आणि सीम अशी प्रतवारी करण्यांत आली व प्रतीनुसार जमिनीवर रोख आकार घ्यावयाचा असा एक शिरस्ता ठरला. (२) बागायत-आकार अगर दस्त. ह्यांत बागायतीखालीं जी जमीन असेल, तिचा महसूल येणार होता. बागायत उस्तवारीस येत असतांना नाकारी म्हणजे नापीक जमिनी कमी कमी होत जाणार व नगदी शिर-स्त्याची कांही जमीन बागायती बनणार हें उघड होतें. तीवर बागायती महसूल बसणार होता. अर्थात् अशा दस्ती जमिनीवरील ' शिरस्ता ' नाहीसा होणार होता. ' नगदी 'ची जमीन कमी होऊन ' दस्ता 'ची जमीन वाढणार होती. या दस्तावर क्रमाने चढ देऊन नवीन लावणीच्या झाडांचा महसूल सरकारला मिळावयाचा होता. प्रजेने विनंति केली की अशा जमिनीवरील नगदी व दस्त दोन्ही वसूल होऊं लागतील; तेव्हा चढ बाद द्यावा. त्यावर सरकारने ठरविलें की अशा जमिनींतील जें पेढ पाहणीस लागेल, त्यावर नगदी शिरस्त्याचा आकार बाद देऊं व बागायताचाच आकार घेत जाऊं.

शिरस्त्याहून जास्त लावलेल्या झाडांवर बारदार माडास .।. रु., भंडारमाडास .।।. रु., बारदार सुपारीस ॰/‒ याप्रमाणे हशील आकारलें जाईल.

नागावच्या प्रजेचें म्हणणें असें होतें की माड वगैरेंचीं जीं झाडें गैरबारदार, निखर म्हणून पाहणींत लागलीं आहेत, त्यांची स्थिति अशी आहे की त्यांबाबत मेहनत करून फल नाही; म्हणून तीं झाडें आकारांतून म्हणजे दस्तांतून बाद द्यावीत. यावर सरकारचें म्हणणें पडलें की सदर पेढाचा आकार सातवे वर्षी जमा धरावा.

**सालबंदीकडील चढ** — सरकारने स्पष्ट केलें की चढाचा आकार करून शिरस्त्याप्रमाणे सालबंदीकडील १५ वर्षे मक्ता करार केला आहे. तो ' चढ ' पुढीलप्रमाणे —

(अ) इ. स. १८१३–१४ मध्ये बारदार झाडांवर चढ
- (१) माड — दर पेढास ॰/।।.
- (२) सुपारी — दर पेढास ॰/‒।।.

(ब) इ. स. १८१४–१५ मध्ये गैरबारदार माडांवर चढ
- (१) माडपेढास दर .।.
- (२) सुपारीस दर ॰/≥
- (३) उंडी, फणस दर .।.।।।.

(क) इ. स. १८१५–१६ मध्ये पोईकर माडांवर चढ —
- (१) पोईकर माडास दर .।≥

(ड) इ. स. १८१९–२० मध्ये उगवत्या दर पेढ व झाडास चढ.
- (१) माडपेढास दर .।≥
- (२) सुपारीस दर ॰/≥
- (३) उंडी, फणस दर .।.।।।

(ई) इ. स. १८२५-२६ ते १८२७-२८ मध्यें रोपें असतील त्यांवर चढ

(१) माडपेड दर ८≡

(२) सुपारी दर ८—

(३) उंडी, फणस दर ।.।॥।.

हा पूर्वशिरस्त्याप्रमाणे चढाचा शिरस्ता होय. याचें थोडें स्पष्टीकरण असें – इ. स. १८१२-१३ मध्यें पाहणी झाली. त्यावेळीं ज्या माडांवर उत्पन्न होतें, त्यांवर म्हणजे केवळ बारदार माडांवरच दस्त आकारला होता. बागायतांत गैरबारदार पोईकर, उगवते, रोपे इत्यादि अवस्थांतील माड होते; त्यांवर दस्त आकारला नाही; कारण त्यांवर उत्पन्न नव्हतें. त्यांवर फळें येऊं लागल्यावर दस्त आकारावयाचा होताच. तो केव्हा व कसा आकारणार, याचा सरकारने खुलासा केला की इ. स. १८१३-१४ मध्ये आजच्या म्हणजे इ. स. १८१२-१३ च्याच बारदार माडांवर थोडा जास्त दस्त घेऊं; पण इतर माडांवर आकार बसवणार नाही. आजच्या गैरबारदार झाडांवर इ. स. १८१४-१५ मध्ये दिलेल्या प्रमाणांत दस्त वसूल करूं. इ. स. १८१५-१६ मध्यें आजचे पोईकर माड बारदार झालेले असतील; तेव्हा त्यावर आकार आकारूं. आजचे उगवते माड१८१९-२० मध्ये दस्त आकारण्यास योग्य होतील व आजचे रोपे १८२५-२६ नंतर बारदार होतील; त्यांवर तेव्हा आकार केला जाईल. यावरुन 'चढ' देण्याच्या पद्धतीची कल्पना स्पष्ट होते की झाडें बारदार झालीं की त्यांवर चढ आलाच! तोवर मात्र, सत्ता महमूल बसवीत नव्हते; पण झाडांची दरसालची बदलती अवस्था तें ध्यानांत घेत होतें.

कलमबंदीचे वेळीं प्रजेनें विनंति केली की यंदा पाहणी झाल्यानंतर जागजागीं नारळ-सुपारीचीं झाडें मयत झालीं आहेत. अजून मक्ता ठरावयाचा आहे; तेव्हा वसुलींत सदर झाडांचा आकार बाद द्यावा. हें सरकारने मान्य केलें.

लोकांनी सरकारला विनंति केली की सरकार झाप, सुंभ इत्यादि वस्तू खरेदी करतें. दरसालच्या शिरस्त्याप्रमाणे आम्ही त्या देऊं. त्यांची किंमत सरकारने जमा करावी व बागायताच्या मक्त्यांत बाद द्यावी. बागायताचा मक्ता आठ महिन्यांत द्यावयाचा; तो हप्ता दरमहाचा दरमहा घ्यावा. अखेरीस हिशेब करतांना जी बाकी निघेल, ती घ्यावी. त्यावर सरकारचें म्हणणें पडलें की काथा, सुंभ, झाप हे आम्ही ठरवून दिलेल्या चार महिन्यांत घेऊं व त्यांची किंमत मजुरा देऊं. जास्त खरेदी केल्यास महालांतून रोख ऐवज देऊं.

लोकांनी सरकारला विनंति केली की आगरांत सुपारीची लागवड थोडी आहे व पानवेल नाही. तेव्हा, नवी लागवड व उस्तवारी होणें आहे हें ध्यानीं घेऊन सुपारीच्या बारदार पेडावर ८— व पानवेल दर शेकडा (वेलांस) ।. रु. प्रमाणे आकार घ्यावा. मक्ता पुरल्यानंतर कौली शिरस्त्याप्रमाणे जो आकार व्हावयाचा तो होईल. ज्या जमिनींत ही लागवड होईल, तेथें मक्ता पुरेपर्यंत 'चढ' देऊं नये. यावर सरकारचें म्हणणें पडलें की, मक्ता भरल्यानंतर कोणी पानवेली, सुपारी लावील. पानवेलींस शेकडा ।. रु. व सुपारी पेडास, ठरले त्याहून जास्त लावले असतील, त्यांस प्रत्येकीं ८— प्रमाणे आकार वसूल केला जाईल.

बागायतांत पानवेल नसल्यामुळे सरकारने पानांचा रोखा करूं नये, अशी विनंति करण्यांत आली. सरकारने उत्तर दिलें की ५० हजार पानांपर्यंत रोखा करूं; जास्त करणार नाही. पानांची किंमत खरेदीचा दर ध्यानांत घेऊन जमा करूं.

प्रजेने विनंति केली की आगरांत बांबूचीं बेटें नाहीत; सरकारांतून बांबूंचा रोखा करूं नये. सरकारचें म्हणणें पडलें की वर्षभरांत २५० बांबूंपर्यंत रोखे करूं; जास्त केल्यास पुढील दर काठीस

८— प्रमाणे किमत मजुरा देऊं.

लोकांची विनंति की आगरांतील आंबे, चिंचा इत्यादींचा झाडोरा सरकारांत तोडून नेतात; त्याची मनाई करावी. सरकारने कळविलें की वाडकरास राजी राखून तोडूं.

लोकांची विनंति की माडपेढ, सुपारी, सरकारांत तोडून नेल्यास तिचा आकार मक्त्यांत बाद द्यावा. सरकारचें म्हणणें पडलें की दस्ती झाड तोडून नेल्यास मक्त्यांत आकार बाद देऊं.

सरकारने मान्य केलें की माडांखालील मोकळ्या जागेंत वाडकरांनी जिन्नब केल्यास, पूर्वी-प्रमाणेच, उपसर्ग लागणार नाही. तसेंच, वाडींत रयेतीनें जिनजिन्नब, मेवाजिन्नस निर्माण केले, तर सरकारचा उपद्रव लागणार नाही; जरूर तर सरकार त्या वस्तू खरेदी करील. केळीं, कोनफळ इत्यादि जिन्नस सरकारांत लागतात. त्यांबाबत सरकारने मान्य केलें की महालांतून रोख रक्कम देऊन त्या खरेदी करण्यांत येतील.

लोकांनी विनंति केली की आफ्तफितरत झाल्यास मक्त्यांत मजुरा द्यावा. सरकारने विचार प्रकट केला की चौकशी करूं व इतर आगर आहेत, त्यांच्या शिरस्त्याप्रमाणें मजुरा देऊं.

प्रजेचें म्हणणें की वाडकरास रहाटवडीस लाकूडसामान लागेल. आपल्या प्रदेशांतील जंग-लांतून सरकारनें साग, इंजायली या प्रकारचें द्यावें. त्यावर सरकारने कळविलें कीं चौकशी करून साग व जुजबी इंजायली देऊं.

सरकारने मान्य केलें की वाडकर रहाटांस टोणगे व बैल विकत आणतील; त्यांवर जकात घेण्याचा शिरस्ता नाही; पुढेही घेतली जाणार नाही.

**जमिनीचे मालक कोण ?**— प्रजा व सरकार यांमध्ये बागायताच्या मामुरीचा हा करार झाला; त्याची प्रत सरकारने महाजन, वर्तक, नागाव महालांतील रयत यांस लिहून दिली.[1] या कागदांतील कलमबंदीतूनही सरकार जमिनीचे मालक व वाडकर ½ उत्पन्नाचे धनी, बाकी ½ उत्पन्न सरकारचें, ही कल्पना स्पष्ट आहे. वाडकराने मेहनत करून ½ घ्यावयाचें व सरकारनें मेहनत न करतां ½ उत्पन्न घ्यावयाचें; ही प्रजेची जमिनीवरील 'मालकी' की काय? वाडींतील झाडझाडोऱ्यावर हक्क सरकारचा. मेलेल्या झाडांची मालकी सरकारची हें स्पष्ट झालें आहे. एवढेंच नव्हे, अन्यत्र आलेंच आहे की सरकारपरवानगीशिवाय वाडकरास झाड तोडतां येत नव्हतें. जमीन सरकारची हें विधान इतक्या उपर ज्यांस पटत नसेल, त्यांचेसाठी एकच प्रश्न! जमीन जर खरेदी करून लोकांची होत असती, तर या जमान्यांतील लोकांनी वतनांचा हव्यास कां धरला असता?

## विड्याचीं पानें —

नागावांतील उत्पन्नाची आणखी एक बाब विड्याचीं पानें होय. त्यांचें मोठें गिऱ्हाईक आंगरेसरकार स्वतःच होतें. नागवेलीस पाण्याची व्यवस्था उत्तम असावी लागते. डोंगरी गावास, जेथे बारमहा भरपूर पाणी पुरविण्याची सोय असत नाही, तेथे हें उत्पन्न होत नाही. त्यामुळे पानांना अन्य गिऱ्हाईकही पुष्कळ होतें. इ. स. १८१७ मध्ये आंगऱ्यांनी नागांव येथील किती पानें खरेदी केलीं असतील, याचा अजमास म्हणून पुढील नोंदी पहा —

५०० आषाढ मासचे समाप्तीस जंजिरे कुलाब्यास.

३०० छ २ साबान — इ. स. १८१७ जून १८ रोजीं—कान्होजी आंगरे यांच्या मासिकांनिमित्त.

५०० छ १६ सवाल — इ. स. १८१७ ऑगस्ट ३० — गोविंद आंगरे यांचे क्षयतिथीस

1. आंदरु नं. ६३७, पृ. ११६ ते १२६

१५०० छ २४ सवाल — सप्टेंबर ७ — कुलाबा येथे सरकारवाड्यांत ब्राह्मणभोजन — श्रावणमासानिमित्त

२५० छ २७ सवाल — सप्टेंबर १० — कुलाबा येथे गौरी आणावयास

५०० छ १४ जिल्काद — सप्टेंबर २६ — कै. बाबूराव आंगरे यांचे पितरांनिमित्त

१००० छ २८ जिल्काद — ऑक्टोबर १० — कुलाबा येथे सरकारवाड्यांत गोंधळास व दसऱ्यास

३५०० छ १६ जिल्हेज — ऑक्टोबर २७ — कुलाबा येथे दिपवाळीस

१००० छ ७ मोहरम — नोव्हेंबर १७ — कुलाबा येथे सरकारवाड्यांत कार्तिकी एकादशीनिमित्त.

५०० पौष पौर्णिमेस–इ. स. १८१८ जानेवारी २२ — सरकारवाड्यांत

२००० वसंतपंचमीकरिता कुलाबा येथे

१५०० संवत्सरप्रतिपदा — सरकारवाड्यांत गोंधळास

१५०० किल्ले सागरगड येथे जन्माष्टमीसाठी ५०० व हुताशनीसाठी एक हजार

एका वर्षाचे, सहज सहज आढळले ते आकडे येथे उद्धृत केले आहेत. पानांची किमत हजारीं एक आणा असे. नागावचीं पानें पनवेल, शिरढोण अशा लांबच्या ठिकाणींहि रवाना होत; त्या वेळीं त्यांचा दर हजारीं दोन आणे असे. उदाहरणार्थ, इ. स. १८१८ मे ३१ सु॥ समान आशर मयातैन आलफ, छ २५ रजब या दिवशीं वेलीचीं पांच हजार पानें बापुजी विश्वनाथ आपटे शिरढोणकर यांजकडे लग्नाकरिता नागावांतून रवाना झालीं.[१]

**इतर पिकें** — केळीं, कोनफळ, चिंच, भाजीपाला यांसारखीं कांही पिकें होत होतीं; पण तीं उत्पन्नाची बाब नव्हती.

बागायतींत काम करणें व नारळ, सुपारी, फणस, उंडिणी, केळीं व पानवेल यांचें उत्पन्न काढणें हा नागावकरांचा महत्त्वाचा व्यवसाय होता.

---

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६,

# पावसाळी व हिवाळी पिकें

## शेतीचें क्षेत्र

आण्णाजी दत्तोच्या इ. स. १६६२ च्या मोजणीप्रमाणे नागावची जिरायत जमीन १७१ बिघे १४।। पांड होती. तींत सुमारें ८०।। खंडी शेतसारा म्हणून सरकारला ऐनजिनसी उत्पन्न मिळावयाचें[१] इ. स. १७९८–९९ च्या मोजणीप्रमाणे १८२ बिघे १२ पांड जमीन भातशेतीखाली असावयाची; पण सवाई सूट, ऐन खराबा इत्यादि प्रकारांनी क्षेत्र कमी करतां करतां भातशेतजमीन म्हणून ९४ बिघे १४।।। पांड इतकें क्षेत्र उल्लेखिलें आहे.[२] इ. स. १८३९–४० मध्यें ११७ बिघे १८।।। पांड इतकें भातशेतीचें क्षेत्र म्हणून दाखविण्यांत आलें असून त्याचे अव्वल, दूम, सीम, खराबा, कौली असे प्रकार सांगितले आहेत.[३]

यायोगें नागावचें भातशेतीचें क्षेत्र समजतें. इ. स. १७९५–९६ पासून नागावांत बैलगाडया होत्या. शेतांत खत, माती वाहून नेणें वगैरे कामांसाठी त्यांचा उपयोग होई.[४] इ. स. १८४०–४१ मध्यें २७९ नांगरांनी शेती होत असे; म्हणजे नागावांत सुमारें साडेपांचशें बैल असले पाहिजेत.[५] सवाई सूट जमीन, खराबा जमीन इत्यादि प्रकार असले, तरी तींत शेतें करून भात पिकविण्यास रयतेस प्रत्यवाय नव्हता. त्यामुळे जवळ जवळ सर्व जिरायत जमिनींत भाताचें पीक काढण्याचा प्रयत्न होत असावा; कारण नागावचें भातजमिनीचें क्षेत्र मर्यादित आहे. नागावांत भातजमिनीचें आणखी एक क्षेत्र आंगरेकालांत निर्माण झालें; त्याला 'खार दिवाणखार सरकार शिलोत्र' असें कागदोपत्रीं नांव होतें. यामुळे भातशेतीची चांगलीच वाढ झाली.

**दिवाणखार** — दिवाणखार मूळची खारवट जमीन; आंगऱ्यांनी ती पिकास आणली. ती प्रथम केव्हा बंदिस्त केली, हें उपलब्ध नाही. इ. स. १७९८–९९ मध्यें खारीपैकी ३३ बिघे ११ पांड जमीन भातशेतीखाली होती.[६] इ. स. १८१८–१९ मध्यें मूळ खारीच्या जुन्या कोटयाबाहेर नवीन खारी जमीन बंदिस्त करण्याच्या स्थितीस आलेली पाहतांच आंगऱ्यांनी तीही नौबंदिस्त केली.[७] त्यामुळे खारीचें क्षेत्र आणखी वाढलें. इ. स. १८२६–२७ मध्यें दिवाणखार मोजली, ती ३६८ बिघे १३।।। पांड भरली. पैकी २०४ बिघे ७ पांड जमिनींत भात पेरूं लागले असले, तरी खरी भातशेतीखाली आली अशी जमीन १२७ बिघे २।।। पांड होती व १६४ बिघे ६।।। पांड जमिनीच्या उस्तवारीस प्रारंभ व्हावयाचा होता; ती बंदिस्त केली होती एवढेंच. त्यापैकी ७७ बिघे ४। पांड जमीन खराबा मानण्यांत येत होती.[८] इ. स. १८३४–३५ च्या पाहणींत, दिवाणखारींतील २३६ बिघे ५।।। पांड जमीन भातशेतीखाली असल्याचें निर्देशिलें आहे.[९] म्हणजे, इ. स. १७९८ ते १८३५ या काळांत दिवाणखारीची भातशेतजमीन म्हणून ३३ बिघे ११ पांड वरून २३६ बिघे ५।।। पांड इतकी वाढ झाली आहे.

---

१ उकोरु नं. १७४, पृ. २००, आंदरु नं. ८३, पृ. १७९; आंदरु नं. ६३७, पृ. १५८.
२ आंदरु नं. ६३७, पृ. १३१ आंदरु नं. १३४, पृ. ५७, ५८
३ आंदरु नं. ६३८, पृ. १७६, १७७
४ आंदरु नं. ६३७, पृ. १३०
५ कोंजरु नं. १३७, पृ. २ ते ५, २६, २८
६ आंदरु नं. १३४, पृ. ५२
७ आंदरु नं. ६३७, पृ. १५९
८ आंदरु नं. ६३८, पृ. १७१
९ कोंजरु नं. १३७, पृ. २ ते ५, २६, २८

**दिवाणखारीचा पाटील**— मोठें क्षेत्र निर्माण झाल्यावर तेथे पाटील नेमण्याचें आंगऱ्यांनी ठरविलें. नागावचा जिरायतीचा पाटील बापु महाद वर्तक व कृष्णा हूर पाटील आगरी – खारकर यांनी राघोजी आंगऱ्यांस लिहिलें की नौबंदिस्त खारीच्या बाहेरच्या कोटयाभोवती नवी खारजमीन तयार झाली. आम्हांस तेथील पाटील नेमावें व सनद द्यावी. आंगऱ्यांनी महाजन, वर्तक यांचे अनुमतीने तशी सनद दिली. बापु महाद वर्तक हा 'जिरायत नागाव'चा 'पाटील' आणि बागायतीकडे 'वर्तक' अशा स्वरूपाचा वतनदार दिसतो. आंगऱ्यांनी पाटलांमार्फत नवीन परमुलकी कुळें आणविलीं, त्यांस तगाईबद्दल रोख रुपये व भात महालांतून देवविलें. मग आंगऱ्यांनी पाटलांस कळविलें की या कुळांस तुम्ही जामीन राहावें. पण कुळें अपरिचित असल्यामुळे पाटलांनी जामीनकीचा धोका नाकारला. नंतर आंगऱ्यांनी पोस वर्तक, पीट वर्तक व रघु वर्तक या नागावच्या बागायतीकडील वर्तकांना खारीच्या कुळांची जामीनगत पत्करण्यास सांगितलें. वर्तक जामीन राहिले, पण नवागत कुळांना दिलेली तगाई संपल्यानंतर तीं परागंदा झालीं! सरकारने नव्या पाटलांकडून नजराणा मागितला, तेव्हा त्यांनी नजराणा देववत नाही म्हणून कळविलें. त्यामुळे आंगऱ्यांनी त्यांजकडून पाटीलकी काढून घेतली व पुन्हा बापु वर्तक व कृष्णा हूर पाटील या जिरायती पाटलांना खार जमिनीच्या पाटीलकीची वतनदारी दिली.

सदर पाटिलकीच्या मानपानाचीं कलमें —

(१) पाटलांनी आंगऱ्यांस २३५ रु. नजराणा द्यावा. (२) परमुलखांतून दहा कुळें आणावींत. त्यांस घरटक्का, गादीतंबाखु, दोन वर्षें माफ; नंतर दरकुळास १।।≈ रु. प्रमाणे आकारले जातील. (दोन्ही कर प्रत्येकी वेगळे). (३) त्यांनी फक्त खारीकडे वेठबेगार द्यावी. (४) त्यांस कारसाई, दहीपट्टी, कोंबडें, बकरें, फडफर्मास माफ आहे. (५) दहा कुळांपैकी दोघांस दोन म्हशींचा वनटक्का माफ केला जाईल. (६) खारीची जिरायती संचणी झाली आहे. त्या जमिनीशिवाय जी दर्यागर्क जमीन आहे, तींतून १५ बिघेपर्यंत जमीन बंदिस्त करून पाटलांनी लागवडीस आणावी. जी जमीन लागवडीस येईल, तिचेबद्दल इ. स. १८२२–२३ मध्यें दर विघ्यास १ मण; इ. स. १८२६–२७ पासून दरसाल दर विघ्यास २ मण; इ.स. १८३०–३१ ते १८३३–३४ पर्यंत दरसाल दर बिघ्यास ३ मण; इ. स. १८३४–३५ पासून लागवडीखाली आलेल्या क्षेत्रास दरबिघा ४ मण प्रमाणे आकार पाटलांनी द्यावा.[१]

**दिवाणखारीची जत्रा** — बागायताची जत्रा करण्याचा शिरस्ता आंगरेकालांत दिसत नाही. पण खारीची जत्रा करण्याचा शिरस्ता होता. दिवाणखारीची जत्रा करीत असत. इ. स. १७९९–१८०० या वर्षी जत्रेस ३। रु. खर्च झाला.[२] इ. स. १८१८–१९ व १८१९–२० या वर्षीचा तपशील असा: (१) चैत्री पौर्णिमेस दास्तान मांडवी पेठ श्रीबागपैकी तांदूळ खरेदी सवातिसेरी मापें .।। पायली; (२) भंडाऱ्याकडून कलाली दारू वजन अर्धामण; (३) ०≈चें तेल, ०≈।। चे नारळ एकूण १०; (४) डुक्कर रु. १; (५) शेंदूर व चुना ०– चा; (६) बारा कोंबडीं; इतक्या साहित्यानिशीं दिवाणखारीच्या जत्रा केल्या. रोख खर्च दरवेळीं १।≈।।. झाला.[३] इ..स. १८२२–२३ मध्ये दिवाणखारीच्या चैत्रीच्या यात्रेस सरा वजन अर्धामण व कोंबडीं पीस १२ लागलें. खर्च दरसालप्रमाणे महालांतून झाला.[४] इ. स. १८४०–४१ मध्ये जत्रा झाली, तिला ३।।– रु. खर्च झाला.[५]

---

१ आंदरु नं. ६३७, पृ. १५९ ते १६१
२ आंदरु नं. १३५, पृ. ४९
३ आंदरु नं. ४७, पृ. ७४
४ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७
५ कोंजरु नं. १३७, पृ. ४०

**दिवाणखार दुरुस्ती** — दिवाणखार सागरसन्निध असल्याने समुद्राच्या भरती-ओहोटीचा, सोसाट्याच्या वाऱ्याचा, वादळांचा परिणाम होई व दुरुस्ती करण्याचा प्रसंग येई. इ. स. १८११ मे ३० ते जून १८ ची एक नोंद अशी : दिवाणखार सरकार शिलोत्र येथील काम सरकारांतून केलें; खर्च ४८।. रु. झाला. वेठचे असामी इस्तकबील छ ७ जावल तागायत २६ जावलपर्यंत होते. गांवगन्नापैकी पांडुरंग बाजी,दाप वर्तक, कान वर्तक कारभारी व शंकर सावंत दिमत फकीरजी राणे व गोदजी भोगला कामावर होते. एकूण हजर असामी ७८६ होते.[1] इ. स. १८१९–२० मध्ये बंदिस्तीकरिता १० रु. खर्च झाला.[2] इ. स. १८४०–४१ मध्ये बांधास खांडी पडल्या. त्या बुजविण्यासाठी भर घातली; खर्च ४००= रु. झाला. तसेंच, बांधास गुरूळ पडला; तो काढून टाकण्यासाठी पोस्त खर्च ।। रु. झाला.[3]

**इतर खाऱ्या जमिनी** — (१) इ. स. १७०० च्या सुमारास नागाव येथे कोठारभाट म्हणून पडजमीन होती. ती चौलचे कृष्णाजी सुडक ठाकूर अधिकारी यांनी खरेदी करून तींत लावणी केली व तिला अदकारवाडी व अदकारखार असें नांव दिलें[4] इ. स. १८०४–०५ मध्ये नागावचे नारायणभट फडके यांनी अदकारखार पुन्हा बंदिस्त केली. (२) इ. स. १८०४–०५ मध्ये हाटाळघावर सोनखार नांवाची एक नवी खार बंदिस्त करण्यांत आली.[5]

**खारजमिनींचा त्रोटक इतिहास** — आंगरेकालांत खारजमिनी लागवडीस आणण्याचा जो एक दीर्घ प्रयत्न झाला, तो नागावच्या खारींच्या निमित्ताने येथे थोडक्यांत सांगण्यासारखा आहे. आवर्तांत जसे ते तेच आकडे येतात तसे देशाच्या जीवनांत तेच तेच प्रश्न उभे राहूं लागतात. कोंकणच्या जीवनांतील खाऱ्या जमिनींचा प्रश्न तशाच स्वरूपाचा असल्यामुळे, त्याबाबत आंगरेकालांत जो विचार झाला, तो समजला तर त्या पार्श्वभूमीवरून आजचाही प्रश्न कदाचित् सुटूं शकेल. शिवाय, एका नागावकरानेच तो प्रश्न सोडविण्याचा भगीरथ प्रयत्न केला असल्याने, नागावच्या इतिहासांत त्यास स्थान देणें उचित होईल.

नागावच्या कर्तबगार व्यक्तींत साबाजी तुकाजी चिटणीस व त्याचा भाऊ कृष्णाजी तुकाजी अविस्मरणीय आहेत. साबाजी प्रभूचें नांव आंगऱ्यांच्या इतिहासांत इ. स. १७०७ पासून इ. स. १७७१ इतका दीर्घकाल येतें. इ. स. १७७१, ऑगस्ट ४ रोजीं त्याचें पुण्यास देहावसान झालें. त्याने कान्होजी, सेखोजी, मानाजी व राघोजी या चार सरखेलांची कारकीर्द पाहिली, अनुभविली व चालविली. इ. स. १७३२ त तो सेखोजी आंगऱ्यांचा दिवाण होता. कान्होजींच्या कारकीर्दींत त्याने अनेक महत्वाचीं कामें केलीं, मुत्सद्दी म्हणून त्याचा अनेक ठिकाणीं गौरव केलेला आढळतो. इ. स. १७६८ मध्ये त्याचें व राघोजी आंगऱ्यांचें बिनसल्यामुळे त्याने कारभार सोडला व तो पुण्यास येऊन राहिला.[6]

(१) या थोर पुरुषाचे कोंकणावर महान् उपकार आहेत.इ. स. १७३९–४० मध्ये साबाजीने तपे श्रीगाव येथे दर्यागर्क, जंगलगर्क आणि विन्हेगर्क असलेली खांचली नांवाची खार बंदिस्त केली. गर्क म्हणजे बुडालेली. जेथे पूर्वी खारी जमीन होती, तेथे पाणी येऊन खाजण माजलें होतें व खाऱ्या जमिनींत उत्पन्न होणारीं जंगलें वाढलीं होतीं. या बेवारशी जागेस भातजमीन बनविण्याचे दृष्टीने त्याने बंदिस्ती केली व उत्पन्न काढण्यास प्रारंभ केला.[7]

---

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६

२ आंदरु नं. २४६, पृ. १००

३ कोंजरु नं. १३७, पृ. ४०

४ आंपले ५

५ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६

६ आंअ. ६१, १८५, २४७, ३०८, ३५२; आंपले ९

७ आंपले ७

(२) चौलच्या सुम्यांत पूर्वी मौजे चाहिरें ऊर्फ वहागाव नांवाचें बंदर खाडीच्या काठीं होतें. तें ओहरून तेथे खाजण तयार झालें, असें पाहून साबाजी व कृष्णाजी यांनी १५ नोव्हेंबर १७५५ रोजीं गावठाणाचे पूर्वेस खार बांधली. मानाजी आंगरे यांनी खार बांधण्यास प्रोत्साहन दिलें. खारीच्या बाहेरील बांध (म्हणजे कोटा) चांगला मजबूत, चुनेगच्ची बांधला होता; पण पावसाळ्यांत पाण्याच्या वेगानें बांध दोन वेळा फुटला व साबाजीचे दोन प्रयत्न व्यर्थ गेले. तेव्हा साबाजीने, पावसाच्या पाण्याचा नेट नाहीसा करण्याकरिता, गावचे पूर्वेकडे असलेले खडक सुरुंग लावून फोडले; जोरदार पावसाळी प्रवाहास नवीन मार्ग करून दिला व खार तिसऱ्यांदा बांधून काढली. या कामीं त्यास दहा हजार रुपयांहून जास्त खर्च आला. त्याच्या या दीर्घ प्रयत्नांकडे अनेकांचें लक्ष होतें व खार पक्की झाल्यावर त्याला फार मोठी प्रसिद्धि मिळाली. (३) जदीद खार म्हणजे नवी खार व (४) नऊदर वगैरे आणखी नवीं स्थलें साबाजीच्या प्रयत्नांतून निर्माण झालीं. अनेक बेवारशी, बेरकमी म्हणजे ज्यांतून उत्पन्न होणार नाही अशी बाह्यत: परिस्थिति वाटेल अशा जागीं साबाजीने नवें नवें शिलोत्र निर्माण केलें व तें दस्तुरांत आणलें.[१]

साबाजीच्या प्रयत्नांस साथ देण्याचें कार्य अनेकांनी केल्यामुळे, अष्टागरांत साबाजीच्या दीर्घ आयुष्यांतच पुढील खारजमिनी तयार झाल्या. (१) खार खानपूर (इ. स. १७१८–१९); (२) खार मेढेखार (१७२१); (३) मांडवें येथील खार (१७५५ ऑगस्ट); (४) चावरें येथील खार (१७५९); (५) चेऊल येथील खार (१७६०) व (६) चिंचोटी येथील खार दुधाळें (१७६४–६५). सारांश, साबाजी तुकाजीने शेतीबाबतचें एक नवें पर्व अष्टागरांत सुरू केलें. नंतरच्या काळांतही कितीतरी खारी आंगरे राजवटींत बांधल्या गेल्या. त्याचीं उदाहरणें 'आंगरे-कालीन अष्टागर' मध्ये भरपूर सांपडतील. खारी बांधण्याची ही प्रेरणा साबाजीची आहे. या कामांत त्याचा भाऊ कृष्णाजी याचाही कांही भाग आहे. खारींमुळे आंगरे राजवटींत भाताचें उत्पन्न भरपूर वाढलें व लोकांचें जीवन सुखी होण्यास मदत झाली. खारजमिनीचा प्रश्न हा कोंकणच्या जीवनमरणाचा प्रश्न पूर्वी होता, पण तो तीव्र नव्हता; आज तो तीव्रतम झाला आहे. अशा काळांत साबाजीचें स्मरण होणें व त्याने दाखविलेल्या बिनतोड, विधायक मार्गाची आठवण होणें स्वाभाविक आहे.

**शिलोत्री मण** — इ. स. १८४१ पासून कंपनी सरकारचा कारभार सुरू झाला. कलेक्टर्सनी मराठे-आंगरे राजवटीचीं वैशिष्टयें मोडून नवीन घडी आणि नवा जमाना सुरू केला. आंगरे प्रदेशांतील ऐनजिनसी महसूल, घरटक्का, गादीतंबाखु, वनटक्का इत्यादि प्रकार नष्ट झाले; मोजणीची पद्धति बदलली. पण कांही प्रघात विचारपूर्वक चालू ठेवणें कंपनीस भाग पडलें. अलेक्झांडर गौ हा कुलाब्याचा कलेक्टर म्हणून काम करीत असतांना इ. स. १८५४ मध्ये कंपनी सरकारास खारजमिनींचा विचार करण्यास व कांही निर्णयास येण्यास सवड झाली. खारींची बांधबंदिस्ती कायम राहून उत्पन्नांत घट यावयास नको असेल, तर खर्चाची तजवीज म्हणून, कुळांकडून येणाऱ्या दरखंडी मक्त्यावर एक मण–शिलोत्री मण म्हणून खारमालकास आंगरेप्रदेशांत जास्त मिळे; तो त्यास मिळणें इष्ट आहे, असें कंपनी सरकारचें ठाम मत झालें. कंपनी सरकारने शिलोत्री मण आकारण्याची पद्धति कायम ठेविली.[२]

शिलोत्री मणाबाबत थोडें स्पष्टीकरण देणें जरूर आहे. गोडधा जमिनी समुद्राच्या भरती-ओहोटीच्या दैनंदिन घडामोडींपासून दूर असतात. त्या जमिनींत पावसाच्या पाण्याने जी कांही फूटतूट होईल तेवढीच. पण खारजमिनी खाडीकाठीं, समुद्रालगत असल्याने, भरतीचें उधाण पाणी

१ आंपले ६; आंअ. १८५ १ कुर्गे पृ. १६७

खारींच्या बांधांस जोराचा आघात देऊन बांध फोडण्याचा धोका नेहमीच असतो. हा धोका चैत्र-वैशाखांतील मोठ्या उधाणांच्या वेळेस मोठा असतो व बांधबंदिस्ती ढासळूं नये, म्हणून खारमालकांस जागरूक रहावें लागतें. पाण्याच्या जोराने एखाद्या जागीं बांध कमजोर झाल्यास लगेच दुरुस्ती-फेरबांधणी करावी लागते; नाहीतर खारीची वाट लागली म्हणून समजावें ! कांही वेळा हें काम फार मोठ्या खर्चाचें व मेहनतीचें असतें. हा प्रकार दर वर्षीचाच होय.

मोठा खर्च करण्याचें सामर्थ्य खारींत राबणाऱ्या कुळांस कोठून असणार ? तेव्हा, खारीच्या धन्याने बाहेरच्या बंदिस्तीची जबाबदारी घ्यावी व त्यासाठी कुळाने दरखंडी मक्त्यामागे एक जादा मण भात–शिलोत्री मण–घालावें, अशी पूर्वापार पद्धति होती. दरखंडीमागें एक मणप्रमाणे जें जास्त भात मालकाकडे जमा होई, त्यांतून बाहेरच्या कोटाच्या म्हणजे मजबूत बांधाच्या, तटाच्या बंदिस्तीचा खर्च व्हावा, अशी योजना आंगरेकालांत होती. इंग्रज सरकारने ती कायम ठेविली.

**ब्रिटिश अमदानींतील खारी** — इ. स. १८६२ मध्ये सरकारास असें आढळून आलें की खाड्यांच्या काठच्या नवीन खाजणांची भातजमीन बनावी, म्हणून विशेष सवलती द्यावयास पाहिजेत; म्हणून सरकारने जाहीर केलें की जो कोणी बांधबंदिस्ती करील व नवीन खारजमिनी पिकास आणील, त्यास पहिलीं दहा वर्षें माफी देण्यांत येईल. पुढील वीस वर्षेपर्यंत एकरीं चार आणे महसूल घेण्यांत येईल. याच प्रकारास पूर्वी 'इस्तावा' म्हणत. तीस वर्षांनंतर पाहणी करून महसूल ठरविला जाईल. सरकारच्या धोरणाचा योग्य परिणाम झाला आणि इ. स. १८७३ पर्यंतच्या अकरा वर्षांत, दीडशे एकर खारी भातजमीन नव्याने तयार झाली.[१] या खारी नागावच्या पूर्वेस निर्माण झाल्या व नागावचें पूर्वीचें सलग क्षेत्र विस्तारलें.

**नक्त महसूल** — कुलाब्याचा पहिला कलेक्टर डेव्हिस याने नक्त रकमेंत सारा वसूल करण्याची पद्धति रूढ केली व ऐनजिनसी वसूल घेण्याची पद्धति मोडली. दर वर्षी भाताचे जे दर असतील, त्या प्रमाणांत सरकार साऱ्याची आकारणी करील, असें त्याने जाहीर केलें.[२] सबंध पश्चिम किनाऱ्यावरच काय, पण दक्षिण भारतांत इंग्रजांस शत्रु राहिला नव्हता; तेव्हा सैन्य कमी करणें इंग्रजांस शक्य होतें. आता ऐनजिनसी तनख्याची भानगडच इंग्रजांनी ठेवली नसल्यामुळे सरकारी गोदामें, कोठारें, भात इत्यादींची रखवालीची गरजच नव्हती. आता कारभार रोख पैशांत सुरू झाला होता !

**अतिवृष्टि आणि अवर्षण** — शेतीचा मोठा शत्रु अतिवर्षाव, अवेळीं पर्जन्य आणि अवर्षण हा होय. शेतीबद्दल माहिती सांगण्यापूर्वी, आंगरेकालांतील पर्जन्याबाबतचें टाचण करूं या.

(१) इ. स. १६८२ ते ८४ व १६८८–८९ या वर्षी अष्टागरांत दुष्काळ पडला व विलक्षण महर्घता झाली.[३] हा दुष्काळ नैसर्गिक व राजकीय परिस्थितीमुळे पडला. अष्टागरांत औरंगजेबाच्या फौजेचें आगमन व शिद्दीच्या सततच्या स्वाऱ्या, ही राजकीय परिस्थिति होय.

(२) २६ जून १७३१–पर्जन्य नाही, म्हणून सेखोजी आंगरे सरखेल यांनी चौल येथील रामेश्वर मंदिरांतील पर्जन्यकुंड उघडलें. होमहवन झाल्यानंतर पर्जन्यवृष्टि झाली.[४] म्हणजे मृगाचा पाऊस पडला नाही; पण आर्द्रा नक्षत्रापासून पावसाळा सुरू झाला; लावणीचा व पिकाचा हंगाम लांबला.

(३) जून १७६६ — अष्टागरांत रोहिणींची अगोट झाली; पण पावसास जोर नव्हता.

१ कुर्गे पृ. १६८.
२ कुर्गे पृ. १९०.
३ आंअ. ४, ७, ९, १०.
४ आंअ. ५५ इति. मं. १८३५, पृ. १६५.

लावणीचे वेळीं पर्जन्य अल्प पडत गेला. जोरदार पाऊस पडावा, म्हणून देवळांतून जप, प्रार्थनांस प्रारंभ झाला.[१]

(४) इ. १७६८ — पर्जन्यसुवृष्टि झाली नाही.[२]

(५) १० ऑक्टोबर १७७० — ज्येष्ठ महिन्यापासून पाऊस उत्तम पडला; पण उत्तरा व हस्त हीं नक्षत्रें पडलीं नाहीत.[३] याचा अर्थ उशीरा होणारीं भातें — पटणी, वरंगल, आंबेमोहोर इत्यादींचें पीक फारच कमी आलें व दुष्काळाचें स्वरूप आलें.

(६) इ. स. १७७१ जून १४ नंतर लावण्या अर्ध्या होईपर्यंत पाऊस पडला; पुढे पडला नाही.[४]

(७) १७ ऑगस्ट १७७९ — मघा नक्षत्र कोरडें गेलें. प्रांतांत आकांत झाला.[५]

(८) १५ जून १७८२ नंतर–मृग कोरडें गेलें. पुढील नक्षत्रें कांही पडली, कांही न पडलीं. पर्जन्यमान अत्यल्प होतें.[६]

(९) ८ नोव्हेंबर १७८३ — कार्तिकी पौर्णिमेस पाऊस फार पडला. उडव्या व लाण्या भिजल्या. शेतांत पाणी तुंबलें. नद्या, ओढे वाहूं लागले. वादळ झालें.[७] म्हणजे, पीक तयार झालें; पण सगळें हातीं लागलें नाही. जें हातीं लागलें, तें भिजकें झालें.

(१०) १६ व २१ जुलै १७९० — पाऊस अत्यल्प पडत होता. नक्षत्रें कोरडीं चाललीं व पर्जन्याकरिता अनुष्ठानें सुरू झालीं.[८]

(११) इ. १७९२ जून–जुलै–रोहिणी नक्षत्र शेवटचे २।३ दिवस पडलें. मृग फक्त शेवटच्या दिवशीं रात्रीं पडलें. आर्द्रा ५।७ दिवस पडून अगोठ झाली.[९] लावणीसाठी रोप कमी पडलें असावें.

(१२) इ. स. १८०३ — अवर्षणामुळे दुष्काळ पडला. लोक उपासमारीने मरूं लागले. अर्भकें विकलीं गेलीं. भाताचा भाव ४ शें रुपये खंडीपर्यंत चढला. रुपयास १ शेर तांदूळ झाले. इंग्रजांनी बंगालचा तांदूळ आणल्याने दर उतरूं लागला. सर्व प्रकारचे कर रद्द करण्यांत आले.[१०] पण ही स्थिति इंग्रजी सत्तेखालील प्रदेशांतील होय; नागावची नव्हे.

(१३) जून १८०५ — वृष्टि चांगली होऊन पिकें उत्तम आलीं.[११]

(१४) जुलै १८०८ — आषाढांत कांही दिवस पर्जन्य पडला नाही.[१२]

(१५) इ. स. १८०९–१० — आशर मयातैन आलफ – कृत्तिकांची अगोट झाली; त्यामुळे शेतांतील राब भिजले. मघा नक्षत्र पडलें नाही. यामुळे शेतांत वीट पडला.[१३]

(१६) १९ ऑगस्ट १८१७ — श्रावणांत पाऊस पडला नाही.[१४] त्यामुळे धान्य इतकें कमी पिकलें की प्रांतास दुष्काळाचें स्वरूप आलें.[१५]

(१७) इ. १८१९ – २० — या वर्षी सुकवें पडलें.[१६]

(१८) ५ जून १८२४ — ज्येष्ठ शु।। ९ रोजीं मृग निघालें. त्यांचा पाऊस शेवटचे २।३

१ आंअ. २९६.
२ आंअ. ३०९.
३ आंअ. ३३६.
४ आंअ. ३५०.
५ आंअ. ४३४.
६ आंअ. ४५३.
७ आंअ. ४७१.
८ आंअ. ५२०.
९ आंअ. ५४९.
१० कुर्णे पृ. १००.
११ आंअ. ६७७.
१२ आंअ. ६८७
१३ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६.
१४ आंअ. ७०६.
१५ कुर्णे पृ. १००
१६ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७

दिवस पडला. पेरण्या झाल्या व पाऊस गेला. देवालयांतून अनुष्ठानें सुरू झाली. आर्द्रा, पुनर्वसु व पुष्य हींही नक्षत्रें कोरडीं गेलीं. नागावचे ५० ब्राह्मण चौलच्या रामेश्वरमंदिरांत अनुष्ठानास बसले होते. भाद्रपदांत आश्लेषा नक्षत्र पडलें व लावण्या झाल्या. पिकें थोडीं आलीं. मार्गशीर्षांत भाताचा दर ४० रु. खंडी झाला व कडाडूं लागला.[१]

(१९) इ. स. १८२८–२९ — या वर्षी सुकवें पडलें. काशीनाथ अनंत सुकव्याच्या पाहणीवर नेमण्यांत आले.[२]

(२०) जुलै १८३८ — मृगाचा पाऊस फार पडून राब गेले. शेतांची लावणी होत नाही, अशी परिस्थिति उत्पन्न झाली. पुढे तेच राब होऊन लावणी झाली. लावणीचे वेळीं पाऊस थोडया प्रमाणांत पडत होता. आश्लेषा, मघा, पूर्वा हीं नक्षत्रें कोरडीं गेलीं. उत्तरांचा पाऊस फक्त एक दिवस पडला. इतकें असून पीक सवाई आलें. सर्वांस अपूर्व वाटलें.[३]

(२१) जून-जुलै १८३९ – कृत्तिकांची अगोट झाली; पेरण्या झाल्या. रोहिणी नक्षत्र चांगलें पडलें. मृगाचा पाऊस फक्त एक दिवस पडला. आर्द्रा व पुनर्वसू नक्षत्रें मुळींच पडलीं नाहींत. पुष्य नक्षत्रापासून पुढील नक्षत्रें चांगलीं पडलीं; पण दरम्यान राब मेले.[४]

अष्टागराच्या लहरी पावसाचें वर्णन वर दिलें; त्यावरून एक गोष्ट उघडच होते की आंग्र्यांच्या राजवटींतील भाताचें ऐनजिनसी उत्पन्न दरसाल बदलतें असणार.

शेतांत पीक उभें असतांना सरकार ऐनजिनसी वसूल किती होईल, याची पाहणी करीत असे; तिला 'अजमास पाहणी' अगर 'कलित पाहणी' असें म्हणत. पिकें तयार होण्याच्या सुमारास ही पाहणी सरकारी अंमलदार करीत.[५] भाताच्या उत्पन्नाचा अंदाज बांधीत; तेव्हा गतवर्षी जेवढें वसूल झालें असेल, तो आकडा आधार मानण्याची पद्धति होती.[६]

सारा म्हणून भाताची वसुली करीत असतांना, आंगरे राजवटींत दर मणास एक शेर भात जास्त वसूल करीत. ही पद्धति इ. स. १८२० पर्यंत चालू होती. जास्त भात आकारण्याचें कारण असें की भात जों जों जुनें होऊं लागतें, तों तों तें पूर्ण वाळून व चोळूनघासून, त्यांत थोडी तूट येते. पण एक शेर भात वाढीव घेत गेल्याने, सरकारी दास्तानांत अंतीं थोडा वाढावा येतो, असें आढळून येई. १ नोव्हेंबर १८२१ या दिवशीं, सरकारआज्ञेने दिवाण बिवलकर यांनी हा वाढावा अर्ध्या शेरावर आणला व तशी सनद प्रजेस छ ५ सफर रोजीं दिली. माप फऱ्याने घेत. फऱ्याच्या तीनही पट्टया स्पष्ट दिसतील अशा तऱ्हेने फरा कापावा, अशा सूचना दिवाणांनी जाहीर केल्या. तरीही अगदी थोडा वाढावा येतच राहिला, महालाच्या हिशेबांत तो वेगळा दाखवीत असत.[७]

कान्होजी आंगऱ्यांच्या कारकीर्दीपासून इ. स. १७८८ पर्यंत, अष्टागरांत ३॥ शेरांची पायली असें माप होतें. या वर्षी तें सवातीन शेरांची पायली असें झालें. म्हणजे, दर खंडीस सवा मण भात वजा करीत असत.[८]

**भाताचें उत्पन्न — सरकारचें** — इ. स. १७९८–९९ मध्ये आंगरे घराण्यांत दुसरी यादवी होऊन गेली. तिचा परिणाम ऐनजिनसी उत्पन्नावर झालेला दिसतो. नवेदर बागमळा येथे शेती नव्हती. तेव्हां, नागाव व खार दिवाणखार यांतील भात हेंच नागावचें मख्य जिरायती उत्पन्न होय.

---

१ आंअ. ७२९, ७३१.
२ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७
३ आंअ. ७६७.
४ आंअ. ७७३.
५ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६; कुर्णे पृ.१९२
६ आंदरु नं. ३९६, पृ. १८७
७ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७
८ आंअ. ५००

| इ. स. | | भात कैली खंडी | भात कैली खंडी | भात कैली खंडी |
|---|---|---|---|---|
| १७९८–९९ | | एकूण | चोखें | रातें |
| | नागाव– | ५६। ४।२।। | ५६।१।२।। | ०३ |
| | दिवाणखार | १३०३।।.।।. | १३०१।।१।। | ०१।।।२ |
| | | ६९।।३ | ६९।०२।००१ | ०४।।।२ |

[ आंदरु नं. १३४, पृ. ५२, ५६ ].

नागावच्या ५६।४।२।। खंडी भाताची वांटणी पुढीलप्रमाणे आहे :—

| खंडी | मण | पायली | |
|---|---|---|---|
| ४८ | १८ | ४। | बरहुकूम पाहणी |
| ० | २ | ६ | इस्तावा |
| ७ | ८ | १। | आकार दरखंडीस ३ मणांप्रमाणे बाबती. |
| ० | .।।. | ० | इस्तावा दर २।। मणाप्रमाणे |
| ५६ | ९। | २।। | |

आंगरेप्रदेशांत दर शेंकडा १५ खंडीप्रमाणे 'बाबती'चा आकार वसूल करीत.[1] या वर्षी ९४।।४।।। बिघे जमिनींतून व दिवाणखारीच्या ३३०२। बिघे जमिनींतून, फक्त, भात पिकलें. वर ६९।।३ खंडींचा जो आकडा दिला, तो पाहणीबरहुकूम आहे; प्रत्यक्ष वसुली दस्त कैली ६५।।०। खंडी झाली. हें उत्पन्न अत्यंत कमी आल्यानें, सरकारनें दर खंडीस ३ रु. प्रमाणे १९७ रु. जास्त आकार 'खराबा पट्टी' या नांवाखाली वसूल केला.[2]

इ. स. १८०५–०६ मधील नागावचें उत्पन्न.

| खंडी | मण | पायली | |
|---|---|---|---|
| ५६ | १२ | ७।। | मक्ता |
| ० | १३ | ७ | फूट मक्ता |
| २ | २ | ९।। | खेरीज मक्ता |
| ५९ | ८ | .।. | एकूण उत्पन्न भात सरकारचें [आंदरु नं. ६३७, पृ. १३५] |

यांत खार दिवाणखारीचें उत्पन्न दिलें नाही. या वर्षी पिकें चांगलीं असल्याचीं नोंद आंगरेकालीन अष्टागरमध्ये दिली आहे.

इ. स. १८०६–०७ चें सरकारी उत्पन्न

| खंडी | मण | पायली | |
|---|---|---|---|
| ५६ | १२ | ७।। | गतवर्षाप्रमाणे मक्ता पुरला तो |
| ० | १३ | ७ | फूट मक्ता |
| २ | २ | ९।। | खेरीज मक्ता |
| ८ | १८ | १० | बाबती |
| १ | ८ | १० | मुशाहिरा |
| ४ | १ | ७। | खेरीज मुशाहिरा |
| ७३ | १८ | ३।। | एकूण उत्पन्न [ आंदरु नं. ६३७, पृ. १३५ ]. |

१ आंदरु नं. १३४, पृ. ५८, ५९ २ आंदरु नं. १३४, पृ. ६२

मुशाहिरा व खेरीज मुशाहिरा या बाबतींत वतनदारांचें भात येतें. सरकारने तें वसूल करावयाचें व वतनदारांस द्यावयाचें असे. अर्थात् तें सरकारचें नसे. पण, १८०५ पेक्षा परिस्थिति सुधारली असें दिसतें. अजून सरकारच्या सरासरी उत्पन्नापर्यंत परिस्थिति आली असें दिसत नाही.

इ. स. १८०८–०९ मध्ये सरकारची खाऱ्या भाताची वसुली १५।। मण दिग्दर्शित झाली आहे.[१]

इ. स. १८०९–१० :

| खंडी | मण | पायली | |
|---|---|---|---|
| १२७ | १५ | २ | गोडें भात |
| ० | ० | ९ | रातें |
| १२७ | १५ | ११ | एकूण सरकारचें उत्पन्न |

[आंदरु नं. १६६, पृ. १८६, १८७].

इ. स. १८११–१२ चें भात ऐन जमा

| खंडी | मण | पायली |
|---|---|---|
| ११५ | ६ | ९।।। |

इ. स. १८१७–१८ :

| खंडी | मण | पायली | |
|---|---|---|---|
| ९७ | १० | ४।। | गोडें |
| — | ५ | ९। | रातें |
| ९७ | १६ | १।।। | |
| ३ | ३ | ७। | बाबती, मुशाहिरा इत्यादि |
| १०० | १९ | ९ | एकूण उत्पन्न [म. ना. अप्रपेदरु नं. ६३७] |

इ. स. १८१९–२०

| खंडी | मण | पायली | |
|---|---|---|---|
| १४४ | ११ | ।।. | भात गोडें |
| १ | ५ | ० | भात खारें |
| २ | १९ | ७ | परभारें कुलाब्यास जमा |
| १४८ | १५ | ७।। | सरकारी भात जमा [आंदरु नं. २४९, पृ. ११०] |
| १५ | ५ | १।। | मुशाहिरा, बाबती इत्यादि. |
| १६४ | ० | ९ | एकूण जमा |

[म. ना. अप्रपेदरु नं. ६३७]

इ. स. १८२२–२३

| जमा भात सरकारी | | | जमीन लागवडीखाली | | |
|---|---|---|---|---|---|
| खंडी | मण | पायली | बिघे | पांड | |
| ५२ | १३ | १०।। | १०० | ३।। | रकमी जमीन |
| ५ | ९ | २।।। | १५ | १४। | कौली जमीन |
| ० | ९ | २ | ० | १९ | चढ जमीन. |
| ५८ | १२ | ३। | ११६ | १६।।। | |

[आंदरु नं. ६३८, पृ. १७०]

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७

खंडी मण पायली

या वर्षी खारें भात (शिलोत्र) ५ — १ — ३। सरकारांत जमा झालें.

[म. ना. अप्रपेदप्त नं. ६३६, ६३७]

इ. स. १८२८–२९ :

| खंडी मण पायली | |
|---|---|
| १३६—१५—.२। | इतकें गोडें भात पहाणीप्रमाणें यावयाचें |
| ४—११— ९। | इतकें भात पाहणीपेक्षा कमी आलें |
| १३२ — ३ — ५ | इतकें प्रत्यक्ष वसूल झालें |
| २ — ४ — ११ | इतकें खारें भात यावयाचें; पण आलें नाही. |

[आंदप्त नं. ३९६, पृ. १८७]

इ. स. १८२७ मध्ये नागाव व दिवाणखार यांतील खेरीज मक्त्याच्या जमिनींची पाहणी व संचणी झाली व त्यांचा आकार पुढीलप्रमाणे ठरला.

| | अज भात | चोखें | रातें |
|---|---|---|---|
| महाल नागाव | ५८।।।२। | ५८।।।२। | ० |
| दिवाणखार | ३०।२८१ | २९।३।।।१ | .।।।३। |
| | ३५।३८१ | ३४।४।।।.।. | .।।।३।. |

[आंदप्त नं. ६३८, पृ. १७०]

इ. स. १८२९–३० मध्ये नागावचें उत्पन्न पुढीलप्रमाणे

| खंडी मण पायली | |
|---|---|
| १४९ — १३ — २।। | गोडें भात |
| — — १२ — ७ | खारें भात |
| १५० — ५ — ९।। | एकूण भात |

[आंदप्त नं. ३८८, पृ. १९७]

पैकी सरकारचा मक्ता

| | |
|---|---|
| ८७ — ० — ४। | भात गोडें |
| १ — १० — ६ | भात खारें |
| ८८ — १० — १०। | एकूण मक्ता. |

[आंदप्त नं. ६३८, पृ. १६९]

इ. स. १८३९–४० मध्ये महालांत एकूण १२० खंडी – १ मण – ७। पा. भात पिकलें. पैकी दस्त ठरला होता तो—

| | |
|---|---|
| ६२ — १८ — १।।। | गोडें भात |
| ० — १० — ४।। | खारें |
| ६३ — ८ — ६। | एकूण दस्त |

पैकीं ६१ खंडी १५ मण २। पायली भात मक्ता म्हणून वसूल झालें. [आंदप्त नं. ६३८, पृ. १७४, १७७]

| इ. स. १८४०–४१ मध्ये – खंडी | मण | पायली | |
|---|---|---|---|
| ९० — | ० — | १॥। | गोडें भात |
| १ — | ४ — | ० | खारें |
| ९१ — | ४ — | १॥। | एकूण भात |

हें नागावचें उत्पन्न होय.[१]

**दुसरें पीक** — भात हें मुख्य पीक होतें. कांहीं जागांतून हिवाळी पीक काढण्यास प्रारंभ झाला होता. इ. स. १७९७–९८ पासून कांहीं जमिनी दुपिकी झालेल्या दिसतात. सरकार अशा पिकांस उत्तेजन देण्यासाठी दर बिघ्यास १ रु. 'बाबती' म्हणून घेण्याचा ठराव करीत असे.[२] इ. स. १८०८–०९ मध्ये तागाचें पीक काढण्यांत आलें; त्यावर सरकारला ११॥ रु. कर मिळाला.[३] इ. स. १८०९–१० मध्ये सरकारला ३॥। मण वालांचें उत्पन्न झालें.[४]

वरकस जागेंत उडीद पेरीत; असा उल्लेख इ. स. १७९८–९९ पासून आढळतो.[५] या वर्षी वरकशीचें उत्पन्न ४६।.॥. रु. सरकारला मिळालें. दुसरें पीक थोडें निघत असलें, तरी तें अनेक वर्षें काढलें गेलें आहे.

**वस्तूंचे दरदाम** — प्रमुख व्यवसाय भात पिकविणें हा होता. त्याचे अनेक वर्षांचे दर पुढीलप्रमाणें :—

| इ. स. | चोखें भात खंडीस रुपये | रातें खंडीस रुपये | आधार |
|---|---|---|---|
| १७६२ | १० | ८ | आंअ. २४२ |
| १७६६ मार्च ते मे | १२ | — | आंअ. २९१, २९४ |
| जून | १३ | — | आंअ. २९५ |
| १७८३ मार्च | २५ | — | आंअ. ४६१ |
| मे | ३७ | — | आंअ. ४६२ |
| सप्टेंबर | ४० | — | आंअ. ४६८ |
| १७९८–९९ | ६ | ५ | आंदरु नं. १३४, पृ. ५० ते ५४ |
| १७९९–१८०० | १६ | — | आंदरु नं. १३५, पृ. ४६ |
| १८०४ जून | ८० | — | आंअ. ६७४ |
| १८१८ | ६ | ५ | म. ना. अप्रपेदरु नं. ६३६ |
| १८१९–२० | २० | — | आंदरु नं. २५२, पृ. ४५ |
| वैशाख | ३० | — | आंदरु नं. २४४, पृ. ८९ ते ९४ |
| नंतर | ३८।. | — | आंदरु नं. ४७, पृ. ७१ |
| १८२९–३० | २० | — | आंदरु नं. ३८४, पृ. १९४ |
| १८४०–४१ | १३ | ११ | कोंजरु नं. १३७, पृ. २८, ३१, ४० |
| १८४१ मे | १२ | — | आंअ. ७८१ |
| सप्टेंबर | १५ | — | आंअ. ७८१ |
| १८४२ | १४॥ | — | आंअ. ७८२ |

१ कोंजरु नं. १३७, पृ. २८
२ आंदरु नं. १३४, पृ. ६५
३ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६, ६३७
४ आंदरु नं. १६६, पृ. १८६, १८७
५ आंदरु नं. १३४, पृ. ५९; आंदरु नं. ६३७, पृ. १३३

**मीठ** — इतर वस्तूंचे दरदाम येथेच देत आहोंत. इ. स. १७७५ मध्ये मिठाचा दर १७॥ रु. खंडी होता. खंडीच्या १४ गोण्या भरत व दर गोणीस सव्वा रुपया पडे.[१] इ. स. १८१९–२० मध्ये चार आणे मण मीठ मिळे.[२] अव्वल इंग्रजी अमदानींत कॅप्टन हेव्हिसने मिठाच्या गोणीची किंमत सव्वा रुपयावरून दहा आणे मणावर आणली व मीठ विकण्याचे हुकूम दिले. मिठागरवाल्यास मीठ पिकविण्याबद्दल मणास दोन आणे मिळावयाचे.[३] पण आंगऱ्यांच्या प्रदेशांतील मिठागरें बंद करण्याचा निर्णय कंपनी सरकारने अगदी आरंभींच घेतलेला दिसतो. १८५८ ते १८७२ या काळांत अलीबाग तालुक्यांतील मिठागरें बंद करण्यांत आलीं व त्यांच्या खाऱ्या भातजमिनी बनविण्यांत आल्या.[४]

**झाप** — इ. स. १७९८ पासून १८३० पर्यंत झापांचा भाव दीड रुपया शेकडा होता; इ. स. १८४०–४१ मध्ये तो एक रुपया शेकडा झाला. झापांची गरज घरशाकारणीस होती व सरकारलाहि झाप मोठ्या प्रमाणांत लागत.[५] इ. स. १८५२ मध्ये सरकारने ऐनजिनसी झाप घेण्याचें बंद केलें.[६] आंगऱ्यांचीं गलबतें व कुलाब्यांतील, सागरगडावरील इमारती शाकारण्याचा प्रश्नच आता उरला नव्हता !

**बकरीं** — इ. स. १७९८–९९ व इ. स. १८४०–४१ मध्ये बकऱ्याची किंमत अडीच रुपये होती[७] १८२०–२१ त ती १॥=- रु. होती.[८]

**दिव्याचें तेल** — हें दोन प्रकारचें तेल वापरीत. गोडें व कडवें. पैकी कडवें उंडिणीचें तेल इ. स. १७९९, १८११, १८१५ मध्ये अडीच ते तीन रुपये मण होतें. १८२९ मध्ये तें ३८= रु. होतें.[९] गोडें तेल बरेंच महाग, म्हणजे ५ ते ६ रु. मण होतें.[१०]

**कोंबडें** — इ. १८२०–२१, १८२४–२५ व इ. स. १८४० मध्ये कोंबड्यांचा भाव नगास २ आणे होता. कदाचित्, 'चवलीची कोंबडी' ही म्हण या कायम दरानें पडली असेल ![११]

**नारळ** — इ. स. १८१२, १८४० मध्ये नारळाचा सरकारी दर १॥।= रु. शेकडा असा आहे. इ. स. १८१९–२० मध्ये तो १॥- रु. आहे,[१२] पण बाजारांत किरकोळीने जास्त भाव असणार. इ. स. १८१८ मध्ये बाजारांत २८॥. रु. शेकडा या भावाने नारळ मिळे. नागावचा

---

१ आंज. ४०१

२ आंदरु नं. २५२, पृ. ४५

३ आंज. ७७८

४ कुर्गे पृ. ९०

५ आंदरु नं. १३४, पृ. ५० ते ५४; आंदरु नं. ६३६, ६३७; आंदरु नं. २४४ पृ. ८९ ते ९४; आंदरु नं. ३८४, पृ. १९४; कोंजरु नं. ६३७, पृ. १७

६ आंज. ७९८

७ आंदरु नं. १३४, पृ. ६० व कोंजरु नं. १३७, पृ. ३५

८ आंदरु नं. ६३७

९ आंदरु नं. ३८४ पृ. १८८; आंदरु नं. ६३६

१० आंदरु नं. ४७, पृ. ७३

११ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७; कोंजरु नं. १३७, पृ. ३१

१२ आंदरु नं. ६३७, पृ. १३७; आंदरु नं. ४७, पृ. ७४; कोंजरु नं. १३७, पृ. ९

नारळ दूरवर विक्रीला जाई. या वर्षी पनवेल तालुक्यांत शिरढोण येथें तो ५ रु. शेकडा होता.[१] १०० नारळांच्या चोवडांस १ रु. किंमत पडे.

सुपारीचा अनेक वर्षांचा सरकारी भाव ३ रु. मण आहे. इ. स. १८२९-३० मध्ये तो ३८= रु. आहे.[२]

काथ्या — जाडा व बारीक असा दोन प्रकारचा काथ्या विक्रीस येई. बारीक काथ्या २ रु. मण व जाडा १। रु. मण असे.[३]

यांशिवाय दूध, दही, कोनफळ, विड्याचीं पानें यांचे दर निरनिराळ्या वर्षांचे सांगतां येतील. पण नागाव हें नारळ व भात यांच्या उत्पन्नाचेंच ठिकाण होतें. बाकीच्या वस्तू अगदी किरकोळ होत्या. त्यांचे दर बाजारच्या त्या दिवसाच्या परिस्थितीवर अवलंबून असणारे आहेत.

शिवाय नागावच्या एकूण उत्पन्नांत राजभाग आणि प्रजाभाग असे भाग पाडीत. प्रजाभाग ⅓ होता, राजभाग ⅔ असे. म्हणजे, वस्तू विक्रीसाठी उरल्या, तर त्या राजभागांतीलच प्रामुख्याने उरावयाच्या. ज्याला 'व्यापार' असें मोठें नांव देतां येईल, तो करण्याचें सामर्थ्य प्रजेमध्ये उत्पन्नाच्या अभावीं फारसें दिसत नाही. म्हणजे नारळ सुपारी, भात यांचे जे सरकारी दर होते, त्या दराने आंगरे स्वत: अगर दुसऱ्यांमार्फत जो माल अन्यत्र विक्रीस पाठवितील, तोच नागावचा व्यापार ! प्रजेने व्यापार केला, तरी तो स्थानिक व किरकोळीचा व अगदी मर्यादित असे. घरखर्च भागून शिल्लक राहणाऱ्या आपल्याजवळील वस्तू विकून जरूर त्या अन्य वस्तू खरेदी करण्यासाठी पैशांचा विनियोग करावयाचा एवढेंच ज्यांचें विक्रयसाधन, ते व्यापार कसला करणार !

---

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६

२ आंदरु नं. ६३६, ६३७, ६३८; कोंजरु नं. १३७, पृ. ९

३ आंदरु नं. १६६ पृ. १८६; आंदरु नं. २४९, पृ. ११०

# वतनदार

वर्तक, महाजन, कुलकर्णी, चौघुले, माने हे नागावचे वतनदार आहेत. त्यांस दरसाल महालांतून नक्त नेमणूक असे. ३० रु. महाजनांस, ६० रु. कुलकर्णी यांस, ३५ रु. तीन वर्तकांस, १० रु. माने यांस व १० रु. चौघुले यांस असे १४५ रु. महालांतून खर्च पडत.[१] महाजनांस लग्नप्रसंगीं दोन नारळ, पानसुपारी व सहा आणे असा प्रथम मान देण्यांत येतो; मग इतरांस मान दिला जातो. वर परगावचा असल्यास दोन नारळ, पानसुपारी व एक रुपया असा महाजनांचा मान आहे. सभेच्या आरंभीं हा मान देतात. म्हणजे महाजनांचें घराणें नागावांतील सर्वप्रथम, सर्वांत जुनें होय. ठोसर, लोंढे, दामले हीं ब्राह्मणघराणींहि मानकरी आहेत व त्यांना लग्नादिप्रसंगीं मान मिळतो. शिवकालांत या घराण्यांचा उल्लेख येतो. अर्थात्, हे समाजांतील मानकरी होत.

**कुलकर्णी** – इ. स. १६६२ च्या सुमारास नागावला कुलकर्णी प्राप्त झाला. त्याने गावचें लिहिणें करावयाचें. हें घराणें शक्य तों वंशपरंपरा असावयाचें, हें शिवाजीने मान्य केलें.[२]

प्रसंगीं वतनदारांच्या वतनांवर सरकारी बडगा बसत असे. इ. स. १७९८–९९ मध्ये सरकारी उत्पन्न जेव्हा प्रमाणाबाहेर तुटलें, तेव्हा सरकारने वतनदारांच्या उत्पन्नास कात्री लाविली. तोच प्रकार इ. स. १८४०–४१ मध्येंहि झाला. सरकारने त्यांचें अर्धें उत्पन्न सरकारांत घेतलें.[३] म्हणून या दोन वर्षीं कुळकर्ण्यास ३० रु. नक्त मिळालें आहे. कुळकर्ण्याचें वेतन नक्त व ऐनजिनसी असें दोन्ही प्रकारचें होतें. त्यास ऐनजिनसी वसुलींत दर खंडीस अर्धा मण एवढा हिस्सा होता.[४] ऐनजिनसी उत्पन्न कायम नसल्यामुळें कुळकर्ण्याचा ऐनजिनसी मुशाहिरा बदलता असे. इ. स. १८१२–१३ मध्ये कुळकर्ण्यास वेतन ४०। रु. च मिळालें.[५] इ. स. १८२९–३० मध्ये तें ५६॥=। रु. मिळालें.[६] इ. स. १८०६–०७ मध्ये कुळकर्ण्याचा भाताचा मुशाहिरा १ खंडी ३ मण ।॥। पा. होता.[७] इ. स. १८३९–४० त तो १ खंडी ११ मण ८॥। पा. होता.[८] इ. स. १८४०–४१ त तो २ खंडी ४ मण ।। पा. झाला असता; पण त्यास अर्धाच मिळाला.[९]

**माने पाटील** – हे नागावचे पाटील होत. यांचें नक्त वेतन १० रु. होतें. त्यांस ऐनजिनसी वेतन मिळत असे. इ. स. १८०६–०७ मध्ये पाटलाचें ऐनजिनसी वेतन १ खंडी १४ मण ६॥। पा. होतें.[१०] इ. स. १८३९–४० मध्ये तें २ खंडी ७ मण ६॥ पा. होतें.[११] इ. स. १८४०–४१ मध्ये तें ३ खंडी ६ मण इतकें मिळालें असतें.

पाटील माने आणि कुलकर्णी यांखेरीज ऐनजिनसी वेतन कोणाहि वतनदारास नव्हतें. वतनदारांस गावच्या कारभारांत स्थान होतें.

---

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६, ६३७

२ उकोंरु नं. ५०६, पृ. १९२, १९३

३ आंदरु नं. १३४, पृ. ६१; कोंजरु नं. १३७, पृ. ३०, ३१

४ कोंजरु नं. १३७, पृ. ३०, ३१

५ आंदरु नं. ६३७, पृ. १२२

६ आंदरु नं. ६३८, पृ. १६७

७ आंदरु नं. ६३७, पृ. १३५

८ कोंजरु नं. २०१३, पृ. २

९ कोंजरु नं. १३७, पृ. ३०, ३१

१० आंदरु नं. ६३७, पृ. १३५

११ कोंजरु नं. २०१३, पृ. २

**इनामदार** – गावचे वतनदार प्रतिष्ठित मानले जात असत. गावांत प्रतिष्ठितांचा आणखी एक प्रकार होता, त्यांस इनामदार म्हणतात. प्रत्येक गावांत सरकारने कांही इनामदार निर्माण केलेले असत. त्यांना वाड्या व शेतें इनाम दिलेलीं असत. इ. स. १७९९–१८०० मध्ये पुढील इनामदार आढळतात.

| आकार नक्त रु. इनाम | इनामदार |
|---|---|
| २॥·।॥· | खंडेराव रामचंद्र. वाडीपैकी आकार रुपये |
| ·॥· | धोंड्या हीर पाटील. भंडारी मुकादम व॥ नागाव माड १ |
| ·]॥· | महाद साळवी कुंभार, दारमाडपैकी १ |
| –॥· | गोम साळवी कुंभार दारमाडपैकी १ |
| १॥· | पांडूशेट सोनार (पोतदार) दारमाड ३ |
| ·॥· | फकीरा पेडणेकर दारमाड १ |
| ८१॥। | जिवाजी बल्लाळ चिटणीस इनामवाडी आकार रुपये |
| १४। | लक्ष्मण आप्पाजी डबीर इनामवाडी आकार रुपये |
| ८०।≡॥ | आनाजी त्रिंबक डबीर इनामवाडी आकार रुपये |
| ७२॥ | मोरशेट कासार जमीन ६ बिघे [ भातजमीन ] |
| ३६। | गोद म्हात्रे वैद्य जमीन ३ बिघे [ भातजमीन ] |
| १९३॥ | जिवाजी बल्लाळ चिटणीस १६ बिघे [ भातजमीन ] |
| ७२॥– | लक्ष्मण कृष्ण कोल्हटकर ६ बिघे [ भातजमीन ] |

या यादीवरून इनामदारांना वाड्या, भातशेतीची जमीन व दारमाड इनाम दिल्याचें आढळतें; इनामाचा आकार कळतो.[1]

कांही माणसें त्या त्या समाजांतील प्रमुख म्हणून वतनदार झाले आहेत. उदाहरणार्थ, भंडाऱ्यांचा मुकादम, कुंभारांचा मेहतर, सोनारांतील पोतदार, कासार हे किरकोळ वतनांचे मानकरी झाले; हे 'गावगाड्या'च्या दृष्टीने झाले आहेत. चिटणीस व डबीर हीं दोन्ही प्रभु घराणीं दरबारांत वावरणारीं, राजकारण खेळणारीं असल्यामुळे इनामदार झालीं आहेत. खंडेराव रामचंद्र हे नागावचे कुळकर्णी आहेत. कोल्हटकर हे पेशव्यांचे नातेवाईक व सावकार, म्हणून इनामदार झाले. म्हात्रे वैद्य हे नागावचे पिढीजाद वैद्यकी करणारे आहेत. इ. स. १८१९–२० मध्ये त्यांस आंग्ऱ्यांनी चिकित्सेकरिता अलीबागेस नेल्याचा व त्यांना वस्त्रें देऊन त्यांचा सन्मान केल्याचाहि उल्लेख आढळतो.[2] समाजांतील एवंगुणविशिष्ट व्यक्तीस इनाम देणें हा तत्कालीन रिवाजच होता.

इ. स. १८०६–०७ मध्ये नागावचे हरिपंत आठवले व विसाजीपंत जोगळेकर यांना सरकारने इनाम जमिनी [ अर्धा बिघा व ३ बिघे भात जमीन ] दिल्याचें आढळतें. पैकी जोगळेकर एक कुटुंबवत्सल ब्राह्मण, त्यांचा योगक्षेम चालावा, एवढ्यासाठी त्यांस जमीन दिली आहे.[3]

इ. स. १८१९–२० मध्ये बलवंत वासुदेव नेने हे इनामदार वाडकर असल्याचें आढळतें.[4] हें नेने घराणें विद्वान् म्हणून आंग्ऱ्यांच्या पदरीं होतें. त्यांच्याजवळ मोठा ग्रंथसंग्रह असे. तेव्हां विद्वानांचा परामर्श घेणें, या प्रकारांत नेने वतनदार झालेले दिसतात.

१ आंदरु नं. १३५, पृ. ४८, ४९
२ आंदरु नं ४७, पृ. ७१
३ आंदरु नं. ६३७, पृ. १३५
४ आंदरु नं. २४४, पृ. ८८

कोणत्याहि गावांत वतनदार किती असावेत व गावची किती जमीन इनाम म्हणून देण्यास हरकत नाही, याबद्दल कांहीतरी 'शिरस्ता' असावा. पेशवे व छत्रपति यांच्या प्रदेशांत तसा शिरस्ता होता. आंग्र्यांच्या सदर शिरस्त्याचा अजमास आपल्याजवळच्या कागदांतून लागत नाही.

# न्यायनिवाडे

आंगरेकालांत नागावकरांचा महत्त्वाचा व्यवसाय शेतीचा आणि बागायताचा होता. प्रत्येक व्यावसायिकाला कांही ना कांही निमित्ताने न्यायदेवतेकडे धाव घ्यावी लागते. तदनुसार वरील व्यवसायांतील लोकांना न्यायालयाचा आश्रय करावा लागला; त्याचीं कांहीं उदाहरणें अन्यत्र, प्रामुख्याने 'ब्राह्मणसमाज' या प्रकरणांत दिलीं आहेत. सदर उदाहरणें वगळून येथे न्यायनिवाड्यांचे अन्य प्रकार दिले आहेत. या प्रकरणीं दिलेले निवाडे वृत्तिविषयक, वतनविषयक आणि किरकोळ भांडणांच्या स्वरूपाचे आहेत. त्यांतील कांही समाजाच्या वृत्तीचे निदर्शक असून कांही नैमित्तिक आहेत.

**क्रमवंतांचें उपाध्येपण** — अष्टागरांत क्रमवंत ब्राह्मणांची वस्ती बरीच आहे. नागावमध्ये त्यांचीं कांही घरें आहेत. क्रमवंत हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. त्यांचें मूळ ठिकाण जोगाईचें आंबें असून चवदाव्या शतकांत दुर्गादेवीच्या कुप्रसिद्ध दुष्काळांत त्यांचीं घराणीं देशोधडीस लागलीं; त्यांतील एक घराणें अष्टागरांत आलें व इ. स. १५०० च्या सुमारास स्थायिक झालें असें समजलें जातें. त्या घराण्याची वृद्धि होऊन त्यांतून अनेक घरें निर्माण झालीं. विद्वान् ब्राह्मणांत जटापाठी, घनपाठी असत; त्यांच्या परंपरा वेगळ्या; क्रमवंत म्हणजे क्रमपाठी ब्राह्मण होत. त्यांस अलीबाग तालुक्यांतील २५० गावांची उपाध्येपणाची वृत्ति आणि कान्होजी आंगरे यांच्या घराण्याचें पुरोहितत्व प्राप्त झालें. २७ आगस्ट १७१८ या तारखेचा एक अस्सल कागद सांगतो की नागाव महालाची उपाध्येपणाची वृत्ति क्रमवंतांस प्राप्त झाली.[1]

या वर्षीं आंगरे राजवटीचे मुख्य पुरुष कान्होजी यांच्या मनांत क्रमवंतांबद्दल संशय निर्माण करण्याचें काम एका ब्राह्मणानें केलें. अडीचशें गावांच्या उपाध्येपणाच्या वृत्तीमुळे क्रमवंतांचें नष्टचर्य संपलें होतें. ते सधन होऊन मानमान्यता पावूं लागले होते. त्यांचा आंगऱ्यांच्या व पेशव्यांच्या राज्यांत बोलबाला होत होता; पण त्यामुळेच ते इतर ब्राह्मणांच्या असूयेचें आणि विरोधाचें स्थान झाले. विरोधकांत कोंकणस्थ ब्राह्मण प्रमुख असून इतर ब्राह्मण त्यांस साथ देऊं लागले. नागाव येथील वेदशास्त्रसंपन्न हरिभट्ट लेले यांनी एक दिवस कान्होजी आंगऱ्यांजवळ बोलतां बोलतां, त्यांच्या मनांत क्रमवंतांच्या ब्राह्मणत्वाबद्दल आशंका उत्पन्न केली. गोवें-सावंतवाडीकडे 'कीरवंत' नांवाची एक अब्राह्मण जात आहे; त्या जातींतील तर हे 'क्रमवंत' नसतील ना, असा, केवळ शब्दांतील ध्वनिसादृश्यावरून हा संशय उत्पन्न झाला!

त्या काळांतील न्यायपद्धतींतील प्रमुख सूत्र असें कीं आरोपीने आपलें निरपराधित्व आणि निष्कलंकपण सिद्ध करावयाचें! कोणीहि, कोणावरहि आरोप करून मोकळें व्हावें आणि आरोपीवर सर्व जबाबदारी टाकून स्वस्थ राहावें! क्रमवंत उपाध्यायांनी आंगऱ्यांची संशयनिवृत्ति करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण तो अयशस्वी झाला. क्रमवंत म्हणजे क्रमपाठी ब्राह्मण, 'कीरवंत' नव्हेत; हें सिद्ध करण्याची जबाबदारी क्रमवंतांवर पडली. हें सिद्ध होईपर्यंत त्यांचे उपाध्येपणाची वृत्ति, तत्कालीन पद्धतीप्रमाणे सरकारजमा झाली. पण वृत्ति कोणीतरी चालवलीच पाहिजे, धार्मिक कृत्यें तटून राहातां कामा नयेत; म्हणून ही वृत्ति इतर, विशेषत: कोंकणस्थ

---

1. आंपले. २६

ब्राह्मण चालवूं लागले. अशा तऱ्हेने क्रमवंतांचें मानमान्यतेचें व उपजीविकेचें साधन कायदेशीर रीत्या त्यांजपासून हिरावून घेण्यांत आलें.

क्रमवंत दीर्घोद्योगी होते. त्यांनीं आपल्या ब्राह्मणत्वाचा पुरावा देण्याची संपूर्ण जबाबदारी उचलली व दक्षिणेंतील महत्त्वाच्या क्षेत्रांहून आणि अन्य ठिकाणांहून आपल्या ब्राह्मणत्वाचे लेख आणले. छत्रपति, पेशवे, क्षेत्रस्थ उपाध्याय इत्यादि सर्वांची आपल्या ब्राह्मणत्वाबद्दलची खात्री पटविली; पण आपली उपाध्येपणाची वृत्ति ते परत मिळवूं शकले नाहीत. ज्या कीरवंत शब्दांतील ध्वनिसादृश्यामुळे हा संशय उत्पन्न झाला, त्या कीरवंत जमातीनेहि जबाब लिहून दिला की क्रमवंत वेगळे; ते आपणांतले नाहीत. पण वृत्ति परत मिळवण्याचे दृष्टीने हा कबुलीजबाब अपुरा पडूं लागला. दरम्यान, ज्या हरिभट्ट लेल्यांच्या शब्दांमुळे हा भयंकर गोंधळ उत्पन्न झाला, ते निवर्तले. त्यांचे पुत्र विश्वनाथभट्ट लेले यांनी क्रमवंतांस लिहून दिलें की आमच्या वडिलांनी केलेला दोषारोप मिथ्या आहे; पण या पत्रानेही भागेना ! पेशवे व पेशव्यांच्या दरबारचे न्यायाधीश स्पष्टपणें लिहून क्रमवंतांचें शुद्धत्व जाहीर करीत होते; पण ग्रामण्याच्या चक्रव्यूहांतून क्रमवंत सहीसलामत बाहेर पडूं शकले नाहीत.

अष्टागरांतील क्रमवंत घराणें मूळचें एकच असल्यामुळे, शरीरसंबंध जोडण्याचे दृष्टीनें त्यांस इतर ब्राह्मणांत मिसळून जाणें क्रमप्राप्त झालें. अष्टागरांत त्यांचीं बरींच घरें झालीं; पण मूळ घराणें एकच, हें ध्यानीं घेतां, क्रमवंत मुलांमुलींचे लग्नादिसंबंध कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे ब्राह्मणांत होणें, ही गोष्ट ओघानेच आली व तसे संबंध घडून आलेहि. त्यामुळे अष्टागरांत 'क्रमवंतसंबंधी' घराणीं निर्माण झालीं. अशीं घराणीं शेकडा ५०।६० आहेत. क्रमवंतांस उपाध्येपणाची जी वृत्ति प्राप्त झाली होती, तींत ब्राह्मणांचेंहि उपाध्येपण होतेंच व त्यांचे गर्भाधानादि संस्कार व सपिंडीकरणाचें धार्मिक कृत्य त्यांच्याच हातून होत असे; ते श्रौतस्मार्तकर्मानुष्ठान, उपाध्येपण, धर्माधिकार व पुराणिकत्व चालवून अष्टागरांत नांदत होते. त्यामुळे सर्व ब्राह्मणपोटजातींकडे त्यांचा वृत्त्यंश होता.

क्रमवंत हे सुविद्य आणि सत्पात्र, म्हणून शिवछत्रपतींच्या राज्यारोहणाचे वेळीं गागाभट्टांबरोबर रायगडावर त्यांचा सन्मान झाला होता. दुसऱ्या एका छत्रपतींनी त्यांचा आदर करून त्यांस योगक्षेमार्थ, अलीबाग तालुक्यांतील मौजे मुळें तर्फ खंडाळें हा गाव इनाम दिला होता. पण ग्रामण्याच्या धगधगत्या आगींत या गोष्टींस कांही महत्त्व उरलें नाही !

इ. स. १७५६ मध्ये चित्पावन व क्रमवंत यांचा वृत्तिविषयक वाद न्यायनिवाड्यासाठी पुन्हा एकदा पुण्यास गेला. तेथे, त्यांच्या ज्ञातीसंबंधीं शोध लागत नाही व ती कशी उत्पन्न झाली हें कळत नाही, असें दूषण देण्यांत येऊन त्यांस अपंक्त ठरविण्यांत आलें, अशी नोंद आढळते.[1] पण हा नागावच्या ब्राह्मणांचा केवळ कांगावा होता. वस्तुस्थिति अशी होती की क्रमवंतांच्या समाधानासाठी पुणें दरबारने त्यांस एक संमतिपत्र करून दिलें; त्यांत पुढील गोष्टी समाविष्ट करण्यांत आल्या.

(१) ब्राह्मणांनी क्रमवंतांशीं पूर्ववत् पंक्तिव्यवहार करावा. (२) क्रमवंतांस अनुष्ठानास बोलाविल्यास इतर ब्राह्मणांनी हरकत घेऊं नये. (३) ज्यांना क्रमवंतांस बोलवावयाचें नसेल, त्यांनी दुसऱ्या उपाध्यायास बोलवावें; पण वृत्तीचें द्रव्य क्रमवंत उपाध्यायास मिळावें.

हें संमतिपत्र क्रमवंतांस मान्य झालें नाही; कारण त्यायोगें उपाध्येपणाच्या वृत्तीचा अंश मिळाला, तरी तो उपेक्षणीय होता. संमतिपत्राने, खरें म्हणजे वृत्तिच्छेदच स्पष्टपणें दिसत होता;

---

१ आंज. १९१

अग्रहक्क नष्ट होत होता. संमतिपत्रांत ऋमवंतांचा विजय होता हें खरें; पण तो संपूर्ण विजय नव्हता; कारण उपाध्येपणासाठी इतरांस बोलावणें मान्य होण्याची फट त्यांत होती. ' एकमेव उपाध्ये ' हें ऋमवंतांचें स्वरूप त्यायोगें नष्ट होत होतें. संमतिपत्र ही तडजोड, ' त्वयार्धं मयार्धम् ' असा प्रकार होता.

शिवाय, अष्टागरांतील ब्राह्मणांनी त्यांतूनहि श्लेष काढला की हें संमतिपत्र देतांना पेशवे आणि ऋमवंत यांचें एका पंक्तींत भोजन झालेलें नाही. तेव्हा आम्हीं तरी कसें त्यांच्या पंक्तीस भोजन करावें ? झालें ! ऋमवंतांना पेशव्यांच्या पंक्तीस बसून ' पंक्तिपावन ' होण्यासाठी प्रथम पुण्यास, तेथून पंढरपुरास जावें लागलें. पेशवे त्यांच्या पंक्तीस जेवले व त्यांनी तसें शिक्का-मोर्तबाचें पत्र ऋमवंतांच्या स्वाधीन केलें. अशा प्रकारें दीर्घकालीन लढा मिटत मिटत आला. ऋमवंतांच्या पंक्तींतून उठून जाणाऱ्यांना प्रायश्चित्तें घ्यावीं लागल्याचेहि प्रकार घडले.

पेशव्यांचीं पत्रें व प्रायश्चित्तें यांतून बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीत कांही निष्पन्न झालें असेल, तर तें एवढेंच की ऋमवंत ' ब्राह्मणसम ' मानले जाऊं लागले ! उंदेरीच्या सुभ्यांत ब्राह्मणांचा ऋमवंतांशीं सर्वविध व्यवहार बिनबोभाट सुरू झाला; कारण तेथें पेशव्यांचा अंमल चालत होता. पण अष्टागरांतील तेढ मोडली नाही. ऋमवंतांचा अपमान करण्याच्या निरनिराळ्या क्लृप्त्या अष्टागरस्थांनी योजावयास प्रारंभ केला. जे ब्राह्मण ऋमवंतांशीं अन्नोदकादि व्यवहार करूं लागले होते, त्यांस बहिष्कृत करण्याचें धोरण इतरांनीं स्वीकारलें. ऋमवंतांस इतर ब्राह्मणांबरोबर ' तीर्थगंधा'चा हक्क नाही, असें ते म्हणूं लागले.

माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीत अलीबाग येथे वरसोली, थळ, किहीम, आवास, सासवनें येथील ब्राह्मणसमुदाय जमा झाला. त्या सभेंत सरखेल राघोजी आंगरे यांनीं सर्वांस बजावलें की ऋमवंत ' पूर्ण ' ब्राह्मण असल्याने, अन्नोदक, तीर्थगंध इत्यादि कोणत्याहि बाबतींत त्यांचे-बद्दल पक्षपात करून त्यांचा अपमान होईल, असें कोणी वागल्यास त्यांचा मुलाहिजा होणार नाही. ज्या अष्टागरांत वाद उत्पन्न झाला, त्याच ठिकाणीं राघोजी आंगऱ्यांनी हा निर्णय दिल्यामुळें त्याला महत्त्व आहे. पण राघोजी आंगरे यांस आपल्या निर्णयाचा पाठपुरावा करतां आला नाही. ते इ. स. १७९३ मध्ये वारले. इ. स. १७९७–९८ मधील एक नोंद अशी: ' जोशी व ऋमवंत अलीबागकर यांचे उपाध्येपणाचा कजिया आहे. वादाचा निकाल होईपर्यंत उपाध्येपण सरकारांत जप्त केलें आहे. जप्तीची कमावीस वेदमूर्ति बापूभट सोमण यांस सांगितली आहे; ते चालवतील. त्यांस चालवूं देण्याबद्दल आंगऱ्यांनी गांवगन्ना सनदा धाडल्या. महाल नागावांत अशी सनद बालाजी सदाशिव यास धाडली.'[१]

इ. स. १८०६ मध्ये नागावच्या वेदशास्त्रसंपन्न गोविंदभट्ट वैशंपायन यांनी ग्रामण्याच्या अग्नीवर एक फुंकर घालून तो पुन्हा प्रज्वलित केला. वैदिकांच्या सभेंत ऋमवंतांना स्थान असूं नये, असें त्यांचें म्हणणें होतें. ते बसले असतां त्यांस उठवून लावण्याचा हा चंग होता. ऋमवंतांच्या वृत्तीचा पैसा आजवर सुभ्याकडे जमा होत होता; तो यापुढे तसा जमा न होतां अन्य ब्राह्मणांस मिळावा, असाहि हेतु त्यांच्या विचारांत अनुस्यूत झाला होता. पण ऋमवंतांनी वेळींच दक्षता घेतल्यामुळे त्यांचा हा हेतु सिद्धीस गेला नाही. वृत्तीची मिळकत महालोमहालीं सरकारजमा होत होती.

अनेक वर्षेपर्यंत पुराव्याची छाननी करून निर्णय देण्याचें काम पुणेंदरबारांत झालें; पण तें अष्टागरांत झालें नव्हतें आणि अष्टागरावर सत्ता आंगऱ्यांची होती. आंगऱ्यांनी निर्णय देणें

७ आंदरु नं. १३४, पृ. ६५

जरूर होतें. तेव्हा पुणेंदरबारचे खंडेराव नीलकंठ यांनी सुचविलें की आता एकदा अष्टागरांतच पंच नेमून या वादाचा कायमचा निकाल लावून टाकावा. पंचांनी क्रमवंतांच्या विरोधकांचा पुरावा पाहावा. या वादाचा आता सर्वांनाच कंटाळा आणि तिटकारा आला होता. तेव्हा, योजनेप्रमाणे निर्णय घेण्याचें ठरलें; निर्णय घेतला. पण त्याची अंमलबजावणी झाली नाही. इ. स. १८४०–४१ मधील एक नोंद अशी: 'नागावचें उपाध्येपण ग्रामस्थ व उपाध्ये यांमधील बेबनावामुळें वादांत पडलें होतें. सरकारनें तें ब्राह्मणांकडून चालविलें. उपाध्ये त्यांचेमार्फत वसूल होणारी रक्कम घेईनात. तेव्हा सरकारांत जमा रक्कम ४॥=॥ रु. झाली. ही रक्कम पुण्याहवाचन, सुवर्णाभिषेक, गणपतिपूजन, मंडपोद्यापन, एकादशीचें व्रत, समावर्तन इत्यादींबद्दल आहे.'[1]

इ. स. १७१८ मध्ये जी आशंका आंगऱ्यांच्या मनांत उत्पन्न होऊन हें प्रकरण निर्माण झालें, तें इ. स. १८५४ पर्यन्त चाललें व मग आपोआप थंडावलें.

क्रमवंतांचें उत्पन्न दरसाल महालोमहालीं कसें अनामत जमा होत होतें, यासंबंधी कांही नोंदी पुढे देत आहोंत; त्या किरकोळ वाटतील. पण ज्या मनुष्यानें तात्पुरतें उपाध्येपण चालवावयाचें असतें, तो नेहमीच निम्या उत्पन्नाचा वांटेकरी होतो. त्याचें भोजन यजमानाकडे व्हावयाचें असतें. त्यास मिळालेली दक्षिणा व भोजनदक्षिणा ही त्याचीच प्राप्ति असते. हें सर्व वजा जातां अनामत जमा किरकोळच असणार! पुढील विवेचन त्या काळांतील वैदिक ब्राह्मणांचे भिक्षुकीचे रिवाज व दरदाम समजण्यास उपयोगी पडेल.

[इ. स. १८०९ जुलै १४] छ १० जखर सुा आशर मयातैन व आलफ (१) बाल जोशी पगारकर याचे घरीं गाईच्या प्रदक्षिणेचें उद्यापन झालें. वृत्तिविषयक सरकारांत जमा रकम ८—।॥. आणे.

उपाध्ये विश्वनाथभट वैशंपायन यांनीं त्रिंबकभट बर्वे यांजकडे कुष्मांडव्रत केलें. वृत्तिविषयक रकम सरकारांत जमा झाली. [आंकडा अनुपलब्ध.]

इ. स. १८१५–१६ मध्ये नागाव महालाची क्रमवंतांच्या उपाध्येपणाची नऊ महिन्यांची रकम एकून २२।= रु. सरकारजमा झाली.

इ. स. १८१८–१९: (१) रामभट केळकर यांजकडे म्हशीची शांत केली. वृत्तिविषयक सरकारजमा ८— आणा.

(२) विसोबा साने यांजकडे अठांगुळ झालें. सरकारजमा वृत्तिविषयक रकम ८— आणा.

(३) बाळाजीपंत दांडेकर यांजकडे गाईची शांत झाली. सरकारजमा रकम ८— आणा.

(४) तात्या जोशी यांजकडे षष्ठीपूजन झालें. सरकारांत जमा ८॥. अर्धा आणा.

(५) महादाजी गोपाळ जोगळेकर यांजकडे मंगलागौरीचें व्रत झालें. सरकारांत जमा ८—॥ दीड आणा.

(६) सोमवती व्रताचें उद्यापन. सरकारजमा रकम ८—॥. दीड आणा.

इ. स. १८१८ ऑक्टोबर ५, छ ४ जिल्हेज.

(७) बाबाजीपंत महाजन यांजकडे नवरात्राचें हवन झालें; उपाध्येपणाचे सरकारजमा ८— आणा.

(८) बाळाजीपंत दांडेकर यांजकडे ऋषिपंचमीचें व्रत झालें; त्यांत गाय उपाध्यायांस दिली. तिची किंमत रुपये पांच. पैकी सरकारजमा रुपये २॥ अडीच.

---

१ कोंजरु नं. १३७, पृ. ३२

(९) गर्भाधानविधीचा धार्मिक खर्च सरकारजमा रकम ८=.

(१०) लक्षप्रदक्षिणा उद्यापनविधि. सरकारांत रकम ८=

(११) गोविंदभट्ट रिसबूड यांनी सखंभट आठवले यांच्या मुलीच्या लग्नांत उपाध्येपण केलें; तेव्हां गणपतिपूजन ८।. व इतर उत्पन्न .।।. रु. सरकारांत जमा झालें.

इ. स. १८१८–१९ मध्ये ऋमवंतांच्या उपाध्येपणाची सरकारांत अनामत एकूण ४१।=।।। रु. झाली.

दिलेलीं उदाहरणें व रकमा फक्त नागाव महालांतील आहेत; आणि नागाव महाल म्हणजे नागाव, बागमळा व दिवाणखार हीं तीन ठिकाणें! पैकी बागमळा व दिवाणखार येथील वस्ती अगदी जुजबी होती.[1] इ. स. १८१९ ते २४ या वर्षांत उपाध्येपणाची वृत्ति अनामत असल्याची नोंद आहे.[2] इ. स. १८३४ पर्यंत या वादाचा उलगडा झाला नाहीं. तेव्हा आंगऱ्यांनी आज्ञा दिली की ब्राह्मणांकडील वृत्ति ऋमवंतेतर ब्राह्मणांनी चालवावी व निम्में उत्पन्न ऋमवंतांस द्यावें. पण ऋमवंत पूर्वीप्रमाणेच, या तडजोडीला राजी नव्हते; म्हणून पुढेही ही रक्कम सरकार-जमा होत गेली.[3]

सुमारें १३५ वर्षांच्या या वादाचें स्वरूप काय, त्याचें पर्यवसान काय झालें, ग्रामण्य म्हणजे काय व तें किती तीव्र असूं शकतें, याचा पुरावा नागावपुरताच येथे दिला आहे. यामुळे ऋमवंतांची आर्थिक व सामाजिक परिस्थिति इतकी खालावली, की त्यांचें अष्टागरांतील महत्त्व पूर्ण नष्ट झालें. ऋमवंतांच्या अनेक घरांनी 'ऋमवंत' हें आपलें ललामभूत आणि अत्यादर-सूचक अभिधान सोडून दिलें; ग्रामत्याग केला; आडनांवें बदललीं! ते पुन्हा 'देशस्थ' झाले, 'ऋमवंत' राहिले नाहीत!

इ. स. १८४० मध्ये आंगऱ्यांचें राज्य खालसा झालें. तोंपर्यंत सतत, ऋमवंतांचें उपाध्येपणाचें उत्पन्न सर्व महालांतून सरकारजमा होत होतें; त्यावर आपला हक्क सांगून तें स्वीकारण्यास कोणीही मानी ऋमवंत पुढे आले नाहीत. आंगऱ्यांच्या उदयाबरोबर ऋमवंतांची उपाध्येपणाची वृत्ति निर्माण झाली व सरकारजमा होऊं लागली. त्यांच्या अस्ताबरोबर वृत्तीचें द्रव्य नाहींसें झालें. त्यावर आपला हक्क शाबीत करण्याचा प्रयत्न ब्रिटिश अमदानींतही ऋमवंतांनीं केला नाहीं.*

**वर्तकवतनवाद :—** नागावच्या पूर्वापार तीन पाखाड्या होत्या. १ भावई, २ वोढण, ३ कौली. प्रत्येक पाखाडीचा स्वतंत्र वतनदार वर्तक असे. वर्तक हा सध्यांच्या बेलिफासारखा, पण गावकामगार असून ग्रामपंचायतीच्या ठरावांची अंमलबजावणी करणें व जमाबंदीस मदत करणें हीं त्याच्या वतनदारीचीं कामें होतीं. इ. स. १८३३–३४ मध्ये भावई पाखाडीचा वर्तक निपुत्रिक मरण पावला. वर्तकांचा वारस उरला नाही, हें सरकारच्या ध्यानांत आलें नाही. दुसऱ्या पाखाड्यांचे वर्तकच वतनाचा उपभोग घेऊं लागले. पाखाडीचे चोथले वतनदार यांनी हा प्रकार सरकार-दरबारीं समजाविला व आपल्याजवळील कागदपत्री पुरावा दाखल केला. त्यावरून, पुन्हा ठराव होईपर्यंत, भावई पाखाडीचें वर्तकपणाचें वतन सरकारजमा ठेवण्याचा हुकूम झाला व वतनाची

---

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६ २ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७

३ म. ना. अप्रपेदरु नं. ६३८

* येथवरच्या मजकुरास आधार : (अ) 'अष्टागरांतील ऋमवंत घराण्याचा इतिहास', ले. श्री. ग. दा. टिल्लू, एम्. ए.; (ब) महाल नागांव अप्रसिद्ध कागद, पेशवे दप्तर, रु. नं. ६३६, ६३७ व ६३८ हे प्रामुख्यानें आहेत. श्री. टिल्लूंच्या पुस्तकांतील साधनांचें मूळ लेखकाने पाहिलें आहे.

रकम अमानत पडूं लागली. नागावच्या तीन पाखाड्यांच्या तीन वर्तकांस मिळून वतनादाखल ३५ रु. सरकारांतून मिळत. त्यांतील ११॥=॥ रुपये सरकारांत अमानत जमा होत गेले. पण ही रकम सांभाळण्यासाठी त्यांतील ४ था हिस्सा इतकी रक्कम महालीं खर्ची पडूं लागली व उरलेले ८॥। रुपये, जेव्हा केव्हा पाखाडीचा कायदेशीर वर्तक ठरेल, तेव्हा त्यास मिळावयाचे, असें ठरलें. नख्त रकमेप्रमाणे वर्तकास कांही बागायत मोईन म्हणजे नेमणूक होती; तीही वरीलप्रमाणें अमानत राहात गेली.[1] आंगऱ्यांचें संस्थान खालसा होईपर्यंत भावई पाखाडीचें हें वतन अमानत होतें.[2]

**कुंभारांचें मेहतरपण** — इ. स. १८२० च्या सुमारास कुंभारांच्या वतनावरून वाद उत्पन्न झाला व त्या वतनाची रक्कम सरकारांत अमानत पडत गेली. मेहतर म्हणजे जातीचा मुख्य अगर पुढारी. गांवगाड्यांत कुंभार, धोबी इत्यादि मानकरी असत व त्यांचे मानपान असत. कुंभारांचें मेहतरपण इ. स. १८२५ पर्यंत अनिर्णीत होतें असें दिसतें.[3]

इ. स. १८१६–१७ मध्ये गोलक समाजाच्या वृत्तीसंबंधाने असाच वाद उत्पन्न झाला.[4]

**महाजनकीचा वाद** — इ. स. १८२७–२८ त नागाव येथे कुंटे व महाजन यांमध्ये लग्न-प्रसंगींच्या मानाच्या शेल्यावरून वाद उत्पन्न झाला व प्रकरण सरकारकडे गेलें. महाजनांनी महालांत सनद रुजू केली व वहिवाट सांगितली कीं आजवर महाजनकीच्या मानपानाचा आम्ही अनुभव घेत असतां अलीकडे कुंटे यांचे घरीं सासवनेकरांकडील लग्नाचा जानवसा आहे; तेथे कुंटे मानपानावरून वाद करणार आहेत. तक्रारीप्रमाणे वाद उत्पन्न झाला; तेव्हा सरकारनें मानाच्या वस्तु – १ रु. रोख शेल्याबद्दल; नारळ २, या अमानत ठेविल्या.[5]

इ. स. १८३३–३४ मध्ये महाजन व नागावचे ग्रामस्थ यांमध्यें गणपतिपूजनाच्या रकमे-बद्दल वाद उत्पन्न होऊन तीहि रकम सरकारांत अनामत पडूं लागली.[6]

**प्रभूंचा पुनर्विवाह** — कायस्थांमध्ये पुनर्विवाह रूढ होता. खंडो बल्लाळ यांचा पुत्र जिवाजी खंडेराव कुलाब्यास आला असतांना नागावचे त्रिंबक महादेव डबीर व साबाजी तुकाजी चिटणीस यांबरोबर चर्चा करून त्यांनी ठरविलें कीं कायस्थांत पुनर्विवाह होऊं नयेत. त्यांनीं एकमुखी निर्णय घेतला; पण बाबूराव नरहरि दिमत मानाजी आंगरे- यांनी हा निर्णय मोडून पुनर्विवाह केल्यामुळें नागावच्या कायस्थ समाजांत खळबळ झाली व हें प्रकरण अंतीं नारायणराव पेशव्यांकडे गेलें. पेशव्यांनी निर्णय दिला की प्रभु समाजांत पूर्वीप्रमाणे पुनर्विवाह रूढ असावा. यामुळें प्रभु-मंडळी पेशव्यांवर रुष्ट झाली.[7]

येथवर सांगितलेले न्यायनिवाडे दिवाणी कोर्टांतील खटल्यांप्रमाणें आहेत. अशा स्वरूपाचे न्यायनिवाडे महालांत न चालतां सरखेल आंगऱ्यांच्या सूचनांनुसार पंचांसमक्ष चालत; आंगरे-सत्ता त्या निवाड्यांस मान्यता देई अगर स्वतः न्यायदान करी. पण ज्यावेळीं एखाद्या वादाचें स्वरूप आंगरेसत्तेच्या मर्यादित क्षेत्राहून मोठ्या क्षेत्राचें असेल, तेव्हा तो वाद पेशव्यांपर्यंत जाई व मराठी सत्ता अंतिम निर्णय घेई. ऋग्वेदांच्या उपाध्येपणाच्या वादांत त्यांच्या ब्राह्मण-त्वाचाच वाद आनुषंगिक म्हणून खेळत राहिला व त्याला व्यापक स्वरूप आलें. तोच प्रकार प्रभूंच्या पुनर्विवाहप्रकरणाचाहि असल्यामुळे, ते निर्णय पेशवेसत्तेने दिले व आंगऱ्यांनी ते मान्य केले; त्यांमुळे अशा वादांत अगर निर्णयांत एकमुखीपणा व सुसूत्रता राहिल्याचें दिसतें. महत्त्वाच्या

---

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३८
२ कोंजरु नं. १३७, पृ. ३१
३ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७
४ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६
५ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७
६ म. ना. अप्रपेदरु नं. ६३८
७ आंज. ३७५; समापेरो २, क. ११४४

सर्व फिर्यादी अतिशय पद्धतशीर चालत. सर्वांच्या जबान्या शपथेवर घेतल्या जात. पुराव्याचे कागदांची छाननी कसोशीने होई. न्यायदानांत सत्ता ढवळाढवळ करीत नसे. त्यामुळे आंगरे व पेशवे यांस व त्यांच्या न्यायाधीशांस न्यायनिष्ठुर हें विशेषण लावावें लागेल. पेशव्यांच्या अगर आंगऱ्यांच्या राज्यांत न्यायदेवता पक्षपाती झाल्याचा बदलौकिक नाही. निवाडा झाल्यावर लेखी निवाडापत्र सादर होई; गुन्हेगारास शिक्षा होई; पण निकाल रेंगाळत राहण्याचे प्रकार बरेच चालत असेंही उघड दिसतें. हें म्हणणें, अर्थात्, मोठ्या फिर्यादींबाबत झालें.

अनेक फिर्यादी किरकोळ स्वरूपाच्या असत व त्यांचा निकाल आंगऱ्यांच्या महालांत लागे. आंगऱ्यांच्या राजवटींत अनुभवी मनुष्याचा समजूतदारपणा हाच न्यायाचें अधिष्ठान होतें, असें किरकोळ फिर्यादींबाबत म्हणतां येईल. पुढील फिर्यादी व त्यांचें स्वरूप पहा:—

## किरकोळ फिर्यादी

इ. स. १७९८–९९–रघु घरत नागावकर याची सून जातिबाह्य झाली होती. तिला जातींत घेण्यासाठी चार रुपये सरकारांत भरून जातींत परत घेण्यांत आलें.[1]

इ. स. १८१०–११ – न्हावी अर्धी हजामत करून उठून गेल्याची फिर्याद महालांत दाखल झाली. न्हावी दोषी ठरला. त्यास ·।।· रु. दंड झाला.

इ. १८१२ फेब्रु. २३ – दोन माणसांनीं संगनमत करून तिसऱ्याच्या वाडींत आग लाविली. सदर दोघांनी गुन्हा केल्याचें चौकशींत सिद्ध झालें. दोघांस प्रत्येकी १ रु. मसाला झाला.

इ. स. १८१२–१३ – (१) वेठीस बोलावलें असतां आला नाहीं. ८= मसाला भरावा लागला.

(२) तेल्याच्या घाण्याचें लाकूड होळींत टाकून व्यवसायाचें साधन नष्ट केलें. गुन्हेगारास २ रु. मसाला लावला.

(३) क्ष मनुष्य य चे बायकोशीं झोंबला असें फिर्यादींत सिद्ध झालें. गुन्हेगारास १ रु. दंड झाला.

इ. स. १८१५–१६ – (१) न्हाव्यानें गावांत हजामतींचा बोभाटा पाडला. न्हाव्यास १ रु. दंड झाला. हा न्हावी वतनदार अगर बलुतेदार असला पाहिजे; कारण बलुतेदार न्हाव्यावर बंधन असे. बोभाटा पडण्याचें कारण उघड आहे. तिथि, वार, योग, नक्षत्र, करण इत्यादि गोष्टी ध्यानीं घेऊनच हजामतीचा (ब्राह्मणांचा) दिवस ठरत असे व काम न्हाव्याच्या आटोक्याबाहेर जाई!

(२) कृष्णा हेटकरी गावांत मोलमजुरी करतो; पण वेठबेगारीस बोलाविलें असतां येत नाही. हेटकरी रजा घेऊन आलेला सरकारी नोकर होता. सरकारी नोकरास वेठबेगारीचा उपद्रव द्यावयाचा नाही, असा शिरस्ता होता. पण त्यानें मोलमजुरीस जाणें अयोग्य असताहि जातो; वेठीचे वेळीं तेवढी सरकारी नोकर असल्याची सबब सांगतो, असें फिर्यादीचें स्वरूप होतें. निर्णय होऊन कृष्णास १ रु. दंड झाला.

(३) न्हाव्यानें हजामत करण्याचें नाकारलें. त्यास ·।।· रु. मसाला झाला.

(४) बोलावलें असतां न्हावी हजामतीस आला नाही. न्हाव्यास ·।· रु. दंड झाला.

(५) एक मनुष्य भंडाऱ्याकडे माडी पिऊन त्याच्याच घरांत शिरला. गुन्हेगारास २ रु. मसाला झाला.

---

१ आंदरु नं. १३४, पृ. ३३

( ६ ) बापु विठ्ठल कवल्या याचीं भुतें राघोबा मराठे याचे घरीं गेलीं, असें देवकी रावतीण हिने सांगितलें ( देवकी रावतीण ही देवाला कळे लावून निर्णय घेणारी गुरत्रीण. ) बापु विट्ठल यास १५ आणे मसाला झाला.

( ७ ) भाजी घेतली, पण पैसे न देतां शिवीगाळ केली. गुन्हेगारास ·॥· रु. दंड झाला.

इ. स. १८१८-१९–( १ ) मोकाट घोड्याने शेतांतले राब खाल्ले असें सिद्ध झालें. घोड्याचे मालकास ·।· रु. मसाला लावला.

( २ ) बाईने एका पुरुषास मारलें व शिव्या दिल्या. बाईस ·।।· रु. दंड झाला.

( ३ ) ब्राह्मणानें दुसऱ्या ब्राह्मणास शेंडी धरून मारलें. गुन्हा करणाऱ्या ब्राह्मणास एक रुपया मसाला द्यावा लागला.

( ४ ) न्हावी माडी खाऊन झिंगला व त्याने शिवीगाळ केली. त्यास १ रु. दंड झाला.

( ५ ) एकाने दुसऱ्याच्या वाडींतील नारळ चोरले असें सिद्ध झालें. चोरास ·।।· रु. गुन्हेगारी द्यावी लागली.

( ६ ) एकाने दुसऱ्यास सोटा मारिला. ·।।· रु. दंड झाला.[1]

इ. स. १८१९–२०–बायकांनी आपसांत मारामारी केली; त्याची फिर्याद महालांत निवाड्यास आली. बायकांस २ रु. मसाला झाला.[2]

( २ ) समसेन [ सॅम्सन् ] काजी जमातींत बसला होता. समा [ सॅम ] तेली तेथे दारू पिऊन आला व अद्वातद्वा बोलूं लागला. त्याने काजीचा हात धरला. समा तेल्यास १ रु. मसाला झाला.

( ३ ) रघु शिंदा याची बायको जानकी हिला सोन्या गुलाम याने बदअंमल करून पळवून नेलें व रेवदंडच्या विठू भंडाऱ्याकडे जाऊन राहिला. विठू व रघू शिंदा या दोघांस प्रत्येकी १ रु. मसाला झाला. [ सोन्या गुलाम म्हणून सुटलेला दिसतो. ]

( ४ ) विष्णु गणेश दातार यांच्या वाडीच्या मसुद्याबाबत खटला पडला त्या बाबतींत नरसिंगराव दातार (?) याजकडून १ रु. मसाला घेतला.

( ५ ) दिवाणखारीच्या बंदिस्तीस शेती जोली (?)वर आले नाहीत. सबब मसाला ·।= रु. गोविंद शेवडा, तुकाजी शेवडा व देवजी पाटील यांस–प्रत्येकी दोन आणे.

( ६ ) चांभार नागावकर याने कातडीं द्यावयाचें कबूल करून दिलीं नाहीत; सबब मसाला ·।· रु.

( ७ ) रामचंद्र गंगाधर गाडगीळ यांनी सागवानी लाकडें सनदेशिवाय तोडलीं. सबब त्यांस मसाला १८ रु. झाला.[3]

१८२० जाने. २०, छ १० जखर उर्फ माघ :

रामा कुंभाराच्या मुलीचें लग्न धर्मा कुंभाराशीं ठरलें; पण मुहूर्तसमयीं रामा हजर नव्हता. लग्न झाल्यावर त्याने फिर्याद केली की मी नसतां लग्न कसें लावलें ? चौकशींत रामा दोषी ठरला; त्यास ३ रु मसाला लावला.

इ. स. १८२०–२१–( १ ) खारींतील मासे खारीच्या मालकास न विचारतां धरून नेल्याचें सिद्ध झालें. मासे नेणारास ·।· रु दंड झाला.

( २ ) धाऱ्या गुरव कृष्ण गुरवास म्हणाला कीं तूं माझ्या बापाचे पोटचा नव्हेस ! फिर्याद

---

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६ २ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७

३ आंदरु नं. २४९, पृ. १०९;

आंदरु नं. २४६, पृ. १००, १०१

झाली. घाऱ्यास ।।' रु. दंड झाला.

( ३ ) ऋणकोचे अपरोक्ष धनकोने कागदावर साक्षीदारांच्या सह्या घेतल्या. धनकोस चार रुपये मसाला झाला.

( ४ ) इ. स. १८२०–२१–मध्ये पायरलीच्या तळयावर हवालदार व गावकरी यांनी एक खांब पुरला व त्याजवळ एक झाड लाविलें. खांबासाठी झालेल्या खर्चाच्या रकमेवरून वाद होऊन महालीं फिर्याद झाली. नागेश्वर मंदिराच्या यात्रेसाठी जी आकारपट्टी होत असे, तींतून खांबाचा खर्च करावा, असें एका पक्षाचें म्हणणें होतें. निवाडा झाला की खर्च आकारपट्टींतून होऊं नये.[1]

इ. स. १८२२–२३–(१) न्हावी वाजंत्र्याचें काम करीत. राघो न्हावी याचा बाजा शिमग्यांत चोरीस गेला. तीन चोर सांपडले; त्यांस एकूण १ रु. मसाला द्यावा लागला.

( २ ) परगावीं जात असतां चांभार वस्तीस राहिला. दोष नसतां त्यास जातिबहिष्कृत करण्यांत आलें. बहिष्कार घालणारांस प्रत्येकी ।।' रु. दंड झाला.

इ. स. १८२३ फेब्रु. १–छ १९ सवाल.

( ३ ) दाजी जोशी गोलक यांनी कुणबी, माळी यांजकडे लग्न झालें असतां मंडपस्थापनेसमयीं वर्तक व चोघले या वतनदारांस विचारून आरंभ करावयाचा, अशी पूर्वापार रीत होती ती मोडली. बापु वर्तक जिराइती याजकडे मुलाचें लग्न झालें, त्यावेळीं त्यांनी वर्तकांस विचारलें नाही; सबब गोलक दाजी जोशी यांस १ रु. मसाला महालांतून करण्यांत आला.

[इ. स. १८२१–२२] इसन्ने अशरीन मयातैन आलफ (१) परीट जातीची सासू दारु प्याली व सुनांस मारूं लागली. एक सून तळयांत जीव देण्यास गेली, तें महालच्या शिपायाने पाहिलें. सासऱ्याने सासूस आवरावें, तें केलें नाही; तेव्हा महालांतून परीट सासऱ्यास ८ आणे मसाला झाला.

(२) सर्व वस्तूंची वांटणी झाली; पण आजीचे अंगावरचे दागिने वांटावयाचे राहिले. तिचे पश्चात् त्यांतील हिस्सा दिला नाही, म्हणून फिर्याद झाली. न देणारास २ रुपये दंड झाला.

(३) दुकानदाराने गिऱ्हाइकास जिन्नस कमवजन दिला असें सिद्ध झालें. दुकानदारास चार आणे दंड झाला.

(४) स्वतःच्या वाडींतील आंब्याचें झाड सरकारपरवानगीशिवाय तोडलें. तोडणारास ८ आणे दंड झाला.

(५) भंडाऱ्याने माडाच्या पोय्या बांधल्या; पण माड वाहिले नाहीत. त्यामुळे वाडीवाल्याचें नुकसान झालें. भंडाऱ्यास ८ आणे दंड झाला.

इ. स. १८२२ एप्रिल ८– फिरस्ता जोगी याचे जातीगोताचा तंटा पडला. तो महालांत फिर्यादीस आला. त्याची महालांत छ १५ रजब रोजीं समजूत केली. समजुतीदाखल त्याचेकडून ३ रु. घेतले, ते महालीं जमा केले.

इ. स. १८२३–२४–(१) नथुभट गुजराथी याने बाबाजी बलाल गोडबोले यांच्या कुणबिणीशीं मारामारी केली. नथूभटास ७ आणे मसाला केला.

(२) देवालयाचे वाडींतील झाड सरकारांत खबर न देतां तोडलें. तोडणारास ८ आणे मसाला झाला.

(३) कुंपण तोडून आंत गुरें भरलीं. भरणारास ८ आणे दंड झाला.

---

१ म. ना. अप्रेपेदरु नं. ६३७

(४) आईस शिवीगाळ करून दोन दिवस उपवासी ठेवलें. मुलास १ रु. मसाला केला.

(५) चाकरी टाकून दुसऱ्याकडे कामास जाऊं लागला. तसें करणारास चार आणे दंड झाला.

इ. स. १८२३ जुलै २१– छ १२ जिल्काद.

(१) बच्च्या गुरवाने सरकारच्या शिपायाशीं बेकैद वर्तन केल्यामुळे त्याला बेडी घालून महालांत आणला. त्यास सोडून देण्याबद्दल ग्रामस्थांनी रदबदली केली; म्हणून त्याजकडून गुन्हेगारी-दाखल ५ रुपये मसाला घेतला. सरकारांतून बेडी तोडण्याबद्दल सनद सादर झाली व मग बेडी तोडण्यांत आली.

(२) सोइरी विधवा हिने घरटक्का भरला; पण टीपेपूर्वीं पाट लावला. सबब, तिने भरलेले १॥।≈ रु. तिला महालांतून परत करण्यांत आले.

[ इ. स. १८२३ सप्टेंबर १० ] छ ४ मोहरम, आर्बा अशरीन मयातैन आलफ–

नागांवच्या ग्रामस्थांचा गणपति श्री भीवेश्वराचे देवालयांतून दरसालप्रमाणें, समारंभानें नेत होते. वाजंत्र्यांस मार्गांत अकारण अडथळा करून सरकारची द्वाही दिली. द्वाही देणें म्हणजे राजा अगर सत्ताधारी यांचे नांवें शपथ घालणें. या प्रकाराबद्दल समस्त ब्राह्मणांनीं महालांत फिर्याद केली. तेव्हां, आरोपी नं १ बापुशास्त्री शुक्ल यांना वाजंत्री आडवून स्वमुखें ग्वाही दिली, म्हणून २ दोन रुपये मसाला महालांतून करण्यांत आला. आरोपी नं. २ बगाजीपंत महाजन यांनी अडथळा करण्याचा व नवीन रूढि पाडण्याचा प्रयत्न केला व बापुशास्त्री शुक्ल यांचे मुखें सरकार-आज्ञा उच्चारविली; सबब दोन रुपये मसाला करण्यांत आला.

[ इ. स. १८२३ ऑक्टोबर ६ ] छ १ सफर उर्फ आश्विन – पर्जन्यवृष्टि व्हावी, म्हणून नागावकरांनी श्री भीमेश्वर मंदिरांत महाद्वारीं महारुद्र करावयाचें ठरविलें व ग्रामस्थांतील एका गृहस्थांची यजमान म्हणून नेमणूक केली. पण, अनुष्ठानाचे आरंभीं, यजमानत्व तुम्ही करूं नये, अशी सरकारची द्वाही दिल्यावरून, महालांत रघुनाथ बल्लाळ महाजन यांस ५ रुपये व राघो अनंत महाजन यांस २ रुपये मसाला करण्यांत आला.

[ इ. स. १८२३ ऑक्टोबर १८ ]छ १३ सफर–बाळ ठाकूर याच्या बायकोने विष्णु महादेव आठवले याचे कुणबिणीस पळून जाण्याबद्दल हिकमती शिकविल्या; बाळ ठाकूर याच्या बायकोस ८ आणे दंड महालांतून करण्यांत आला.

[ इ. स. १८२७ जून ५ ] छ ९ जिल्काद – बाबु गुरव याने श्री देवदेवेश्वराचा नंदादीप सरकारतर्फे लावावयाचा असे. छ मजकुरीं रात्रीं देवळांत दीप लावला नव्हता असें सिद्ध झालें. गुरवास ८≈ दोन आणे मसाला लावण्यांत आला.

[ इ. स. १८२६ नोव्हेंबर २८ ] छ १८ रबर उर्फ कार्तिक – खुमतेली, वास्तव्य महाल नागाव याने बापु तेली याचेबरोबर तंटा करून महालांत फिर्याद केली की, बापु तेली गावांत तेल विकावयास नेऊन आपलें नुकसान करितो. खुमतेली म्हणजे गावच्या नेमणुकीचा, प्रतिष्ठित तेली होय. महालांत चौकशींत असा रिवाज उघड झाला कीं, प्राचीन काळापासून गावच्या नेमणुकीच्या तेल्याने तेल विकीत गावांत फिरावें; तसें स्पष्ट ठरलेलें होतें. खुमतेली याने ठराव मोडला हें सिद्ध झालें. शिवाय, बापु तेली यास, तो गावांत तेल विकतो या सबबीवर, खुमतेल्याने व इतर सहा जणांनी जातीवेगळा टाकण्याची कारवाई केली होती. महालांत खुमतेली व सदर सहाजणांस मिळून ३॥ रु. मसाला झाला.

[ इ. स. १८२८ ऑगस्ट १३ ] (१) रोंग्या प्रधान व बाबा प्रधान पाडेकरी यांनी

जंजिरे कुलाबा येथे श्रावण महिन्यांत सोनचाफ्याचीं फुलें गावापैकी तोडून द्यावयाची, अशी चाल होती. या वर्षी तीं दिलीं नाहीत, म्हणून त्यांस महालांतून प्रत्येकीं ८‒ आणा दंड करण्यांत आला.

(२) कुळाने अर्धेलीने एक शेत केलें. पण शेतमालकास न कळवतां भारे बांधून नेले. कुळास ८‒ एक आणा दंड झाला.

(३) वर्तकांकडील मक्त्याचे भाताबद्दल कांही वाद उत्पन्न झाला. महालांतील अधिकाऱ्यांनी तें रघु थळे याजकडे अनामत ठेविलें. रघु थळे यानें परवानगी न घेतां तें दुसऱ्या कुळाचे स्वाधीन केलें. त्यावरून थळे यास महालांतून ८= दोन आणे दंड झाला.

(४) एकाचें घोडें, मालकास न विचारतां, दुसऱ्यानें वरातीसाठीं दिलें. देणारास महालांतून चार आणे दंड झाला.

(५) महालांतून वाडीची जप्ती केल्याचें जाहीर करण्यांत आलें असतांहि, परवानगीविना वाडीची वहिवाट करतो, असें आढळून आलें. गुन्हेगारीबद्दल ८= दोन आणे दंड करण्यांत आला[1].

[इ. स. १८२९‒३०] सलासीन मयातैन आलफ–मांडणशेट गुजर याने सखारामशेट सोनारापासून रोख पैसे देऊन सोनें खरेदी केलें; पण तें वजनांत कमी भरलें. गुजराने सोनारावर महालांत फिर्याद केली. सोनारास चार आणे दंड झाला.

[इ. स. १८३०‒३१] (१) ताकीद देऊनहि आपल्या वाडीची वही कुडली नाही, अशी फिर्याद शेजारच्या वाडकरांनी केली. शेजाऱ्यांच्या जिन्नसांत गुरें जाऊन नुकसान झाल्याचें महालीं सिद्ध झालें. गुन्हेगाराला ८ आणे मसाला झाला.

(२) गण्या गुरवाने घाऱ्या गुरवाच्या शेतांत न विचारतां आवण लावल्यामुळे घाऱ्याने महालांत फिर्याद केली. गण्या गुरवास चार आणे मसाला भरावा लागला.

(३) भागीरथी मांजरेकरीण भंडारीण हिने बदअंमल केला असें महालीं सिद्ध झालें. तिचेकडून वीस रुपये खंड वसूल करण्यांत आला.

[इ. स. १८३२ जुलै १९] छ २० सफर–ठकी प्रधानी हिजवर भाऊबंधांनी द्वेषाने आरोप केला. चौकशी केली असतां आरोप खोटा ठरला. मग भाऊबंधांनी ठकीची व्यवस्था करून दिली व दंड होऊं नये म्हणून महालांत 'अंतस्त' म्हणून चार रुपये भरले.

[इ. स. १८३२ ऑक्टोबर ६] छ ११ जवल–बहीर चोघला याने दारू खाऊन रात्रीं मारामारी केली. त्यास महालांत आणून बसवून ठेवलें. त्याची गावांत धिंड काढावी, असें महालच्या अधिकाऱ्यांनी सांगितलें. ती निघूं नये, म्हणून चोघल्याने महालांत 'अंतस्त' म्हणून १ रु. भरला.

[इ. स. १८३२ ऑक्टोबर १८] छ २३ जवल.

(१) भिकु फटजी यानें चोरीचे शले अलीबागकर सोनारास विकले. चोरीचा माल, तेव्हा स्वस्त दराने विकला. हें प्रकरण महालांत गेल्यावर विक्रींतील तफावत महालांत सोनाराकडून भरून घेतली व महालांत १।।। रु. जमा केले.

(२) दामाजी नाईक कोचरेकर मयत झाला. सबब त्याच्या शेताचें निम्में उत्पन्न सरकारांत आणलें. त्यांत पेंढे सुमार १०० आले; त्यांची किंमत बारा आणे महालांत जमा केले.

(३) बाळाजी नाईक पाटणकर याची म्हैस ५।४ वर्षे वीत नाही, असें त्याने महालीं सिद्ध केलें. त्याच्याकडून इ. स. १८३१ चा वसूल केलेला वनटक्का रु. १ त्यास परत करण्यांत आला.

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७

[ इ. स. १८३४ सप्टेंबर २ ] गोपाळ गुजर याच्याकडे गणेश बापु भिडे याचे रुपये येणें होते. त्यांची फेड गोपाळशेटच्या बापाने केली होती; बापाच्या मृत्यूनंतर भिडे यांनी खत काढून मागणें केलें. महालांत चौकशी झाली; तींत असें निष्पन्न झालें की भिडे खोटा आरोप करून मागणी करतात. तेव्हा भिडे यांजकडून २५ रु. दंड म्हणून प्रथम वसूल करण्यांत आले. पैकीं २० रु. त्यांस परत करण्यात येऊन ५ रु महालांत जमा करण्यांत आले.

[ इ. स. १८३५ जानेवारी १७ ] रमजान १७, खमस सलासीन मयातैन आलफ.

अलीबागकर कोळी याने पांडु म्हात्रा याच्या वाडींतील पुनईचें झाड तोडतांना भंडाऱ्याच्या माडी काढण्याच्या घडया फुटल्या. महालांत घडयांची किंमत भरून घेण्यांत येऊन कोळयास चार आणे दंड करण्यांत आला.

इ. स. १८४०–४१ मध्ये नागाव महालांतून ९॥।~॥। रु. खंडगुन्हेगारी जमा झाली होती.[१]

महाल नागावांत होत असलेल्या न्यायनिवाडयांचें स्वरूप समजण्यासाठी हीं उदाहरणें दिलीं. फिर्यादींचे सर्व प्रकार त्यांत आले आहेत. त्यांवरून घ्यानांत येतें की फिर्यादींचें व कलहांचें स्वरूप अत्यंत सौम्य होतें. सराईत गुन्हेगारी अगर बौद्धिक विस्मय निर्माण करणारी बाब या फिर्यादींतून पुढे आलेली दिसत नाही.

या प्रकरणीं खंड, दंड व मसाला हे तीन शब्द वारंवार आले आहेत; ते मूलतः भिन्न असलें, तरी नंतरच्या काळांत समानार्थाने वापरले जाऊं लागले होते.

या फिर्यादींतून कुणबिणी बाळगण्याची पद्धति अष्टागरांत रूढ होती ही गोष्ट उघड होते. सार्वजनिक गणपतीची चाल नागावांत होती, हें घ्यानांत येतें. कोणत्या जातीच्या मनुष्याची अब्रू कोणत्या बाबतींत मानली जाई, अगर कोणाचा मानबिंदु कोणता, याचा कयास करतां येतो. त्या दृष्टीने, जेथे 'अंतस्त' रकम दिल्याचें सांगितलें आहे, तीं उदाहरणें जरूर पाहावींत. जीवनाचें साधन नष्ट करणाऱ्या गुन्हेगारांवर, त्यांतल्या त्यांत, करडी नजर असल्याचें आढळून येईल.

---

१ कोंजरु नं. १३७, पृ. ३०

# ब्राह्मणसमाज

## पहिली वसाहत :

इ. स. १३६७ मधील शिलालेखामुळे, नागावांत पहिली वसाहत केव्हा झाली असावी, याचा अजमास लागतो. शिलालेखांत कवल्या, म्हात्रे, पाटील, दातार हीं आडनांवें आलीं आहेत. ' कवल्या ' हें गुरवाचें आडनांव असल्यामुळे, नागावांत त्या काळांत मंदिरें असल्याचा अप्रत्यक्ष पुरावा मिळतो. म्हात्रे हे क्षत्रिय माळी आहेत. दातार हें आडनांव ब्राह्मणाचें असल्यानें, पहिल्या वसाहतींत कांहीं ब्राह्मण होते हें निर्विवाद आहे.

## दुसरी वसाहत :

विजयनगरचें कोकणांतील साम्राज्य मोडून मुसलमानी राज्य निर्माण झालें; त्या सुमारास नागावची वसाहत मोडली असावी. आदिलशाही अगर निजामशाही सत्ता नागावांत स्थापन होऊं लागली, त्या वेळीं, राज्यक्रान्तीचा अगर सत्तान्तराचा परिणाम म्हणून जें अराजक निर्माण झालें, त्यांत पहिली वसाहत पांगली व नवी सत्ता स्थिर झाल्यावर दुसरी वसाहत स्थिर झाली असावी. शिवाजी राजांच्या काळांत ही दुसरी वसाहत नांदत होती व महाजन, लोंढे, वर्तक, पाईक, ठोसर, कुलकर्णी, कुंटे हीं घराणीं नागावांत होतीं.[1] यांपैकी ठोसर कऱ्हाडे ब्राह्मण असून महाजन, लोंढे, कुंटे हीं कोकणस्थ ब्राह्मणांचीं घराणीं आहेत. आजहि तीं नागावांत नांदत आहेत. कुंटयांच्याच एका शाखेकडे महाजनकीचें वतन असल्यामुळे हें घराणें मूलतः एक असावें. हीं ब्राह्मणघराणीं शेती – बागायत करीत. कुंटे घराणें सावकारीहि करी असें वर दिलेल्या लेखावरून उघड आहे. कुळकर्णी प्रभु असून वर्तक क्षत्रिय – माळी आहेत. ही वसाहत इ. स. १६९५ च्या सुमारास, औरंगजबाचें सैन्य जेव्हां अष्टागरांत चौल येथे मुक्काम करून बसलें व विलक्षण महर्घता अष्टागरांत निर्माण झाली, तेव्हां उठून गेली असावी. या काळचा अष्टागराचा कांही राजकीय इतिहास शिवचरित्रसाहित्य खंड ९ व आंगरेकालीन अष्टागर या पुस्तकांतून आला आहे. त्यांवरून दुसऱ्या वसाहतीच्या वाताहतीचा अंदाज मांडला आहे.

## तिसरी वसाहत :

इ. स. १७१० च्या सुमारास, नागावच्या तिसऱ्या वसाहतीस प्रारंभ आंगऱ्यांच्या प्रेरणेनें झाला. परागंदा झालेलीं जुनीं घराणीं परत येऊन नांदूं लागलीं. इ. स. १७१० ते इ. स. १७६० या कालांत अराजक मोडलें व शांततेचा – सुरक्षिततेचा काल सुरू झाला; म्हणून आपली माहितीहि, अर्थात्, इ. स. १७६० नंतरच्या कालांतील आहे.

येथे तीन वसाहती असा जो उल्लेख केला, तो मोघम आहे असें समजावें; वस्ती प्रत्येक वेळीं पूर्ण मोडली असें अभिप्रेत नाही. दुसऱ्या वसाहतींतील कांही घराणीं नागावांतून गेलीं, तीं परतलीं नाहीत. उदाहणार्थ, जुवेकरांनी आपली मालमत्ता वैजनाथ ज्योतिषी यांस विकली; तीच पुढे कोल्हापूरच्या छत्रपतींनी कान्होजी आंगऱ्यांमार्फत त्यांस इनाम करून दिली. हे जुवेकर

---

१ आंदप नं. ६३७, पृ. ११५, ११६

परतले नाहीत. कांही नवीन घराणीं येऊन नांदूं लागण्याचा क्रम सुरू झाला; त्यांचे उल्लेख पुढे येणार आहेत. या कालांत आपली मालमत्ता विकून पोर्तुगीझ बागायतवाले नागावांतून अन्यत्र निघून गेले; कारण, आंगऱ्यांचें म्हणजे पोर्तुगीझांच्या शत्रूचें राज्य आता नागावांत निर्माण झालें.[१]

## घरटक्का माफ :

नागावांतील एकूण घरें व त्यांत ब्राह्मणांचीं घरें किती हें समजण्यासाठी तक्ता पृष्ठ २३, पाहा.

मंदिरें हीं सार्वजनिक ठिकाणें; म्हणून कोणाचीच वस्ती नसलेलीं घरें होत. तीं व महालाची इमारत, नाकीं, मेटें यांची संख्या एकूण घरांतून वजा केल्यास ब्राह्मणांच्या घरांचें इतरांच्या घरांशीं प्रमाण अंदाजतां येतें. सर्व ब्राह्मणघरें नागावांतील आहेत. महालांतील बागमळा व दिवाण-खार येथे ब्राह्मणाचें एकहि घर, या कालांत नव्हतें. सारांश, नागावांतील ब्राह्मणघरांची संख्या मोठी आहे. त्यामुळे नागाव प्रामुख्यानें ब्राह्मणवस्तीचा गाव होता. ब्राह्मणांच्या घरांवर घरटक्का आकारला जात नसे. प्रभूंवरहि घरटक्का नाहीं. ब्राह्मण व प्रभूंचा सुबुद्ध सुशिक्षित समाज नागावांत नांदावा, या दृष्टीने सत्ताधारी आंगऱ्यांनी घरटक्क्याची त्यांस माफी दिली असावी.[२]

## वनटक्का माफ

ब्राह्मणमंडळींस वनटक्का माफ होता. वनटक्का म्हणजे गुरेंढोरें पाळण्यावरील कर होय. पारड्या, वांझ म्हशी यांवर वनटक्का आकारीत नसत.[३] कोणत्याहि जातीच्या वाडकरानें शेतीसाठी खरेदी केलेल्या बैल–टोणग्यांवरहि कर नव्हता. इ. स. १८१२-१३ मध्ये सरकार व नागावची प्रजा यांमध्ये बागायत ऊर्जितावस्थेस आणण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण चर्चा व कलमबंदी झाली. त्या वेळीं सरकारनें मान्य केलें की वाडकर शेतीसाठी जनावरें विकत आणतील, त्यांवर वनटक्का व जकात आकारण्याचा शिरस्ता नाही; तेव्हा, यापुढेही हे कर आकारले जाणार नाहीत.[४] नागावांत गाई पाळल्या जात होत्या. गाय कोणाकडेहि पाळली जावो, तिच्यावर वनटक्का आकारीत नसत. तेव्हा, वनटक्का म्हणजे केवळ म्हशी पाळण्यावरील कर असा मर्यादित अर्थ नागाव महालापुरता तरी होता. वनटक्क्याबद्दल अन्यत्र अधिक हकीकत दिली आहे. तीवरून ब्राह्मणांस वनटक्का माफ केल्याचीं उदाहरणें बरींच आढळतील.[५]

ब्राह्मणांस दुभत्याकरितां म्हशी आणण्यास सरकारची परवानगी घ्यावी लागे व ती देण्याचा शिरस्ता होता. त्यावेळीं सरकारांत 'नजर' द्यावी लागे. सामान्यतः दर म्हशीमागे दोन रुपये द्यावे लागत. पण ते किती कमी घ्यावेत, हें म्हैस खरेदी करणाऱ्या ब्राह्मणाच्या व सरकारच्या संबंधांवर अवलंबून असे. कांही वेळां नाममात्र चार आणे घेतले जात; कांही वेळां दोन रुपये आकारून एक रुपया 'बक्षीस' म्हणून परत दिला जाई.[६] इ. स. १८३९-४० मध्ये सरकारी धोरणांत अगर विचारसरणींत कांही फरक झाला असावा असें वाटतें. बाळाजी महादेव लेले यांस अर्धा वनटक्का माफ व अर्धा वसूल देण्याची सनद आंगऱ्यांनी दिली आहे. तेव्हा,

१ अप्र. कागद–खरेदीखतें; आंदरु नं. ६३८, पृ. १६१

२ आंदरु नं. ६३७, पृ. १२०

३ आंदरु नं. १३४, पृ. ५७

४ आंदरु नं. ६३७, पृ. १२४

५ आंदरु नं. ६३७, पृ. १२०, १३२; आंदरु नं. ६३६, पृ. १४६, १४७

६ आंदरु नं. २४९, पृ. १०३

ब्राह्मणांजवळून यापुढे वनटक्का वसूल करण्याची प्रथा आंग्न्यांना निर्माण करावयाची होती कीं काय, असा विचार मनांत येतो. वनटक्क्याचा आकार दर म्हशीस १५।। आणे होता.[1]

ब्राह्मणांस वनटक्का माफ कां असावा, असा प्रश्न उद्‌भवतो. त्याबद्दल असा अजमास वाटतो की ब्राह्मणांचा म्हशी पाळण्यामागील हेतु दुग्धव्यवसाय करण्याचा नव्हता, म्हणून ही सवलत असावी. नागावकर ब्राह्मण शेती, सरकारी नोकरी, ठेकेदारी अगर दुकानदारी करीत होते. त्या व्यवसायांवर असलेले कर ते भरीत होते. दुग्धव्यवसाय ब्राह्मणांनी करावयाचा नाही, असा तत्कालीन रिवाज होता व तो मोडून कोणी ' गवळ्याचा ' धंदा केल्याचें उदाहरण आढळत नाहीं ; म्हणून ह्या करांतून ब्राह्मणांची मुक्तता झालेली असावी.

## दारमांडावरील कर माफ

आंग्न्यांनी अनेक ब्राह्मणांना बागायतीबाबत अनेक सवलती, माफी दिल्याचें दिसून येतें; त्यांचें स्वरूप पुढीलप्रमाणे :–

कोंकणच्या बागायती गावांत घरांभोवती नारळ-सुपारीचीं झाडें असतात. परसावांत आपल्या गरजेपुरती नारळ, केळी वगैरेंची बागायत करण्याची रीत नागावांत होती. सरकार त्यांवर कर आकारीत असे. पण विनंति केल्यास ब्राह्मणांस आकार माफ करण्याचा शिरस्ता दिसतो.

| इ. स. | नांव | नारळाचीं झाडें | आकार | आधार |
|---|---|---|---|---|
| १८०१–०२ | अंताजी गणेश सहस्रबुद्धे | ६ | — | आंदरु नं. ६३७, पृ. १३२ |
| १८३९–४० | नारो बाबाजी गोडबोले | ९ | २।।। ।।' | रु. कोंजरु नं.२०१३पृ.१ |

ही माफी एका पिढीपुरती चाले. अंताजी गणेश यांना मिळालेली माडांच्या आकाराची माफी इ. स. १८३८–३९ पर्यंत चालली. ते १८३८–३९ मध्यें वारले. नंतर सदर सहा झाडांवरील आकार वसूल केला जाऊं लागला.[2] पण अशीं उदाहरणें थोडीं होतीं.

## बागायत आकार माफ

| इ. स. | व्यक्ति | बागायत आकार माफ |
|---|---|---|
| १७९९–१८०० | बाल करवंत | |
| | पुराणिकवाडी | ८८≡।। |
| | केशव रामचंद्र | |
| | जोशीवाडी | ६९।।।• |
| | बालकृष्णभट्ट लेले | ११।।।• |
| | विश्वनाथभट्ट लेले | ७।।•।।। |
| | रामकृष्णभट्ट पुराणिक | १२।≡ |

[ आंदरु नं. १३५, पृ. ४८ ]

१ आंदरु नं. ६३८, पृ. १६२ २ आंदरु नं. ६३७, पृ. ११२

| व्यक्ति | बागायत आकार माफ | | झाप आकार माफ | | एकूण आकार माफ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | इ. स. १८१९–२० | इ. स. १८२९–३० | इ. स. १८१९–२० | इ. स. १८२९–३० | इ. स. १८१९–२० | इ. स. १८२९–३० |
| पांडू बाल करवंत | १९।≡।। | २१ | ३८– | ३८– | २२॥.।। | २४८– |
| मुकुंद जोशी | ३६॥=।। | २०।–।. | ६८– | ६८–। | ४२॥≡।।. | २६।=।।. |
| विश्वनाथभट्ट लेले | ७८≡।।।. | ३।।।–।।।. | ·।।।≡।। | १८।।. | ८८≡।. | ४।।।=।. |
| गोविंद बाळकृष्ण लेले | ७।।।.।। | ३।।।≡। | १८≡। | १८≡। | ८।।।≡।।। | ५८=।। |
| बापूभट्ट पुराणिक | ८८=।। | ४।– | १८≡। | १८≡। | ९।–।।।. | ५।।.।. |
| बलवंत वासुदेव नेने | ७६८=।।। | – | ११।।।= | – | ८८८।।।. | – |

[ आंदरु नं. २४४, पृ. ९७; आंदरु नं. ३८४, पृ. १९६ ]

| व्यक्ति | बागायत आकार माफ (झापांसकट) | | हक्कदारी वसुली |
|---|---|---|---|
| | १८३९–४० | १८४०–४१ | १८४०–४१ |
| विष्णु महादेव आठवले | १९।।≡ | २६।।– | – |
| बाल करवंत | २१।।≡।। | २१।।≡।।. | २।।.।। |
| नारो बल्लाळ लेले | २।.।।।. | २।.।।।. | २।।।=।. |
| गोविंद बाळकृष्ण लेले | ३८।।।. | ३८।।।. | ३।।।.।।।. |
| बाबाजी विश्वनाथ लेले | ·।।= | ·।।= | ·।।।. |
| सदाशिवभट्ट लेले | १।।।–।. | १।।।–।. | २।.। |
| वासुदेवभट्ट लेले | २।≡ | २।≡ | २।।।≡।।. |
| सखाराम विश्वनाथ लेले | ·।।≡।। | ·।।≡।।. | ·।।।=।।. |
| बच्याजी हरी आठवले | – | ३।।–।। | – |
| नारो बाबाजी गोडबोले | – | १।।.।।। | – |

[ कोंजरु नं. १३७, पृ. ४१,४२ कोंअरु नं. २०१३, पृ. १. ]

येथे बागायताचा व झापांचा आकार माफ केल्याचे कांही आकडे व दाखले दिले. बाबतीचे पैसे वसूल केले आहेत; कारण, हक्कदारी सरकारने वसूल केली, ती गावच्या वतनदारांस अंतीं मिळावयाची; म्हणून वसूल केलेली दिसते. पण इ. स. १८४०–४१ हें वर्ष सत्तान्तराचें आहे. आंगऱ्यांचा अंमल नष्ट करून कॅप्टन डेव्हिसने इंग्रजी अंमल सुरू केला, तेव्हा त्याने अनेक कर काढून टाकले. ज्यांनी अगोदर भरले, त्यांना पैसे परत मिळाले नाहीत; पण ज्या 'घोरणी' लोकांनी ते भरले नव्हते, त्यांना माफी मिळाली. वर दिलेले कांहीं आकडे त्या स्वरूपाचे आहेत. इ. स. १८३९–४० मध्ये विश्वनाथभट्ट लेले यांच्या स्थावर मालमत्तेचें वांटप झालें. त्यांना वाडीच्या आकाराबाबत सरकारने इनाम म्हणून ज्या सवलती दिल्या होत्या, त्या सवलतींचेंहि, अर्थातच, वांटप झालें.[1]

१ कोंअरु नं. २०१३, पृ. १

वर दिलेल्या तक्त्यावरून ध्यानीं येतें की नागावांत ब्राह्मणमंडळी बागायताचा व्यवसाय करीत होती. ह्या मुद्दा पुढे अधिक स्पष्ट होणार आहे; बागायतटक्क्यांत त्यांना मिळणाऱ्या माफीपुरताच येथे विचार केला आहे.

## झापांचा आकार माफ

बागायतांतील झापांचा शाकारणीसाठी उपयोग होई. अनेक ब्राह्मण मंडळींस झाप इनाम, मिळत अगर त्यांच्या आकाराची माफी सरकारांतून मिळे. पूर्वी कांही उदाहरणें दिलीं; आणखी कांही पुढीलप्रमाणे – [ झापांचा दर दीड रु. शेंकडा आहे. ]

| इ. स. | व्यक्ति | झाप | आधार |
|---|---|---|---|
| १८१९–२० | भटंभट वाडवळ | १०० | आंदरु नं. २४४, पृ. ९५ |
| | रघुनाथभट वझे | ३०० | आंदरु नं. २४४, पृ. ९५ |
| | बाळाजी महादेव लेले | १०० | आंदरु नं. ४७, पृ. ७१ |
| | | | आंदरु नं. २४४, पृ. ९६ |
| | बलवंतराव नेने | ७९१ | आंदरु नं. २४४ पृ. ८८ |
| १८२९–३० | बाबूभट मराठे | ३०६ | आंदरु नं. ३८४, पृ. १९६ |
| | मोरभट बर्वे | ८ | ” |
| | रघुनाथभट वझे | ३०० | ” |
| १८४०–४१ | बाल करवंत | २१२ | कोंजरु नं. १३७, पृ. १७ |
| | बालकृष्णभट्ट लेले | ७६ | ” |
| | विश्वनाथभट्ट लेले | ६८ | ” |
| | बलवंतराव नेने | ५८३ | ” |
| | विष्णु महादेव आठवले | ३०४ | ” |
| | गोपाल खंडेराव | ८ | ” |
| | बापूभट पुराणिक | ७६ | ” |
| | मुकुंद जोशी | ३६० | ” |
| | नारो अनंत | २४ | ” |
| | श्री देव चिंचवड | ६० | ” |

## भातजमिनी इनाम

नागाव व आसपासच्या खेड्यांतून आंगऱ्यांनीं ब्राह्मणांस भातजमिनी वंशपरंपरा इनाम दिल्या होत्या; त्यांत उत्पन्न होणाऱ्या भातावर, ऐनजिनसी वसुली करतांना, इनाम म्हणून कशी आकारणी करीत, याची कल्पना पुढील पत्रकावरून होईल. सर्व ब्राह्मण नागावचे आहेत.

| इ. स. | व्यक्ति | जमिनीचें क्षेत्र बिघे | आकार माफ रु. | आधार |
|---|---|---|---|---|
| १७७०–७१ | | | | |
| | गोपाल केशव जोगळेकर | ३ (दिवाण-खारीलगत) | – | आंदरु नं. ६३७, पृ. १२९ |

| इ. स. १७९९–१८०० व्यक्ति | जमिनीचें क्षेत्र बिघे | आकार माफ रु. |
|---|---|---|
| रघुनाथभट्ट वझे | ५ | ६०॥ |
| नारंभट्ट फडके | १ | १२८~॥ |
| कृष्णंभट्ट करंदीकर | ४ | ४८।= |
| त्रिंबकभट्ट बर्वे | २ | २४८≡ |
| बालकृष्णभट्ट फाटक | २॥। | ३३। |
| बालकृष्णभट्ट लेले | १ | १२८~॥ |
| कृष्णंभट्ट पटवर्धन | १ | ,, |
| आपाभट्ट आचार्य | १ | ,, |
| केशवभट्ट करवंत | २ | २४८≡ |
| लक्ष्मीबाई मराठीण | १॥ | १८८≡ |
| महादेवभट्ट आठवले | ।॥. | ६८॥। |
| बालाजी हरि गोखले | १ | १२८~॥ |
| बाल करवंत | २ | २४८≡ |

| इ. स. १७९९–१८०० व्यक्ति | जमिनीचें क्षेत्र बिघे | आकार माफ रु. |
|---|---|---|
| महादेव करवंत | १६ | २०० |
| मोरो कृष्ण दाभोळकर | ।॥. | ६८॥। |
| हरि नारायण आठवले | ३ | ३६। |
| गणेश रघुनाथ काणे | ५ | ६०।. |
| नथोबा नाईक पैठणकर | ५ | ,, |
| विसाजी भिकाजी निमकर | १ | १२८~॥ |
| केशव हरि नेने | ३ | ३६। |
| भिकाजी महादेव कोल्हटकर | १० | १२१॥।≡ |
| गोविंद राम परांजपे | ५ | ६०। |
| केसो गणेश महाजन | ३ | ३६। |
| लक्ष्मण कृष्ण कोल्हटकर | ६ | ७२॥~ |

[ आंदरु नं. १३५, पृ. ४७, ४८, ४९ ]

यादीवरून दोन गोष्टी स्पष्ट होतात. (अ) जिरायतीचा आकार १२८~॥ रु. दर बिघा असा होता. (ब) आंगऱ्यांनीं भातजमीन इनाम दिली, अशा ब्राह्मणांची संख्या मोठी होती.

या यादीवरून जमीन कोणत्या गावीं इनाम दिली याचा बोध होत नाहीं; तो पुढील यादीमुळे होतो.

| इ. स. | व्यक्ति | जमिनीचें क्षेत्र व गाव–बिघे | आकार माफ रु. | उत्पन्न भात [ भाव २० रु. खंडी ] |
|---|---|---|---|---|
| १८१९–२० | लक्ष्मी (मराठीण) | कावीर १॥ | १८॥। | १८॥। मण |
| | महादेवभट आठवले | कावीर ।॥. | ६। | ६। मण |
| | रघुनाथशास्त्री फडके | (खानव) १ | १२॥. | १२॥ |
| | नारायणशास्त्री फाटक | वणोली १ } खानव २॥। } | ४६॥।= | ४६॥।= |
| | बापूभट्ट रिसबूड | वरडें १० | १२५ | १२५ मण |
| | रघुनाथभट्ट वझे | सहाण ३ | ३७॥ | ३७॥ मण |
| | पांडु बाल करवंत | वरडें २ } कावीर २ } | ५० | ५० |
| | गोविंद बालकृष्ण लेले | कावीर १ | १२॥ | १२॥ |
| | बच्याजी हरि आठवले | नागाव ।॥. | ६।. | ६। |

[ आंदरु नं. २४४, पृ. ८९ ]

इ. स. १८२९–३० या वर्षी 'सुकवे' पडले; म्हणजे बरेच दिवस पाऊस न पडल्यामुळे

उत्पन्न कमी आलें. ब्राह्मणांना प्रत्येक इनाम जमिनीचे द्वारें सरकारनें जें ऐनजिनसी इनाम दिलें होतें, तें कमी आलें. सरकारनें ती तूट भरून दिली हें विशेष आहे !

इ. स. १८२९–३०

| व्यक्ति | जमिनीचें क्षेत्र गाव, विघे. | सरासरी अपेक्षित उत्पन्न मण. पा. | प्रत्यक्ष उत्पन्न मण पा. | तूट उत्पन्न व सरकार भरपाई मण पा. |
|---|---|---|---|---|
| रघुनाथशास्त्री फडके | खानव १ | १५ –५॥ | ७ | ८–५॥. |
| रघुनाथभट्ट वझे | सहाण ३ | ४६–३॥ | ३० | १६–३॥ |
| नारायणशास्त्री फाटक | बेलवली १<br>खानव २॥। | १५–५॥<br>४२–५। | २९ | २८–१०॥। |
| बाबूभट रिसबूड | वरडें १० | १५४–२॥। | १०० | ५४–२॥। |
| आपाभट आचार्य | कुणें १ | १५–५॥ | ३–१ | १२–४॥ |
| महादेवभट आठवले | कावीर ·॥· | ७–९ | १–६॥। | ६–२। |
| पांडू बाल क्रमवंत | वरडें २<br>कावीर २ | ६१–९॥ | २६–१॥ | ३५–८ |
| गोविंद बाळकृष्ण लेले | कावीर १ | १५–५॥ | ७–१० | ७–७॥ |

[ आंदरु नं. ३८४, पृ. १९४ ते १९६ ]

## धर्मादाय भात : वार्षिक व कायम.

इनाम जमिनीचें उत्पन्न हा ब्राह्मणांच्या योगक्षेमाचा एक भाग झाला. शिवाय, आंगरे–सरकार ब्राह्मणांना देणगी, नेमणूक किंवा धर्मादाय म्हणून भात देत असे. त्या दृष्टीने पुढील तक्ता पाहा. यांतील कांहीं धर्मादाय वार्षिक तर कांहीं दरसाल (कायम) स्वरूपाचें आहे.

| इ. स. | व्यक्ति | नेमणुकीचा प्रकार | भात आकार मण पा. | आधार |
|---|---|---|---|---|
| १७९९–१८०० | महादेवभट वैशंपायन | दरसाल | ४ | आंदरु नं. १३५, पृ. ४७ |
| | बाजीभट्ट मुळाखे (?) | ,, | ८ | ,, |
| | रामभट्ट पटवर्धन | ,, | ३॥। | ,, |
| | गोविंदभट्ट रिसबूड | ,, | ८ | ,, |
| | बाळंभट्ट भातखंडे | ,, | ५ | ,, |
| | परशराम गोविंद महाजन | ,, | २० | ,, |
| १८०६–०७ | हरिपंत आठवले | – | ६–८॥. | ,, |
| | विसाजी केशव जोगळेकर | – | ३६–२॥। | ,, |
| १८१९–२० | जिऊबाई रिसबूड | वार्षिक | १५ | आंदरु नं. ४७, पृ. ७३, ७४ |
| | नारोबा गोसावी सिधये | ,, | ५ | आंदरु नं. २४४, पृ. ९५, ९६ |

| इ. स. | व्यक्ति | नेमणुकीचा प्रकार | भात आकार मण पा. | आधार |
|---|---|---|---|---|
| १९१९–२० | कृष्णंभट्ट करंदीकर | " | २० | आंदरु नं. २४४, |
| | गणेशभट्ट रिसबूड | " | १५ | पृ. ९५, ९६ |
| | सखारामभट्ट आठवले | " | १५ | " " |
| | महादेवभट्ट केशवभट्ट आठवले | " | १५ | " " |
| | रामभट्ट केळकर | " | १० | " " |
| | विष्णुभट्ट रिसबूड | " | ४० | " " |
| | विश्वनाथभट्ट बर्वे | " | ५ | " " |
| | रघुनाथभट्ट केळकर | " | ५ | " " |
| | लक्ष्मीबाई बापट नागांवकर | " | १५ | " " |
| | गंगाधरशास्त्री फडके | " | २० | " " |
| | गोविंदभट्ट वैशंपायन | " | २० | " " |
| | गोविंदभट्ट रिसबूड | " | १० | " " |
| | केशवभट्ट वैशंपायन | " | १२ | " " |
| | जगन्नाथभट्ट पटवर्धन | दरसाल | ८० | " " |
| | बाळाजी महादेव लेले | वार्षिक | ४० | आंदरु नं. २४४, पृ. ९६ |
| | कृष्णंभट्ट करंदीकर | " | ४० | " " |
| | गोविंदभट्ट वैशंपायन | वार्षिक २ खंडी; ६। मण दरसालची | ४६। | " " |
| | भास्करभट्ट भातखंडे | वार्षिक | १० | " " |
| १८२९–३० | गोविंदभट्ट पुराणिकांच्या भार्येस | वार्षिक | १० | आंदरु नं. ३८४, पृ. १९६ |
| | गोविंदभट्ट वैशंपायन | दरसाल | ६। | पृ. १९४ |
| | जगन्नाथभट्ट पटवर्धन | " | ८० | " " |
| | गणेशभट्ट पेशवे | वार्षिक | ७ | " " |
| | रघुनाथभट्ट रिसबूड | दरसाल | ६० | " " |
| | बचंभट्ट केलकर | वार्षिक २० मण व दरसाल १॥≡ | २१॥≡ | " " |
| | रघुनाथशास्त्री फडके | वार्षिक | १८॥ | " " |
| १८३९–४० | विष्णु महादेव आठवले | वार्षिक | ६ १०॥ | कोंजरु नं. २०१३, पृ. १ |
| १८४०–४१ | रघुनाथभट्ट रिसबूड | वार्षिक | ३० | कोंजरु नं. १३७, पृ. ४० |

**निरनिराळ्या कारणांनी नेमणुका.**

इ. स. १८१९–२०: (१) जगन्नाथभट्ट व रघुनाथभट्ट रिसबूड यांचें घर दग्ध झालें

आंगऱ्यांनी घर बांधण्यास रोख २५ रु. व तीन खंडी भात योगक्षेमार्थ दिलें. घर बांधण्यास लाकूड पाहिजे होतें; सरकारनें पांच माडांचीं झिटें बहालांसाठी देवविलीं. तसेंच तर्फ ब्राह्मणगाव येथील जंगलांतून १२ मेढी – प्रत्येकी दोन असामींच्या ओझ्याची – याप्रमाणें दिल्या. २५ वासे प्रत्येकी १४ हात लांबीचे, मौजे कुर्णे व भेरसें येथील रानांपैकीं तोडून देण्याबद्दल मामलेदार व जंगलांवरील अधिकाऱ्यांस कळविलें. हें साहित्य सागवानी असून विनामूल्य दिलें होतें.[१]

(२) बाबाभट्ट अनंतभट्ट आठवले यांनी अग्निहोत्र घेतलें होतें. त्यांना, योगक्षेमार्थ आंगऱ्यांनी नक्त २५ रु. व तीन खंडी भाताची नेमणूक करून दिली; ती इ. स. १८४१ पर्यंत चालू होती.[२]

(३) वेदमूर्ति नारायणभट्ट घारपुरे विद्वान् होते; सबब त्यांस २५ रु. ची नेमणूक करून दिली.[३]

(४) नागावांत केळकरांकडे पाठशाळा होती; तींत विद्यार्थी शिक्षण घेत. त्यांपैकी कांहींना आंगरेसत्तेने भोजनासाठी भात दिलें.[३]

(५) विष्णु जोशी नि॥ केळकर यांस एक वर्षाकरिता ५ मण भात योगक्षेमार्थ दिलें.[४] ही पाठशाळेंतील विद्यार्थ्यांस देणगी आहे.[५]

(६) भिकंभट लेले अंध होते. त्यांचा योगक्षेम चालला पाहिजे; म्हणून आंगऱ्यांनी १५ मण भात व धोतरजोड्यांसाठी ३ रु. दरसाल सरकारमहालांतून देण्याबद्दल सनद दिली. सनदेप्रमाणें नेमणूक सतत इ. स. १८०४ पासून १८४१ पर्यंत चालू होती.[६]

(७) भटंभट वाडवळ अंध होते; त्यांस दरसाल ५ मण भात देण्याचा आंगऱ्यांचा शिरस्ता होता. इ. स. १८१९–२० मध्यें, त्यांच्या गरजेनुसार १५ मण भात जास्त दिलें.[५]

(८) कृष्ण जोशी आजरेकर विद्याभ्यास करतात, म्हणून त्यांच्या योगक्षेमार्थ आंगऱ्यांनी चार मण भात दिलें.[५]

(९) लक्ष्मणभट आचार्य स्वतःचें लग्न करणार; आंगऱ्यांनी त्यांच्या विवाहाप्रीत्यर्थ १५ मण भात एकसाल नेमून दिलें.[७]

(१०) रघुनाथशास्त्री फडके आपल्या मुलीचें लग्न करणार असें सरकारांत कळतांच लग्नाप्रीत्यर्थ दहा मण भात व रोख १० रु. अशी वर्षापुरती नेमणूक आंगऱ्यांनी करून दिली.[८]

(११) रामचंद्र गोसावी आपटे यांच्या मुलीचें लग्न ठरलें. आंगऱ्यांनी एका वर्षाकरिता १० मण भाताची नेमणूक करून दिली.[८]

---

१ आंदरु नं. ४७, पृ. ७५

२ आंदरु नं. २४४, पृ. ९६; आंदरु नं. ४७, पृ. ७३; आंदरु नं. ३८४, पृ. १९५; कोंजरु नं. १३७, पृ. ४०; म. ना. अप्रपेदरु नं. ६३७, ६३८

३ आंदरु नं. ४७, पृ. ७३

४ आंदरु नं. २४४, पृ. ९५

५ आंदरु नं. ४७, पृ. ७३, ७४

६ आंदरु नं. २४४, पृ. ९५; आंदरु नं. १९५; कोंजरु नं. १३७, पृ. ४१; आंदरु नं. ४७, पृ. ७३, ७४; म. ना. अप्रपेदरु नं. ६३६

७ आंदरु नं. ४७, पृ. ७३, ७४; आंदरु नं. २४४, पृ. ९६

८ आंदरु नं. २४४, पृ. ९४

(१२) वेदमूर्ति आप्पाभट आचार्य यांजकडे गोकुळ अष्टमीचा उत्सव दरसाल होई. इ. स. १७९७–९८ मध्ये या उत्सवासाठी सरकारने चार मण दह्याची नेमणूक करून दिली.[१] पण दही पुरविण्याचा प्रकार थांबवून इ. स. १८१९–२० पासून नक्त नेमणूक १० रु. करण्यांत आली[२] ही कायमची नेमणूक आहे. शिवाय, बाळकृष्णाच्या पूजेनिमित्त दरसाल १२॥ मण भाताकरिता मौजे कुणें येथील एक बिघा जमीन इनाम म्हणून लावून दिली.[३]

(१३) महादेवभट्ट आचार्य यांजकडेहि जन्माष्टमीचा उत्सव होत असे. इ. १८१९–२० पासून त्यासाठी नक्त नेमणूक करून देण्यांत आली; तीच पुढे त्यांचा मुलगा जनार्दनभट्ट आचार्य याचे नांवें चालू ठेवण्यांत आली.[४]

(१४) बाळाजी महादेव लेले यांस दरमहा रोख सुमारें ३। रु. ची नेमणूक अनेक वर्षे चालूं असे. इ. १८१९–२० मध्यें सरकारने त्यांस कांबळें घेण्यासाठी १।= रु. खर्च केला आहे.[५]

(१५) वेदमूर्ति आप्पाभट व बचंभट साठे यांस सरकारने प्रत्येकी दरमहा २ रु. प्रमाणे कायम नेमणूक करून दिली होती. बंचभटांस दरमहा ३ मणप्रमाणे भाताची नेमणूकहि होती.[६]

(१६) नागावच्या बाबूभट मराठ्यांबद्दल आंगरेसरकारला एवढी आस्था वाटत होती की त्यांना दरमहा नक्त वेतन, भात, दूध, धोतरजोडा, नेसावयाचे दोन पंचे, वाडींतील एका नारळाच्या झाडाचें उत्पन्न, घरशाकारणीसाठी झाप इत्यादि वस्तु धर्मादाय म्हणून पुरविल्या जात असत. पुढील यादी पाहा; तीयोगें कांही वस्तूंचे तत्कालीन दरदाम समजण्यास मदत होते.—
इ. स. १८२९–३० रु. ३६ बाबूभट मराठे यांस नक्त दरमहा ३ रु. प्रमाणें.

| | |
|---|---|
| ३६ | दरमहा ३ मण भात; एकूण मण ३६ ची किंमत. |
| ९ | दरमहा ३० शेर दूध; त्याचे मणास १ रु. दराने रुपये. |
| १ | कोनकर यांच्या जागेंतील नारळाच्या झाडाचें उत्पन्न सरकारांतून देण्याचा ठराव; ती रक्कम. |
| ४॥–। | घरशाकारणीस झाप ३०६ ची किंमत. |
| ६।– | धोत्रजोडा व दोन पंचे यांची किंमत. |
| ९२॥।=। रु. | |

इ. स. १८२८–२९ मध्ये अधिक मास आला. बाबूभट्ट मराठे यांस खर्चाप्रीत्यर्थ १२ महिन्यांची बेगमी पोहोंचली होती. नंतर सरकारने, त्यांस १३ व्या महिन्याच्या खर्चाची रक्कम पोहोचती केली, तिचा तपशील—

| | |
|---|---|
| १॥ | कुंपणास काटी. |
| ३॥। | ऐन नक्त. |
| ३ | तीन मण भाताचे ऐवजीं.[७] |
| ८। रु. | |

---

१ आंदरु नं. १३४, पृ. ६६

२ आंदरु नं. २४४, पृ. ९८; आंदरु नं. ३८४, पृ. १९५

३ आंदरु नं. २४४, पृ. ९८

४ आंदरु नं. २४४, पृ. ९८ नं. ३८४, पृ. १९५

५ आंदरु नं. २४४, पृ. ९६ आंदरु नं. ३८४, पृ. १९५

६ आंदरु नं. ४७, पृ. ७२; आंदरु नं. २४४, पृ. ९६

७ आंदरु नं. ३८४, पृ. १९६

(१७) इ. स. १८१९–२० मध्ये केशवभट केळकर यांनी वाडींत चिरेबंदी विहीर बांधण्याचें ठरविलें व आंगऱ्यांस विनंति केली की विहिरीच्या तळास चौकट बसविण्यासाठी भेरसें येथील जंगलांतून लाकडें विनाजकात पुरवावींत. आंगऱ्यांनी १ चौदा हात लांब व दोन हात वेढीचें खैराचें लांकूड; १ सोळा हात लांब व पावणे दोन हात वेढा इतक्या जाडीचें कनेकड; फळयां-साठी दोन ताड, इतकें साहित्य दिलें.[१]

सारांश, आंगरेसरकार संन्यासी, गोसावी, अंध ब्राह्मण, विधवा, विद्यार्थी, अग्निहोत्री, विद्वान यांचा समाचार घेऊन त्यांस जीवनवेतन म्हणून वार्षिक नेमणुकी करून देत होते.[२] ब्राह्मणाकडे लग्न निघालें, की आंगरें लग्नाप्रीत्यर्थ रोख रकमा व भात धर्मादाय म्हणून देत. ब्राह्मणांच्या योगक्षेमाची काळजी वाहण्याचा हा प्रकार विचारांत घेण्यासारखा आहे.[३] ब्राह्मणांस धर्मादाय देण्याबाबत आंगऱ्यांची दृष्टि विशाल होती. अंध ब्राह्मणांस धोतरजोडे व भात सरकारां-तून देणें, अग्निहोत्र घेतलें असल्यास त्यास नेमणूक करून देणें, ह्या गोष्टी इ. स. १८१९–२० प्रमाणें इ. स. १८२९–३० मध्येंही, पूर्वरिवाजास अनुसरून, चालू होत्या.[४] पाठशाळांबाबत तोच प्रकार होता. इ. स. १८२३–२४ मध्ये महादाजी अनंत मोघे यांची पाठशाळा नागावांत होती; विद्यार्थी निसबत महादाजी अनंत मोघे यांस दरमहा ३ रु. प्रमाणे सरसालीं ३६ रु. सरकार–महालांतून मिळाले.– १८ रु. महादाजी अनंत; १८ रु. विद्यार्थी नि॥ मजकूर = ३६ रु. भोजन–खर्च.[५] गुरु आणि शिष्य दोघांच्याही चरितार्थाची काळजी सरकारनें घेतली.

**धर्मादाय मीठ**—अष्टागरांत मांडवें, वरसोली, चौल इत्यादि ५।६ ठिकाणीं मिठागरें होतीं व दरसाल भरपूर मीठ पिकत-विकत असे. ब्राह्मणांस 'चातुर्मास्यासाठी' मिठाची बेगमी करून देणें हा आंगऱ्यांचा दानधर्माचा एक प्रकार होता. दिलेलें मीठ वर्षभर सहजच पुरे. उदाहरणा-दाखल पुढील उतारा पाहा—

वस्ती नागाव—बद्दल देणें खेरीज मुशाहिरा चातुर्मासाचे बेगमीबद्दल कैली (मापी)—

मण

५ धर्मादाय, केशव लक्ष्मण आठवले नागावकर:
५ देहनगी, गणेश विठ्ठल मथुरे नागावकर (प्रभु).
३ हरि राम सुद्रीक, धर्मादाय.
३ गंगाधरशास्त्री फडके, धर्मादाय.
३ रघुनाथशास्त्री फडके, धर्मादाय.
२ सदाशिवभट्ट वर्वे, धर्मादाय.
५ बाबाजी बलाल गोडबोले, देहनगी.
५ पांड माहात्रा वैद्य (माळी क्षत्रिय),देहनगी.
४ रामचंद्र गोसावी आपटे, धर्मादाय.
५ गणेश बापुजी जोशी, धर्मादाय.[६]

ब्राह्मणांस दिलें तें धर्मादाय व इतरांस दिलें ती देणगी होय.

---

१ आंदरु नं. ४७, पृ. ११२
२ आंदरु नं. ४७, पृ. ७२ ते ७४
३ आंदरु नं. २४४, पृ. ९४
४ आंदरु नं. ३८४, पृ. १९५
५ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७
६ आंदरु नं. २४९, पृ. १०४, १०५; आंदरु नं. ४७, पृ. ७०, ७१

### श्रावणमासाभिषेक

इ. स. १७९७–९८ मध्ये नागावांत श्रीमहालक्ष्मी महाकालीचा शारदीय नवरात्राचा उत्सव पार पाडण्यास कोणी यजमान नव्हता. तेव्हा, चिंतो राम पटवर्धन यांनीं सरकारांत विनंति केली की हें धार्मिक कार्य मजकडे सोपवावें व सरकारांतून उत्सवाच्या खर्चाची नेमणूक करून द्यावी. आंगऱ्यांनी विनंति मान्य केली.[1] एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं अष्टागरांतील जवळ जवळ सर्व गावीं मंदिरें स्थापन झालीं होतीं. त्यांतून श्रावण महिन्यांत, सरकारमदतीनें मासाभिषेक चालू असे. इ. स. १८०९–१० या वर्षी श्रावण महिना २८ दिवसांचा होता. या दिवसांत, आंगऱ्यांनी नागावकर ब्राह्मणांस कोणत्या ना कोणत्या तरी मंदिरांत अभिषेक करण्यास नेमून टाकलें. मौजे वरडें, कावीर, वढव, सुरई, तलई, भेरसें, पोयनाड, चऱ्ही इत्यादि गावीं आंगऱ्यांनीं या वेळीं नागावकर ब्राह्मणांची नेमणूक केली. म्हणजे, वर सांगितलीं तीं गांवें वसलीं होतीं. तेथें मंदिरें स्थापन झालीं होतीं; पण तेथें ब्राह्मणकुटुंबें नांदत नव्हतीं; असलींच, तर प्रत्येकी एखादेंच घर असावें. उलट, नागाव येथें मात्र ब्राह्मणांची संख्या मोठी व त्यांच्या धार्मिक व्यवसायास क्षेत्र अपुरें, असा प्रकार होता. म्हणून आंगऱ्यांनी त्यांस वरील गावच्या मंदिरांतून मासाभिषेकाचीं कामें नेमून दिलीं. बऱ्याच वैदिक मंडळींस खुद्द नागावांतच काम दिलें होतें; कारण नागावांत १६।१७ मंदिरें असल्यानें तितक्या जणांस तेथें व्यवसाय होता. पण स्थिर वस्तीच्या गावांत, मंदिर केवल एकाच देवतेचें, असें क्वचित् दृष्टीस पडतें. नागावांतील मंदिरांतून, मुख्य देवतेबरोबर उपदेवतांची स्थापना झालेली होती व या उपमंदिरांतूनहि मासाभिषेकाचें काम अनेकांस सांगितलें होतें. प्रत्येक मंदिरांत एक एक ब्राह्मण, असें ५१ ब्राह्मणांना आंगऱ्यांनी काम नेमून दिलें. कांही ठिकाणीं अभिषेक, कांही जागीं लक्षपूजा, बेल वाहणें, शिवपंचाक्षरजप, अश्वत्थ-पूजा, शतचंडी इत्यादि विधि करविले. प्रत्येक ब्राह्मणास दक्षिणा व पूजासाहित्याचा खर्च देवविला. या प्रसंगीं नागावकरांस २५३ रुपये पोहोंचते झाले. हे मासाभिषेक अनेक वर्षे सतत चालत असल्याचें नमूद आहे. नागावांत नागेश्वरास मासाभिषेक होई. त्याची बारमाही पूजा बाळकृष्ण-भट्ट करीत होतेच; या कालांत नागेश्वराची लक्ष बेलपत्रांनीं पूजा बांधण्याचें काम चाले. त्याप्रीत्यर्थ इ. स. १८०९–१० मध्ये २२ रु. हून जास्त खर्च झाला आहे. एकाच मंदिरांत एवढा खर्च म्हणजे नागेश्वर ही नागांवची मूख्य देवता मानली जाई.[2]

इ. स. १८१५–१६ मध्ये ४९ नागावकर ब्राह्मणांकडे श्रावणमासाचें हें काम होतें. त्यांस दक्षिणा म्हणून ७०८~ रु. देण्यांत आल्याची नोंद आहे.[3]

**विद्वानांची संभावना**—श्रावणमासांत विद्वान् ब्राह्मणांची सरकारतर्फे संभावना होई. सुमारें ५० नागावकरांना दक्षिणा म्हणून रोख रकमा वांटीत. विद्वानांना राजाश्रय देण्याचा हा प्रकार आंगऱ्यांनी बंद केला नाही. इ. स. १८०९–१० मध्ये ५० जणांना एकूण १४७ रु. वांटले आहेत; अनेक वर्षांच्या देकाराच्या याद्या उपलब्ध आहेत. देकारावरून विद्वत्तेचें मोजमाप करावयाचें झाल्यास, इ. स. १८०९–१० मध्ये, नागावांतील पुढील माणसें विद्वान् म्हणून मानलीं जातील :— (१) बाळकृष्णशास्त्री भातखंडे, (२) नारायणभट्ट फडके, (३) कृष्णंभट्ट करंदीकर, (४) गंगाधर-भट्ट पुराणिक, (५) वीरेश्वरभट्ट पुराणिक, (६) आप्पाभट्ट फडके पंडित, (७) नीलकंठभट्ट पुराणिक, (८) तात्याशास्त्री फाटक, (९) बचंभट कोनकर, (१०) लक्ष्मण करवंत, (११) गणेशभट्ट लोंढे, (१२) बाबाजीभट्ट फाटक. यांपैकी भातखंड्यांस रु. १० व बाकीच्यांस प्रत्येकी

१ आंदरु नं. १३४, पृ. ६६
२ आंदरु नं. १६८, पृ. १३८ ते १४५
३ म. ना. अप्रेदरु नं. ६३६

५ रुपये संभावना म्हणून मिळाले आहेत. याहून कमी देणग्या ४, ३, २, १ रु. अशा एकूण ३८ जणांस देण्यांत आल्या आहेत. दक्षिणा देणें तें पात्रता, विद्वत्ता पाहूनच होत असावें. पुण्यांत पेशवे दरसाल रमण्यांत दक्षिणा वांटीत, त्यांतलाच हा प्रकार होता. हा देकार आंगऱ्यांच्या सर्वच महालांतून चाले.[१]

श्रावणांत नागावास अनेक परस्थ ब्राह्मण येत. त्यांच्या भोजनासाठी नागावच्या महालांतून भात खर्ची पडे.[२]

इ. स. १८१९–२० मध्यें विजयादशमीच्या निमित्तानें ब्राह्मणांस दक्षिणा देण्यांत आली. पुढील तपशील पाहा — विजयादशमीची दक्षिणा मिळाली ती —

| महाल | दक्षिणा | ब्राह्मणांची संख्या |
|---|---|---|
| चौल | १५॥ रु. | ३१ |
| नागाव | ५०॥ रु. | १०१ |
| अक्षी | २० रु. | ४० |
| पेठ श्रीबाग | ३०॥ रु. | ६१ |
| थळ | १२ रु. | २४ |
| तर्फ दुतर्फा (उंदेरी) | ६॥ रु. | १३ |
| रेवदंडा | १॥ रु. | ३ |
| परप्रांतस्थ | २२॥ रु. | ४५ |
| | १५९ | ३१८ |

सारांश, वर्षांतून अनेकदा, निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या कारणांनी दक्षिणा दिली जाई. या यादीवरून उघड होतें की अष्टागरांत ब्राह्मणवस्तीचीं गावें अनेक होतीं; पण ती नागावांत ठळक प्रमाणांत एकवटली होती; अष्टागरांतील एका गावांतील १०१ ब्राह्मणांस एका वेळीं दक्षिणा मिळते, यावरूनच नागाव हा प्रामुख्याने ब्राह्मणवस्तीचा गाव असें मानण्यास हरकत नाही.[३] या वर्षी (१८१९–२०) संवत्सर-प्रतिपदेस नागावांत १०४ ब्राह्मणांस १०७ रु. दक्षिणा वांटण्यांत आली.[४] इ. स. १८२९–३० मध्ये कृष्णंभट्ट करंदीकरांस सरकारांतून चार वेळां धर्मादाय म्हणून २५ रु. दिल्याचें दिसतें. (१) श्रावणमासानिमित्त, (२) नारळी पौर्णिमेच्या उत्सवाच्या निमित्ताने, (३) विजयादशमीचे वेळीं व (४) संवत्सर प्रतिपदेचे वेळीं. म्हणजे ब्राह्मणांच्या संभावनेचे योग दरसाल चार वेळां घडून येत.[५]

ब्राह्मणांस संतुष्ट करून त्यांचें जीवन सुखाचें करण्याचा आणखी एक प्रकार आंगरेकालांत मधून मधून चालत असे. इ. स. १८१९–२० मध्ये, सरकारकार्यें निर्विघ्न पार पडावीत, म्हणून श्रीभीमेश्वरसन्निध असलेल्या श्री नारायण मंदिरांत ब्राह्मणसंतर्पण झालें. सदर प्रसंगीं आंगऱ्यांना ९१॥≈ रु. खर्च आला.[६]

इ. स. १७७०-७१मध्ये गोपाल केशव जोगळेकर यांचे पांच भाऊ नागावांत राहात होते. स्वतः गोपाल केशव वरघाटीं राहात व जाऊन येऊन नागावांत असत. पांच भाऊ कृषिकर्म व शेतवाडी करून असत पण तेवढ्यावर त्यांचें भागत नसे. त्यांनी राघोजी आंगऱ्यांस विनंति केली

१ आंदरु नं. १६८, पृ. १८५
२ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६
३ आंदरु नं. ४५, पृ. ६८, ६९
४ आंदरु नं. ४७, पृ. ११२
५ आंदरु नं. ३८४ पृ. १९५
६ आंदरु नं. २४४, पृ. ९८; आंदरु नं. २४७, पृ. १०२

कीं योगक्षेमार्थ जमीन द्यावी. आंगऱ्यांनीं मौजे वढु त॥ बाह्मणगाव येथे जमीन दिली ; पण ती जोगळेकरांस सोयीची नव्हती. त्यांनी पुन्हा विनंति केली की वढूची जमीन अनुकूल नाही ; ती परत घेऊन नागावांतच दुसरी जमीन द्यावी. आंगऱ्यांनीं पहिली जमीन परत घेऊन दुसरी जमीन त्यांचे वाडीजवळचीच दिली. सदर तीन बिघे खारजमिनीचा महसूल इनामखर्च म्हणून लिहिण्याबाबत आंगऱ्यांनी सनद देवविली व जोगळेकरांस पुत्रपौत्रादि वंशपरंपरा निर्वाहास साधन उपलब्ध करून दिलें.[१] अशीं कांही उदाहरणें अन्यत्र दिलीं आहेत. आपल्या राज्यांत ब्राह्मण उपाशी मरूं नये, सुखासमाधानाने जगावा, ही आंगऱ्यांची तीव्र इच्छा सर्वकाल होती. इ. स. १८२९-३० मध्ये, सरकारने ब्राह्मणांस ज्या जमिनी इनाम दिल्या होत्या, त्यांतून अपेक्षेप्रमाणे भात पिकलें नाही व प्रत्येक सनदी ब्राह्मणास भाताची तूट आली. त्या तुटीची भरपाई म्हणून आंगऱ्यांनी महालांतील सरकारी उत्पन्नांतून रोख रकमा देवविल्या. या वर्षीं अष्टागरांत कांही ठिकाणीं दहा आणे, कांही गावीं आठ आणे व सहा आणे इतकेंच पीक आलें. आली तेवढी सगळी तूट आंगऱ्यांनी भरून दिली ! हाच प्रकार बागायत इनाम जमिनीबाबत झाला आहे.[२]

सारांश, नागावचे ब्राह्मण ब्रह्मकर्म करून आपला योगक्षेम चालवीत होते. वैदिक कृत्यें करून प्रपंच भागविणें हा त्यांचा नित्यक्रम होता. पण तेवढयावर त्यांचा सर्वांचा उदरनिर्वाह होऊन ते सुखाने नांदत होते असें मानणें चुकीचें होईल, त्यांना अन्य व्यवसाय करण्याची गरज होती. त्यांना लोकाश्रय होता व राजाश्रय होता. पण तो "शाकाय वा स्यात् लवणाय वा स्यात्," इतकाच होता. ते शेती आणि बागायताचा व्यवसाय स्वतः करीत होते व माळी अगर परमुलकी चाकर मदतीस घेऊन तो करीत होते.

## ब्राह्मण आणि बागायत

नागावचे कांही ब्राह्मण शिवकालांतहि बागायत करीत होते. मागे उल्लेखिलेले कऱ्हाडे ब्राह्मण ठोसर यांचा निर्वंश झाला. सव्वा बिघा क्षेत्रफळाची त्यांची एक वाडी होती. इ. स. १७६७-६८ मध्ये ती इतकी खराबीस आली की तींत दहा माड, दोन फणस, दहा आंबे व एक करंज इतकींच झाडें उरलीं. वाडी कुंटयांच्या ताब्यांत होती. गोखल्यांनी सरकारांत १०० रुपये नजर देऊन सदर वाडी मामूर करण्याच्या व महसूल देण्याच्या करारानें आपणांकडे घेतली. वाडी गोखल्यांच्या स्वाधीन करतांना आंगऱ्यांनी त्यांस अट घातली की जर कोणी कऱ्हाडा ठोसर येऊन वाडी परत मागूं लागला, त्याने आपला वारसा सिद्ध केला, तर गोखल्यांनी भरलेला नजराणा, लावणीसाठी केलेला खर्च, यांची सदर ठोसराकडून निशा करून दिली जाईल. ठोसर सरकारांत नजराणा भरील. गोखल्यांनी जें दांडे व चुनेगच्चीचें काम केलेलें असेल, त्याची किंमत नवा ठोसर भरील व गोखल्यांना वाडीचा हक्क सोडावा लागेल. या गोष्टी गोखल्यांनी मान्य केल्या.

ठोसरवाडीबद्दल होत असलेलें सगळें गैरसमजुतीमुळे चुकीचें घडत होतें. मूलतः ठोसर-वाडी कुंटे यांजकडे गहाण होती ; नंतर त्यांनी ती खरेदी केली होती. त्यांनी तिची निगा राखली नाही, त्यामुळे ती त्यांची नसावी असा गैरसमज पसरला. गोखल्यांनी सरकारांत गैरवाका समज करून दिला की ती अनक वर्षे कुंटयांकडे असली, तरी कुंटे तिचे धनी नव्हेत ! ग्रामस्थांनीही अजाणतेपणें गोखल्यांचें म्हणणें खरें मानलें. कुंटयांजवळील वाडीचें खरेदीखत सांपडत नसल्याने, ती आपल्याच मालकीची आहे हें सिद्ध करणें त्यांस अशक्य झालें. अशा वेळीं, आपणांस घर बांधून राहण्यास ती दिली जावी, असें गोखल्यांनी म्हणतांच

१ आंदरु नं. ६३७, पृ. १२८, १२९
२ आंदरु नं. ३८४, पृ. १९४, १९५

सरकारला तें पटलें. वस्तुतः गोखले बंदरकिनाऱ्यावर दिवाणवाडींत राहात होते; भर वस्तींत जागा द्यावी, अशी विनंति त्यांनी करतांच ब्राह्मणाची सोय होते तर होऊं द्यावी, या सद्‌बुद्धीने आंगऱ्यांनी सदर गोष्टीस मान्यता दिली होती.

या वेळीं नागावांत रामाजीपंत ठोसर या नांवाचे आणखी एक ठोसर राहात होते; तेहि वाडकर म्हणूनच व्यवसाय करीत. ते म्हणूं लागले की 'ठोसरवाडीचे आम्ही वारस आहोंत. पण त्यांचें म्हणणें अवेळीं पुढें आलें होतें. निर्णय करणारे म्हणूं लागले की रामाजीपंतांचे वडील बाळाजीपंत ठोसर यांनी ही भूमिका आपल्या हयातींत घेतली असती, तर तिला कांही अर्थ होता. त्यांनी हा वाद सांगितला नाही आणि आतां त्यांच्या मुलानें या वादांत पडावें यास अर्थ नाही. शिवाय, रामाजीपंत ठोसर हे कोकणस्थ असल्यामुळे त्यांचा वाद टिकूं शकत नव्हता. पंचायतीचे वेळीं हे मुद्दे पुढे येतांच रामाजीपंत निरुत्तर झाले. कुंटयांनी बागायताची उस्तवारी केली नाही ; आपली मालमत्ता अशी अव्यवस्थित कोणी टाकील काय, या विचाराचा पगडा बसल्यामुळे, ही वाडी कुंटयांचीच असें पंच मानीनात ! गोपाळ हरि गोखले यांनीं या वेळीं एक चांगलें विधान पुढे मांडलें. ते म्हणूं लागले की सध्या कुंटयांच्या ताब्यांत असलेली ठोसरवाडी सरकारपरवानगीने कुंटयांकडे आहे व ते तिची निगा राखीत नसल्यामुळे ती त्यांच्याकडून काढावी व मजकडे निगेसाठी द्यावी. अनामत पडलेल्या वाडया कांही अटींवर, नजराणा घेऊन, जर सरकार लायक माणसाच्या स्वाधीन मामुरीसाठीं करतें, तर ही वाडी मला तशा हेतूनें द्यावयास हरकत नसावी. वाडीचे क्षेत्रफळानुसार जीवनमाफक आकार ठरविल्यास, जामीन देऊन मी वाडी करीन.

चालू प्रकरणीं नागावच्या चिटणिसांस कांही स्पष्ट माहिती असावी; पण ते कुंटयांविरुद्ध गेले. त्यामुळे कुंटयांचा नाइलाज झाला. वाडी आपल्या पूर्वजांनी खरेदी केली असल्याची जाणीव त्यांस नसल्यामुळे, वाडी अखेर गोखले यांचे ताब्यांत गेली. गोखल्यांनी इ. स. १८०३-०४ पर्यंत वाडीचा भोगवटा केला.

पण इ. स. १८०३–०४ मध्ये ठोसरवाडीचें गहाणखत कुंटे यांस सापडलें ! तें त्यांनी सरकारांत रुजू केलें. तेव्हा आंगऱ्यांनी वाडी गोखल्यांकडून काढून पुन्हा कुंटयांस दिली व त्यांचे नांवें भोगवटयास सनद करून दिली. वाडी ताब्यांत आल्यावर त्यांनी दांडे व चुनेगच्ची विहीर बांधण्यांत ४।५ शें रुपये खर्च केला व तेरा वर्षें ठोसरवाडीचा भोगवटा केला. पण इ. स. १८१६–१७ मध्ये बच्याजी गोपाळ गोखले यांनी पुन्हा वाडीवर हक्क सांगण्यास प्रारंभ केला. सरकारने महाजन, महालांतील चार ग्रामस्थ व इतर माणसें पंचायतीस नेमलीं तीं –

| | |
|---|---|
| महाल नागाव | महाल अक्षी |
| वासुदेव बल्लाळ महाजन | सदाशिव गोविंद पाटील |
| चिंतो राम पटवर्धन | रामचंद्र त्रिंबक आपटे–२ |
| गंगाधरशास्त्री फडके | महाल चेऊल |
| रघुनाथ बाबूराव कुळकर्णी | निळो बल्लाळ आचार्य |
| राघो अनंत महाजन | बाळकृष्णभट्ट राईरकर–२ |
| बावजी बल्लाळ गोडबोले | बाळकृष्ण रघुनाथ कुलकर्णी |
| नारो घोंडदेव लोंढे | दुतर्फा वतन महाल |
| दिनकर हरि आठवले | किहीम |
| हरि बच्याजी वाड–९ | |

ठोसरवाडीचा वाद तोडण्यास जमलेल्या पंचांनी कुंट्यांजवळचें अस्सल गहाणखत पाहिलें, तें १४२ वर्षांचें जुनें, जीर्ण होतें; त्यावर विसोबा महाजनांची सही होती. त्याच्याच एका पुरातन नकलेवर गोविंद विठ्ठल महाजनांची सही होती; हे गोविंद विठ्ठल इ. स. १७९१–९२ त वारले होते ; पण त्यांच्या सहीची ओळख पंचांस पटली. शिवाय, कुंट्यांचा ब्याण्णव वर्षांचा भोगवटा सिद्ध झाला. इतक्या वर्षांचा अविच्छिन्न भोगवटा चिटणिसांनी आंगऱ्यांच्या निदर्शनास आणून देणें जरूर असतां तो दिला नाही, ही चिटणिसांची कृति उघड झाली. नारो बाबाजी कुंटे यांनी, इ. स. १६७४–७५ मध्ये प्रथम ठोसरवाडी गहाण घेतली; नंतर ती अंतोबा बहिरव ठोसरांपासून खरेदी घेतल्याचें सिद्ध झालें. ठोसरवाडीस कोणी वारस उभा राहिल्यास आपण ती स्वाधीन करूं, असें मान्य करीत असतांना गोखले यांनी ती आपली नसल्याचें अप्रत्यक्षत: मान्य केलेंच होतें, असें पंचांचें मत झालें. त्यामुळे गहाणखत, वाडीचा भोगवटा या गोष्टींना बळकटी आली. वाडी कुंटे यांचीच असें सिद्ध झालें व आंगऱ्यांनी तें मान्य केलें. आंगऱ्यांनी कुंटे यांस नवी सनद करून दिली. गोखले यांनी ३५ वर्षें वाडीचा भोगवटा केला; त्यांत त्यांनी दांडे, विहिरीप्रीत्यर्थ, लागवडीकरिता केलेला खर्च भरून आला, असा निर्णय झाला. या भोगवट्यांत, गोखल्यांनीं केलेल्या नजराण्याचा खर्चहि भरून आला, असें सरकारनें मानलें. कुंटे यांनी सरकारांत २५ रु. द्यावेत असें ठरलें ; त्यांनी ते दिले. गोखल्यांकडून वाडीचा कबजा निघाला व वाडीसंबंधींचे सर्व उलट सुलट स्वरूपाचे त्यांचे कागद रद्द ठरविण्यांत आले. गोखले यांस घर बांधण्यासाठी ठोसरवाडी द्यावी असा मुद्दा पुढें येण्याचे अगोदर त्यांस दात्यांच्या वाडींत घर बांधण्यास जागा दिलेली होती व दातेवाडी विसोबा महाजनांकडे होती ही गोष्ट चिटणिसांनी सरकारांत समजाविली नाही, असा आणखी एक मुद्दा पंचांनी काढला व त्यायोगें स्पष्ट केलें की गोखले जागेसाठी अगतिक झाले नव्हते; त्यांस ठोसरवाडींत जागा दिलीच पाहिजे, अशी परिस्थिति उत्पन्न झाली नव्हती. सारांश, डाव टाकून लबाडीने कबजा मिळविण्याचाच तो एक प्रकार झाला, असें पंचांनी मानलें.[१]

एक प्रदीर्घ कागद येथें थोडक्यांत दिला आहे; त्यायोगें कांही गोष्टी आपातत: सिद्ध होतात. (१) नागावचीं कुंटे, गोखले, ठोसर, महाजन, दाते हीं माणसें शिवकालापासून बागायत करीत होतीं. (२)एखाद्याने वाडी मामूर न केली, तर ती त्याजकडून काढावयाची व दुसऱ्यास द्यावयाची ही भूमिका आंगरे स्वीकारीत. राज्याचा महसूल बुडूं नये, म्हणून ही गोष्ट ते करीत. (३) जमिनीचे मालक सरकार. वाडकर वाडी खरेदी करतो, याचा अर्थ तो वाडीचें उत्पन्न काढण्याचा हक्क खरेदी करतो, जमीन खरेदी करीत नाही, अशी भूमिका या कागदांत डोकावत आहे. उत्तरोत्तर हा मुद्दा अधिक स्पष्ट होत जाणार आहे.

नागावांत डाकमळा या नांवाची एक वाडी जंगलगर्क होती. इ. स. १७६०–६१ मध्ये केसो गणेश महाजन यांनी आंगऱ्यांकडून अभयपत्र घेऊन तेथें बागायत करण्याचें ठरविलें. इ. स. १७७२–७३ पर्यंत महाजनांनी झाडें लावणें, विहीर खणून चुनेगच्ची बांधकाम करणें यांत बराच पैसा खर्च केला. पण जमीन बागायतास योग्य नसल्याने ती रकमेस येईना. तेव्हा महाजनांनी सरकारांत कळविलें की वाडी ठेवतां येत नाही; टाकतां येत नाही, अशी स्थिति झाली आहे ; सरकारने कौल द्यावा. आंगऱ्यांनी बागायताची पाहाणी केली. तींत असें आढळून आलें की एकूण क्षेत्र ६ बिघे ७॥ पांड इतकें आहे ; पण त्यांतील १ बिघा २॥ पांड बागायताचे दृष्टीनें सर्वस्वीं अयोग्य आहे. उरलेल्या ५। बिघे जमिनींत पांच वर्षांच्या श्रमांनंतर नारळाचीं शंभर झाडें

१ आंदरु नं. ६३७ पृ. ११५ ते ११९

जगलीं ! तेव्हा, इ. स. १७७१–७२ पासून १६ वर्षे म्हणजे इ. स. १७८६-८७ पर्यंत वाडीचें सरकारदेणें माफ करावें; इ. स. १७८७-८८ मध्ये पुन्हा पाहणी करावी, असा कौल आंगऱ्यांनी दिला; कारण या शंभर झाडांत तीन बारदार व आठ पोईकर एवढींच झाडें लक्षांत घेण्यासारखीं होतीं ! आंगऱ्यांनी कौल दिला, त्याचें स्वरूप असें–(१) इ. स. १७८७-८८ मध्ये पाहणी होईल, तेव्हा जे माड बारदार असतील, त्या प्रत्येक माडास बाबतीदेखील चार आणे सरकारांत घ्यावेत. (२) वेलीचीं पानें दरशेंकडा मालकी रकमी शिरस्त्याप्रमाणें घ्यावीत. (३) दर बारदार माडाचे दोन झाप सरकारांत घ्यावेत. (४) वाडीच्या मामुरीसाठी परमुलकी माळी ठेविल्यास त्यास तीन वर्षे घरटक्का माफ; नंतर पूर्ण घरटक्का घ्यावा. माळयास तीन वर्षे वेठ पडणार नाही; नंतर दरमहा दोन वेठी गावांत कराव्यात. (५) चाकर ठेवल्यास प्रारंभीं घरटक्का, तंबाखु-कर माफ; नंतर दरसाल निम्मे द्यावा. (६) सुपारी दरपेढास एकूण बाबती-देखील दोन आणे घ्यावेत. (७) कौल पुरा झाल्यावर, वाडकराकडून झाडदस्त घेतला जातो, तदनुसार घ्यावा. (८) काथ्या, झाप, चुडी, केरसुण्या इत्यादि सर्व माफ. (९) वाडकरास जकात नाही. सावकारास माल दिल्यास व त्यानें विक्रीस नेल्यास शिरस्त्याप्रमाणे जकात पडेल. (१०) वाडींत मेवेजात कांहीहि पिकवावें; सरकार मागणार नाही. (११) रहाटरहाटवडीस लाकूड लागल; त्यावर जकात माफ.[१] या लेखावरून आंगरेमध्यकालांतील आणखी एक ब्राह्मण वाडकर व त्याशीं सत्तेचा करार यांची कल्पना आली. वाडी मामूर व्हावी, यासाठी आंगरे कोणत्या सवलती देण्यास तयार असत, याचा बोध या कराराचे योगें होतो. इ. स. १७७२–७३ च्या कागदांतून नागावच्या दोन ब्राह्मण वाडकरांचा उल्लेख येतो. एक महाजन व दुसरे चिंतो राम पटवर्धन.[२]

वेदमूर्ति आप्पाभट आचार्य यांजकडे सरकारनें अधिकारवाडी वहिवाटीस दिली होती. सरकारदेणें द्यावें व वाडीचे उत्पन्नावर उदरनिर्वाह करावा एवढाच ठराव होता. इ. स. १७९७–९८ मध्ये आचार्यांनी कळविलें की सरकारदेणें भागवून आमचें चालवणें शक्य होत नाहीं; तेव्हा सरकारने वाडी परत घ्यावी. सरकारने ती परत घेतली व दुसऱ्या कुळानें अगर भंडाऱ्याने ती सरकारदेण्याच्या अटीवर करण्याचें ठरविल्यास आपण ती देण्यास तयार आहोंत, असें जाहीर केलें.

अधिकारवाडी ही मूलतः अधिकाऱ्यांची; देणें भागवितां येईना, म्हणून ती सरकारचे ताब्यांत दिली गेलेली ! जमिनीवर भोगवटयाचे दृष्टीने सत्ता अधिकाऱ्यांची असली, तरी अंतिम सत्ता सरकारची ! तेव्हा, सरकारदेणें नको व वाडीहि नको, अशा विमनस्कतेंतून ती सरकारकडे परत करण्यांत आली व आचार्यांप्रत पोहोचली; आता ती तिसरीकडे वहिवाटीस जाणार होती.[३] इ. स. १८०३–०४ मध्ये अधिकारवाडी आंगऱ्यांनी बाबू शिवलकर, धोंडू मुकदम, नारायण परकार या तीन भंडाऱ्यांस नऊ वर्षांच्या करारानें मक्त्यानें दिली. त्यांनी तिचा उपयोग आपल्या व्यवसायासाठी केल्यामुळे, इ. स. १८०८–०९ पर्यंत तींतील आणखी कांही माड मेले व वाडी अधिक खराबीस आली.[४]

आंगऱ्यांच्या प्रदेशांतील जमिनीचे मालक आंगरे होत. वाडकर हा जमीन कसण्याचा हक्क खरेदी करतो; जमीन खरेदी करूं शकत नाही. कोणतीहि जमीन सरकार कसण्यास देतें व माघारी घेऊं शकतें, दुसऱ्यास देऊं शकतें ही भूमिका आणखीहि कागदांतून दिसते.[५]

---

१ आंदरु नं. ६३७, पृ. १२७, १२८
२ आंदरु नं. ६३७, पृ. १२८, १२९
३ आंदरु नं. १३४, पृ. ६५
४ आंदरु नं. ६३७, पृ. १४९
५ आंदरु नं. ६३७, पृ. १२९

इ. स. १७९७–९८ मध्ये वेदमूर्ति रघुनाथभट वझे यांनीं सरकारांत कळविलें की नागावांतील 'ताडभाट' खराबा आहे. चौल शिरस्त्याप्रमाणे बागायतलावणीची परवानगी दिल्यास मामुरीचा प्रयत्न करूं. सरकारने परवानगी दिली व लावणीनंतर पाहणी करूं असें कळविलें. ताडभाटांत वझ्यांनी बागायत बनविलें.[1]

एखादा वाडीवाला कांही कारणांनी परागंदा झाल्यास वाडी तात्पुरती बेमालक, बेमामूर होई. सरकार ती कराराने कोणास तरी मक्त्याने देई व बागायत जिवंत ठेवून सरकारी उत्पन्न बुडूं देत नसे. या विधानास अधिकारवाडी हें एक ठळक उदाहरण आहे. वाडी मोठी असल्याने, ती, वर सांगितलेले आचार्य व दामले या दोघांनी मामुरीसाठी आपणांकडे घेतली होती. इ. स. १७९३–९४ मध्ये दंगलीचें वातावरण निर्माण झाल्यामुळे, गोविंद कृष्ण दामले परागंदा होऊन वर्ष दीडवर्ष किहीम येथे जाऊन राहिले. अधिकारवाडीची रहाट–रहाटवड नाहीशी झाली; झाडें तोडलीं गेलीं, मोडलीं व वाडीची पुन्हा खराबी झाली. दामले परागंदा असल्यामुळे वाडीचें सरकारदेणें दिलें गेलें नाही. सरकारने सदर बागायत आपणांकडे घेतलें व दामल्यांची मोकळीक केली. दुसरे भागीदार आचार्य यांनीही अशीच मोकळीक करून घेतली, म्हणजे इ. स. १७९८–९९ त 'उतारचिठी' घेतली. सदरपैकी दामले इ. स. १८०८–०९ मध्ये नागावास परतले व त्यांनी सरकारशीं बोलणें लाविलें की अधिकारवाडी ही मूळची खारजमीन होती; आम्हीं व आचार्यांनी डोक्यावरून पाणी आणून बागायत लावलें–जगवलें व वाडी निर्माण झाली. सरकारपरवानगीने आम्हीं तिची बराच काल वहिवाट केली. दरम्यान आम्हीं वाडी टाकली व सरकारने ती मक्त्याने दिली. आतां आम्ही आलों असून वाडी पुन्हा करण्यास तयार आहोंत; तरी ती, जीवनमाफक चढ देऊन आमचेकडे पुन्हा द्यावी व कौल द्यावा. आंगऱ्यांनी दामल्यांचें म्हणणें मान्य केलें. मक्तेदारांस करारांतून मुक्त करण्यासाठी ६९॥~। रु. आकार दामल्यांकडून घेऊन वाडीचा भंडारी मक्तेदार दूर केला. वाडीवर ५।=॥। रु. आकार चढ दिला. दामल्यांनी शिरस्त्याप्रमाणे झाप देण्याचें कबूल केलें. फडफर्मास इत्यादि करांबद्दल दरमाडास चार आणे, दर उंडीच्या झाडास ।।॥। रु. आकार देण्याचें मान्य केलें. हा करार होतांच सरकारने अधिकारवाडी दामल्यांच्या पुन्हा स्वाधीन केली.[2] यावरून समजतें की सरकार जमिनीबाबत कुळाची मालकी मानीत नसून आपण मालक ही भूमिका घेत होतें. जोंपर्यंत पहिलें कूळ करार पाळीत होतें, तोंवर सरकार त्यास कूळ म्हणून संरक्षण देत होतें; तो नाही तर दुसरा, ही सरकारची भूमिका होती. उलट, एखाद्या जमिनींत श्रम करूनही पिकत नाही अशी परिस्थिति दिसून आल्यास जमिनीचा वाडकर सरकारकडे 'उतारचिठी' मागत असे व सरकार ती देत असे. उतारचिठी दिलेल्या वाड्या अगर शेतें मामूर करण्यास देण्यास सरकार मोकळें होतें व दुसरा मनुष्य सरकारदेणें वगैरे देऊन स्थावराचा उपभोग घेई. याचा अर्थ उघडच आहे की जमिनीचे अंतिम मालक आंगरे होत, अशी आंगऱ्यांची भावना होती.[3]

आणखी एक उदाहरण पाहा —

अनाजी त्रिंबक डबीर या इतिहासप्रसिद्ध व्यक्तीस आंगऱ्यांनी 'लालघोडा' ही वाडी इनाम दिली होती; शिवाय, त्यांची धाकुलवाडी म्हणून दुसरी वाडी होती. इ. स. १८०८–०९ मध्यें 'लालघोडा' वाडी सरकारजमा झाली व तिचें इनामाचें स्वरूप जाऊन सरकार तीवर महसूल आकारूं लागलें. वाडीचें उत्पन्न येईना, म्हणून डबीरांनी ती महालकऱ्याच्या स्वाधीन केली व

१ आंदरु नं. १३४, पृ. ६५
२ आंदरु नं. ६३७, पृ. १४९, १५०
३ आंदरु नं. ६३७, पृ. १४४ ते १४६

स्वत: रेवदंडा येथे राहावयास गेले. महालांतून वाडी मामूर करण्याचा प्रयत्न अयशस्वी झाला. पूर्वी नागावांत एकदोनदा जे दंगे झाले, त्यांत वाडीच्या रहाट–रहाटवडीची मोडतोड झाली होती, झांडें तुटलीं होतीं. वाडी पूर्णपणें खराबीस आली; म्हणून सरकारनें ती राघो महादेव करंदीकर यांस २५ वर्षांच्या करारानें मक्त्यानें दिली. राघो महादेव यांनी सरकारला कळविलें की दोन परमुलकी कुळें आणून वाडी मामूर करतों; त्याबद्दल चौली शिरस्त्याप्रमाणें पाळणुकीचा करार करून द्यावा; वाडींत घर बांधून राहण्यास परवानगी द्यावी. एक म्हैस अजीपाल द्यावी. हें मान्य असल्यास मी मशाखत, उस्तवारी करतों.[१]

येथेही, वाडीचा मालक कोण व सरकारची भूमिका काय, असा प्रश्न उत्पन्न होतो. सरकार मालक व विश्वस्त अशी भूमिका स्पष्ट दिसते !

करंदीकरांनी वाडी ताब्यांत घेण्यापूर्वी वाडीची पाहणी झाली व पुढीलप्रमाणे सरकारी रीत्या उत्पन्न ठरलें —

५२८⌐।।। रु. हालहासील.

४३।।।= माडपेढ १३९ पैकी वजा ९ चढाकडे; १३ गैरदस्ती;
बाकी ११७ माडांचा आकार.
४०।।।= बारदार १०९ दर ·।= प्रमाणे.
३ भंडारमाड ८ दर ·।= प्रमाणे.
४३।।।=

·।।।· सुपारी ५ वजा १ चढाकडे. बाकी ४ दर ८≡ प्रमाणे.
२।= फणस झाडें १३ वजा रोपे ५ = ८ दर ·।·।।।· प्रमाणे.
२।।=।।। उंडी बारदार ९ दर ·।·।।।· प्रमाणे.
·।≡।।। इतर उत्पन्न.
·।।।⌐। वरकसचें उत्पन्न.
१८≡ तूप उडीद.
५२८⌐।।।· रु.

करंदीकरांनीं ठरावाप्रमाणे संचणी ७१।।।·।।· रु. द्यावयाची; पण पाहणीप्रमाणे सरकार व करंदीकर यांना उत्पन्न ५२८⌐।।। रु. मिळणार होतें ! तेव्हा ठरलें की करंदीकरांनी दरसाल ३० रु. द्यावेत व सरकारनें ४१।।।·।।· रु. बाद द्यावेत. करंदीकरांस जहाजफर्माशीचा उपद्रव लागूं नये. करंदीकरांनी दर बारदार माडामागें चौलाच्या शिरस्त्याप्रमाणे दोन झाप सरकारांत द्यावेत; अन्य माफी असावी. त्यांनी वाडीच्या उस्तवारीकरितां नवीं परमुलकी दोन माणसें चाकर, मुशारखोर म्हणून ठेवावींत. या चाकरांकडून सरकारनें सहा वर्षेपर्यंत घरटक्का, गादी-तंबाखु हे कर घेऊं नयेत; नंतर घरपट्टी १।।≡ रु. दरसाल प्रत्येकी आकारावी. या नोकरांस वेठबेगार, फडफर्मास, बकरें-कोंबडें, कारसाई इत्यादि कर, ते नोकर असेपर्यंत माफ असावेत.

वाडीचा करार व मामुरी म्हटली की 'वार्षिक चढ' ही गोष्ट आलीच. लालघोडा वाडीचा चढासह आकार ठरला, तो असा—

इ. स. १८०९ – १० – ५२८⌐।।। रु.
१८१० – ११ – ५३।=।।। रु.
१८११ – १२ – ५५।।=।।। रु.

---

१ आंदरु नं. ६३६, पृ. १४६

हा चढ केवळ गैरबारदार व पोईकर माड ज्या प्रमाणांत बारदार होतील, त्या प्रमाणांत आहे. इ. स. १८१२–१३ मध्ये सरकारनें इतर बागांबरोबर या वाडीची पाहणी करावयाची व तींत दर बारदार माडपेढास ·।≈ रु. प्रमाणे आकार घ्यावयाचा असें ठरलें.[१]

या तपशीलाने महसुलावरील चढ आकारण्यांतील विचार कळतो व बागायताचा महसूल आकारतांना किती तपशील पाहिला जात असे हें समजतें. इनाम दिलेली मालमत्ता ही सत्तेच्या इच्छेवर वतनदाराकडे राहते; ती इच्छा बदलली म्हणजे इनामदाराची औट घटकेची मालकी संपली ! अंतिम मालक सरकार किंवा सत्ता !

चिमणाजी बापुजी ओक हे एक वाडकर इ. स. १८१९–२० च्या सुमारास निपुत्रिक वारले व त्यांची बेवारस वाडी सरकारांत जमा झाली. आप्पाजी रघुनाथ कुंटे यांस ती सरकारने जमीदार व ग्रामस्थ यांच्या. विद्यमाने २३५ रु. स फरोख्त केली; वाडीचें क्षेत्र १ बिघा व १।।। पांड होतें. सनदेंत चतु:सीमा सांगितल्या आहेत. वाडींत चुनेगच्ची विहीर, घरटा, बेडें, पाणस्थल यांच्या क्षेत्रफळाची नोंद आहे. ओकांनीं एक मंदिर बांधलें होतें तें सरकारने कुंटे यांजकडे पूजे-अर्चेस देऊन मंदिरास दिलेली नेमणूक त्यांजकडे चालविली.[२]

इ. स. १७८५ मध्ये चिंतो राम पटवर्धन यांनी महादू नाईक याजपासून १ बिघा ३।।। पांड क्षेत्रफळाची वाडी खरेदी केली.[३] सदाशिव नारायण ढापरे हे इ. स. १८४०–४१ मध्ये नागावचे एक वाडकर होते.[४] सारांश, शिवकालांत जशीं अनेक ब्राह्मण घराणीं नागावांत बागायतीचा व्यवसाय करीत, तशींच आंगरेकालांत तो पुढे चालविणारीं अनेक घरें होतीं. मह्याजन, आचार्य, वझे, दामले, करंदीकर, ओक, पटवर्धन, कुंटे, ढापरे अशी केवढी तरी यादी देतां येईल.

इ. स. १८१२–१३ मधला बागायताच्या आकाराचें तेरीज सांगणारा कागद पेशवेदप्तरांत जेवढा उपलब्ध झाला, तेवढा नकलला आहे. त्यांतून वाडकर, वाडींतील एकूण माड, एकूण उत्पन्न, सरकारी उत्पन्न, सरदेशमुखी, पोतदारी इत्यादि गोष्टी कळतात. या कागदाचा एक बंद मुळांत गहाळ झाला असल्यामुळे नागावचे एकंदर सुमारें ३०० पैकी सुमारें २५ वाडकर आपणांस समजूं शकत नाहींत. पण किमान किती ब्राह्मण बागायताचा व्यवसाय करीत होते, हें समजण्याची सोय त्यांत झाली आहे. तक्ता पुढीलप्रमाणे :—

| | वाडकर | एकूण आकार रु. | नारळाचीं एकूण झाडें |
|---|---|---|---|
| १ | नारायण गोविंद आरेकर | १०।≡ | ४७ |
| २ | रामचंद्र बल्लाळ आरेकर | १५८⁓।।। · | ५९ |
| ३ | भास्कर बल्लाळ आरेकर | १२८≡।।। · | ३७ |
| ४ | पांडुरंग शंकर आरेकर | २६८= | १३३ |
| ५ | नारो विष्णु आरेकर | २।।·।। · | १५ |
| ६ | अंताजी आपाजी आरेकर | ४८≡।। · | ९ |
| ७ | गणेश बाबाजी आरेकर | ८।।।≡।।। | २१ |
| ८ | गणेश राम आरेकर | ३१।·। · | १०३ |
| ९ | बापुजी कृष्ण आरेकर | ५३८⁓।।। · | ९९ |

१ आंदरु नं. ६३६, पृ. १४६ ते १४८
२ आंदरु नं ४७, पृ. ७०, ७१; आंदरु नं. २४९, पृ. १०३
३ आंदरु नं. ८३, पृ. १७८
४ कोंजरु नं. १३७, पृ. ३२

| | वाडकर | एकूण आकार रु. | नारळाचीं एकूण झाडें |
|---|---|---|---|
| १० | हरि अनंत आरेकर | ३६॥।=॥।· | १५५ |
| ११ | भिकाजी नारायण ढापरे | ५ऽ–॥।· | ३० |
| १२ | महादाजी कृष्ण ढापरे | १३।–॥।· | ३५ |
| १३ | हरि कृष्ण ढापरे | १०॥= | ४० |
| १४ | कृष्णाजी बाजी ढापरे | ११॥।= | ४१ |
| १५ | मोरो गणेश भागवत | ९।=। | ४२ |
| १६ | केशव कृष्ण दातार | ९ऽ≡ | २९ |
| १७ | बापूभट दातार | ३ऽ≡॥।· | १० |
| १८ | रामाजी त्रिंबक वझे | ४॥–॥ | १८ |
| १९ | बापुजी रामचंद्र बर्वे | २१।= | ५९ |
| २० | नारायणभट फडके | ६५॥= | २३८ |
| २१ | विश्वनाथ बल्लाळ भिडे | ५ | २१ |
| २२ | बच्चाजी गणेश जोशी | ९॥≡ | २७ |
| २३ | विसाजी केशव जोशी | ७ | २५ |
| २४ | पांडुरंग जोशी | ८ऽ॥।. | ३१ |
| २५ | दामोदर जोशी | ३।≡।. | १४ |
| २६ | बच्याजी नारायण जोशी | ३।। | ११ |
| २७ | रामचंद्र विठ्ठल जोशी | ३॥ऽ। | १६ |
| २८ | बच्याजी विठ्ठल जोशी | १०॥। | ४२ |
| २९ | हरि आप्पा जोशी | १०॥।=॥ | ४८ |
| ३० | मुकुंद जोशी | २५।–॥।. | ८० |
| ३१ | हरि त्रिंबक जोशी | ४।=।. | १४ |
| ३२ | राम बाबा जोशी | ७॥।–॥। | २४ |
| ३३ | केसो गोविंद जोशी | १७॥– | ६२ |
| ३४ | बच्याजी बाबूराव जोशी | ७॥– | २९ |
| ३५ | बाल जोशी पगारकर | १४ऽ।. | ५४ |
| ३६ | बालकृष्ण जोशी पगारकर | ६ऽ≡।. | २२ |
| ३७ | गोविंद नारायण दामले | ७०ऽ≡॥।. | ६८ |
| ३८ | विसाजी विठ्ठल दामले | २३॥= | ८३ |
| ३९ | त्रिंबकभट आठवले | ५ऽ–॥।. | १९ |
| ४० | जनार्दन महादेव आठवले | ४ऽ–॥। | १२ |
| ४१ | महादेवभट आठवले | १॥–॥ | ८ |
| ४२ | पांडुरंग बाबाजी आठवले | १।.। | ६ |
| ४३ | बच्याजी हरि आठवले | .॥ऽ॥ | ४ |
| ४४ | तात्या आठवले अक्षीकर | .।– | १ |
| ४५ | लक्ष्मणभट आठवले | .॥= | ४ |

| | वाडकर | एकूण आकार रु. | नारळाचीं एकूण झाडें |
|---|---|---|---|
| ४६ | गोपालभट आठवले | १॥− | ७ |
| ४७ | त्रिंबक बाबाजी आठवले | ४८≡॥ | २६ |
| ४८ | गणेश नारायण आठवले | ३।≡ | २२ |
| ४९ | आबाजी विश्वनाथ आठवले | २।=. | १४ |
| ५० | बाळंभट आठवले | १।≡॥।. | ७ |
| ५१ | केशव विष्णु आठवले | .॥≡।. | २ |
| ५२ | त्रिंबकभट आठवले | १८॥।. | ४ |
| ५३ | लक्ष्मण महादेव आठवले | ९८= | ३१ |
| ५४ | गोविंद गणेश आठवले | ५८≡॥ | २८ |
| ५५ | रामाजी गणेश आठवले | ३८−। | ८ |
| ५६ | त्रिंबक हरि आठवले | ३॥− | ९ |
| ५७ | पांडुरंग हरि आठवले | १५॥=। | ६२ |
| ५८ | आपाजी विश्वनाथ आठवले | २१।॥=। | ७० |
| ५९ | भिकाजी नारायण आठवले | ७।=॥. | २० |
| ६० | सदाशिव विठ्ठल ठोसर | ९८− | ४४ |
| ६१ | बच्याजी गणेश ठोसर | ११॥− | ४३ |
| ६२ | अनंतभट पटवर्धन | .।≡॥. | १ |
| ६३ | बापूभट पटवर्धन | १॥।−॥ | ९ |
| ६४ | लक्ष्मणभट सान्ये | ३८≡ | १७ |
| ६५ | विश्वनाथभट सान्ये | ८।॥−।॥. | ३२ |
| ६६ | नारो बाबाजी कोल्हटकर | ७।≡॥. | २९ |
| ६७ | सदाशिव विश्वनाथ कोल्हटकर | ३८॥।. | १० |
| ६८ | गणपतराव कोल्हटकर | ७८−॥. | २२ |
| ६९ | लक्ष्मण कृष्ण कोल्हटकर | ३२।= | ७९ |
| ७० | गोविंदभट रिसबूड | २।≡। | ६ |
| ७१ | भास्करभट भातखंडे | २।−॥. | १४ |
| ७२ | बापूभट भातखंडे | ७॥≡।. | २४ |
| ७३ | नारायणभट भातखंडे | २८=।॥. | १५ |
| ७४ | बच्याजी महादेव लेले | .।≡।॥. | १ |
| ७५ | बालाजी महादेव लेले | ४॥≡॥. | १५ |
| ७६ | बाबाजी बल्लाळ लेले | ४ | ८ |
| ७७ | सदाशिवभट मायदेव | ५।॥=। | २७ |
| ७८ | गोविंद आप्पाजी मायदेव | ५।=।॥ | १९ |
| ७९ | राघो नारायण मायदेव | ७।=।॥. | २८ |
| ८० | केशव हरि नेने | ८।−।॥. | ३१ |
| ८१ | भिकाजी हरि नेने | ५॥− | २४ |

| | वाडकर | एकूण आकार रु. | नारळाचीं एकूण झाडें |
|---|---|---|---|
| ८२ | बापुजी भिकाजी नेने | २।≡।।।. | ९ |
| ८३ | बलवंतराव नेने इनामदार | ५७८—।। | १७१ |
| ८४ | बाळाजी भिकाजी सोहनी | १।=।। | ९ |
| ८५ | गोपाल बापुजी सोहनी | २८= | ८ |
| ८६ | रामचंद्र अनंत सोहनी | १।।≡।। | ७ |
| ८७ | बच्याजी गणेश काणे | ७।।—। | ३२ |
| ८८ | बालाजी नारायण काणे | ५।।=। | ३७ |
| ८९ | रामाजी जोगळेकर | १०८—। | ४२ |
| ९० | बालकृष्ण विठ्ठल जोगळेकर | २ | ६ |
| ९१ | बालाजी केशव जोगळेकर | १।—।।। | ४ |
| ९२ | त्रिंबक विश्वनाथ जोगळेकर | ४।।≡ | १५ |
| ९३ | नारभट पुराणिक | ३।।.।।। | १५ |
| ९४ | बापूभट पुराणिक | ४।।।=।. | २१ |
| ९५ | गंगाधरभट पुराणिक | २ | ९ |
| ९६ | वीरेश्वरभट पुराणिक | १।।।≡।।. | ८ |
| ९७ | दामोदरभट पुराणिक | ३।=।।।. | ९ |
| ९८ | विठ्ठल बल्लाल निमकर | १।।।≡ | १२ |
| ९९ | हरि विश्वनाथ निमकर | १८≡।।।. | ७ |
| १०० | महादाजी विश्वनाथ निमकर | .।।।— | ५ |
| १०१ | बापुजी गोविंद पुंडले | १।।। | ९ |
| १०२ | नारो जनार्दन पाटणकर | १५।।≡।।।. | ५६ |
| १०३ | सदाशिवभट सहस्रबुद्ध | २४।।।= | ७१ |
| १०४ | अंताजी गणेश सहस्रबुद्धे | ३८=।।. | ६ |
| १०५ | रामचंद्र बल्लाळ थथे | ६।—।।. | २७ |
| १०६ | बाल करवंत | ११।।।—। | ४४ |
| १०७ | बापू करवंत | ७।।= | २४ |
| १०८ | भास्कर बलाल फाटक | २।।।—। | ७ |
| १०९ | वासुदेवभट पाळंदे | ८।।≡।. | २३ |
| ११० | महादाजी गोविंद चापेकर | २७।.।।।. | ७५ |
| १११ | नारो विठ्ठल बापट | २७।।।. | ९० |
| ११२ | भटंभट खडपेकर | १८—।।।. | ५ |
| ११३ | बाबूराव कुंटे | .।।।≡ | ५ |
| ११४ | हरि राम मुद्रीक | १७।।।=।।।. | ७७ |
| ११५ | शिवाजी विठ्ठल लोंढे | १२।।।— | ६१ |
| ११६ | गणेश त्रिंबक लोंढे | .।।।—। | १ |
| ११७ | महादजी नारायण लोंढे | ४८≡।। | १७ |

| | वाडकर | एकूण आकार रु. | नारळाचीं एकूण झाडें |
|---|---|---|---|
| ११८ | वासुदेव बाबूराव लोंढे | ४।≡।।. | २९ |
| ११९ | विष्णु बल्लाळ लोंढे | ९।।≡।. | ३९ |
| १२० | आबाभट लोंढे | ८।।।.।. | २९ |
| १२१ | सखो गोविंद लोंढे | १।।=।. | ६ |
| १२२ | हरभट लोंढे | ३।.।।. | १५ |
| १२३ | केसो धोंडदेव लोंढे | ३९।=।।।. | १०८ |
| १२४ | सदाशिव विठ्ठल महाजन | .।।-।।. | १ |
| १२५ | बापुजी कृष्ण महाजन | २।।- | ९ |
| १२६ | राघो अनंत महाजन | ५७।।=।। | २०१ |
| १२७ | परशराम गोविंद महाजन | ४।≡ | ९७ |
| १२८ | नारो आप्पाजी महाजन | १।।।=।. | १० |
| १२९ | वासुदेव बल्लाळ महाजन | १७।।=। | ७६ |
| १३० | विसाजी बाळकृष्ण महाजन | १।।=।। | ३ |
| १३१ | कृष्णाजी महादेव महाजन | २०।।=।।। | ११६ |
| १३२ | त्रिंबक राम महाजन | ८।-।।।. | २७ |
| १३३ | गणेश हरि महाजन | ४८≡ | १७ |

गहाळ झालेल्या पृष्ठांतील २५ खातेदारांचीं नांवें जमेस धरून खातेदारांची संख्या सुमारे ३ शें होते; पैकी १३३ हून जास्त खातेदार ब्राह्मण आहेत. ज्यांच्या ब्राह्मणत्वाबद्दल संशय नाही, तेवढेच येथे निर्दशित केले आहेत. ब्राह्मण बागायतदारांच्या वाडयांतील नारळाचीं झाडें किमान ४५०० आहेत. सुपारी, उंडी, फणस, ताड यांच्या झाडांची संख्या मर्यादित असल्याने ती येथें विचारांत घेतली नाही. या वर्षी नागावांत नारळाचीं एकूण बारदार झाडें १०००८ असल्याचें अन्यत्र आलें आहे.

या कागदामुळे अनेक गोष्टी उघड होतात. यादींत करवंत हें ज्यांचें आडनांव आहे, ते क्रमवंत ब्राह्मण होत. ढापरे, आरेकर, निमकर हे देवरुखे ब्राह्मण आहेत. बाकी बहुतेक सगळे कोकणस्थ ब्राह्मण दिसतात. पण नागावांत देशस्थ व कऱ्हाडे ब्राह्मणहि नांदत होते. बहुसंख्य कोकणस्थ आहेत. इ. स. १८१९–२० मध्ये तीच परिस्थिति होती;[1] तीच आजहि आहे.

एक बिघा इतक्या क्षेत्रांत नारळाचीं सुमारें ५० झाडें असलीं म्हणजे बागायतांतील लावणी प्रमाणांत असल्याचें मानलें जात होतें. त्याहून कमी झाडें असणें हें नातवानीचें चिन्ह समजलें जात होतें. या यादीकडे लक्ष दिलें, तर त्याहून लहान क्षेत्र असलेल्या बागायतदारांची संख्या मोठी दिसते. सर्वांत मोठी वाडी नारायणभट फडके यांची असावी, असें झाडांच्या संख्येवरून दिसते; तिचें क्षेत्रफळ सुमारें ५ बिघे असावें. म्हणजे, नागावांतील वाडया आकाराने लहान होत्या. कांही इतक्या लहान होत्या की त्यांच्या उस्तवारीसाठी परमूलकी कुळें अगर माळी आणण्याची गरज नव्हती; म्हणून परमुलकी कुळें व माळी आणणारांची संख्या मर्यादित होती.

**विभक्त कुटुंबें**— आपला एक दृढ समज असा आहे की पूर्वीच्या काळांत अविभक्त कुटुंब-पद्धति असे व प्रत्येक कुटुंब चांगलें मोठे असे. नागावपुरता विचार करूं लागलें, तर या समजुतीस

१ आंदरु नं. ४५, पृ. ६८, ६९

वरील कागदाने धक्का बसतो. या कागदांत बाप, भाऊ, मुलगे यांचें बागायत वेगळें दाखविलेलें दिसते. उदाहरणार्थ, आरेकरांचीं दहा खातीं आहेत. दहा जणांच्या दहा वेगळ्या बागा दाखविल्या आहेत. ते सरकारमहसूल वेगळे भरतात. यांतील २ रामचंद्र बल्लाळ, ३ भास्कर बल्लाळ हे सख्खे भाऊ असावेत; त्यांचें बागायत वेगळें आहे. ढापरे यांचीं चार बागायतें दिसतात. पैकीं एक महादाजी कृष्ण यांचें; दुसरें हरि कृष्ण यांचें आहे. हे दोघे बंधु असावेत; आणि कृष्णाजी बाजी ढापरे हे त्यांचे वडील नाहीत असें मानवत नाही. नागावांत जोशांचीं १३ बागायतें आहेत गावास मूलत: एकच जोशी असणार; दुसरे असलेच तर ते पगारकर जोशी असावेत. एका घराण्याचीं १३ बागायतें १३ नांवांवर आहेत. त्यांतील रामचंद्र विठ्ठल व बच्याजी विठ्ठल हीं नांवें दोन भावांचीं भासतात. आठवल्यांचीं २१ बागायतें आहेत. त्यांतील पुढील नांवें पाहा—

| | |
|---|---|
| १ जनार्दन महादेव आठवले | १ पांडुरंग बाबाजी आठवले |
| २ महादेवभट आठवले | २ त्रिंबक बाबाजी ,, |
| ३ लक्ष्मण महादेव आठवले | १ गोविंद गणेश ,, |
| | २ रामाजी गणेश ,, |

आणखी भरपूर निवड करतां येईल; पण आमचें म्हणणें सूचित करण्यास एवढें पुरे. लेल्यांची, नेन्यांची, निमकरांची हीच स्थिति आहे. तेव्हा, नागावांत सख्खे भाऊ वेगळे झाले आहेत व त्यांचे वडील त्यांजपासून विभक्त आहेत असें ही यादी सूचित करते. केवळ बागायत वेगळें आहे, सरकारधारा वेगळा भरावा लागतो, सरकार प्रत्येकाच्या उत्पन्नाचा वेगळा अंदाज करतें, एवढ्यावरून त्यांचें वेगळेपण मानावें कीं न मानावें, असा द्विधा विचार करणारांनी विचारांत घ्यावयाची गोष्ट अशी की नागावांतील ब्राह्मणांच्या घरांची संख्या मोठी आहे. इ. स. १८०८ मध्ये ती २२३ आहे !! हीं घरें स्वत:साठी बांधलीं आहेत; घरें भाड्यानें देण्याचा रिवाज तेव्हा नव्हता. स्वत:साठी दोन तीन घरें बांधून दोन बंद ठेवण्याचा प्रकार असण्याचें कारण नाही; तीं गरजेच्या पोटीं बांधलीं आहेत असें मानलें, तर विभक्त होण्यामुळे जी गरज उत्पन्न झाली, तींतून ही घरांची संख्या वाढली असें दिसतें. बागा लहान असल्याचा देखावा दिसतो; त्याचाहि अर्थ असा, की विभक्त होण्याच्या प्रकारांत, वाटपामुळें वाड्या लहान झाल्या असणार.

नागाव येथील घरांचें स्वरूप कसें होतें व त्याला काय सामान लागत होते, हे रिसबूड यांच्या घराच्या निमित्ताने पूर्वीं याच प्रकरणीं सांगितलें आहे. खेड्यांतील पूर्वीची घरें केंवळी होतीं. त्यांना पडवी, ओटी, माजघर, स्वयंपाकघर, बाळंतिणीची खोली व मागें एक पडवी एवढीं 'दालनें' असत. यांतच भात साठवावयाचें; नारळ वगैरे ऐनजिनसी उत्पन्न ठेवावयाचें, असा प्रकार होता. त्यामुळें घरांत ४।५ माणसांहून जास्त जणांची राहण्याची सोय नव्हती. अर्थात् विभक्त कुटुंब नांदण्यापुरतीं झोपडीवजा घरें, असें घरांचें स्वरूप असे.

लोकसंख्येचे आकडे उपलब्ध असते, तर अधिक स्पष्ट लिहितां आलें असतें; पण घरटीप माणसांचे आकडे उपलब्ध नाहीत. इ. स. १८४०–४१ मध्यें नागावांत एकूण ५८५ घरें होतीं त्यांतून मंदिरें व महालादि सार्वजनिक इमारती (वस्तीचीं स्थानें नव्हेत) वजा केल्यास ही घरांची संख्या सुमारें ५५० होते. या वर्षीची 'खानेसुमारी' सुदैवाने उपलब्ध आहे. पुरुष ९०७; स्त्रिया ९६४; मुलगे १५९ व मुली ९३ मिळून नागावची माणसांची संख्या २१२३ भरते. म्हणजे दरघरांत सुमारे चार माणसें भरतात.[1] म्हणजे, इ. स. १८४०–४१ मध्ये तरी घरें विभक्त-

१ कोंजरु नं. १३७, पृ. ३

कुटुंबपद्धतीचीं द्योतक होतीं हें स्पष्ट आहे. इ. स. १८१२–१३ मध्येही याहून वेगळा प्रकार असण्याचा संभव दिसत नाही !

आणखी एक गमक पाहा— इ. स. १७७०–७१ मध्ये अगर त्या सुमारास जोगळेकर घराणें नागावांत स्थायिक होऊं पाहात होतें. त्यावेळीं त्यांचीं स्थिति कशी होती हें पूर्वी दिग्दर्शित झालें आहे.[1] त्यावेळीं त्यांचें नागावांत एक घर निर्माण झालें असें मानावयास पाहिजे. इ. स. १८१२–१३ मध्ये त्यांनीं किमान, बागायताचीं चार खातीं, म्हणून चार घरें निर्माण झालेलीं दिसतात. सुमारें चाळीस वर्षांत हीं एकाचीं चार घरें झालीं ! हें विभक्तकुटुंबपद्धतीचें द्योतक मानावयास हरकत नाही.

विभक्त होण्याची प्रथा बरीच असावी असें मानण्यास कागदोंपत्रीं पुरावेहि आढळतात. इ. स. १८३९–४० मध्ये विश्वनाथभट्ट लेले याचें घर फुटून त्याचीं चार घरें झालीं. १ बाबाजी विश्वनाथ लेले, २ सखाराम विश्वनाथ लेले, ३ सदाशिवभट व ४ वासुदेवभट्ट यांचें.[2] याच वर्षीं १ विनायक रामचंद्र महाजन व २ रामचंद्र बल्लाळ महाजन हे विभक्त झाले. तसेंच, मोरो रघुनाथ मायदेव व बापुजी कृष्ण यांचीं घरें विभक्त झालीं.[3] हें एका वर्षीं झालेलें विभक्तीकरण आहे.

घरांखालीं जमीन किती यांचे आकडे उपलब्ध आहेत व घरांचे आकडे उपलब्ध झाले आहेत. त्यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला तर असें दिसतें की घरांखालील जमिनीचें क्षेत्र लहान आहे. शिवाय, १८६७ पर्यंत नागावांत दुमजली घर नसल्याचा पुरावा अन्यत्र आला आहे. त्यावरूनहि वाटतें की नागावचीं घरें ४/५ माणसांकरितां एक अशा प्रमाणाचीं असावीत.

म्हणजे, नागावचे ब्राह्मण परिस्थित्यनुसार विभक्त कुटुंबपद्धतीचा अवलंब करीत होते ते ते धर्मकृत्यें चालविण्याचा, पूजाअर्चा करण्याचा व्यवसाय जोडधंदा म्हणून करीत होते. त्यांचा मुख्य व्यवसाय बागायतांत काम करण्याचा होता. वरील माहितीवरूनहि ब्राह्मणांच्या मुख्य व्यवसायाचा बोध होतो. आपल्या वाडींतील नारळाचीं झाडें भंडारव्यवसायासाठी देण्यास त्यांची तयारी नसे; सदर व्यवसायाने झाडांची नुकसानी होते, असा त्यांचा समज होता.[4] ही समजूत एका बाबतींत बरोबर आहे. झाडावर चढण्यासाठी भंडारी झाडास खाप पाडतो व पोय बांधण्यासाठी झापाच्या पात्या कापून त्यांचा उपयोग करतो; म्हणून झाडाची मजबुती कमी होते व शाकारास झाप उपयोगांत येत नाहीत.

## वाड्यांची उस्तवारी

कांही बागा मोठ्या होत्या व त्या नोकरांच्या मदतीने निगादास्त होत होत्या. आंगऱ्यांस पटलें होतें की मुशारखोर म्हणजे वेतनी नोकर आणून ठेवल्याशिवाय वाड्या मामूर होत नाहीत. इ. स. १८०८–०९ मध्ये आंगऱ्यांनी त्रिंबकभट आठवले यांच्या अर्जाचा विचार करून, त्यांनी परमुलखांतून आणलेल्या चाकरांबाबत घरटक्का माफ केला व तशी सनद दिली.[5]

इ. स. १८१२–१३ मध्ये आंगरे व नागावकर यांमध्यें बागायताच्या उस्तवारीसंबंधी एक कलमबंदी झाली; तींतील कलमें अशीं—(१) वाडकराने परमुलखांतून माळी आणून ठेविल्यास त्यास तीन वर्षेपर्यंत घरदेणें, वेठबेगार, फडफर्मास, बकरें, कोंबडें इत्यादि सर्व माफ होईल.

१ आंदरु नं. ६३७, पृ. १२८, १२९
२ कोंजरु नं. २०१३, पृ. १
३ आंदरु नं. ६३८, पृ. १७४
४ आंदरु नं. ६३७, पृ. १५०
५ आंदरु नं. ६३७, पृ. १४५

तदनंतर त्याने घरपट्टी देत जावी. याचा अर्थ, घरपट्टी देऊं लागला म्हणजे तो 'नागावकर' झाला. (२) वाडकराने मुशारखोर चाकर ठेवल्यास खत पाहून सहा वर्षेपर्यंत सर्वविध कर माफ; नंतर निम्मे धरटक्का द्यावा. वेठ, वेगार इत्यादि सर्व माफ होईल. (३) स्वमुलकी माळी वाडींत ठेविल्यास घरपट्टी वसूल केली जाईल; बाकीचे सर्व कर माफ होतील.[1] इ. स. १८१३–१४ मध्ये शिवाजी विठ्ठल लोंढे यांनी परमुलखांतून नवा माळी आणला. आंगऱ्यांनी त्याला सर्वविध कर माफ केले, त्यांत 'फडफर्मास' माफ होती. फडफर्माशींतच कोंबडें, बकरें यांचें देणें अंतर्भूत होत असे.[2] इ. स. १८१६–१७ मध्ये वासुदेव बल्लाळ महाजन यांनी हेट प्रांतांतून एक नोकर आणला; त्यास एक वर्ष घरपट्टी माफ झाली; तदनंतर निम्मे म्हणजे १ रु. ११ आ. ० पै घरपट्टी घेण्याचें ठरलें.[3] इ. स. १८१६–१७ मध्ये गंगाधर रामकृष्ण पुराणिक यांनी रेवदंड्याहून शेत-वाडीच्या उस्तवारीसाठीं एक नोकर आणून ठेविला. त्याला एक वर्ष घरपट्टी माफ; तदनंतर दरसाल अर्धी म्हणजे १ रु. ११ आ. ० पै घरपट्टी त्याचेवर आकारण्यांत येऊं लागली.[4] ही कलमबंदी अगर करार पुढील काळांत पाळला आहे असें स्पष्ट दिसतें.[5] सारांश, शक्य तर स्वतः, नाहीतर वेतनी मनुष्याच्या मदतीने नागावचे बहुसंख्य ब्राह्मण बागायताचा व्यवसाय करीत होते व त्यावर त्यांचें जीवन अवलंबून होतें.

## ब्राह्मण व शेती

नागावकर ब्राह्मण बागायताचे जोडीस शेतीचा व्यवसाय करीत होते. पुढील तक्ता पाहा. तेरीज ऐनजिन्नस भात महाल नागाव [ सरकारांत मक्ता म्हणून दिलें तें ] इ. स. १८०७–०८.

| ब्राह्मण शेतकरी | एकूण भात खंडी | ब्राह्मण शेतकरी | एकूण भात खंडी |
|---|---|---|---|
| मुकुंद जोशी | ·।।·।।२।।। | विसोबा जोशी | ० |
| चिंतामण जोशी | ·।१८२ | पांडुरंग जोशी | ·।३।।।१ |
| केसो गोविंद जोशी | ८४।। २।।। | दामोदर जोशी | ·।१ |
| सदाशिव जोशी | ८४।·।।· | बालकृष्ण जोशी | ·।।·।।२। |
| हरि त्रिंबक जोशी | ८३।२।।। | आपा जोशी | ·।।·।।२।।।· |
| केसो जोशी (रातें भात) | ८।।·१।।· | हर जोशी गोलक | ·।१।·।।· |
| केसो अनंत जोशी | ८।·२।· | बाल जोशी पगारकर | ·।।२।।।·।· |
| बच्याजी बाबू जोशी | ·।।।·।।।· | बाल जोशी पगारकर | ८३८१।।।· |
| अंताजी गणेश सहस्रबुद्धे | ·।।१८।· | वामनभट बर्वे | ·।४।·।।।· |
| वासुदेवभट पाळंदे | ८४८१। | रघु करवंत | ८२।१।।। |
| पांडुरंग महादेव चापेकर | ·।।१।।।२।।।· | बालाजी गणेश फाटक | ·।४।।१।। |
| त्रिंबक हरि आठवले | ८२८२।।। | आबाभट फाटक | ·।।२।।।२ |
| रामाजी गणेश आठवले | १८४।।२।।। | गोपालभट साठे | ·।१।।।२।। |
| विसाजी बल्लाळ आठवले | ·।।८१· | केसो गोविंद आरेकर | ८२।।२।। |
| पांडुरंग हरि आठवले | ·।·।।।· | सदाशिव कृष्ण आरेकर | ८२।१।।। |

१ आंदरु नं. ६३७, पृ. १२६
२ आंदरु नं ६३७, पृ. १४३
३ आंदरु नं. ६३७, पृ. १२०
४ आंदरु नं. ६३७, पृ. १२०
५ आंदरु नं. २४९ पृ. ११०

| ब्राह्मण शेतकरी | एकूण भात खंडी |
|---|---|
| बगाजी बापुजी आठवले | ·॥२।·॥· |
| बाबाजी गोविंद आठवले | ·॥३॥२॥।· |
| लक्ष्मण केशव आठवले | ·।३॥।१· |
| गणेश हरि आठवले | ८४॥।१॥।· |
| बच्याजी हरि आठवले | ·।४।१· |
| महादेवभट आठवले | ·।८२॥· |
| बालभट आठवले | ८४।१ |
| त्रिंबकपंत आठवले | ·।१।·॥· |
| गणेश नारायण आठवले | ·।१ |
| गोपालभट आठवले | ८१८॥।· |
| नारायणभट आठवले | ८॥।·॥।· |
| आनंदभट आठवले | ·॥१॥।२ |
| नारंभट फडके | ·॥।३॥।·।· |
| काशीनाथभट रिसबूड | ·।२।२। |
| लक्ष्मणभट रिसबूड | ·।१।·॥· |
| केशवभट रिसबूड | ·॥·।· |
| नारो विठ्ठल बापट | ·।२।· |
| विसाजी राम कुंटे | ·॥।३॥।१॥ |
| बाजी गोविंद कुंटे | १।४॥।१॥। |
| त्रिंबक विठ्ठल कुंटे | ·।४।२।· |
| विष्णुभट कुंटे | ·।३॥।२।· |
| हरि राम सुद्रीक | १॥३॥।१। |
| बच्याजी गणेश ठोसर | ·॥१८।· |
| केशव हरि नेने | ·॥।१॥·॥· |
| गोविंद नारायण दामले | ८३८।· |
| कृष्णाजी राम दामले | ८३।२॥।· |
| बच्याजी केशव वाड | २॥।१।१॥· |
| बच्याजीपंत काणे | ८३ |
| गणेश गोसावी | ८२।१ |
| पांडुरंग बल्लाळ लिमये | ८४॥१। |

| ब्राह्मण शेतकरी | एकूण भात खंडी |
|---|---|
| महादाजी कृष्ण आरेकर | ·।१।१॥ |
| गणेश बालाजी आरेकर | ·॥·॥१ |
| बालाजी बाबजी आरेकर | ·॥।४८॥· |
| गणेश राम आरेकर | १।१८१॥ |
| बापुजी कृष्ण आरेकर | १८२॥।२॥। |
| नारो अनंत आरेकर | ·॥१॥।१ |
| नारो केशव आरेकर | ·।१॥।२। |
| भास्कर आरेकर | ·।·॥२।· |
| वासुदेव गोविंद महाजन | १।३॥।·॥।· |
| सदाशिव दाद महाजन | १।४।२॥ |
| रामचंद्र धोंडदेव महाजन | १॥१।२ |
| राघो अनंत महाजन | ३॥२॥१॥ |
| वासुदेव राम महाजन | १॥।४॥।·॥।· |
| विसाजी कृष्ण महाजन | ८३।१ |
| मोरो बापुजी महाजन | ·।१।२॥।· |
| बापुजीपंत पुंडले | ८२८३॥। |
| बालाजी राम पुंडले | ·।·।१॥ |
| महादाजी कृष्ण ढापरे | ·।·॥।१। |
| हरिपंत ढापरे | ·।१॥।२। |
| विठ्ठल बाजी ढापरे | ·॥१॥·।· |
| गोविंद बलाल ढापरे | ८४॥२॥। |
| मोरो लक्ष्मण ढापरे | ·।८२॥।· |
| कृष्णाजी नारायण ढापरे | ·।·॥·॥· |
| आपाजी बालकृष्ण ढापरे | ८४८१। |
| बालाजी केशव जोगळेकर | २।२॥।२॥।· |
| बालकृष्ण जोगळेकर | ८१॥१ |
| बापूभट भातखंडे | ·।२। |
| नारभट भातखंडे | ·।१ |
| भास्करभट भातखंडे | ·।२॥।· |
| पांडुरंग भिकाजी ओक | ८४।२।· |
| गंगाधरभट पुराणिक | ८४॥।१॥ |
| शिवाजी विठ्ठल लोंढे | ·।·।।१· |
| विठोबा गोसावी | ८३॥।·॥· |

इ. स. १८०७–०८ या वर्षी सरकारला एकंदर ७८८४॥।८२। खंडी भात मक्ता म्हणून नागावांत मिळालें. एकंदर १६१ कुळें होतीं. पैकी ९३ कुळें ब्राह्मण आहेत (ले. ६५). ते

नागावांतच शेती करीत असल्याचें उघड होतें. जवळपासच्या गांवांतूनही त्यांची शेती आहे.[१] या कागदामुळेहि नागावांतील विभक्त कुटुंबपद्धतीच्या राहणीचा बोध होतो; तेव्हां मागील बागायताच्या खातेदारांच्या यादीबरोबर या कागदाचाहि विचार केला पाहिजे.

## ब्राह्मणांचा कृषिकर्माचा ह्रास

(१) इ. स. १७९५–९६ मध्ये चिंतो राम पटवर्धन यांनी मानाजी आंगऱ्यांस विनंती केली की 'नागावांत शिलोत्र खारजमीन सात बिघे आहे. ही खस्ती जमीन परिश्रमपूर्वक शेतीस आणण्यास मी तयार आहें; अजमासें २५५ रु. खर्च येईल. पण जमीन शेतीस योग्य होईल. या जमिनींत उंच भागावर माड लावून बागायत करण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला होता. बाकीच्या खोलगट जागीं बाहेरून माती आणून भर घालून जमीन तयार करतों'. आंगऱ्यांनीं विनंती मान्य केली व इ. स. १७९५–९६ ते १८१५–१६ या वीस वर्षांच्या काळांत जमीन रकमी करावी असें सांगितले. दर वर्षी जेवढी जमीन मामूर होईल, तेवढीची पाहणी करून दरबिघा तीन मण भात महसूल म्हणून द्यावें; २१ वे वर्षापासून शिरस्त्याप्रमाणें दरबिघ्याचा ठरेल तो आकार द्यावा, असा करार झाला. दर बिघ्याच्या तीन मण भातांत 'बावती' अंतर्भूत झाल्या होत्या.[२]

(२) इ. स. १७९७–९८ मध्ये वासुदेव बल्लाळ महाजन यांनीं विनंती केली की मौजे वणवली येथील जमिनींत रब्बीचें पीक काढण्याचा आमचा विचार आहे; यंदा पेरून पाहतों. जितक्या जमिनींत पीक येईल, तेवढीस, दरबिघा १ रु. प्रमाणें देखील बावती म्हणून आकार देण्यास आपण तयार आहोंत. सरकारनें तें मान्य केलें.[३]

(३) इ. स. १७९९–१८०० मध्ये नागावांतील कासारवाडी व बांग अलीखान हीं जंगल-गर्क शेतें अनंतभट आठवले, गणेश घैसास, रामचंद्र घोंडदेव महाजन, भिकाजी नारायण ढापरे व भिकाजी हरि लेले यांनीं आंगऱ्यांकडे कसण्यास मागितलीं. या दोन शेतांचें एकूण क्षेत्र ५॥ बिघे होतें व गेलीं वीस वर्षें तीं सरकारांत पडून होतीं. त्यामुळें त्यांत जाळ्या, झुडपें व केतकी माजली होती. आंगऱ्यांनी तीं शेतें सदर पांच जणांस करारानें दिलीं. करार की जितकी जमीन लागवडीस येईल, तितकीवर दरसाल दरबिघा पांच मण भात सरकारमहसूल म्हणून आकारावयाचें.[४]

(४) इ. स. १८०८–०९ मध्ये बाळाजी जिवाजी घाणेकर यांनी आंगऱ्यांकडे अर्ज केला की माझी सहा बिघे १३॥ पांड जमीन असून तींत अकरा शेतें आहेत. आजवर धारा भरला; आता तीं मला करवत नाहीत; कारण जमीन कनिष्ठ प्रतीची आहे. मी नातवानीस आलों असल्यानें मला उतारचिठी द्यावी व सरकारने त्यांची उस्तवारी दुसऱ्या कोणासहि सांगावी. अर्जानुसार, आंगऱ्यांनी शेतें सरकारखालसा ठेवलीं व तसें जाहीर केलें. नंतर गणेश हरि आठवले यांनी आंगऱ्यांस अर्ज केला की वरील जमिनीपैकी पांच बिघे जमीन योग्य धारा ठरवून मजकडे उगवणीस दिल्यास मी शेतें करीन. आंगऱ्यांनी पाहाणी करून ३ बिघे १६ पांड जमीन उगवणीस दिली. दर बिघ्यास ६ मण गोडें भात, असा सात वर्षांकरितां दरसालचा मक्ता ठरला. तूप–उडीद मोईन, गुंडीपेंढा इत्यादि सर्व इतर देणीं सरकारने माफ केलीं.[५]

---

१ आंदरु नं. ६३७, पृ. १२९; आंदरु नं. १३५ पृ. ४७ ते ४९

२ आंदरु नं. ६३७, पृ. १२९, १३०

३ आंदरु नं. १३४, पृ. ६५

४ आंदरु नं. ६३७ पृ. १३१

५ आंदरु नं. ६३७ पृ. १४४ ते १४६

(५) इ. स. १८१९–२० मध्ये गणेश राम कुंटे, बालाजी गोविंद कुंटे, विष्णु नारायण कुंटे, त्रिंबक विठ्ठल कुंटे यांनी गोठी तर्फे ब्राह्मणगाव येथे नवीन जागा आकारांत आणून शेतें तयार केलीं. सदर जागेकरिता त्यांनी सरकारास १५० रु. नजर दिली.[१]

(६) इ. स. १८२०–२१ मध्ये नागावची रोठमळा नांवाची जमीन जंगलगर्क झाली होती. वासुदेव बल्लाळ महाजन यांनी सदर १ बिघा ३ पांड जमीन बारा वर्षांच्या कराराने आंगऱ्यांपासून घेऊन शेतीस लायक बनविली. पहिलीं बारा वर्षे माफी; नंतर दर बिघ्यास पांच मण भात असा तिचा महसूल ठरला. महाजनांनी जमिनीप्रीत्यर्थ ८७।।। रु. खर्च केला.[२] बागायतीसाठी जसे माळी अगर मुशारखोर नोकर परमुलखांतून आणून मामुरी करीत, तसेच, शेतीसाठीं बाहेरून चाकर आणणें आंगऱ्यांस मान्य होतें इ. स. १८०१–०२ मध्ये अंताजीं गणेश सहस्रबुद्धे यांनी शेतीसाठीं परमुलखांतून एक चाकर आणून ठेवला. आंगऱ्यांनी त्यास घरदेणें, पट्टी-तंबाखु, फडफर्मास इत्यादि देणें माफ केलें.[३] जागा मोकळी पडली अगर बेवारस ठरली तर ती बागायतीखाली व चांगल्या व्यवस्थेखाली आणण्याचा आंगऱ्यांनाहि छंद होता. उदाहरणार्थ, इ. स. १८१५–१६ मध्ये गणपत महादेव नेने यांस त्यांनी ६ बिघे सवा पांड इतकी जमीन योगक्षेमार्थ दिली.[४]

सारांश, आगरेकालांत नागावकर ब्राह्मणांनी शेती व बागायत या व्यवसायांत चांगला पुढाकार घेतला. जेथे जेथे जमीन मोकळी आढळली, तेथे तेथे त्यांनी जरूर तो प्रयत्न केला व आंगऱ्यांनी त्यांस उत्तेजन दिलें.

**आंगऱ्यांचा ब्राह्मणांबाबत दृष्टिकोनः—** ब्राह्मणांस आधार व सवलती देणें, हे जसें आंगऱ्यांचें एक धोरण होतें; तसेंच, त्यांचे हातून कांही अपराध घडल्यास सत्ताधारी म्हणून त्यांस शिक्षा करावयाची, पण नंतर माफी द्यावयाची असें दुसरें धोरण होतें. तुम्ही गुन्हा केलात अशी त्यांस जाणीव द्यावयाची व ब्राह्मणप्रतिपालन हें आपलें कर्तव्य म्हणून माफी द्यावयाची! इ. स. १८१९–२० मध्ये (१) बाजी गोविंद कुंटे यांना, सालगुदस्त वाडीबाबत जो खटला झाला, त्याबद्दल सरकारने १५० रु. दंड केला; पण नंतर २५ रु. माफ केले.[५] (२) गणेश विठ्ठल महाजन यांस आंगऱ्यांनी अलीबागेस बोलाविलें. ते आले, पण परवानगी घेतल्याशिवाय गेले; म्हणून त्यांस २ रु. मसाला केला. नंतर तो परत करण्यांत आला. (३) महाजनांस सरकारकामासाठीं येण्याबद्दल ताकीद झाली असतां आले नाहीत, म्हणून बगाजीपंत व वासुदेव राम यांस प्रत्येकीं १० व ७ रु. दंड झाला, पण तो वसूल केल्यावर परत करण्यांत आला.[६]

**सती —** ब्राह्मण स्त्रिया सती जाण्याची चाल प्रचलित होती. (१) इ. स. १७७३ मार्च ३ या दिवशीं नारो शंकर महाजन दिवंगत झाले. त्यांची भार्या सती गेली.[७] (२) इ. स. १८१०–११ सुा इहिदे अशर मयातैन आलफ या वर्षी विठ्ठलपंत दातार वारले. त्यांची भार्या सती गेली; सबब सरकारमहालांतून सतीच्या चोळीपातळाबद्दल ५ रु. खर्ची पडले. (३) इ. स. १८११–१२ मध्ये भिकाजी हरि सोनी मृत्यु पावले; त्यांच्या भार्येने सहगमन केलें. सरकारांतून सतीच्या

१ आंदरु नं. २४९, पृ १०३; आंदरु नं. ४८, पृ. ११३
२ आंदरु नं. ६३७, पृ. १५८
३ आंदरु नं. ६३७, पृ. १३२
४ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६
५ आंदरु नं. ४७, पृ. ७२
६ आंदरु नं. २४६, पृ. १००, १०१; आंदरु नं. २४९, पृ. १०९
७ आंअ. ३७९

चोळी-पातळाबद्दल ५ रु. खर्च झाले. (४) इ. स. १८१५ सप्टेंबर ९, छ ५ सवाल, सीत आशर मयातैन आलफ या दिवशीं पांडुरंग हरि आठवले यांची स्त्री समागमें गेली; सबब, साडी-चोळी-प्रीत्यर्थ महालांतून ५।। रु. खर्च झाले. चोळी-पातळ देऊन सतीचा सन्मान करण्याची सरकारची रीत नागाव महालांत होती.[1] इ. स. १८१९–२० मध्ये भागीरथीबाई पाळंदे मयत झाली. तिच्या अग्निसंस्कारार्थ महालांतून सात रुपयें खर्च झाले. हा धर्मार्थ खर्च दिसतो.[2]

**ब्राह्मणांत स्थलांतर** — इ. स. १८२४–२५ पर्यंत ब्राह्मणवर्गांत स्थलांतर झाल्याचें दिसत नाही. पण १८२५ ते १८३५ या दहा वर्षांच्या काळांत एकदम चढउतार झाल्यासारखें दिसतें. इ. स. १८२४–२५ त नागावांत एकंदर घरें ६५१ असून ब्राह्मणघरें २२६ होतीं. इ.स. १८२८–२९ मध्ये तीं २११, इ. स. १८३१–३२ मध्ये तीं २०८ झालीं. म्हणजे, ब्राह्मणांत स्थलांतर करण्याची प्रवृत्ति निर्माण होऊन वाढीस लागली. पेशवाई नष्ट झाली व आंगरे-सत्तेचीहि प्रलयावस्था सुरू झाली, तिचें हें निदर्शक आहे. राजकीय सत्तान्तराचा पहिला परिणाम बुद्धिजीवि ब्राह्मणवर्गावर दिसूं लागला. 'पंचामृत' नांवाचें एक पुस्तक दहा वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालें आहे; त्यांत पुढील माहिती आली आहे– 'महाराष्ट्र भाषेचा कोश ज्या पंडितांनी इ. स. १८२९ मध्ये प्रसिद्ध केला, त्याचे मुख्य जगन्नाथशास्त्री क्रमवंत हे नागाव येथील होते. अलीकडे हें घराणें 'टिल्लु' या नांवाने प्रसिद्ध आहे. त्यांचे मदतनीस गंगाधरशास्त्री फडके हेही नागावचे. या मंडळांतील परशरामपंततात्या गोडबोले वगळले, तर इतर म्हणजे रामचंद्रशास्त्री जान्हवेकर, दाजीशास्त्री शुक्ल हे नागावचेच आहेत. दादोबांच्याहि पूर्वी, पण त्याच म्हणजे इ. स. १८३६ सालीं जें महाराष्ट्र-भाषेचें व्याकरण प्रसिद्ध झालें, त्याचे कर्ते कोश-मंडळांतील एक गंगाधरशास्त्री फडके हे होते. त्यांनी आपल्या व्याकरणावर "राहणार प्रांत अष्टागर, महाल नागाव," असें स्पष्टच नमूद केलें आहे.'

'दादोबा पांडुरंग जरी ठाणें जिल्ह्यांतील होते, तरी ते ज्यांच्याकडून व्याकरण शिकले, ते त्यांचे गुरु बापुशास्त्री शुक्ल-मायदेव यांचेंहि मूळ ठिकाण नागाव हेंच आहे. दादोबांनी त्यांच्या स्वभावाची व विद्वत्तेची मुक्तकंठ स्तुति आपल्या 'आत्मचरित्रांत' केली आहे. शिक्षा-मंडळीचे 'सक्तार' ( सेक्रेटरी ) व आधुनिक मराठी भाषेचे जे जनक समजले जातात व ज्यांनीं "इसाप-नीति", "बालमित्र" वगैरे ग्रंथांचीं सुंदर मराठी भाषांतरें केलीं, ते सदाशिव काशीनाथ छत्रे हेही पण नागावचे होते, असें प्रो. गो. वि. भाटे लिहितात. ...... नेटिव एज्युकेशन सोसायटीचे सक्तार जर्विस याने जे मराठी, गणितविषयक ग्रंथ किंवा "विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष" वगैरे जे ग्रंथ प्रसिद्ध केले, ते सर्व जगन्नाथशास्त्री क्रमवंतांच्या साहाय्यानें होते, असें त्यानें बहुतेक प्रत्येक ग्रंथावर स्पष्टपणें नमूद केलें आहे.'[3]

नागावकर मंडळी मुंबईकडे वळली यांचें कारण राजसत्ता मुंबईस केंद्रित झाली हें होय. पेशवाईत विद्वान् ब्राह्मणवर्ग पुण्याकडे वळत होता; आता तो मुंबईकडे वळूं लागला.

इ. स. १८६७ मध्ये गोविंद बाबाजी जोशी या नांवाचे एक बडोद्याचे गृहस्थ कोंकणच्या प्रवासास निघाले. त्यांनी आपल्या प्रवासाची हकीकत रोजनिशीच्या रूपाने लिहून ठेवली व इ. स. १८९६ मध्ये प्रसिद्ध केली. त्यांच्या पुस्तकांतील १५ ऑक्टोबर १८६७ मधील नागावबद्दलचा मजकूर पुढीलप्रमाणें आहे. " अलीबाग सोडून मी ता. १५ ऑक्टोबर १८६७ रोजीं नागावास गेलों······ मुंबई सोडून दक्षिणेस प्रवास करूं लागलें म्हणजे दक्षिण कोंकणच्या लोकांच्या खुणा

---

१ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६ २ आंदरु नं. २४६, पृ. १०१

३ पंचामृत — अ. का. प्रियोळकर, पृ. ३३

दिसूं लागतात. अलीबाग ही सब्‌कलेक्टरच्या सदर स्टेशनची जागा आहे व येथें मागें लिहिलेलें राजकीय घराणें ( सरदार बिवलकरांचें ) आहे; म्हणून मात्र येथील कांही लोक ठाणें व मुंबई येथील लोकांप्रमाणें पोशाक करणारे दृष्टीस पडतात. परंतु अलीबाग सु-ली म्हणजे पांढरीं पागोटीं व बुधवारी पंच्यांसारखीं आखूड वस्त्रें नेसणें हा प्रघात दृष्टीस पडूं लागतो; आणि तो जसजसें दक्षिणेस जावें, तसतसा जास्त अनुभवास येतो. इकडील लोकांच्या रीतिभाती आणि मुंबईचे उत्तर आंगच्या लोकांच्या रीतिभाती यांत बरीच तफावत आहे. इकडील ब्राह्मण लोक स्वतः शेती करणारे आहेत, तसे उत्तरेकडील नाहीत...... इकडील लोक शब्दाचे पहिले अक्षरावर बोलतांना जोर देतात. उदाहरण, "अष्टागरातील अठवल्याचे घरीं अगस्त्याचे झाडाखाली हत्ती पाहिला." तसेंच, ते किंचित् लांबट बोलतात······ यामुळें नवख्या माणसास तें बोलणें ऐकून नवल वाटतें...... अशी नागाव येथे ब्राह्मणांचीं घरें एकंदर ३०० आहेत. ब्राह्मणांच्या मोठे समुदायाचा गाव ठाणें जिल्ह्यांत यासारखा दुसरा नाही. माझे येण्याबद्दलची सभा नागाव येथे भीमेश्वराचे देवळांत झाली होती. येथील लोक लिहिण्या-वाचण्याच्या कामांत इतर ब्राह्मण-वस्तीचे मोठे गावापेक्षा मागें आहेत...... तरी कृषिकर्मांत त्यांनी ठाणें जिल्ह्यांतील सर्व गावच्या ब्राह्मणांपेक्षां आघाडी ठोकली आहे...... नागावात ठोसर आडनांवाचे ब्राह्मणाचें मात्र दुमजली घर आहे. बाकी सर्व साधीं घरें आहेत."

आंगरे-सत्ता नष्ट झाल्यावर पंचवीस वर्षांनी लिहिलेलें हें वर्णन आंगरेकालीन परिस्थितीस व ब्राह्मण समाजाच्या चित्रास धरून असल्यामुळे येथे दिलें आहे. नागावकरांचा व्यवसाय व त्यांचें त्यांतील कौशल्य, त्यांचा पोशाख, त्यांचीं घरें, त्यांचें शिक्षण व त्यांची बोलभाषा यांचें शब्दचित्र लेखकानें रेखाटलें आहे. सामान्यतः तीच परिस्थिति आंगरे-सत्तेच्या अखेरीस होती, असें मानावयास प्रत्यवाय वाटत नाही.

# मंदिरें व पुष्करिणी -

श्रीनागेश्वर—नागावचें प्रमुख मंदिर नागेश्वराचें होय. मंदिर आणि गाव यांतील 'नाग' शब्द असें सूचित करतो की तें कदाचित् गावाच्या स्थापनेपासून, यादवकालापासून असावें— मंदिर निदान शिवकालांतील असावें; कारण त्याचा जीर्णोद्धार ६ जानेवारी १७७२ या दिवशीं राघोजी आंगरे सरखेल यांनीं वेदोक्त मंत्रांनी केला. मंदिराजवळ दीपमाळ आहे, ती सहस्रबुद्धे यांनी बांधविली.[1] नागेश्वराच्या मंदिराजवळ 'नागेश्वराचें तळें' आहे; तें इ. स. १७७३ च्या सुमारास राघोजी आंगऱ्यांनी बांधविलें. सर्व बाजूंनी चिरेबंदी तांबडा दगड असून तळयानें सहा एकर क्षेत्र व्यापिलें आहे. खोली २१ फूट असून त्यांत वर्षभर पाणी असतें[2] इ. स. १८४०–४१ मध्ये तळयाच्या एका बाजूचें बांधकाम दुरुस्त केलें व आंतील माती काढून तें स्वच्छ केलें; तेव्हा १२३१॥=॥। रु. खर्च झाला.[3]

मंदिर अगदी साधें होतें व तें दरसाल झापांनी शाकारीत. इ. स. १८१४, १८१९–२०, १८२९–३०, १८४०–४१ मधील माहितीवरून असें दिसतें की शाकारणीस २७५ झाप लागत असत. झापांचा खर्च सरकारांतून होत असे. नागेश्वराच्या वार्षिक खर्चास सरकारमंजुरीप्रमाणे महालांतून रकमा मिळत. दररोजच्या नंदादीप व नैवेद्यासाठी, तेल व भात यांसाठी महालांतून नेमणूक होती. इ. स. १७९९–१८००, १८१९–२०, १८२९–३० या वर्षी बारा मण भाताची नेमणूक मान्य करण्यांत आलेली दिसते. पण इ. स. १८०६–०७, १८१४ व १८४०–४१ मध्ये भाताची नेमणूक अनुक्रमें ९ मण ७ पायली व ६ मण एवढीच झालेली दिसते. या वर्षी सर्वच मंदिरांच्या नेमणुकीस काट दिला असल्याने, नेमणूक एकदा ठरली म्हणजे ती सामान्यत: कायम समजली जात असे, असें वाटतें. नंदादीपास ९ मण तेल लागे व त्याबद्दल २२॥ रु.ची नेमणूक दिसते. श्रीनागेश्वरास श्रावण महिन्यांत मासाभिषेक करण्याचा रिवाज होता; त्या वेळीं वेगळें तीन शेर तेल खर्ची पडे. बारमाही पूजा करण्यास कोणाची तरी नेमणूक झालेली असे. इ. स. १८०९–१० मध्ये ती बाळकृष्णभट लेले यांजकडे होती. श्रावणांत लक्ष बेलपत्रांनी नागेश्वराची पूजा बांधीत. इ. स. १८०९–१० मध्ये, तत्प्रीत्यर्थ २२ रु. हून जास्त खर्च झाला. मंदिरांत माही शिवरात्रीचा उत्सव होई; त्याप्रीत्यर्थ महालांतून खर्च होई. त्रिपुरी पौर्णिमेचे दिवशीं त्रिपुर पाजळीत; त्यासाठी तेल, कापड, दक्षिणा यांचा खर्च महालांतून होत असे. वर्षांतून बारा एकादश्यांचे दिवशीं मंदिरांत कीर्तनें होत. प्रत्येक कीर्तनाचे वेळीं सुमारें २॥। रु. खर्च महालांतून होत असे. कीर्तनकारास दर कीर्तनास २ रु. बिदागी मिळे व त्याची साथ मृदंगवादनाने होई. मृदंग्यास दर कीर्तनास ·।॥· रु. देत. बुक्का, नारळ, उदबत्ती इत्यादींचा किरकोळ खर्च सुमारें ८=॥ रु.चा असे. शिवरात्रीच्या पूजासाहित्याचा खर्च ·।· रु., ब्राह्मण भोजनास ·।॥· रु., दक्षिणा १ रु. असा एकूण २॥। रु.पर्यंत होई. त्रिपुरी पौर्णिमेस ५ शेर गोडें तेल व चार आण्यांचें कापड लागे. मंदिरास लागून संन्यासी लोकांस राहण्याची व्यवस्था केली होती, असें इ. १८१९ च्या कागदांवरून दिसतें. सदर वर्षी नारायणस्वरूप संन्यासी तेथे राहात असे; त्याचेप्रीत्यर्थ

---

१ आंअ. ३५६, ३८२

२ कुर्ग. पृ. १२

३ कोंजरु नं. १३७, पृ. ३९

महालांतून एक वर्षाचा २७ रु. खर्च झाला.[1]

नागेश्वराची यात्रा दर वर्षी होई; त्या वेळीं दर घरांतून ' आकारपट्टी ' वसूल करीत. गावांत नसतील ते वर्गणींतून सुटत. घरटीप ०≡ वसूल करण्याची रीति असे; पण सरकारी घरें, गुलामांचीं घरें, विधवांचीं घरें, मंदिरें व मठ यांकडून वर्गणी वसूल करीत नसत.[2] इ. स. १८३८ एप्रिल ९, चैत्र शु॥ १५ या दिवशींची आंगरेकालीन अष्टागर [ ७६४ ] मधील नोंद अशी आहे:— ' महाल नागाव आणि हाटाळें येथील लाटीचा खांब नागावकरांनी पूर्वी नेला होता; त्यामुळे कलह उत्पन्न झाला व लाट फिरावयाची राहिली. या वर्षी नागावकरांनी सरकारी हुकूम आणून जोरावारीने लाट सुरू केली. लाट फिरण्यांत हाटाळेकरांचा संबंध नाही असें नागावकरांचें म्हणणें पडलें. पौर्णिमेच्या दिवशीं लाटेच्या खांबावरून ब्राह्मणाचा एक मुलगा पडून मृत्यु पावला. तसेंच, यात्रेसाठी जमलेल्या मंडळींतील एक ब्राह्मण-स्त्री विहिरीच्या कडेस असलेल्या धक्क्यावर पडून मरण पावली. सर्वांची समजूत झाली की लाट हाटाळेकरांची असून नागावकर जबरदस्तीने ती चालू करीत आहेत. ' ही नागेश्वराची यात्रा अजून भरते.

अवर्षणासारखें सार्वत्रिक संकट कोसळल्यास नागेश्वराच्या मंदिरांत लघुरुद्र करण्यास ब्राह्मणमंडळी जमा होत. इ. स. १८०४–०५, छ १६ साबान, या दिवशींची माहिती अशी की प्रांतांत पर्जन्य पडावा म्हणून नागावकरांनी मंदिरांत लघुरुद्र केला. या समयीं ब्राह्मणांस दक्षिणा महालांतून देण्यांत आली.

इ. स. १८११ जून १५ या दिवसाची नोंद अशी की ६ जून रोजीं मृग लागलें; पण नक्षत्र कोरडें जाऊं लागलें; म्हणून नागेश्वरच्या देवालयांत पर्जन्यवृष्टीकरिता होमद्वारें महारुद्र करण्यांत आला. त्याचा एकूण खर्च ८५।।‍≡।। रु. झाला.

तपशील — ३८।‍।।‍ धर्मादाय, पुण्याहवाचन व १२१ ब्राह्मणांस एकादशिनी प्रत्येकीं ।‍ रु. प्रमाणें.

३०।।=।।‍ भोजन खर्च.

१२।– होमद्रव्यार्थ खर्च.

८५।।≡।। एकूण [ किरकोळ धरून. ][3]

इ. स. १८१०–११ मध्ये ३८।। रु. खर्च करून मंदिराची एकदा दुरुस्ती करण्यांत आली.[3] इ. स. १८२९–३० मध्ये मंदिराची थोडी चुनेगच्ची केली, त्यासाठी पाऊण मण चुना लागला;

१ आंदरु नं. १३५, पृ. ४६, ४७
आंदरु नं. ६३७, पृ. १३३, १३५
आंदरु नं. ६३६, पृ. ११४, ११५
कोंजरु नं. १३७, पृ. ३८, ४२ ते ४४
आंदरु नं. २४४, पृ. ८९ ते ९४, ९८
आंदरु नं. २४७, पृ. १०२
आंदरु नं. ४७, पृ. ७२, ७३
आंदरु नं. ३८४, पृ. १८८ ते १९१
आंदरु नं. १६८, पृ. १८३ ते १८५

२ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७

३ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७

त्याची किंमत ।= होती.[१] इ. स. १८४०–४१ मध्ये या मंदिराची वहिवाट रामचंद्र जगन्नाथ [ पटवर्धन ] यांजकडे देण्यांत आली होती.[२]

श्रीभीमेश्वर — हें दुसरें शिवकालीन मंदिर होय. इ. स. १७५८ मध्ये त्याचा जीर्णोद्धार सदाशिवरावभाऊ पेशवे यांची भार्या पार्वतीबाई हिंचेकडून द्रव्य मिळवून नागावकरांनी केला. सौ. पार्वतीबाई ही कृष्णाजी नाईक कोल्हटकर यांची कन्या व कोल्हटकर हे नागावचे रहिवासी; यामुळे माहेरगावच्या मंदिराची दुरुस्ती पार्वतीबाईने करविली असें दिसतें. मंदिरासमोरची दीप-माळ विठोबा लोंढे यांनी जीर्णोद्धारानंतर बांधविली.[३] इ. स. १७६४ मध्ये भीमेश्वराच्या मंदिरा-पुढील पुष्करिणी नारंभट रिसबूड यांनी बांधविली.

मंदिरास बारमाही नेमणूक महालांतून करून दिल्याचे उल्लेख इ. स. १७९९ पासूनचे आढळतात. वार्षिक नेमणुकींत प्रामुख्याने नैवेद्य आणि दीपवात यांची व्यवस्था केलेली असे. नैवेद्याप्रीत्यर्थ दरसाल सहा मण भात देत. नेमणुकीचा पुढील तपशील पहा —

इ. स. १७९९–१८०० मध्ये बारमाही नेमणुक ११॥= रु. होती. तींतून ६ मण भाताचे ६ रु. व दीपवातीच्या २। मण तेलासाठी ५॥= खर्ची पडले.[४] इ. स. १८०६–०७ मध्ये बारमाही नेमणूक १७॥= रु होती. या वर्षी नैवद्याचें भात ४ मण ९॥ पायल्या एवढेंच दिलें आहे.[५] इ. स. १८१०त श्रावण मासीं दीपास तेल ३ शेर दिलें.[६] इ. स. १८१४ मध्यें ९ मण ७ पायली इतकें भात नैवेद्यास दिलें होतें. नंदादीपाचा खर्च १७॥= रु. झाला होता. या वर्षीची नेमणूक २२॥ रु. होती. बागायतांतील एका माडाचें उत्पन्न मंदिराकडे खर्च होई.[६] इ. स. १८१९–२० मध्ये बारमाही नेमणूक म्हणून ५०॥.॥।. रु. खर्च झाले. त्यांत नैवेद्याचें ६ मण भात [ ६ रु. ], दीप-वातीस १७॥= रु. चें तेल, श्रावणमासांतील तेलासाठी .।= [ ३ शेर तेल ], शाकारणीचे ८ झापांचे ८= खर्ची पडले. मंदिरांत रामनवमीचा उत्सव होऊं लागला होता; तत्प्रीत्यर्थ २५ रु. या वर्षी खर्च झाले. भीमेश्वराच्या खर्चाकडे एका बागायताचा आकार १।=॥। रु. जमाखर्चांत आला आहे.[७] इ. स. १८२९–३० मध्ये बारमाही नेमणूक २३॥= रु. होती. तींतून ६ मण भाताचे ६ रु. व बारमाही दीपवातीचे १७॥= रु. खर्च झाले. याशिवाय श्रावणमासाचें ३ शेर तेल [ किंमत ८=॥। रु. ] नित्याप्रमाणे वेगळें खर्च झालें. या वर्षी २५।=॥ रु. आणखी खर्च झाला, तो राम-नवमीच्या उत्सवाचा असावा. या वर्षी बागायतवाडीचा आकार १॥·॥। रु. इतका दाखविला आहे.[८] इ. स. १८३९–४० मध्यें बागायतवाडीचा आकार २।=॥ रु. आहे.[९]

इ. स. १८४०–४१ मध्ये भाताचा दर १३ रु. खंडी असल्याने ६ मण भाताची खर्चाकडील रक्कम लहान झाली. बारमाही व श्रावणमासाचें तेल मिळून १७॥=॥. रु. खर्च झाला. झापांचे ८= खर्ची पडले. बागायताचा आकार २।=॥ रु. आहे. या वर्षी भीमेश्वराचें मंदिर रामचंद्र जगन्नाथ पटवर्धन यांचेकडे वहिवाटीस आहे.[१०]

नागेश्वराचें मंदिर दर वर्षी झापांनीं शाकारलें जात होतें. या मंदिराच्या शाकारणीच्या खर्चाचा उल्लेख नाहीं; त्यावरून असें वाटतें कीं तें पेंढा अगर सावळ्यांनी शाकारीत असावेत.

---

१ आंदरु नं. ३८४, पृ. १८८ ते १९१
२ कोंजरु नं. १३७, पृ. ३८, ४२ ते ४४
३ आंअ. २०४
४ आंदरु नं. १३५, पृ. ४६, ४७
५ आंदरु नं. ६३७, पृ. १३३ ते १३५
६ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६
७ आंदरु नं. २४४, पृ. ८९ ते ९४
८ आंदरु नं. ३८४, पृ. १८८ ते १९१
९ कोंजरु नं. २०१३, पृ. १
१० कोंजरु नं. १३७, पृ. १७, ३८, ४२ ते ४४

**श्रीवंकनाथ** – केशव महाजन यांनी हें मंदिर इ. स. १७६०–६१ मध्ये बांधलें. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरीण हिने महाजनांस पाऊण लाख रुपये दिले; त्यांतून मंदिर, दीपमाळ, पुष्करिणी दीपकऱ्हा यांचें काम पूर्ण झालें. जेथे मंदिर बांधलें आहे, तेथे पुरातन मशीद होती; ती कोसळली होती. मंदिराच्या दक्षिणेस तळयाचे काठावर महाजनांनी, नंतर एक मशीद बांधली.[१]

वंकनाथास सरकारी नेमणूक —

इ. स. १७९९–१८०० बारमाही नेमणूक १६॥= रु.
यांतून नैवेद्यास भात ६ मण — किमत ६ रु.
दीपवातीस तेल २। मण किमत ५॥= रु.
इनामवाडीचा आकार ५ रु. अशी वांटणी दिसते.
[ आंदरु नं. १३५, पृ. ४६, ४७ ]

इ. स. १८०६–०७ बारमाही नेमणूक २१॥.॥। रु. होती.
तपशील – दीपवातीस ५॥= रु.
नंदादीपास १२।= रु. वार्षिक.
बागायत इनाम आकार ३॥.॥। रु.
शिवाय नैवेद्यास भात ४ मण ९॥ पायल्या.
[ आंदरु नं. ६३७, पृ. १३३, १३५ ]

इ. स. १८१० श्रावणमास तेल ३ शेर नेमणूक.

इ. स. १८१४ बारमाही नेमणूक २१॥। रु.
पैकी १८ रु. नंदादीपाचा खर्च.
शिवाय ४ मण ९॥ पायली भात नैवेद्याचें.
[ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६ ]

इ. स. १८१९–२० बारमाही नेमणूक २९॥≡। रु.
तपशील – नैवेद्यास ६ मण भात. त्याचे ६ रु.
श्रावणमास तेल ३ शेर. त्याचे .।= रु.
बारमाही दीपवातीस खर्च १८ रु.
झाप शाकारणीस ३८ खर्च .॥~। रु.
बागायत आकार इनाम ४॥।.
[ आंदरु नं. २४४, पृ. ८९ ते ९४ ]

इ. स. १८२९–३० बारमाही नेमणूक रु. २४
तपशील – नैवेद्यास ६ मण भाताचे ६ रु.
श्रावणमास तेल ३ शेर ८≡॥. रु.
वार्षिक दीपवात १८ रु.
शाकारणीस झाप ४४ चे .॥=॥। रु.
बागायत माड आकार ११ चा २॥। रु.
[ आंदरु नं. ३८४, पृ. १८९ ते १९१ ]

या आकड्यांवरून नैवेद्य, नंदादीप यांचा खर्च झाला तो नेमणुकींतून झाला; बाकी खर्च बागायत आकारांतून असें दिसतें.

---

१ आंअ. २३१; कुगॅ. पृ. ३५१

इ. स. १८३९–४० मध्ये बागायत माड १० होते. त्यांचा आकार २॥ रु. मंदिराप्रीत्यर्थ मांडला आहे. [ कोंअरु नं. २०१३,पृ. १ ]

इ. स. १८४०–४१ बारामाही नेमणूक १६।॥≈॥ रु. होती. तींतून नैवेद्यास ६ मण माताचे ३।॥≈॥ रु. व नंदादीपास १३८– रु. झाले. [ कोंजरु नं. १३७, पृ. ३८, ४२ ते ४४ ]

या वर्षी मंदिराची वहिवाट रामचंद्र जगन्नाथ पटवर्धन यांजकडे देण्यांत आली आहे.

## श्रीनारायण

श्रीनारायणाचें मंदिर श्रीभीमेश्वराचे सन्निध आहे त्याच्या वार्षिक खर्चाच्या नेमणुकीची माहिती अशी —

इ. स. १७९९–१८००

बारमाही नेमणूक ११।॥= रु. यांतून नैवेद्यास ६ मण भाताचे सहा रुपये; दीपास तेल बारमाही २। मण, किंमत ५।॥= रु. [ आंदरु नं. १३५, पृ. ४६, ४७ ]

इ. स. १८०६–०७

नैवद्यास भात चार मण, साडेनऊ पायली; बारमाही तेलास ५।॥= रु ; अधिक खर्चास १८≡ रु. [ आंदरु नं ६३७, पृ. १३३ ते १३५ ]

इ. स. १८०९–१०

श्रावणमासीं ३ शेर तेल. [ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६ ]

इ. स. १८१३–१४

नैवेद्यास भात चार मण, साडेनऊ पायली; बारमाही तेलास ५।॥= रु.; बागायतांतील एका माडाचें एक रु. उत्पन्न अधिक खर्चास. [ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६ ]

इ. स. १८१९–२०

बारामाही खर्चास एकूण रु. १३।≡॥· नैवेद्यास भात सहा मण–त्याचे ६ रु.; वार्षिक तेलास ५।॥= रु.; श्रावणमासीं दीपास तीन शेर तेलाचे ·।= रु.; शाकारणीस बारा झापांचे ८≡ रु.; अधिक खर्चास इनाम बागायतांतील आकार १।·॥· रु.; रामनवमी उत्सवास २५ रु.; सरकारकार्यें निर्विघ्न व्हावींत म्हणून ब्राह्मणसंतर्पणास ९१।॥≡ रु. इतका खर्च झाला. [ आंदरु नं. २४४, पृ. ८९ ते ९४, ९८; आंदरु नं. ४७, पृ. ७४; आंदरु नं. २४७, पृ. १०२ ].

इ. स. १८२९–३०

बारमाही खर्चास ११।॥= रु. यांत नैवेद्याच्या सहा मण भाताचे सहा रुपये व वार्षिक तेलाचे ५।॥= रु. आले. शिवाय, श्रावणमासानिमित्त तीन शेर तेलाचे ०≡।॥ रु.; शाकारणीच्या बारा झापांचे ८≡ रु. रामनवमी उत्सवास ११ रु. असा इतर खर्च. [ आंदरु नं. ३८४, पृ. १८४ ते १९१ ].

इ. स. १८३९–४० मध्ये बागायत आकार १।=। रु. खर्ची पडला. [ कोंअरु नं. २०१३,पृ. १ ]

इ. स. १८४०–४१

बारमाही खर्चास १०।॥–। रु. यांत ६ मण भाताची किंमत ३।॥=॥ रु. व वार्षिक तेल ५।·॥· रु. चें होतें. शाकारणीस १२ झाप व बागायताचा आकार १।=। रु. खर्ची पडला. [ कोंजरु नं. १३७, पृ. १७, ४२ ते ४४ ]

इ. स. १८४०–४१ मध्ये मंदिर बालाजी गणेश सहस्रबुद्धे यांजकडे वहिवाटीस दिलें.

## श्रीबहिरी उर्फ बहिरव

| | १७९९–१८०० | १८०६–०७ | १८१४ | १८१९–२० | १८२९–३० | १८४०–४१ |
|---|---|---|---|---|---|---|
| बारमाही नेमणूक | ११॥= रु. | — | — | १२ रु. | ११॥= रु. | ९।≡ रु. |
| नैवेद्यास भात | ६ मण–६ रु. | ४ मण ९॥ पा. | ४ मण ९॥ पा. | ६ मणाचे ६ रु. | ६ मणाचे ६ रु. | ६ मणाचे ३।॥=॥ रु. |
| दीपास तेल बारमाही | २। मण–५॥= रु. | ५॥= रु. | ५॥= रु. | ५॥= रु. | ५॥= रु. | ५॥.॥. रु. |
| श्रावणमास तेल | — | — | — | ३ शेर .।= रु. | ३ शेरांचे ४≡॥ रु. | — |
| | [आंदरु नं. १३५, पृ. ४६, ४७] | [आंदरु नं. ६३७, पृ. १३३, १३५] | [म. ना. अप्रपेदरु नं. ६३६] | [आंदरु नं. २४४, पृ. ८९ ते ९४] | [आंदरु नं. ३८४, पृ. १८८ ते १९१] | [कोंजरु नं. १३७, पृ. ४२ ते ४४] |

इ. स. १८४०–४१ मध्ये मंदिर आबा राम यांचे निसबतीस दिलें.

## श्रीहनुमंत

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| बारमाही नेमणूक | ८॥– रु. | — | — | १३॥= रु. | ८॥– रु. | ११॥= रु. |
| नैवेद्यास भात | ६ मण भाताचे ६ रु. | ४ मण ९॥ पा. | ४ मण ९॥ पा. | ६ मणाचे ६ रु. | ६ मणाचे ६ रु. | ६ मणाचे ३।॥=॥ रु. |
| दीपास तेल बारमाही | १॥ मणाचे २॥– रु. | २॥– रु. | २॥– रु. | २॥– रु. | २॥– रु. | ४॥=॥ रु. |
| श्रावणमास तेल | — | — | | ३ शेराचे .।= रु. | ३ शेराचे ४≡॥ रु. | — |
| इनाम बागायत आकार | — | २ माड आकार .॥. रु. | २ माड आकार .॥. रु. | २ माड आकार .॥. रु. | २ माड आकार .॥. | .॥– दोन माडांचा आकार |
| शाकारास झाप | | | | २७९ ची किंमत ४४≡ रु. | २७९ चे ४४≡ रु. | २७५ चे २॥ रु. |
| | [आंदरु नं. १३५, पृ. ४६, ४७] | [आंदरु नं. ६३७, पृ. १३३ ते १३५] | [म. ना. अप्रपेदरु नं. ६३६] | [आंदरु नं. २४४, पृ. ८९ ते ९४] | [आंदरु नं. ३८४, पृ. १८८ ते १९१] | [कोंजरु नं. १३७, पृ. ४२ ते ४४] |

इ. स. १८४०–४१ मध्ये मंदिराची वहिवाट रामचंद्र जगन्नाथ पटवर्धन यांस सांगितली.

### श्रीरामेश्वर

| | १८०६–०७ | १८१४ | १८१९–२० | १८२९–३० | १८४०–४१ |
|---|---|---|---|---|---|
| बारमाही नेमणूक | —— | —— | १७।- रु. | १७।- रु. | —— |
| नैवेद्यास भात | ८ मण. | ३ खंडी | १० मणाचे १० रु. | १० मणाचे १० रु. | १० मण भात किं. ६॥ रु. |
| दीपास तेल बारमाही | २॥।- रु. | २॥।- रु. | २॥।- रु. | २॥।- रु. | २॥=। रु. |
| शाकारास झाप | — | — | ३०० चे ४॥ रु. | ३०० चे ४॥ रु. | ३०० चे ३ रु. |
| | [ आंदरु नं. ६३७, पृ. १३३, १३५ ] | [ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६ ] | [ आंदरु नं. २४४, पृ. ८९ ते ९४ ] | [ आंदरु नं. ३८४, पृ. १८८ ते १९१ ] | [ कोंजरु नं. १३७, पृ. ४२ ते ४४ ] |

इ. स. १८४०–४१ मध्ये मंदिर हरि बच्याजी वाड यांचे वहिवाटीस दिलें. तत्पूर्वी तें बच्याजी अनंत वाड यांचे वहिवाटीस होतें. [ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६ ]

### श्रीलक्ष्मीनारायण

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बारमाही नेमणूक | —— | नक्त ५॥ रु. | २२।·॥· रु. | २२।·॥· रु. | ८।≡ रु. |
| नैवेद्यास भात | १६ मण | १६ मण बामणगांवास | १२ मण १२ रु. | १२ मणाचे १२ रु. | —— |
| दीपास तेल बारमाही | ५॥= रु. | ५॥= रु. | ५॥= रु. | ५॥= रु. | ५।-॥· रु. |
| शाकारास झाप | —— | —— | ३१० चे किं. ४॥=।। रु. | ३१० चे ४॥=॥ रु. | ३१० चे ३८-।। रु. |
| | [ आंदरु नं. ६३७, पृ. १३३, १३५ ] | [ म. ना. अप्रपेदरु नं. ६३६ ] | [ आंदरु नं. २४४, पृ. ८९ ते ९४ ] | [ आंदरु नं. ३८४, पृ. १८८ ते १९१ ] | [ कोंजरु नं. १३७, पृ. ४२ ते ४४ ] |

इ. स. १८४०–४१ मध्ये मंदिर मोरो आपाजी लिमये यांचे निसबतीस होतें.

## श्रीकाशीविश्वेश्वर

| | १८०६–०७ | १८१० | १८१४ | १८१९–२० | १८२९–३० | १८४०–४१ |
|---|---|---|---|---|---|---|
| बारमाही नेमणूक | —— | —— | —— | १६॥– रु. | १२॥।– रु. | —— |
| नैवेद्यास भात | ४ मण | —— | ४ मण | ५ मण कि. ५ रु. | ५ मण कि. ५ रु. | —— |
| वार्षिक दीपवातीस | २॥।– रु. | —— | २॥।– रु. | २॥।– रु. | २॥।– रु. | २॥=। रु. |
| शाकारास झाप | —— | २५० | —— | २५० कि. ३॥। रु. | २५० कि. ३॥। रु. | —— |
| पुजाऱ्यास | —— | —— | ५ रु. नख्त | ५ रु. नख्त | ५ रु. नख्त | —— |
| | [आंदरु नं. ६३७, पृ. १३३,१३५] | [म.ना.अप्रपेदरु नं. ६३६] | [म. ना. अप्रपेदरु नं. ६३६] | [आंदरु नं. २४४ पृ. ८९ ते ९४] | [आंदरु नं. ३८४, पृ. १८८ ते १९१] | [कोंजरु नं. १३७, पृ. ४२ ते ४४] |

इ. स. १८४०–४१ मध्ये श्रीकाशीविश्वेश्वराची व्यवस्था–वहिवाट घाऱ्या गुरव याजकडे होती.

## श्रीसिद्धिविनायक

| | १७९९–१८०० | १८०६–०७ | १८१० | १८१४ | १८१९–२० | १८२९–३० | १८४०–४१ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बारमाही नेमणूक | ११॥= रु. | —— | —— | १२॥= रु. | १९ रु. | ११॥= रु. | ९।≡ रु. |
| नैवेद्यास भात | ६ मणाचे ६ रु. | ४ मण ९।। पा. | —— | ४ मण ९।। पा. | ६ मण कि. ६ रु. | ६ मण कि. ६ रु. | ६मण कि. ३।।।=॥रु. |
| वार्षिक दीपखर्च | २।मण कि.५।।= रु. | ५।।= रु. | —— | —— | ५।।= रु. | ५।।= रु. | ५।।·॥· रु. |
| श्रावणमास तेल | —— | —— | ३ शेर तेल | —— | ३ शेर कि.·।= रु· | ३ शेर कि.८≡।।। | —— |
| शाकारास झाप | —— | —— | —— | —— | बद्दल ७ रु. | बद्दल ७ रु. | —— |
| | [आंदरु नं. १३५, पृ. ४६, ४७] | [आंदरु नं. ९३७, पृ. १३३, ३३५] | [म.ना.अप्रपेदरु नं. ६३६] | [मना.अप्रपेदरु नं. ६३६] | [आंदरु नं.२४४,पृ. ८९ ते ९४] | [आंदरु नं.३८४,पृ. १८८ ते १९१] | [कोंजरु नं.१३७,पृ. ४२ ते ४४] |

इ. स. १८४०–४१ मध्ये वहिवाटदार घाऱ्या गुरव होता.

**श्रीगणपतिपंचायतन**

| | १८०६–०७ | १८१४ | १८१९–२० | १८२९–३० | १८४०–४१ |
|---|---|---|---|---|---|
| बारमाही नेमणूक | — | — | १८ रु. | ११।।।.।।. रु. | ९।≡ रु. |
| नैवेद्यास भात | ४ मण ९।। पा. | ४ मण ९।। पा. | ६ मण कि. ६ रु. | ६ मण कि. ६ रु. | — |
| वार्षिक दीपवात | ५।।= रु. | ५।।= रु. | ५।।= रु. | ५।।= रु. | — |
| श्रावणमास तेल | — | — | ३ शेर कि .।= रु. | ३ शेर कि. ८≡।।। रु. | — |
| शाकारास झाप | — | — | ४०० कि. ६ रु. | — | ४०० कि. ४ रु. |
| | [ आंदरु नं. ६३७, पृ. १३३, १३५ ] | [ म. ना. अग्रभेदरु नं. ६३६ ] | [ आंदरु नं. २४४, पृ. ८९ ते ९४ ] | [ आंदरु नं. ३८४, पृ. १८८ ते १९१ ] | [ कोंजरु नं. १३७, पृ. ४२ ते ४४ ] |

इ. स. १८४०–४१ मध्यें मंदिराचा वहिवाटदार येशा गुरव होता.

**श्रीमहाकाली उर्फ श्रीभवानी**

| | १७९९–१८०० | १८०६–१८०७ | १८१४ | १८१९–२० | १८२९–१८३० | १८४०–१८४१ |
|---|---|---|---|---|---|---|
| बारमाही नेमणूक | ४९।। रु. | ५० रु. | ५० रु. उत्सवास | ५६।।। रु. | २४ रु. | ८१।.। रु. |
| नैवेद्यास भात | ६ मण कि. ६ रु. | ४ मण ९।। पा. | ४ मण ९।। पा. | ६ मण कि ६ रु. | ६ मण कि. ६ रु. | ६ मण कि. ३।।।=।।रु. |
| वार्षिक दीप-तेल | ५ म. १६ शेर कि. १३।। रु. | — | — | — | १८ रु. | नंदादीप ७।। रु. |
| श्रावणमास-तेल | — | — | — | ६ शेर कि. .।।।. रु. | ६ शेर कि. ।≡।। रु. | — |
| नवरात्र | — | — | — | [ दीप व नवरात्रोत्सव यांस ५० रु. ] | ४२ रु. | शारदीय नवरात्र ४२ * |
| | [ आंदरु नं. १३५, पृ. ४६, ४७ ] | [ आंदरु नं. ६३७ पृ. १३३, १३५ ] | [ म. ना. अग्रभेदरु नं. ६३६ ] | [ आंदरु नं. २४४, पृ. ८९–९४ ] | [ आंदरु. नं ३८४ पृ. १८८–९१ ] | [ कोजरु नं. १३७, पृ ३८, ४२–४४ ] |

दर मंगळवार संध्याकाळीं मंत्रपुष्प इ. १८०८–०९ पासून बारमाही एकूण खर्च १६६।≡।। रु.

* माघ शिवरात्री, पूजा, मंगळवार इ. करितां २८।।।≡।। रु. एकूण ७८।।।=।।। रु.

इ. स. १७९७–९८ मध्ये श्रीमहाकालीच्या मंदिरांत दरसाल शारदीय नवरात्राचा उत्सव व्हावा, म्हणून वार्षिक नेमणूक रु. ३० करून देण्यांत आली. ही रकम बागायताच्या सरकारी उत्पन्नांतून मिळावयाची, असा सनदेंत उल्लेख केला आहे. या कालापर्यंत मंदिराची व्यवस्था पाहण्यास व उत्सव पार पाडण्यास व्यवस्थापक–वहिवाटदार नव्हते. चिंतो राम पटवर्धन यांनी आंगऱ्यांस विनंति केली की हें काम मजकडे सोपवावें व उत्सवास खर्चाची नेमणूक करून द्यावी. आंगऱ्यांनी तें मान्य केले.[1] श्रावणांत श्रीमहाकालीस मासाभिषेक होई. दर मंगळवारीं तिची यथासांग पूजा होत असे.[2] अनेकदा जुन्या कागदांतून नागावच्या देवतांच्या नावांत भिन्नता आढळते. इ. स. १८२३ ऑक्टोबर ९ च्या एका कागदांत उल्लेखिलेली श्रीभवानी ही महाकालीच असावी. श्रीभवानी वास्तव्य नागाव महालकडे नंदादीप व नवरात्राचे उत्सवाबद्दल सरकारांतून दरसाल नेमणूक आहे. तितक्याने उत्सव यथास्थित होत नाही. सबब, सालमजकुरापासून १० रु. जास्त मंजूर करून सरकारांतून सनद दिली. ५० रु. पूर्वीपासून चालत आल्याप्रमाणें व १० रु. सालमजकुरापासून जास्त, एकूण ६० रु. महालांतून खर्च व्हावयाचे. मंदिर इ. स. १८२३ मध्ये चिंतो राम पटवर्धन यांजकडे व्यवस्था व वहिवाटीस होतें.

इ. स. १८२४–२५ या वर्षी नागाववर कांही आपत्ति ओढवल्या; महाकालीच्या मंदिरांत दर दिवशीं दीप लागावयाचा, तो लागेनासा झाला. सरकारनें तो लावण्याची व्यवस्था केली. त्यास खर्च ७ शेर तेलास ·।।।≈।। रु. महालांतून करण्यांत आला.[3]

इ. स. १८२७ मे १३ या दिवशीं महाकालीबद्दल पुढील सनद सादर झाली.

श्री

यादी जमाखर्च होणें महाल नागाव सु।। सबा इसरीन मयातैन आलफ महाल मजकूर येथील श्रीमहाकाली देवीची पूजा दर मंगलवारचे मंगलवारी करवून वैदिक मंडळीकडून मंत्रपुष्पांजली करवीत जाणें म्हणून छ २ जवलीं सरकारची सनद सादर जाली, त्या नेमणुकेप्रमाणे इस्तकबील १२ जवल तागायत रमजान अखेर मंगलवार २० जाले. एकूण बाजारभाव दर १६ रु. प्रमाणे खर्च रुपये १७।~। दक्षिणा एकंदर.

१। रु. पूजाकर्त्या ब्राह्मणास नेमणूक ८~ प्रमाणे
१६८~ रु. मंत्रपुष्पांजुलीचे ब्राह्मणमंडळीस एकूण
१७।~ रु.
·।।= रु. पूजासाहित्याकडे नेमणूक ८।।· प्रमाणे.
१७।।।≈। रु. एकूण पावणेअठरा रुपये सव्वातीन आणे

देवस्थानखर्च लिहून महाल नागावपैकी जमा करावे छ १५ सवाल सन सबा इसरीन बार छ १६ सवाल.[3]

इ स. १८४०–४१ मध्ये मंदिराची वहिवाट रामचंद्र जगन्नाथ पटवर्धन यांजकडे होती.[4]

## श्रीकोलाई उर्फ ग्रामदेवता

गावस्थापनेच्या वेळीं ग्रामदेवतेची स्थापना होते; हा तर्क खरा असेल, तर कोलाई ही नागावची सर्वांत जुनी देवता म्हणून तिचें मंदिर सर्वांत जुनें म्हणावें लागेल. मंदिर निदान शिव-

१ आंदरु नं. १३४, पृ. ६६
२ आंदरु नं. १६८, पृ. १८३ ते १८५
३ म. ना. अप्रपेदरु नं. १३७
४ कोंजरु नं. १३७, पृ. ३८, ४२ ते ४४

कालांतील असल्याबद्दल संशय नाही. इ. स. १८२९–३० मध्ये मंदिर पूर्ण मोडकळीस आलें होतें; म्हणून नवें मंदिर बांधण्याचें ठरलें. त्यासाठी तपे उमटें येथील जंगलांतून चार घोणवासे, दोन मोरव आणि पाठाळूस एक लाकूड अशीं सात लाकडें आंगऱ्यांनी मोफत दिलीं व तोडून आणण्यास परवानगी दिली.[1] या साहित्यानिशीं मंदिर नवें बांधलें. मंदिराच्या नेमणुकीचा तपशील—

इ. स. १७९९–१८०० वार्षिक नेमणूक ५।।।~ रु. यांतून खर्च—
नैवेद्यास ३ मण भात उसने मापें किमत ३ रु.
दीपास बारमाही तेल ४५ शेर कि. २।।।~ रु.
[आंदरु नं. १३५, पृ. ४६,४७]

इ. स. १८०६–०७ नैवेद्यास भात २ मण ४।। पायली.
दीपास बारमाही तेलासाठीं २।।।~ रु.
[आंदरु नं. ६३७, पृ. १३३,१३५]

इ. स. १८१४ नैवेद्यास भात २ मण ४।। पायली.
तेलास वार्षिक २।।।~ रु. [म. ना. अप्रपेदरु नं. ६३६]

इ. स. १८१९–२० व १८२९–३० मध्ये
वार्षिक नेमणूक ५।।।~ रु.
नैवेद्यास ३ मण भात किमत ३ रु.
दीपास तेल २।।।~ रु.
[आंदरु नं. २४४, पृ. ८९ ते ९४; आंदरु नं. ३८४, पृ. १८८ ते १९१]

इ. स. १८४०–४१ वार्षिक नेमणूक ४।।~।। रु.
नैवेद्यास ३ मण भाताची कि. १।।।≡। रु.
दीपवातीस तेल किमत २८≡। रु.
[कोंजरु नं. १३७, पृ. ४२ ते ४४]

कोलाई उर्फ ग्रामदेवतेचा वहिवाटदार बाबजी किंवा गणू वर्तक असल्याचें इ. स. १८४०–४१ च्या कागदांवरून दिसतें.

### श्रीगणपति.

१४ एप्रिल १७८८ या दिवशीं गणपतीचें नवीन मंदिर बांधण्यांत आलें. त्या जागीं पूर्वीं खोलगट जमीन होती; तींत पाणी सांचत असे. जमीन भरून काढून तेथें हें मंदिर बांधण्यांत आलें.[2] इ. स. १८१४ मध्ये त्याची आंगऱ्यांनी वार्षिक नेमणुकीची व्यवस्था केली, ती अशी—

नैवेद्यास ४ मण ९।। पा. भात.
दीपास ५।।= रु. वार्षिक.
शाकारणीस ७ रु. चे झाप. [म. ना. अप्रपेदरु नं. ६३६]

नागावचीं आणखी दोन मंदिरें, (१) योगेश्वरीचें [म. ना. अप्रपेदरु नं. ६३८] व (२) मुख्य विनायकाचें होय. या मंदिरांस श्रावण मासांत दीपासाठी ३ शेर तेल सरकारांतून देण्याची व्यवस्था इ. स. १८१० मध्ये केलेली आढळते. [म. ना. अप्रपेदरु नं. ६३६]

तीर्थ— नागावच्या सरहद्दीवर कस नदी व समुद्र यांचा संगम होतो, तें तीर्थक्षेत्र समजलें

१ आंदरु नं. ८३, पृ. १८० २ आंम. ५०४

जातें. येथें वामनद्वादशीस स्नान करणें पुण्यप्रद मानलें जाई. ज्यांना जाववत नसे, त्यांच्या स्नानासाठी, त्या दिवशीं तेथून उदक आणीत.

**इस्रायल लोकांचें मंदिर**—रायवाडी हें गाव सोडून नागावांत प्रवेश करूं लागलें, म्हणजे सध्यांच्या इंग्रजी शाळेजवळ ईशान्येस असलेल्या जागेस मशीदभाग म्हणतात. कांही शतकांपूर्वी तेथें इस्रायल लोकांचें मंदिर होतें; त्याचीं पडकीं भिताडें अजून आढळतात.

ज्या मंदिरांच्या व्यवस्थेबद्दल आकडेवार माहिती देतां आली, त्यांचाच येथे विचार केला आहे. इ. स. १७९८–९९ मध्ये नागावांत अकरा मंदिरें होती.[१] इ. स. १८०९–१० मध्ये ती संख्या २८ पर्यंत गेलेली आहे. यांतील बहुतेक 'सार्वजनिक' असून कांही खाजगी स्वरूपाचीं असल्याचें आढळतें. उदाहरणार्थं, आपाभट आचार्यांकडील श्रीबालकृष्ण; महादेवभट आचार्यांकडील श्रीबालकृष्ण हीं मंदिरें खाजगी असें वाटतें.

एक मंदिर हें अनेकदा अनेक मंदिरांचा समुदाय असतो व मुख्य देवतेवरून त्या मंदिरास एक नांव प्राप्त होतें. इ. स. १८०९–१० मध्ये श्रीहरिहरेश्वर, सुंदरनारायण, श्रीगणपति-हाटाळें, श्रीयोगेश्वरी, श्रीउमामहेश्वर, श्रीसूर्यनारायण, श्रीशिवपार्वती संनिध महाकाली, श्रीलक्ष्मीनृसिंह, श्रीवेताळ संनिध बहिरी, अशीं आणखी कांही नांवें उल्लेखिलेलीं कागदांतून आढळतात. पण यांतील कांही मंदिरें मुख्य मंदिराच्या संनिध, कोनाडयांतून अगर ओवऱ्यांतून स्थापिलेल्या मूर्तींचीं असावीत. त्यांचें पूजन, अर्चन, श्रावणमासाभिषेक इत्यादि 'धार्मिक' विधि आस्तिक्यपूर्वक चालू होते.

वैदिकांस मिळणाऱ्या दक्षिणेचें प्रमाण हें गमक मानून नागावांतील प्रमुख मंदिरें कोणतीं, याचा विचार केला, तर श्रीनागेश्वर व श्रीमहाकाली हीं नागावचीं मुख्य मंदिरें होत; कारण मासाभिषेकांप्रीत्यर्थ जास्त रकमा या मंदिरांतून खर्च होत.[२]

इ. स. १८१९–२० मध्ये नागावांत 'ओकांची वाडी' बेवारशी होऊन ती सरकारने कुंटे यांस विकत दिली. ओकांनी एक मंदिर बांधलें होतें; त्याची पूजा-अर्चा कुंटे यांनी करावयाची व मंदिरास दिलेली सरकारी नेमणूक कुंटयांकडे चालावयाची, असा करार झाला.[३] हें नागावचें आणखी एक मंदिर होय.

ठळक मंदिरांची शाकाराणी, नैवेद्य, दीपवात यांची व्यवस्था सरकारी उत्पन्नांतून झाली आहे. त्यांचे कांही आकडे वर दिले. त्यांवरून उघड होतें की या मंदिरांत भव्यता, शिल्प नाही. मंदिरांच्या इमारती अत्यंत सामान्य आहेत. इ. स. १८४०–४१ मध्ये आंगऱ्यांची सत्ता नष्ट होण्याच्या सुमारास ९ मंदिरांस 'इमारती' होत्या. पंधरा मंदिरें तर कुडटारू म्हणजे पेंढयाने अगर झापसावळयांनी शिवलीं शाकारलीं जाणारीं होतीं.[४] कौलांनी शाकारण्याचा काल अजून यावयाचा होता.

मंदिरांची स्थापना, जीर्णोद्धार यांवरून एक गोष्ट स्पष्ट होते की नागावच्या मंदिरांस दीर्घ परंपरा व प्राचीनत्व नाही. श्रीगणपति, वंकनाथ, महाकाली इत्यादि देवदेवतांच्या मंदिरांच्या बांधणीचा काल दिला; कांही तत्पूर्वीचीं आहेत हें खरें असलें, तरी एका अर्थानें हीं सर्व मंदिरें आंगरे–पेशवेकालीन आहेत.

यादवकालांत नागावची पहिली वसाहत झाली. ती एकदोन शतकें टिकल्यावर दुसरी वसाहत मुसलमानी अमलांत नांदू लागून औरंगजेबाच्या स्वारीपर्यंत टिकली व नागाव पुन्हा ओस पडलें असावें. या तर्कामागील कारण असें की औरंगजेब, आंगरे, मराठे, जंजिरेकर व

---

१ आंदरु नं. १३४, पृ. ६०
२ आंदरु नं. १६८, पृ. १८३ ते १८५
३ आंदरु नं. ४७, पृ. ७०, ७१
४ कोंजरु नं. १७३, पृ. ३

पोर्तुगीझ इतक्यांच्या आक्रमक हालचाली या प्रदेशांत चालू असल्यामुळें वसाहत टिकून राहण्याची शक्यता नव्हती. आंगऱ्यांच्या सत्तेचा उदय व सध्याच्या नागावच्या वसाहतीचा प्रारंभ या गोष्टी समकालीन वाटतात. इ. स. १७५० च्या सुमारास आंगरे स्थिरावले व नागावची सध्यांची वसाहत स्थिर झाली.

वसाहत कायम झाल्याशिवाय मंदिरांची स्थापना अगर जीर्णोद्धार या गोष्टी घडणार नाहीत. ह्या विचार मान्य केला, तर मंदिरांच्या आपल्या माहितीचा प्रारंभकाल इ. स. १७६० च्या सुमाराचा कां हें ध्यानीं येतें. मंदिरांचा आकार, भव्यत्व, श्रीमंती यांवरून राजसत्ता व प्रजाजन यांची भाविकता व धार्मिकता अजमावतां येणार नाही; पण त्यांची धनवत्ता मोजतां येईल. तदनुसार असें उघडच म्हणतां येईल की नागावचे अधिपति आंगरे व प्रजा यांना आर्थिक मजबुती प्राप्त झाली नाही. मंदिरांवर कोणत्याहि प्रकारचे कर आंगरेकालांत लादलेले नाहीत. धार्मिक, मानसिक समाधान निर्माण करणारीं व भावनात्मक ऐक्य निर्माण करणारीं स्थानें हें मंदिरांच्या स्थापनेचें आदिकारण असल्यामुळें त्यांवर कर नसणेंच प्रस्तुत होतें.

# नागाव – विविध

मागील मजकुरांत जी माहिती अंतर्भूत झाली नाही, ती या भागांत देत आहोंत; त्यामुळे या भागांत विषयाचा एकसंघपणा असणार नाहीं.

**पाथरलीचें तळें** — नागावच्या दोन तळ्यांची माहिती अन्यत्र दिली आहे. नागावचें सर्वांत जुनें तळें पाथरलीचें होय. तें कान्होजी आंगऱ्यांनी बांधलें. त्याची खोली फक्त सहा फूट असून त्याने अडीच एकर क्षेत्र व्यापलें आहे. त्यांत वर्षभर पाणी असे.[1]

**सण** — नागावांत शिमगा व रंगपंचमीचा सण सार्वजनिक म्हणून साजरे होत.[2] गणपतीचा सण ब्राह्मणसमाज साजरा करीत होता. गौरीचा सण ब्राह्मणेतर समाजांत महत्त्वाचा मानला जाई. नारळी पौर्णिमेचें महत्त्व सागरकिनाऱ्यावरील लोकांस मोठेंच असतें; तें नागावकरांस होतें. विजयादशमीचा सण सर्वच मराठी प्रदेशांतल्याप्रमाणें नागावासही महत्त्वाचा होता. नागेश्वराची चैत्र शुद्ध पौर्णिमेची जत्रा हा नागावचा एक सार्वजनिक आनंदोत्सव होता. नागावकरांस बैलगाड्यांच्या व घोड्यांच्या गाड्यांच्या शर्यतीचा मोठा शौक असे व आजही तो कायम आहे. कार्तिक शुद्ध १ च्या दिवशीं व शिवरात्रीच्या दिवशीं शर्यती लागत. शर्यतींची तयारी कित्येक महिने अगोदरपासून चालत असे. पैजा लागत.

**जुनी मशीद व बंदर** — नागावच्या ईशान्य कोपऱ्यावर, जेथें इस्रायल लोकांची जुनी पडकी मशीद आहे, तिला लागून नागावचें बंदर होतें. तेथवर भरतीच्या वेळीं नागावच्या व्यापाऱ्यांचीं गलबतें येऊन माल उतरवीत. आतां नागावास बंदर राहिलें नाही. ८० वर्षांपूर्वी या बंदराजवळ दातारांचें किराणा मालाचें दुकान असे. आंगरेकाल संपतांच दातार, लेले, आठवले इत्यादि अनेक ब्राह्मणमंडळी दुकानदारींत शिरली.

## नागावांतील अनर्थ – उत्पात :

(१) इ. स. १७५९ मार्च ४ किंवा ११ – या दिवशीं अष्टागरांत शेंडे नक्षत्र दिसूं लागलें.[3]

(२) इ. स. १८३२ नोव्हें. १३ – कार्तिक वद्य ६ रोजीं आकाशांतून अगणित तारका रात्रभर पडत होत्या.[4]

(३) इ. स. १८५८ नोव्हें. – डिसेंबर – एक महिनाभर शेंडेनक्षत्र दिसत होतें. चार घटका रात्रीस दिसूं लागे.[5]

**रोगांच्या साथी** — (१) इ. स. १८२०–२१ मध्ये नागावांत जरीमरी आली होती.[6] (२) इ. स. १८३०–३१ सु॥ इह्दिे सलासीन या वर्षी नागावांत जरीमरीच्या वाऱ्यानें माणसें मरण पावलीं.[7]

**देवमासा** — ९ मे १८१० या दिवशीं नागावच्या साततडाचे बंदरांत एक देवमासा किनाऱ्यास येऊन लागला. त्याची लांबी ४५ हात होती. त्याचे तुकडे करून त्यास पुरून टाकिला.[8]

---

१ कुर्गे. पृ. १२१
२ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७, ६३८
३ आंअ. २१९
४ आंअ. ७१४
५ आंअ. ८१९
६ म. ना. अप्रपेदरु नं. ६३७
७ म. ना. अप्रपेदरु नं. ६३८
८ आंअ. ६९१

**जंगलें** — आंगऱ्यांच्या प्रदेशांत दाट राखीव जंगलें होतीं. नागाव सपाट जमिनीवरचा व समुद्रकिनाऱ्यावरचा गाव असल्याने तेथे जंगलें नव्हतीं; त्यामुळे नागावकरांना सरकारच्या भेरसें, ब्राह्मणगाव इत्यादि ठिकाणच्या जंगलांतून लाकूड मिळवावें लागे. परवानगीच्या सनदा तपे मजकूरच्या कमाविसदाराच्या व रानाची रखवाली करणाऱ्या मनुष्याच्या नांवानें दिल्या जात. नागावच्या घरांना, ऱ्हाट–नांगर यांना सरकारी जंगलांतील लाकूड विनामूल्य अगर अल्प मोबदल्यांत मिळे.[1]

**सत्तांतर व त्याचा परिणाम** : ९ एप्रिल १८४० या दिवशीं शेवटचे सरखेल दुसरे कान्होजी आंगरे निपुत्रिक मरण पावले; आंगरे राजवटीला धनी उरला नाही. दिवाण विनायक परशराम बिवलकर कारभार करीत राहिले.[2] इंग्रजांनी आंगऱ्यांचें राज्य ताबडतोब खालसा न करतां साडेपांच महिने तसेच जाऊं दिले. २९ ऑक्टोबर १८४० रोजीं साष्टी परगण्याचा अधिकारी कॅप्टन् जॉन मार्शल डेव्हिस, पोलिस सुपरिंटेंडेंट, कुलाबा राज्याची जप्ती करण्यासाठी अलीबागेस आला व १ नोव्हेंबर १८४० पासून निरीक्षण करीत एक एक गोष्ट समजवून घेत राहिला. १० डिसेंबर १८४० रोजीं त्याने आंगऱ्यांचा मुलूख खालसा करून इंग्रजी प्रदेशास जोडल्याचें जाहीर केलें.[3]

कॅप्टन डेव्हिसने पूर्वीचींच माणसें कामावर कायम ठेवून त्यांचेमार्फत कारभार चालविला. त्याने जे कर माफ केले, त्यांचा उल्लेख पूर्वी येऊन गेला आहे. इ. स. १८४२ च्या जूनमध्ये कलेक्टरने आंगऱ्यांचे दोनचार महालकरी दूर करून नवे शिपाई व नवे कारकून ठेविले.[4] कॅप्टन डेव्हिसनंतर २० डिसें. १८५१ पर्यंत जीवनसाहेब (जॉन) कुलाब्याचा 'एजंट' म्हणून काम करीत होता. त्या दिवशीं पिलीसाहेबाची नेमणूक झाली.[5] चारच दिवसांनी, ता० २४ डिसेंबर १८५१ रोजीं दिवाण विनायक परशराम बिवलकर ऊर्फ बाबासाहेब कालवश झाले.[6] नवीन दिवाण नेमण्याचा प्रश्नच नव्हता. जुन्याला काढून टाकण्यापेक्षा तो मृत्युवश होईपर्यंत थांबण्याचें सरकारचें धोरण होतें.

**नवी व्यवस्था** : २९ सप्टेंबर १८५२ ची आंगरेकालीन अष्टागरमधील नोंद पुढीलप्रमाणे आहे. 'या वर्षी अलीबाग हा ठाणें जिल्ह्याचा सब्-डिव्हिजन झाला. कारभाराचे दृष्टीने त्याचे पांच तालुके करण्यांत आले. (१) अलीबाग–रेवदंडा, (२) पोयनाड-उंदेरी, (३) महाड, (४) राजपुरी व (५) पेण-साकसे. या तालुक्यांचा कलेक्टर म्हणून कार हा कारभार करीत होता. त्याचे हाताखाली एक असिस्टंट कलेक्टर काम करीत असे. त्याचे देखरेखीखाली अलीबाग येथें पांच फेरणी (सर्कल ऑफिसर्स) जमाबंदीचें काम पाहात.'

कोर्टाचीं कामें अलीबाग येथें मुनसिफ् कोर्टांत चालवयाचीं; मोठीं कामें ठाण्यास चालावयाचीं. अपील मुंबईच्या माजगाव कोर्टांत अगर गव्हर्नरपुढे दाखल व्हावयाचें. अलीबागेस तिजोरी ठेवण्यांत आली. नागावकरांनी न्यायनिवाडे व सरकारसाऱ्याचा भरणा करण्यासाठीं अलीबागेस जावयाचें अशी पद्धति रूढ झाली. अलीबागचें मुनसिफ् कोर्ट इ. स. १८५३ पासून सुरू झालें.[7]

इ. स. १८५८ मध्ये अलीबागेस एक फौजदार म्हणजे पोलीस इन्स्पेक्टर असे. त्याच्या हाताखाली दहा शिपाई फिरते असत. पोयनाड येथें दुसरा फौजदार व तितकेच शिपाई असत.

---

१ आंदरु नं. ८३, पृ. १८० — २ आंअ. ७७६
३ कोंजरु नं. १३७, पृ. ३९, ४० — ४ आंअ. ७८३
५ आंअ. ७९३ — ६ आंअ. ७९४
७ कुगॅ. पृ. १६०

फौजदाराचें वेतन ४० रु. असे. कसब्याचे गावीं एक गेट असे. तेथे एक नाईक व त्याच हाताखाली तीन शिपाई असत. गुन्ह्यांची चौकशी मामलेदार करी.[१]

आंगरेकालांत कर्जखतें, गहाणखतें इत्यादि देवघेवींच्या कागदांचे प्रकार असत. इ. स. १८५८ पासून अष्टागरांत स्टँप कागदांचा उपक्रम सुरू झाला. १ ते २५ रु. पर्यंतच्या व्यवहारासाठी दोन आण्यांचा, २५ ते ५० रु. पर्यंतच्या करारांसाठी चार आण्यांचा, ५० ते १०० रु. पर्यंतच्या देवघेवीसाठी आठ आण्यांचा स्टँप घेणें जरूर ठरलें. फरोक्त खत करणें असल्यास १ ते १०० रु.— पर्यंत किमतीच्या वस्तूसाठी एक रुपयाचा स्टँप कागद वापरावा लागे. कागद नोंदविण्याची पद्धति सुरू झाली. त्याचा आकार १०० रु. च्या व्यवहारास एक रुपया असे.[२] कोर्टांत फिर्याद करण्याचा खर्च इ. स. १८५८ पर्यंत शेकडा ७ रु. होता. अठ्ठावन्नमध्ये तो शेकडा १४ रु. करण्यांत आला.[३]

आंगरेकालांत सरकारदेणें आठ हप्त्यांत घेण्याची पद्धति होती. आता तें चार हप्त्यांत दिलें पाहिजे, असें नव्या सरकारने ठरविलें. शेतांबाबत कुलबाब, कुलकानु, हालीपटी, पेस्तरपटी इत्यादि भानगडी उरल्या नाहीत; फक्त उत्पन्न काढण्याबद्दलचें देणें दिलें म्हणजे झालें.

आंगऱ्यांचें राज्य खालसा करतांच कंपनी सरकारने भंडारी लोकांवर प्रथम विशेष मेहेर-नजर दाखविली. त्यांस देणें, वेठबेगार, यांची माफी मिळाली. वहात्या माडास सालीना एक रुपया आकार भंडाऱ्याने भरला म्हणजे झालें! भंडाऱ्याने १५ अगर ३० माड वाहिले पाहिजेत, एवढी अट होती. माडीचा दर १ रुपयास कच्चे तीस शेर असा होता. माडी किरकोळीने विकण्यास मुभा होती. बंगाली ६४ तोळयांच्या शेरास दीड आणा किंमत पडे.[४]

राजवट बदलली, म्हणून मुख्य व्यवसायांत बदल होण्याचें कारण नव्हतें. शेती, बागायत करणें, भंडारकाम करणें हें पूर्वीप्रमाणे चालू होतेंच. पण बदलत्या राजवटीचा परिणाम ब्राह्मण-समाजावर प्रथम दृग्गोचर होऊं लागला. त्यांच्या सवलती, त्यांच्या पाठशाला इत्यादि मागें पडूं लागून, त्यांचेबाबत नया जमाना सुरू झाला.

---

१ आंअ. ८२०
२ आंअ. ८२२
३ आंअ. ८२७
४ आंअ. ८२१

# परिशिष्ट

## १ शब्दकोश

अगोट-ठ — पावसाळ्याचा प्रारंभकाल; शेतीच्या हंगामाची सुरुवात.

अजीपाल — अजी – यापासून, पुढे, पूर्णपणें, अगदी. पाल – कराची सूट, माफी.

अडशेरी-अडीसेरी — अडीच शेरांचें माप किंवा वजन. ( पूर्वी पांच शेरांची पायली असे; त्याचा अर्ध ). नोकरास दररोज किंवा महिन्याच्या महिन्याला दिलें जाणारें धान्य.

अलंग-गा — लांबच लांब सोपा, चाळ, गोठा, पहाऱ्याची जागा. अलंग: परिरक्षा स्यात् मेट स्यात् उपरक्षिका । ( राजव्य. कोश, श्लोक १९५ ).

आफ्तफितरत — आफत = संकट, आपदा, अरिष्ट. फितरत = बखेडा.

इस्तावा — नवीन जमीन कीर्दमामुरीस येतेवेळीं कांही वर्षेपर्यंत भर साऱ्यापेक्षा कमी, परंतु दरसाल वाढत्या साऱ्यानें देण्याची पद्धति – अशा तऱ्हेनें वाढणारा सारा.

उपराळा — साह्य.

उभा मार्ग — रहदारीचा रस्ता; हमरस्ता.

उस्तवारी — डागडुजी, दुरुस्ती, व्यवस्था.

ऐनकबज — ऐन = मुख्य, मूळ. कबज = लेखी पावती, पोच.

ऐन नख्त — पैशांच्या रूपांत येणारा सारा; ऐनजिनसी साऱ्याची पैशांत किंमत.

कलमबंदी — अनेक प्रकारचीं अनेक कलमें निर्णयपूर्वक ज्यांत बांधून दिलीं आहेत तो लेख; सर्व तपशिलांच्या बाबींची एकाखाली एक क्रमाने केलेली नोंद.

कलित — नजर पाहणी; अंदाजी पाहणी; ( हा शब्द शब्दकोशांत नाहीं. शब्दकोश कलतर देतो = पिकाचा अंदाज करून बसविलेला धारा ).

कारसाई — रयतेला दिलेली तगाई; ही सुगीच्या वेळीं धान्याच्या रूपाने परत करण्याच्या बोलीवर देतात; किल्ल्याच्या घेरांतील खेड्यांतील लोकांकडून किल्ल्यावर असलेल्या सरकारी इमारतींच्या शाकारणीसाठी बसविलेला सरकारी कर; यांत गवत, नारळीच्या सावळ्या, पानें, कारव्या, बांबू वगैरे सामान असतें.

कुड्टारु — गवताच्या, माडाच्या, पोफळीच्या सावळ्यांनी शाकारलेलें; जुनें छप्पर.

कुणबीण — दासी, मोलकरीण.

कुलकानु — सर्व कर आणि पट्ट्या आणि बाजारांचे सर्व हक्क घेण्याचा अधिकार दिले आहेत, अशा अर्थाचा सनदेंत येणारा शब्द.

कुलबाब — वतनदारांचे हक्क म्हणून सरकारने गोळा केलेले सर्व कर.

कुलारगवार — (कुळारग – खेड्यांतील शेतसारा देणारीं कुळें.) प्रत्येक कुळामागें; दर कुळागणिक.

कैंबळी — जुन्या गवताचें छप्पर असलेलें. ( घरावरील गवत, पेंढा एका पावसानंतर कुजून निकामी होतो, ती कैंबळ). जुनें शाकार; कैंबळाने शाकारलेलें गवतारू घर.

कौल — कोणत्याहि कारणाकरिता सरकारी अधिकाऱ्याने दिलेलें अभयपत्र; मालक.

सरकार किंवा जमीनदार कुळाला ज्या कांही सवलतीच्या अटी देतो किंवा करार करतो, त्यास कौल म्हणतात.

खेरीजकबज — खेरीज = विरहित. कबज = लेखी पावती; पोच.

खेरीज मुशाहिरा – मासिक वेतन, पगार, रोजमुरा, मजुरी यांव्यतिरिक्त मिळणारी रक्कम.

गादीतंबाकू — सरकारी नोकरांशिवाय इतर सर्वांकडून सरकारला लागणाऱ्या तंबाकूसाठी घेतलेला कर.

गुरुळ — खेकड्यांनी शेताच्या बांधांना काढलेले उकीर.

गुलाम — बटकीचा मुलगा; दासीपुत्र; कामासाठी विकत घेतलेला माणूस.

घालमेल — गोंधळ; धामधूम; उलाढाली करणें.

जमीदार-जमीनदार — जमी = जमीन. जमीदार = जमिनीचा मालक वतनदार. इंग्रजी-पूर्वीच्या राज्यांतील सनदी, सरंजामी माणसें.

जहाजफर्माविस — जहाज – तारूं, गलबत. फर्माविस = एक प्रकारचा कर.

जित्रब-जितरब — जीवनाला आधार असें जमिनीचें उत्पन्न; पिकलेलें उभें शेत; बागाईत व तें करणारीं जनावरें.

जिनजित्रब — शेतांतील, बागेंतील उभीं पिकें.

तहवेल — उष्टरखाना, पीलखाना इ. अठरा कारखान्यांवर झालेला खर्च.

राजव्ययस्तथा विज्ञैस्तहवेलिरिति स्मृतः । ( राजव्य. कोश श्लोक २२१).

थटी – थट्टी – गोशाला; जनावरांचें खातें; गुरें बांधण्याची जागा.

दर्यागर्क – समुद्राने बुडविलेली जमीन, गाव.

दरीबा – (हिंदी) पानांच्या विक्रीचें बाजारांतील दुकान. येथे माडीविक्रीचें ठिकाण.

दस्ती – सरकारी कर बसविण्यास योग्य.

दहीं–बकरें. – गाईविरहित गुरें व बकरीं पाळण्याचा व्यवसाय करणारांकडून घेतलेले कर.

दास्तान – धान्य साठविण्याची कोठी, कोठार.

देशमूखपट्टी – देशमुखाने अगर देशमुखाकरिता बसविलेली पट्टी.

देहेनगी – बक्षीस, इनाम, देणगी.

नगदी जमीनशिरस्ता – रोख नाण्याच्या स्वरूपांतील वसुलाचा ठराव.

नाजीरपट्टी – पाहणी किंवा रक्षण करण्याबद्दल घेतलेला कर.

नातवानी – गरिबी, असमर्थता.

निखर – कनिष्ट प्रतीची जमीन.

निगादास्त – देखरेख, जपणूक, काळजी.

पंचऱ्ण्याचें दुकान — छोटेसें किराणा मालाचें दुकान; ( केणें = मसाल्यांतील मिरीं, मोहरी, जिरें, हिंग, दगडफूल इ. पदार्थ ).

परभारा खर्च — खर्चाची रक्कम स्वतः न देतां दुसऱ्यास ती देण्याचा हुकूम (वरात) देऊन भागविलेला खर्च.

परसाव — परस किंवा परसूं म्हणजे घराची मागील बाजू; अंगण; खुली जागा; परडें; यांपासून बनलेला कोकणांतील त्याच अर्थी शब्द.

पाखाडी — गावाचा एक भाग.

पायपोस पट्टी — जोडा घेण्याकरिता सरकारने बसविलेला कर.

फडफर्मास — राजे किंवा अधिकारी यांच्या हुकुमाप्रमाणे ते गावीं आले असतां घेतलेला नजराणा; भेट; ऐनजिनसी नजर.

फरोख्त — विकलेलें.

बाबती — वसुलाची कोणतीही बाब; एखाद्या विशिष्ट बाबीवर आकारलेला जादा कर; देशमूख, देशपांडे इत्यादिकांचे मुलखावर असणारे हक्क.

बिघावणी — बिघ्याच्या मापानें केलेली जमिनीची मोजणी; बिघ्याच्या मापानें बसविलेला शेतसारा.

मजुरा — ( मूळ शब्द मजरा. ) संमत; माफ.

महामूर–महामुरी—धान्यादिकांची विपुलता; समृद्धि; पेरणी इ. चें पूर्ण झालेलें काम; लागवड.

मुशारखोर — नोकर; चाकर; पगार देऊन ठेवलेला मनुष्य.

मेवा जिन्नस — फळफळावळ व तत्सम वस्तु.

मेहमान — अतिथि; सत्कार करण्याकरिता बोलावलेला किंवा अवचित आलेला मनुष्य.

मोईन — व्यवस्था; वार्षिक किंवा कायम नेमणूक.

मोर्तब — अनुमतिदर्शक शिक्क्याचा ठसा.

मोहतर्फा — खेड्यांतील दुकानदार व कारागीर यांचेवरील कर; गवंडी, सुतार. इ. स त्यांच्या कसबासंबंधीं सरकारास जो कर भरावा लागतो तो.

रुहू — पेरण्यासाठीं भिजवून मोड आणलेलें धान्य.

रोखा — आज्ञापत्र; सान्याचा अथवा मालपुरवठ्याचा सरकारी हुकूम; करारप्रमाणें तगादा अगर सक्त हुकूम; मागणीपत्र; ताकीदपत्र; जरुरीचा हुकूम.

लागवड खर्च — शेतीचा खर्च; जमीन लागवडीस आणणें; पेरणीचा खर्च.

वरकस जमीन — तांदूळ, गहूं, बाजरी, जोंधळा इत्यादि मुख्य धान्यें व तूर, हरभरा, मूग, मठ हीं कडधान्यें सोडून इतर नाचणी, वरी, हरिक वगैरे हलकीं पिकें ज्यांतून काढतात, ती कनिष्ट प्रतीची जमीन; भाताभोंवतालची गवताळ जमीन.

वर्तक — बेलिफासारखा एक गावकामगार; ग्रामपंचायतीच्या ठरावांची अंमलबजावणी करणारा अधिकारी; सरकारी वजनें, मापें पाहणारा अधिकारी.

वानगी — नमुना; मासला; जकातीच्या नाकेदारानें जकातीशिवाय कोणत्याहि मालाचा नमुन्याकरिता, चव पाहण्याकरिता म्हणून घ्यावयाचा अंश; शेतात पिकलेल्या पदार्थाचा खंडकऱ्याकडून मालकास मिळावयाचा नमुन्यादाखल अंश.

विऱ्हेगर्क — ओढा, नाला, प्रवाह, पऱ्ह्या यांत बुडालेली.

वेठवे(बि)गार — मोबदला न देतां काम करून घेण्याचा हक्क.

वेतनात खर्च — ( वेतन = केलेल्या कामाचा मोबदला. ) बिदागी; मजुरी, यांसाठी झालेला खर्च.

शिक्का — नाण्यावरील छाप, मुद्रा, ठसा, राज्यकर्त्याचा छाप.

शिवार — शेतीचा प्रदेश.

सरसुभेदार — सुभेदारांवरील मुख्य अंमलदार.

सरा — मद्य, दारू.

सादिलवार पट्टी — गावच्या नैमित्तिक, आगंतुक खर्चासाठी आकारलेला कर ( उत्सव,

धर्मादाय, भत्ता यांसाठी ). आकस्मिक खर्च भागविण्याकरिता आकारलेली पट्टी.
हेड — विक्रीकरिता नेलेलें गुरांचें खिल्लार; दावण; कळप.

## २ नाणीं व इतर

लारी — शिवपूर्वकालांतहि चालू असलेलें नाणें. याचा उल्लेख आदिलशाही कागदांतून येतो. एका होनाच्या पांच लारी होत. पण लाऱ्या व होन यांचे अनेक प्रकार असल्याने कोणत्या लारीचें कोणत्या होनाशीं हें प्रमाण होतें, तें कळत नाही. दुसऱ्या एका कागदांत एक होन = ९$\frac{१५}{१६}$ लारी असा भाव आला आहे. इ. स. १७५१–५२ मध्ये साडेतीन लारी = १ रु. असा भाव आला आहे. लारी हें रुप्याचें नाणें आहे.

खुर्दा — तांब्याचीं नाणीं.

रुका — टक्क्याहून खालचें तांब्याचें नाणें; १ रु. = ४८ रुके असा भाव असे.

शिवराई — सहा रुके.

सजगाणी — ४५ रुके = साडेसात सजगाण्या. सहा रुके म्हणजे एक सजगाणी. [ भा. इ. सं. मं. त्रैमासिक, वर्ष १६ अंक २ ]

अलीबागी रुपया — आंगऱ्यांनी पाडला. याचें वजन १७२ ग्रेन. कस ८३·७५. शुद्ध धातु १४४.०५ ग्रेन.

श्रीरुपया — वजन १७२ ग्रेन. कस ९१·५०, शुद्ध धातु १५७·३८. ग्रेन.

मुंबई किंवा सुरती रुपया — वजन १८० ग्रेन. ९१·६६६ कस. शुद्ध धातु १६५ ग्रेन. [ १८० ग्रेन = १ तोळा. ] मुंबई रुपयाची किंमत १०० धरली तर अलीबागीची ८७·३०३ व श्रीरुपयाची ९५·३८१

[ असे रिपोर्ट ६।१०।१८२६ रोजीं मुंबई सरकारने प्रसिद्ध केलेला ].

द्राम — १२८० कवड्यांचा एक द्राम होई.

कोष्टक — ४ कवड्या = १ गंडा. २ गंडे = १टोली.
२ टोल्या = १ दमडी. ४ दमड्या = १ पैसा.

सापिका — तांब्याचें नाणें. दोन सापिके = १ शिवराई.

ढबू — सजगाणी. शिवराई.

बिघा — याचें प्रमाण जुन्या काळांत निश्चित नव्हतें. जमीन मोजण्याच्या मान्य (Standard) बिघ्याचे ३०२५ चौ. यार्ड समजत. बंगालमध्यें १६०० चौ. यार्ड = १ बिघा. जमाबंदीच्या वेळीं बनारस येथें ३१३६ चौ. यार्डांचा बिघा ठरविण्यांत आला. अन्य कांहीं ठिकाणीं तो २०२५, ३६०० किंवा ३०२५ चौ. यार्डांचा मानला होता. अकबराचा बिघा ३६०० इलाही गजांचा असे व तो ३०२५ चौ. यार्ड भरे. मराठी बिघावणीचें कोष्टक — २० पांड = १ बिघा; १२० बिघे = १ चावर;. २० काठ्या = १ पांड. ५ हात = १ काठी [ पूर्वी ५ हात व पांच मुठी = १ काठी असें कांही ठिकाणीं होतें ] आदिलशाहींत ४३८३ चौ. यार्ड = १ बिघा होई.

पायली — चार शेरांची पायली मानतात. मराठी राज्यांत ऐनजिनसी महसूल घेतांना ३$\frac{३}{४}$ शेरांची पायली या मापाने घेत. पण विक्रीचे वेळीं ३$\frac{१}{२}$ शेरांच्या पायलीने वस्तूंची विक्री होई.

# व्यक्तिस्थलसूची

[ आकडे पृष्ठांचे आहेत. ठळक व्यक्ती व स्थळें दिलीं आहेत.]


अदकारखार ६९

अदकारवाडी ६९, १११, ११२

अलीबाग १, १०, १२, १५, १८, १९, ३२, ३८, ४९, ६०, ६१, ७८, ८४, ८५, १२४ ते १२६, १४१—चा हिराकोट १०, ११

अलीखान ( बाग ) १२३

अष्टागर १ ते ३, ५, ६, ९ ते १२, ३७, ६१, ६२, ७१, ७३, ८३, ८५, ८६ ९५, १०५, १०६, १४०, १४२

अक्षी १, ११, १२, १५, ३५, १०७, १०९, १२६

आचार्य आपाभट १००, १०१, १०४, १११, १३८

आचार्य निळो बल्लाळ १०९

आचार्य महादेवभट १०४, १३८

आंगरे कान्होजी ( १ ले ) ९, १०, ६५, ६९, ७३, ८३, ८५, १४०

आंगरे कान्होजी ( २ रे ) ३४, १४१

आंगरे बाबूराव १२, १४, २२, ३८, ३९, ६६

आंगरे मानाजी ( १ ले ) १०, ११, ६१, ७०, ८८

आंगरे मानाजी ( २ रे ) ११, १३, १२३

आंगरे राघोजी ११, ६१, ६८, ६९, ८५, १०७, १२७

आठवले. त्रिंबक बाबाजी २०, ४२, ११६, ११९, १२२

आरेकर भास्कर बल्लाळ ११४, ११९, १२२

आण्णाजी दत्तो ५, ९, ४३, ४४, ६७

आपटे रामचंद्र त्रिंबक १०३, १०५

इस्राईल मंदिर १०९

उंदेरी २, ७, ११, ५१, ८५, १०७, १४१

उमामहेश्वर ( मंदिर ) १३८

ओकांची वाडी १३८

करवंत जगन्नाथशास्त्री १२४

करवंत बाल ९७ ते १००, ११७

करंदीकर कृष्णंभट १००, १०२, १०६, १०७

करंदीकर राघो महादेव २०, २२, ३२, ११३

कस (नदी) १२, १३७

कार (कलेक्टर) ६१, १४१

कावीर १००, १०१, १०६

काशीविश्वेश्वर (मंदिर) १३४

कासारवाडी १२३

किहीम १, ८५, १०९, ११२

कुर्णे १००, १०३, १०४

कुलाबा ६, ९, १०, १२, १९, ३७, ६०, ६५, ६६, ७०, ७१, ७५, ७८, ८८, ९३

कुळकर्णी खंडेराव रामचंद्र ८१

कुळकर्णी रघुजी ५

कुळकर्णी रामचंद्र अमृत १७

केळकर रामभट ८६, १०२

कोठारभाट ६९

कोनकर बचंभट १०६

कोल्हटकर कृष्णाजी नाईक १२९

कोल्हटकर लक्ष्मण कृष्ण ८१, १००, ११६

कोलाई ( ग्रामदेवता ) १३६, १३७

कौली ( पाखाडी ) ८७

खंडाळें ( तर्फ ) ३५, ४९, ८४

खांदेरी २, ६ ते ९, ३७

खानव १००, १०१

गणपति ( मंदिर ) १३७, १३८

गणपति ( मंदिर ह्राटाळें ) १३८
गणपति पंचायतन १३५
गाडगीळ रामचंद्र गंगाधर ९०
गुरव घाऱ्या ९०, ९३, १३४
गुरव बच्च्या ९२
गुरव येशा १३५
गोखले गोपाळ हरि १०९
गोखले बच्च्याजी गोपाळ १०९
गोठी १२४
गोडबोले बाबाजी बल्लाळ ९१, १०५, १०९
गोडबोले नारो बाबाजी ९७, ९८
घाणेकर बालाजी जिवाजी १२३
घाणेकरीण वाराणशीबाई ३२
घारपुरे नारायणभट १०७
घैसास गणेश १२३
चिटणीस कृष्णाजी तुकाजी ६९, ७०
चिटणीस जिवाजी ८१, ८८
चिटणीस साबाजी तुकाजी ६९, ७०, ८८
चिंतो विश्वनाथ १६, १७
चोघले ३८, ८०, ८७, ९१, ९३
चौल १ ते ४, ६, ९, ११, १२, ३७, ५६, ६९, ७०, ९५, १०५, १०७, १०९—चा राजकोट ९, १०—चें रामेश्वरमंदिर ७१
जयराम जिवाजी ३६
जीवन ( जॉन ) कलेक्टर १४१
जोगळेकर विसाजी केशव ८१, १०१
जोशी गणेश बापुजी १०५
जोशी ( गोलक ) दाजी ९१
जोशी ( पगारकर ) बाळ ८६, ११५, १२१
जोशी हर बाजी ११, १२१
जोशीवाडी ९७
ज्योतिषी वैंजनाथ रंगभट १०
ठाकूर बाळ ९२
ठोसर अंतोबा बहिरव ६, ११०
ठोसरवाडी १०८ ते ११०
डबीर अनाजी त्रिंबक ८१, ११२
डबीर त्रिंबक महादेव ८८
डाकमळा ११०
डेव्हिस ( कॅप्टन ) २१, २५, ३६, ३७, ७१, ७८, ९८, १४१
ताडभाट ११२
तेली बापू ९२
थळ १, ७, ११, ३२, ८५, १०७
थथे रामचंद्र बल्लाळ ११७
दांडेकर बाळाजीपंत ८६
दातार विष्णु गणेश ९०
दातेवाडी ११०
दामले गोविंद कृष्ण ११२
दिवाणखार १५, १८, २५, २७ ते २९, ३१ ३३, ३४, ३८, ४२, ४६, ४९, ५०, ६७ ते ६९, ७३, ७४, ७६, ८७, ९०, ९६, ९९
दिवाणवाडी १०९
देव चिंचवडकर ३७, ६१, ९९
देवदेवेश्वर ( मंदिर ) ९२
दौलतखान ( दर्यासारंग ) ८, ९
धनजी रुस्तुमजी ३०
धर्माजी आप्पाजी ३२
धाकुलवाडी ११२
नागेश्वर ( मंदिर ) ९१, १०६, १२७, १२८, १३८—चें तळें १२७—ची यात्रा १२८
नारपाटील बाजी मल्हार २०
नारायण ( मंदिर ) ६१, १०७, १३१
नारायणस्वरूप संन्यासी ३८, १२७
नेने बलवंत वासुदेव ८१, ९८, ९९, ११७
पटवर्धन चिंतो राम १०६, १०९, १११, ११४, १२३, १३६
पटवर्धन रामचंद्र जगन्नाथ १२९, १३१, १३२, १३६
पनवेल ६६, ७९
परांजपे गोविंद राम १००
पवार गुणाजी १६
पाईक ६
पांडुरंग बाजी ६९
पाथरली ( तळें ) ९१, १४०
पाटणकर बाळाजी नाईक ९३
पाटील लक्ष्मण ३२

पालव ५०
पुणें १५, ६९, ८४, ८६, १२५
पुराणिक गंगाधर रामचंद्र २०, २२, १०६
पुराणिक वीरेश्वरभट १०६, ११७
पुराणिकवाडी ९७
पेशवे नानासाहेब ( बाळाजी बाजीराव ) १०, ११, ८५
पेशवे नारायणराव ८८
पेशवे पार्वतीबाई १२९
पेशवे गणेशभट १०२
फडके आप्पाशास्त्री १२, १०६
फडके गंगाधरशास्त्री १०२, १०५, १०९ १२५
फडके गोविंद रामचंद्र १६, १७,
फडके नारायण ६९, १००, १०६, ११५, ११८, १२१
फडके रघुनाथशास्त्री १०० ते १०३, १०५
बर्वे त्रिंबकभट ८६, १००
बहिरी (बहिरव, मंदिर) १३२, १३८
बागमळा ( नवेदर) १२, १५, २५, २७ ते २९, ३१, ३३, ३४, ५१, ७३, ८७, ९६
बामणगाव ( महाल, तर्फ ) १, १५, १६, ३५, १०३, १०८, १३३ १४१
बालकृष्ण ( मंदिर ) १३८
बिवलकर परशराम श्रीधर ३८
बिवलकर विनायक परशराम उर्फ बावाजी दिवाणजी ३४, ३८, ६०, ६१, ७३, १४१
बेलवली १०१
भातखंडे भास्करभट १०२, ११६, १२२
भावई (पाखाडी) ८७, ८८
भिकाजी गोविंद २२
भिडे गणेश गंगाधर २८
भीमेश्वर (मंदिर) ३, ९२, १०७, १२६, १२९, १३१
भेरसें १०३, १०५, १०६, १४१
मयुरे गणेश विठ्ठल १०५
मराठे वाबूभट ९९, १०४
महाजन ३८, ६५, ६८, ८६, ८८, ९५
महाजन केशव गणेश ११, १००, ११०, १३०
महाजन नारो शंकर १२४
महाजन महादेव बापुजी २८
महाजन राघो अनंत ९२, १०९, ११८, १२२
महाजन वासुदेव बल्लाळ २०, १०९, ११८, १२१, १२३, १२४
महाजन विसाजी बाळकृष्ण ६, ११०, ११८, १२२
महालक्ष्मी महाकाली ( मंदिर ) १०६, १३५, १३६, १३८
मांडवी (बंदर अलीबाग) ३६, १०५
माने (पाटील) ३८, ८०, ९५
माया नाईक ७,८
मुख्य विनायक ( मंदिर ) १३७
मुंबई १, ६, ७, ९, १२, १५, २७, ३० ३५, ३६, १२५, १४१
मुळें ८४
मैराळ पांडुरंग १६, ६२
मोघे महादाजी अनंत १५, १०५
म्हात्रे ( वैद्य ) गोद ८१
म्हात्रे ( वैद्य ) पांडू ९४, १०५
योगेश्वरी ( मंदिर )१३७, १३८
रामताड ६१
रामराज १५
रामेश्वर ( मंदिर) १३३
रायवाडी १३८
रिसबूड गोविंदभट ८७, १०१, १०२, ११६
रिसबूड नारंभट १२९
रेवदंडा १, २, ११, ५१, ९०, १०७, ११३ १२१, १४१,
रोठमळा १२४
लालघोडा ११२
लक्ष्मीनारायण ( मंदिर ) १३३
लक्ष्मीनृसिंह ( मंदिर ) १३८.
लेले बाळकृष्णभट १२, ९७, ९९, १००, १२७

लेले बाळाजी महादेव २५, ९६, ९९, १०२, १०४, ११६
लेले भिकाजी हरि १०३, १२३
लेले वासुदेवभट ९८, १२०
लेले विश्वनाथभट ८४, ९७ ते ९९, १२०
लेले हरिभट ८३, ८४
लोंढे कृष्णाजी ६
लोंढे गणेश त्रिंबक १०६, ११७
लोंढे नारो धोंडदेव १०९
लोंढे बाबूराव २२
लोंढे बाळाजी विष्णु ३४, ३६
लोंढे विठोबा १२९
लोंढे शिवाजी विठ्ठल २०, ४२, ११७, १२१, १२२
वझे रघुनाथभट १००, ११२
वढव १०६, १०८
वणोली १००, १२३
वरडें १००, १०१, १०६
वरसोली १, १०, ११ ८५, १०५
वर्तक ३३, ३८, ६५, ६८, ६९, ८०, ८७, ८८, ९१, ९३, ९५
वर्तक गणू १३७
वर्तक बापू महाद ६८, ९१
वर्तक राम ६
वर्तक हरि ४
वाघजाई पर्वतवासी ३७
वाड हरि बच्च्याजी १०९, १३३
वाडवळ भटंभट ९९, १०३
वेताळ ( मंदिर ) १३८
वैशंपायन गोविंदभट ३२, ८५, १०२
वैशंपायन विश्वनाथभट ८६
वोढण ( पाखाडी ) ८७
वंकनाथ ( मंदिर ) १३०, १३८
शिद्दी ६, ७, ९, ११, ७१
शिरढोण ६६, ७९
शिवपार्वती ( मंदिर ) १३८
शिवाजी १, ५ ते ९, ४३, ८०, ८४, ९५
शिपी रामशेट १२, १७
शुक्ल बापूशास्त्री ९२, १२५
श्रीगांव ६९
श्रीबाग ३६, ६०, ६८, १०७
सदाशिव बाग १८
सदाशिव विश्वनाथ १७
सहस्रबुद्धे अंताजी गणेश १५, २०, २२, ४२, ९७, ११७, १२१, १२४
सहस्त्रबुद्धे धोंडो गणेश ११
सहस्त्रबुद्धे बालाजी गणेश १३१
सहाण १००, १०१
साखर १, ६, ११, १२
सागरगड ( खेडेदुर्ग ) १, २, ९ ते ११, ३७, ३८, ६०, ६६, ७८
सातताड १८, १९, ६१, १४०
सिद्धिविनायक ( मंदिर ) १३४
सूर्यनारायण ( मंदिर ) १३८
सोनार अर्जुनशेट ४२
सोनार पांडूशेट ( पोतदार ) ८१
सोनार मोरशेट पांडूशेट २९
सोनार सखारामशेट ९३
सोभागदास नरोत्तमशेट ३८
सुंदर नारायण ( मंदिर ) १३८
हनुमंत ( मंदिर ) १३२
हरिहरेश्वर ( मंदिर ) १३८
हाटाळें १२, ३२, ६९, १२८
हंबीरराव महाराजाधिराज ३
होळकरीण अहिल्याबाई १३०

# संदर्भ-ग्रंथ-सूची

[चौकटी कंसांत संदर्भग्रंथाचा पुस्तकांत वापरलेला संक्षेप दिला आहे.]


१. आंगरेकालीन अष्टागर [आंअ] – सं. प्र. शां. वि. आवळसकर, यशोदा चिंतामणि-निधि पुरस्कृत ग्रंथमाला क्र. १६, अ. वि. गृह, पुणें १९४७.

२. आंगरेकालीन पत्रव्यवहार [आंप] – सं. शां. वि. आवळसकर, प्र. चिं. ग. कर्वे, भा. इ. सं. मंडळ, स्वीय क्र. ७१, जनार्दन सदाशिव लि., पुणें १९४८.

३. अष्टागरांतील क्रमवंत घराण्याचा इतिहास – ले. ग. दा. टिल्लू, कों. ए. सो. प्रिंटिंग वर्क्स, अलीबाग १९२८.

४. ऐतिहासिक लेखसंग्रह भाग ११ वा [ऐलेसं.] – सं. वा. वा. खरे, मिरज, आर्यभूषण, पुणें १९२२.

५. काव्येतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेले ऐतिहासिक पत्रें, यादी वगैरे लेख [कासंपया] – आ. २ री, शं. न. जोशी, चित्रशाळा, पुणें १९३०.

६. कुलाबकर आंगरे सरखेल (आंगरे शकावली) – ले. दा. गो. ढबू, शं. ना. जोशी, कर्नाटक प्रि. प्रेस, मुंबई शके १८६१.

७. पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद खंड २४ व ३० – सं. गो. स. सरदेसाई, प्र. मुंबई सरकार. सरकारी छापखाना, मुंबई १९३२, १९३३.

८. बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी अंक १ [बाबापेरो] – सं. द. ब. पारसनीस; डे. व्ह. ट्रा. सोसायटी. निर्णयसागर, मुंबई, १९०७.

९. सवाई माधवराव पेशवे (रोजनिशी) निवडक उतारे अंक २ रा. [समापेरो] – सं. का. बा. मराठे, डे. व्ह. ट्रा. सोसायटी. जगद्धितेच्छु, पुणें १९०९.

१०. माझे प्रवासाची हकीकत (रोजनिशी) – ले. गो. बा. जोशी, बडोदें सरकार प्रकाशन, बडोदें, १८९६

११. भारत इतिहास संशोधक मंडळ वार्षिक इतिवृत्त शके १८३५ [इति. मं. १८३५] – प्र. खं. चिं. मेहेंदळे, आर्यभूषण, पुणें, शके १८३६. भा. इ. सं. मं. ग्रं. पु. ७ वें.

१२. श्रीमहापुरुष ब्रह्मेन्द्रस्वामी धावडशीकर (चरित्र व पत्रव्यवहार) [ब्र. च] — ले. द. ब. पारसनीस, बाबाजी सखाराम आणि कं., निर्णयसागर, मुंबई १९००.

१३. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २ रा, ३ रा, [राखं] — सं. वि. का. राजवाडे, प्र. वि. गो. विजापूरकर, श्रीसमर्थप्रसाद, कोल्हापूर १९००, १९०१.

१४. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ४ था [राखं] — सं. वि. का. राजवाडे, प्र. शं. न. जोशी, चित्रशाळा, पुणें १९००.

१५. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १ व २ [शिपसासं] — शिवचरित्रकार्यालय, भा. इ. सं. मंडळ, न. चि. केळकर, द. वि. आपटे; आर्यसंस्कृति, पुणें १९३०, होळकर सरकार ग्रंथमाला नं. २४.

१६. शिवचरित्रसाहित्य खंड ९ वा (चौल अधिकारी दप्तर) [शिचसाखं. ९] — सं. शां. वि. आवळसकर, प्र. मुजुमदार, कर्वे, जोशी, आर्यभूषण, पुणें १९४४, भा. इ. सं. मंडळ स्वीय ग्रं. क्र. ६२.

१७. पंचामृत — सं. कृ. के. राहाळकर, अलीबाग.

१८. Bombay and the Sidis [B S] — By. D. R. Banaji, The University of Bombay, Macmillan & Co. Ltd., Bombay, 1932.

१९. Kolaba Gazetteer [कुगॅ] — By. James M. Campbell, Bombay, 1883.

२०. Selections from the Records of Bombay Government, Vol VII.


## १. अमुद्रित साधनें

पेशवे दप्तरांतील रुमाल (उत्तर कोंकण)

(अ) कोंकण प्रांत अजमास रुमाल नं. २०१३ — [कोंअरु नं.]

(ब) कोंकण प्रांत जमाव रु. नं. १३७, ५०६ — [कोंजरु नं.]

(क) आंगरे दप्तर रु. नं. १८, ४५, ४७, ४८, ८३, १३४, १३५, १६४, १६६, १६८, १७४, २४४, २४६, २४७, २४९, २५२, ३८४, ३८८, ३९६, ६०१, ७६१. [आंदरु नं.]

(ड) महाल नागाव रु. नं. ६३६, ६३७, ६३८. — [म. ना. अप्रपेदरु नं.]

२. लेखकाच्या संग्रहांतील अमुद्रित साधनें. — [अप्र. कागद]

गोखले अर्थशास्त्र संस्था
पुणें ४

पॉप्युलर बुक डेपो

मुंबई ७